१८६३

म. ग्रं. सं. ठाणें

विषय चरित्र

सं. क्र. १११३

REFBK-0013183

REFBK-0013183

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 3 ४८८२० वि: ...
क्रमांक ........ नों दि: ...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५८२८ वि: चरित्र
क्रमांक ७००३ नों दि: २.५.६३

# विन्स्टन चर्चिल

वसन्त शान्ताराम देसाई

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
83703

मूल्य रुपये ७·५०

REFBK-0013183
REFBK-0013183

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली
मार्च १९६३

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
'व्हीनस प्रकाशन'
'तपश्चर्या'
३८१ क, शनिवार पेठ : पुणें २

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव पेठ, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३५८८५ दि: २।१९
११७३ नों दि: २.५.६३
क्रमांक

## प्रस्तावना

विन्स्टन चर्चिल हे एक कट्टे साम्राज्यवादी मुत्सद्दी असून संपूर्ण स्वातंत्र्याच्या दिशेने सुरू असलेल्या भारताच्या वाटचालींत ते पदोपदीं अडथळे आणीत आहेत इतकीच माहिती, १९४० सालापर्यंत आणि त्या-नंतरसुद्धा, चर्चिल यांचेसंबंधी हिंदी जनतेला होती. परंतु, चर्चिल हे प्रथम लोकशाहीचे निष्ठावंत उपासक आणि नंतर साम्राज्यवादी असल्यामुळे, ब्रिटिशांच्या लोकशाहीने सार्वभौम आणि प्रजासत्ताक अशा भारताची प्रतिष्ठापना, १९४७ सालीं, केल्यानंतर चार्चिल यांनी ती घटना खिलाडू वृत्तीने मान्य केली. इतकेंच नव्हे, तर भारताचे नेते, पंडित जवाहरलाल नेहरू, यांना मानाचें आमंत्रण देऊन त्यांचा आपल्या निवासस्थानीं पाहुणचार केला.

गेल्या जागतिक युद्धांत ब्रिटिश राष्ट्र, एकाकी आणि जवळजवळ निःशस्त्र स्थितींत हुकुमशाही राष्ट्रांच्या तावडींत सापडलें असतां, चर्चिल यांचें एक निराळेंच स्वरूप भूतलाला दिसलें. भूतलावरील स्वतंत्र राष्ट्रांच्या आणि लोकशाहीच्या सर्व आशा आणि आकांक्षा चर्चिल यांच्या उक्तींत आणि कृतींत, १९४० सालच्या मे महिन्यापासून, व्यक्त होऊं लागल्या. त्या वेळच्या त्यांच्या उक्ति आणि कृति म्हणजे परचक्राच्या संकटांत सापडलेल्य राष्ट्राला अंतिम विजयाचा मार्ग दाखविणारी गीताच समजली पाहिजे.

चर्चिल यांच्या चरित्राकडे आणि साहित्याकडे माझें मन १९४० सालीं आकर्षित झालें आणि त्यानंतर मी त्यांच्यासंबंधी दोनतीन लेखहि लिहिले. तीन वर्षांपूर्वी मीं लिहिलेलें बालगंधर्व यांचें चरित्र व्हीनस प्रकाशनचे श्री. स. कृ. पाध्ये यांनी प्रकाशित केलें. तें पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर असतांना, ‘ केसरीचे ’ सहसंपादक, श्री. ल. ना. गोखले, यांनी मीं चर्चिल यांचें चरित्र लिहावें अशी सूचना केली आणि श्री. पाध्ये यांनी तिला तत्काळ दुजोरा दिला. त्यामुळे मी या चरित्रलेखनाला प्रवृत्त होऊन, त्याचें

हस्तलिखित १९६२ च्या जून महिन्यांत पूर्ण केलें. पुस्तकाचे प्रकाशक श्री. पाध्ये, मुद्रक श्री. यशवंतराव जोशी आणि त्याची सजावट करणारे श्री. वि. शं. पाथरकर यांचा मी फार आभारी आहें.

लक्ष्मी, सरस्वती आणि महिषासुरमर्दिनी या तिघीहि देवतांचा चर्चिल यांचेवर वरदहस्त असावा, हा योग अपवादात्मकच समजला पाहिजे. चर्चिल यांच्या कार्यांचा आणि साहित्याचा विस्तार इतका मोठा आहे, की त्याचा परामर्श घेण्याकरिता शेकडो पृष्ठांचा विस्तारसुद्धा अपुरा ठरेल. अशा स्थितींत मराठी वाचकांना त्यांच्या चरित्राचें धावतें दर्शन घडवून, त्यांचें आणि त्यांच्यासंबंधीचें साहित्य वाचण्याची हौस निर्माण व्हावी या प्रमुख हेतूने मीं हें पुस्तक लिहिलें आहे.

—आतापर्यंत मीं कला आणि कलावंत यांजबद्दलच प्रामुख्याने लिहिलें असल्यामुळे, मी चर्चिल यांचें चरित्र लिहीत आहें असें समजतांच माझ्या एका संगीतप्रेमी प्राध्यापक मित्राने उद्गार काढले, " चर्चिल हे एखादे नट किंवा गायक आहेत की काय ! "

—चर्चिल हे नट नाहीत आणि गायकहि नाहीत ! परंतु, नाट्य हा त्यांच्या चरित्राचा आत्मा असून, त्यांच्या साहित्यांत आणि वक्तृत्वांत संगीतासारखीच मनाला धुंद करण्याची शक्ति आहे.

पुणें, ता. ७-३-६३

वसन्त शान्ताराम देसाई

* * *

# संदर्भ ग्रंथ


My Early Life ( Winston Churchill )
Great Contemporaries ( Winston Churchill )
Thoughts & Adventures ( Winston Churchill )
War Speeches—1940–42 ( Winston Churchill )
Second World War Vols. I to VI (Winston Churchill)
Roosevelt & Hopkins, Vols. I & II ( Robert Sherwood )
Winston Churchill ( Philip Guedella )
Winston Churchill ( Robert Taylor )


* * *


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ दि. ........
क्रमांक ........ नों. दि. ........

# विन्स्टन चर्चिल

१. मार्लब्रोचें घराणें–बालपण–शालेय जीवन .... १–१२
२. पहिला अपघात–लष्करी शिक्षण–पिता आणि पुत्र–लष्करी नोकरींत प्रवेश .... १३–२०
३. राणीची कारकीर्द–वार्ताहराचा वेश आणि क्यूबाची मोहीम –हिंदुस्थानांतील वास्तव्य .... २१–३०
४. मलकंदची मोहीम–साहित्य-सेवेची सुरुवात–किचनेर आणि सुदानचें युद्ध .... ३१–४१
५. लष्करांतल्या नोकरीचा राजीनामा–राजकारणांत प्रवेश –पहिल्या निवडणुकींतला पराभव .... ४२–४६
६. बोअर युद्धाची सुरुवात–चिलखती गाडींत–जनरल बोथाच्या कैदेंत .... ४७–५५
७. प्रिटोरियाच्या तुरुंगांत–अटकेंतून सुटका–पंचवीस पौंडांचें बक्षीस .... ५६–६२
८. फरारी कैद्याचा प्रवास–अनोळखी माणसाचा आसरा –रणांगणावरील संचार .... ६३–७३
९. पार्लमेंटांत प्रवेश–मैदानी वक्तृत्वाचा महापूर.... ७४–७८
१०. पार्लमेंटांतलीं पहिलीं भाषणें–पक्षत्याग–स्त्रियांचा विरोध–मंत्रिपद आणि विवाह .... ७९–८६
११. उमरावांचे विरोधक–गृहमंत्रिपद–आरमाराचे मंत्री ८७–९६
१२. पहिलें महायुद्ध–अँटवर्पचा पाडाव–दार्दानेल्सची दुर्दैवी मोहीम .... ९७–१०२

१३. फ्रान्सच्या रणांगणावर–चित्रकलेवर आक्रमण–हुजूरांचा विरोध .... १०३–१०६
१४. अंतराळांत संचार–वसाहतींचें मंत्रिपद–एकांडा शिलेदार–हुजूरपक्षांत प्रवेश .... १०७–११७
१५. संपकाळांतले संपादक–अधिकारशून्यता आणि अप्रियता–आठव्या एडवर्डची प्रेमकथा .... ११८–१२५
१६. सिंहावलोकन .... १२६–१३०
१७. तह नव्हे, युद्धतहकुबी–हिटलरचा उदय–बाल्डविन यांची निष्क्रियता .... १३१–१४०
१८. हिटलरचीं उद्दिष्टें–शांततापूजक चेंबरलेन–म्युनिक करार–'चर्चिलना बोलवा'–दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात.... १४१–१५२
१९. तेव्हा आणि आता–आधुनिक युद्धाचें पहिलें प्रात्यक्षिक–"हिटलरची गाडी चुकली"–"चालते व्हा"–पंतप्रधान चर्चिल .... १५३–१६१
२०. पांच वर्षांत–१९४० सालांतल्या घटना–रक्त, अश्रु आणि कष्ट–डंकर्कचा संग्राम .... १६२–१७०
२१. तो उज्ज्वल क्षण–ब्रिटिशांचें अग्निदिव्य–चर्चिल आणि रूझवेल्ट–आफ्रिकेंतला विजय–१९४० सालच्या शेवटीं .... १७१–१८१
२२. १९४१ सालची पहिली सहामाही–हिटलरचे छत्रिधारी सैनिक–रशियावर हल्ला–अटलांटिक सनद–जपानी साहस .... १८२–१९२
२३. संयुक्त राष्ट्रसंघ–सिंगापूर आणि ब्रह्मदेश–मॉस्कोची सफर–एक संस्मरणीय प्रसंग–दुसरी आघाडी–विजयाचा क्षण .... १९३–२०३
२४. चर्चिल यांच्या चिठ्या–जपानची शरणागति–कम्युनिस्टांचीं नखें–रूझवेल्ट यांचा मृत्यु–रशियन संकट–हुजूरपक्षाचा पराभव .... २०४–२१८

२५. चित्रकार चार्चिल–साहित्यसेवा–युद्धकालीन भाषणें.... २१९–२४८
२६. दिनचर्या–मनोरंजन–वैवाहिक जीवन .... २४९–२५५
२७. साहित्याचें नोबेल पारितोषिक–अविस्मरणीय वाढदिवस–राजकारणाला रामराम–"एकदाच करण्यासारखा प्रवास" .... २५६–२६१

* * *

१

## सिंहगर्जना

—त्या बेटावर झेप घालण्याकरिता उद्युक्त झालेला शत्रु लष्करी दृष्ट्या जितका सुसज्ज तितकाच पराक्रमी होता. त्याच्यासमोर कोणाचा निभाव लागेल अशी कोणालाच शाश्वती वाटूं नये, असे नेत्रदीपक विजय त्याने मिळविले होते. त्याच्या लष्करी सामर्थ्याच्या प्रचंड प्रहारामुळे त्याच्याशीं तुल्यबल आणि समर्थ समजलीं गेलेलीं राष्ट्रेंसुद्धा एखाद्या पत्त्यांच्या बंगल्या-प्रमाणे कोलमडलीं होतीं. जणू काय, कर्दनकाळच अशा त्या शत्रूशीं, जवळ जवळ एकाकी स्थितींत, मुकाबला करण्याचा प्रसंग त्या चिमुकल्या बेटाच्या पुढाऱ्यांसमोर आणि प्रजाजनांसमोर येऊन ठेपला होता ! इतरां-प्रमाणे आपलाहि चुराडा उडूं नये म्हणून तें बेट शरण जाईल अशी अनेकांना खात्री वाटत होती—शरण जावयाचें तें आज की उद्या, इतकाच प्रश्न शिल्लक उरला होता !

—अशा परिस्थितींत त्या बेटाच्या—त्या पुरातन राष्ट्राच्या सहासष्ट वर्षें वयाच्या वृद्ध नेत्याची गर्जना ऐकूं आली—"आम्ही जमिनीवर लढूं, आकाशांत लढूं आणि समुद्रांत लढूं ! आम्ही रस्त्यावर, गल्लीबोळांत, शेतांत आणि वाळवंटांत लढूं—पण कदापि शरण जाणार नाहीं !"

तो बलाढ्य शत्रु आणि तें चिमुकलें राष्ट्र, भूतलावर एकतंत्री, लष्करी आणि हुकूमशाही राजवट स्थापन करण्याची त्या शत्रूची महत्त्वाकांक्षा आणि त्याच्या पंजांपासून तत्काळ पावेतो मुक्त असलेल्या राष्ट्रांची स्वातंत्र्यलालसा, यांच्यामध्ये त्या चिमुकल्या राष्ट्राला वेढणारा समुद्राचा पट्टा—एक अरुंद खाडी—आणि सिंहगर्जना करणारी ती व्यक्ति, या दोनच गोष्टींचा अडथळा उरला होता !

आपल्या नेत्याची गर्जना ऐकून त्या चिमुकल्या बेटांतील त्याच्या देश-बांधवांच्या रोमरोमांत नवचैतन्य निर्माण झालें. त्याची ती गर्जना ऐकून अखिल भूतल आश्चर्यचकित झालें; इतकेंच नव्हे, तर तो बलाढ्य शत्रूसुद्धा क्षणमात्र तरी थक्क झाला !

* * *

१९४० सालीं फ्रान्ससारख्या बलाढ्य राष्ट्राला, डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तोंच, नामोहरम करणारा जर्मन राष्ट्राचा भाग्यविधाता हिटलर हाच तो बलाढ्य शत्रु , त्याच्या समोर एकाकी स्थितींत सापडलेलें ब्रिटन हेंच तें चिमुकलें बेट आणि विन्स्टन चर्चिल हाच ती सिंहगर्जना करणारा ब्रिटिशांचा त्या प्रसंगीचा नेता !

* * *

**मार्लबरोचें घराणें :**

जॉन चर्चिल या नांवाचा एक निष्णात योद्धा आणि कुशल सेनापति ब्रिटिशांच्या इतिहासांत होऊन गेला. १७०२ सालीं फ्रान्सवर स्वारी करून त्याने फ्रेंचांचा पराभव केला म्हणून इंग्लंडच्या राणीने त्याला ' ड्यूक ऑफ मार्लबरो ' हा किताब आणि पांच हजार पौंडांचें वर्षासन देऊन त्याचा सन्मान केला; आणि तेव्हापासून जॉन चर्चिल हा ' मार्लबरोचा पहिला ड्यूक ' म्हणून ओळखला जाऊं लागला.

राणीने केलेल्या त्या बहुमानामुळे मार्लबरोच्या मनांत अधिक मोठा पराक्रम करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा प्रज्वलित झाली. १७०४ सालीं फ्रेंचांचें सैन्य युरोपांत धुमाकूळ घालतें आहे असें पाहून मार्लबरोने, युरोपांत उतरून, ब्लेनहिम येथे फ्रेंचांचा प्रचंड पराभव केल्यामुळे युरोपातील फ्रेंचांचें वर्चस्व तात्पुरतें तरी संपुष्टांत आलें.

ब्लेनहिम येथील विजयानंतर मार्लबरो स्वदेशीं परतला त्या वेळीं इंग्लंडांत लोकशाहीची स्थापना झाली होती. लोकसभेची संमती घेऊन आणि दोन लक्ष चाळीस हजार पौंड खर्च करून राणीने ड्यूकसाहेबांना जो एक भव्य वाडा बांधून दिला, तो ' ब्लेनहिम प्रासाद ' म्हणून ओळखला जाऊं लागला. त्याचें आवार सत्तावीसशे एकरांचें असून वाड्यांत एकंदर तीनशेवीस

खोल्या होत्या. अनेक मैदानें, उद्यानें, हिरवळी, तलाव, झरें आणि शिकारीसाठी राखून ठेविलेलीं जंगलें यांनी ब्लेनहिम प्रासादाचें आवार समृद्ध होतें.

* * *

**‘ संपूर्ण माणूस ’ :**

याच ब्लेनहिम प्रासादांत विन्स्टन चर्चिल यांचा, ३०-११-१८७४ रोजीं, जन्म झाला. मार्लबरोच्या सातव्या ड्यूकसाहेबांचे चिरंजीव, लॉर्ड रॅन्डॉल्फ चर्चिल, हे विन्स्टनचे वडील. रॅन्डॉल्फ चर्चिल हे त्यांच्या शालेय जीवनांतसुद्धा विनोद आणि वाक्पटुत्वाबद्दल प्रसिद्ध होते. लिओनार्ड जेरोम नावाच्या एका सधन अमेरिकनाच्या जेनी नांवाच्या सुंदर मुलीबरोबर रॅन्डॉल्फ यांचा १८७३ सालीं विवाह झाला आणि त्याच वर्षीं ते पार्लमेंटांत निवडून आले. रॅन्डॉल्फ यांनी पार्लमेंटांत जें अगदी पहिलें भाषण केलें त्याला अनुलक्षून, “ त्यांच्या परिणामकारक वाक्पटुत्वामुळे सबंध सभागृह प्रथम आश्चर्यचकित आणि नंतर मंत्रमुग्ध झालें ” असे उद्गार इंग्लंडचा त्या वेळचा मुख्य प्रधान, डिसरेली, याने काढले होते.

लिओनार्ड जेरोम हे अमेरिकेंतील न्यूयॉर्क शहराचे नागरिक होते. ‘ न्यूयॉर्क टाईम्स ’ नांवाच्या वृत्तपत्राचे ते मालक असून, घोडयांच्या शर्यतीचीं दोन मैदानेंसुद्धा त्यांनी स्थापन केलीं होतीं. लंडनमध्ये असतांना एक सर्कस पाहायला ते गेले त्या वेळीं, “ माझ्याशीं पांच मिनिटेंसुद्धा जो मुकाबला करूं शकेल त्याला मी पन्नास पौंड बक्षीस देईन ” अशी त्या सर्कशींतल्या पेहेलवानाची घोषणा त्यांना ऐकूं आली. जेरोम हे तत्काळ जागेवरून उठले, हातांतली काठी बाजूला ठेवली आणि त्या पेहेलवानाशीं चार हात करून त्यांनी त्याला चीत केला ! वाक्पटुत्वांत कुशल अशा पित्याच्या आणि वाटेल तें आव्हान स्वीकारणाऱ्या एका बेडर माणसाच्या मुलीच्या पोटीं चर्चिल यांनी जन्म घेतला.

अटलांटिक महासागराने विभागलेल्या इंग्लंड आणि अमेरिका या इंग्रजी भाषिक राष्ट्रांच्या नागरिकांत त्या काळीं क्वचितच विवाह होत असल्यामुळे, रॅन्डॉल्फ यांचा विवाह हा कांहीशा प्रतिकूल चर्चेचा विषय झाला होता. परंतु, त्यानंतरच्या इतिहासांत इंग्लंड आणि अमेरिका हीं, जणू काय, जुळीं

भावंडें आहेत असें मानण्यांत येऊं लागलें. विन्स्टन चर्चिल हे एकदा अमेरिकेंत भाषणें करण्याकरिता गेले असतां त्यांच्या एका भाषणाच्या वेळीं अमेरिकेचा सुप्रसिद्ध विनोदी लेखक मार्क ट्वेन हा अध्यक्ष होता. चर्चिल यांची ओळख करून देतांना तो म्हणाला, " आजचे व्याख्याते हे पित्याच्या बाजूने इंग्रज आणि मातेच्या बाजूने अमेरिकन आहेत. बंधुभगिनींनो, आपल्यासमोर आज एक संपूर्ण मनुष्य उभा आहे. "

लॉर्ड रॅन्डॉल्फ हे अत्यंत बुद्धिमान्, उत्कृष्ट वक्ते आणि विनोदपटु होते, तर त्या काळांतील अत्यंत सुंदर स्त्रियांत विन्स्टनच्या मातोश्रींची गणना होत असे. " तिच्या केसांत खोवलेल्या हिऱ्याचें तेज तिच्या डोळ्यांच्या तेजापुढे निष्प्रभ झाल्यासारखें वाटतें, " असें वर्णन तिच्या कांही समकालीनांनी केलें आहे. " संध्याकाळच्या तारकेप्रमाणे ती तेजस्वी होती. मला तर ती एखाद्या अप्सरेप्रमाणे भासत असे, " असे उद्गार चर्चिल यांनी काढले आहेत.

संपूर्ण नऊ महिने भरण्यापूर्वींच चर्चिल यांचा जन्म झाला आणि त्यानंतर सुद्धा अशा अनेक घटना घडल्या की, ' नेहमी घाईत असणारा तरुण ' असा त्यांचा निर्देश करण्यांत येऊं लागला. परंतु नेहमी घाईत असलेला हा तरुण कोणत्याहि कार्यक्रमाला ठरलेल्या वेळीं हजर राहिला आहे असें कधीच घडलें नाहीं. एका समारंभाच्या वेळीं इंग्लंडचे युवराज हजर राहणार आहेत हें माहीत असूनसुद्धा चर्चिलनी उशीराची संगत सोडली नाहीं. " मेहेरबान, आपण या उशीराचें कारण सांगूं शकाल काय ? "—असा प्रश्न युवराजांनी विचारिला तेव्हा त्यांना उत्तर मिळालें, " घरांतून बाहेर पडायलाच मला उशीर झाला ! "

विन्स्टनच्या वयाचीं दोन वर्षें पूर्ण होण्यापूर्वींच त्याच्या पितामहांची, म्हणजे मार्लबरोच्या सातव्या ड्यूकसाहेबांची, आयर्लंडचे व्हाइसरॉय म्हणून नेमणूक झाल्यामुळे चर्चिल–कुटुंबाला ब्लेनहिम प्रासादांतून आयर्लंडची राजधानी, डब्लिन, येथे स्थलांतर करावें लागलें. व्हाइसरॉयसाहेबांच्या खाजगी चिटणिसाची ( विनावेतन ) कामगिरी रॅन्डॉल्फ चर्चिल यांनी पत्करिली.

* * *

**व्रात्य आणि दुराग्रही :**

वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत विन्स्टनने डब्लिन येथील व्हाइसरॉयच्या प्रासादांत मुक्काम केला. लॉर्ड गफ नांवाच्या इंग्रजांच्या एका विख्यात सेनापतीच्या पुतळ्याचें अनावरण करतांना ड्यूकसाहेबांनी जें भाषण केलें त्यांतील, " आणि त्यानंतर जबरदस्त गोळीबार करून त्यांनी शत्रुसैन्याची फळी नेस्तनाबूत केली "—हें एकच वाक्य आपल्याला अद्याप आठवत असून, " माझ्या लहानपणची माझी ती अगदी पहिली आठवण आहे " असें चर्चिल सांगतात. प्रतापी मार्लबरोच्या वंशजाची पहिली आठवण रणांगणासंबंधीचीच असावी यांत नवल नाही !

आयर्लंड हा देश त्या वेळीं इंग्लंडचा अंकित असला तरी आपल्या देशाने सशस्त्र उठाव करून स्वातंत्र्य संपादन करावें असें प्रतिपादणारा ' फेबियन ' पक्ष आयरिश राजकारणांत उदय पावला होता. चर्चिल सांगतात, " मी एका गाढवावर बसून फेरफटका करीत होतों—माझ्यावर देखरेख करणारी मास्तरीण त्या गाढवाच्या पाठीवर हात ठेवून चालत होती. इतक्यांत बँडच्या सुरावर कवाईत करीत येणारे कांही लोक समोरून येतांना मला दिसले. ते फेबियन असावेत अशा समजुतीने आम्ही फार घाबरलों, कारण फेबियन लोक इंग्रजांना ठार मारतात असें आमचे नोकर नेहमी सांगत असत. पण मी घाबरलों होतों त्यापेक्षा माझें गाढव अधिक घाबरलें असावें ! आपली भीति व्यक्त करण्याकरिता त्या गाढवाने लाथा झाडायला सुरुवात केल्यामुळे मी त्याच्या पाठीवरून दूर फेकला जाऊन माझ्या कपाळाला जबर जखम झाली !—आयरिश राजकारणाशीं माझा पहिला परिचय झाला तो असा !—"

कोणाचाहि वरचष्मा विन्स्टनला बालपणापासूनच मान्य नव्हता. मातापितरांचें त्याच्यावर प्रेम असलें तरी इंग्रज कुटुंबांतील पद्धतीप्रमाणे त्याला शिकविण्याची आणि शिस्त लावण्याची जबाबदारी त्याच्या मास्तरणीवर सोपविलेली होती. लाल केस, निळे डोळे, कांहीसें फुगीर नाक आणि कांहीशी उद्दाम व बेछूट वृत्ति असलेल्या त्या मुलाला शिकविण्याचे आणि शिस्त लावण्याचे सर्व प्रयत्न निष्फल ठरले ! "माझ्यावर देखरेख ठेवणारी

मास्तरीण येणार म्हणून मला समजलें, त्या दिवशीं सर्वांचा डोळा चुकवून मी आमच्या वाड्याभोवतालच्या झाडींत लपून बसलों होतों. " " कोणाचेंहि न ऐकणारा–जगांतला अत्यंत व्रात्य आणि दुराग्रही मुलगा " असें विन्स्टनचें वर्णन त्याच्या अनेक मास्तरणींनी केलें आहे. त्याच्या व्रात्यपणामुळे बेजार होऊन अनेक मास्तरणी निघून गेल्या ! पण अखेर, त्याच्या कलाने वागणारी आणि त्याच्यावर मातेप्रमाणे ममता करून त्याच्या आयुष्याला वळण लावणारी एक मास्तरीण विन्स्टनला सुदैवाने भेटली–तिचें नांव मिसेस् एव्हरेस्ट !

विन्स्टनचें मन रमावें म्हणून एव्हरेस्टबाईंनी जे अनेक उपाय योजिले त्यांत सैनिकांच्या बाहुल्यांना महत्त्वाचें स्थान द्यावें लागेल. बाईंनी सुरुवातीला आणलेल्या बाहुल्यांकडे मार्लब्ररोच्या वंशजाचें मन ताबडतोब आकर्षिलें गेलें आणि त्यानंतर अधिक बाहुल्या जमविण्याच्या नादांत त्यांची संख्या पंधराशेपर्यंत पोहोचली ! त्या 'सैनिकांची' निरानिराळ्या तुकड्यांत विभागणी करून त्यांची व्यूहरचना करण्यांत विन्स्टन तासन्तास मग्न असे. त्याचा तो लष्करी नाद पाहून, " तूं सैन्यांत जाशील का ? " असा प्रश्न रॅन्डॉल्फ यांनी केला, तेव्हा त्यांना तत्काळ होकारार्थी उत्तर मिळालें ! " लष्करी विद्येंत मी पारंगत होईन हा माझ्या वडिलांचा विश्वास पाहून मला फार आनंद होऊन अभिमान वाटला ! उच्च शिक्षणाच्या बाबतींत मी नालायक आहें ही खात्री झाल्यामुळे मला लष्कराचा मार्ग सुचविला जातो आहे, हें त्या वेळीं माझ्या लक्षांतच आलें नाही ! "––

डब्लिन येथील व्हाइसरॉयच्या वाड्यांत विन्स्टनने चार वर्षें काढलीं असतील तोंच, म्हणजे १८८० सालीं, इंग्लंडांत हुजूर पक्षाचा पराभव होऊन डिसरेलीचें मंत्रिमंडळ गडगडलें आणि उदारमतवादी पक्ष अधिकारारूढ होऊन ग्लॅडस्टनसाहेब इंग्लंडचे मुख्य प्रधान झाले. या खांदेपालटामुळे आयर्लंडमध्ये नव्या व्हाइसरॉयची नेमणूक होऊन विन्स्टनच्या पितामहांना पुन्हा ब्लेनहिमला परतावें लागलें. आयर्लंड सोडल्यानंतर कांही दिवसांनी रॅन्डॉल्फ यांनी आपल्या पत्नीसह आणि चिरंजीवांसह लंडन शहरांत संसार थाटला.

* * *

**चुकलेलीं गणितें :**

अंकगणितांतील आकड्यांशीं विन्स्टनचा सुरुवातीपासूनच छत्तिसाचा आकडा होता. एव्हरेस्टबाई त्याला बेरीज आणि वजाबाकी शिकवूं लागल्या म्हणजे त्याची अक्षरशः पांचावर धारण बसत असे. "हे आकडे एकमेकांत मिसळून एकमेकांवर कोणता परिणाम करतील त्याला नियमच नव्हता— त्यांच्या उपद्रवामुळे आवडीच्या गोष्टी करणें तर दूरच राहो, पण साधी विश्रांति घेणेंसुद्धा अशक्य होऊन माझ्या जीवनावर एक प्रकारची कृष्णछाया पसरली ! गणितांतल्या उदाहरणांशीं गाठ पडल्यावर तर माझी परिस्थिति अधिकच बिकट झाली ! त्या उदाहरणांना, जणू काय, अंतच नव्हता ! एक उदाहरण सोडवून हातावेगळें केलें की, त्याची जागा दुसऱ्याने घेतलेली असावयाची ! अशीं उदाहरणें तयारच कां करतात तें मला समजेना !" गणिताप्रमाणेच लॅटिन भाषेचा अभ्यास आपल्या आवाक्याबाहेरचा आहे अशी विन्स्टनची खात्री झाली होती !

श्रीमंतांचीं मुलें बहुधा ज्या शाळेंत शिक्षण घेत असत अशा ॲस्कॉट येथील सेंट जॉर्जेस नांवाच्या शाळेंत वयाच्या सातव्या वर्षीं विन्स्टनने प्रवेश केला. त्याच्या व्रात्यपणावर मात करून शाळेंतील शिक्षक त्याला वळण लावतील अशी विन्स्टनच्या आईची अपेक्षा होती. त्या जमान्यांत क्वचितच दिसणारे विजेचे दिवे, फुटबॉल आणि क्रिकेटचीं मैदानें, पोहण्याचा प्रशस्त तलाव, स्वतंत्र प्रार्थनामंदिर अशा अनेक सुखसोयी 'सेंट जॉर्जेस' मध्ये होत्या, पण त्याबरोबरच अभ्यासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या किंवा व्रात्य मुलांना वठणीवर आणण्यासाठी 'छड्या मारण्याची' एक खोलीहि होती. त्या खोलींत विन्स्टनला वारंवार प्रवेश करावा लागत होता. शाळेचे मुख्याध्यापक चुकार विद्यार्थ्यांना अक्षरशः बदडून काढीत असत ! छड्यांच्या नियमित खुराकामुळे जवळ जवळ दोन वर्षांत विन्स्टनच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाला आणि एखाद्या 'सौम्य' शाळेंत त्याच्या शिक्षणाची व्यवस्था करणें अवश्य होऊन ब्रायटन येथील एका खाजगी शाळेंत त्याची रवानगी करण्यांत आली ! ब्रायटन हें एक उत्तम हवेचें ठिकाण असून तेथील शाळेंत दोन अध्यापिका होत्या, त्या मातेच्या वत्सलतेने विन्स्टनच्या शिक्षणाकडे लक्ष

देतील असा विश्वास त्याच्या मातेला आणि पित्याला वाटत होता.

—ब्रायटनच्या शाळेंत विन्स्टननें प्रवेश करून दोन आठवडे लोटले असतील नसतील, तोंच आपल्या शाळेंत एक छड्या मारणारा मास्तर पाहिजे असें त्या शाळेच्या चालकांना वाटूं लागलें ! शांततेच्या वातावरणांत इतकीं वर्षें चाललेल्या त्या शाळेंत, जणू काय, प्लेगचा एखादा उंदिरच पडावा अशी विन्स्टनच्या आगमनामुळे त्या शाळेची स्थिति झाली ! फुटबॉलच्या एका सामन्याच्या वेळीं विन्स्टन इतक्या विकाळ आरोळ्या ठोकीत होता, की त्यामुळे विरुद्ध बाजूचे खेळाडूच नव्हेत, तर विन्स्टनच्या बाजूचे खेळाडू आणि प्रेक्षकसुद्धा भयभीत झाले !

* * *

## हॅरो येथील शाळेंत :

ब्रायटन येथील शाळेंत विन्स्टनची अभ्यासांत आणि खेळांत प्रगति झाली नाही तरी पोहण्यांत आणि घोड्यावर स्वार होण्यांत प्रावीण्य संपादन करून, १८८८ सालीं हॅरो येथील सुप्रसिद्ध विद्यालयांत त्याने प्रवेश केला.

‘ एटन ’ आणि ‘हॅरो’ हीं इंग्लंडमधील इतिहासप्रसिद्ध विद्यालयें आहेत. या विद्यालयांचे विद्यार्थीच ब्रिटिशांच्या सार्वजनिक जीवनाचे नेते म्हणून कालांतराने मान्यता पावतात असा आजतागायतचा अनुभव आहे. विन्स्टनच्या पूर्वी चर्चिल घराण्यांतल्या सर्व पुरुषांनी ‘ एटन ’ च्या विद्यालयांत प्रवेश केला होता. परंतु, “ विन्स्टनचीं फुप्फुसें कमजोर असल्यामुळे त्याने चांगल्या हवेच्या ठिकाणीं राहिलें पाहिजे, ” असा सल्ला चर्चिल-कुटुंबाच्या वैद्यकीय सल्लागारांनी दिल्यामुळे, त्याची हॅरो येथील विद्यालयांत रवानगी करण्यांत आली. वैद्यकीय सल्लागारांनी त्याच्या फुप्फुसांच्या कमजोरीचें केलेलें निदान सर्वस्वी चुकीचें होतें हें विन्स्टनने सिद्ध केलें असलें, तरी त्या चुकीच्या निदानामुळेच त्याचा आणि हॅरो येथील विद्यालयाचा संबंध जुळून आला !

हॅरो येथील विद्यालयाचा विन्स्टनवर परिणाम होण्याऐवजी त्याच्या वास्तव्याचाच त्या विद्यालयावर परिणाम झाला असें म्हणता येईल. विद्यालयांत प्रवेश मिळविण्याकरिता जी परीक्षा द्यावी लागत होती, त्या परीक्षेंत

लॅटिन भाषेंतील मजकुराचें इंग्रजी भाषांतर करावें लागत असे. लॅटिन भाषेंतील मजकुराच्या दोन परिच्छेदांचें विन्स्टनने केलेलें भाषांतर वाचून विद्यालयाचे मुख्याध्यापक, डॉ. वेलडन, यांना कांहीच बोध होईना ! आणि बोध व्हावा तरी कसा? कारण, उत्तरपत्रिकेवर शाईचा एक डाग, पहिल्या प्रश्नाच्या अनुक्रमांकाच्या भोवतीचे दोन भले मोठे कंस आणि विद्यार्थ्यांचें ठळक अक्षरांत लिहिलेलें नांव यापलीकडे विन्स्टनच्या उत्तरपत्रिकेंत कांहीच दिसत नव्हतें ! इतका बोजवारा होऊनसुद्धा विन्स्टनला विद्यालयांत प्रवेश मिळाला ही डॉ. वेलडन यांची शहामतच समजली पाहिजे ! विद्यालयांतील शेवटच्या वर्गांत विन्स्टनला प्रवेश मिळाला, पण त्या वर्गाची सरहद्द साडेचार वर्षांनंतरसुद्धा तो ओलांडूं शकला नाही !

अभ्यासाकडे विन्स्टनचें दुर्लक्ष असलें तरी चालू घडामोडींच्या बातम्या तो अत्यंत दक्षतेने वाचून लक्षांत ठेवीत असे. हॅरो येथे प्रवेश मिळाल्यानंतर त्याला डेव्हिडसन नांवाच्या शिक्षकाच्या स्वाधीन करण्यांत आलें. डेव्हिडसनसाहेबांसमवेत विद्यालयाच्या आवारांत प्रवेश करतांना त्याने आपल्या पालकाला प्रश्न विचारला, “ लष्करी प्रश्नावर पार्लमेंटमधे नुकतेंच जें मतदान झालें, त्याबद्दल आपलें काय मत आहे ? ”—त्या प्रश्नामुळे ‘ पाल्या ’कडे पालक आश्चर्यचकित नजरेने पाहात राहिला !

विद्यालयाच्या शेजारीं असलेल्या खेड्याशीं संबंध ठेवूं नये अशी विद्यार्थ्यांना सक्त ताकीद असली तरी त्या खेड्यांत वारंवार फेऱ्या मारणें हा विन्स्टनचा आवडता उद्योग होता. विद्यालयाच्या आवारांत कुत्रीं आणण्याची बंदी आहे असें समजतांच विन्स्टनने दोन कुत्रीं खरेदी केलीं आणि खेड्यांतील एका खोलींत त्यांची स्थापना केली ! त्या खेड्यांतल्या एका गुप्त पोलिसाशीं विन्स्टनची मैत्री झाली होती. आपल्या कुत्र्यासमवेत आपल्या मित्राबरोबर फेरफटका करणें आणि प्रचलित घडामोडींवर गप्पा मारणें हा त्याचा आवडता छंद होता. देशांतल्या घडामोडींची आपल्या विद्यालयांतील विद्यार्थ्यांनाच काय, पण शिक्षकांनासुद्धा यत्किंचितहि कल्पना नाही असें विन्स्टनचें प्रामाणिक मत होतें. विद्यालयांतील विद्यार्थ्यांत विन्स्टन हा अतिशय लोकप्रिय होता. त्याच्या भोवती विद्यार्थ्यांचा घोळका नेहमीच जमलेला असावयाचा. तो उंच स्वरांत बोलायचा, आपण काय

बोलतों याची त्याला पूर्ण कल्पना असावयाची आणि कोणत्याहि वादाचें नेतृत्व त्याच्याकडेच असे ! त्याच्या विनोदी भाषणांमुळे विनोदाला भरती येत असे. स्टॅनले बाल्डविन आणि गॅल्सवर्दीसारखे विन्स्टनचे समकालीन विद्यार्थी अभ्यास करीत असत, अध्यापकांना घाबरत असत आणि विद्यालयाच्या नियमांचें पालन काटेकोरपणाने करीत असत. परंतु, व्रात्यपणाशिवाय विन्स्टनला, जणू काय, दुसरा धंदाच नव्हता !

* * *

**शालेय जीवन :**

आपल्या शालेय जीवनासंबंधी चर्चिल लिहितात,

" माझ्या शालेय जीवनामुळे मी फार निराश झालों होतों. आयुष्यांतील शर्यतीच्या सुरुवातीलाच मीं इतरांच्या इतकें मागे पडावें हा अनुभव विलोभनीय नव्हता. माझ्या आयुष्यांतला अत्यंत नावडता, निष्फळ आणि दुर्दैवी असा तो काळ होता. माझ्या बरोबरीच्या अनेक विद्यार्थ्यांना, अभ्यासांत किंवा खेळांत अनेक बक्षिसें मिळत असलीं तरी मला मात्र कोणतेंच बक्षीस मिळण्याचा संभव नव्हता." गणित आणि लॅटिन हे विषय विन्स्टनला भेडसावीत असले तरी इंग्रजी वाङ्मय आणि इतिहास हे त्याच्या अत्यंत आवडीचे विषय होते. " इतिहास, काव्य आणि निबंधलेखन या विषयांत माझी परीक्षा घ्यावी असें मला वाटत असलें, तरी माझे शिक्षक गणित आणि लॅटिनचे पक्षपाती होते. मला येतें तें त्यांनी मला विचारावें असें मला वाटत असलें, तरी मला येत नव्हतें तेंच ते नेमके विचारीत असत ! माझ्या ज्ञानाचें मीं आनंदाने प्रदर्शन केलें असतें, पण माझे शिक्षक माझ्या अज्ञानावरच प्रकाश टाकीत असत—या प्रकारांमुळे परीक्षा म्हटली कीं, माझें धैर्यच खचूं लागलें ! "

विन्स्टनचें धैर्य खचूं लागलें, पण व्रात्यपणा वाढतच होता ! विनोद आणि वाक्पटुत्व या गुणांमुळे विन्स्टन त्याच्यापेक्षा वरच्या वर्गाच्या विद्यार्थ्यांतसुद्धा लोकप्रिय असला, तरी वरच्या वर्गाच्या विद्यार्थ्यांनी खालच्या वर्गाच्या विद्यार्थ्यांत फारसें मिसळूं नये अशी हॅरो येथील विद्यालयाची प्रथा होती. पोहण्याच्या तलावाच्या काठावर एक किरकोळ बांध्याचा मुलगा

कमरेभोवती फक्त पंचा गुंडाळून उभा आहे असें पाहून, त्याला तलावांत लोटणें आणि त्याच क्षणीं त्याच्या कमरेभोवतीचा टॉवेल ओढून घेणें या दोन्ही क्रिया विन्स्टनने एकाच वेळीं केल्या! तलावांत लोटलेला तो अनोळखी विद्यार्थी घाबरून आरडाओरड करील अशी विन्स्टनची अपेक्षा होती, पण तसें कांहीच घडलें नाही! ज्या विद्यार्थ्यांनी तो प्रकार पाहिला त्यांनी विन्स्टनला विचारलें, " तूं कोणाची खोडी काढलीस माहीत आहे? सहाव्या इयत्तेंतला एल्. एस्. अमेरी—आपल्या शाळेंतला नांवाजलेला खेळाडू आणि तालीमबाज आहे तो!" अमेरी तलावांतून बाहेर येतो आहे असें पाहून विन्स्टनने पळ काढला, पण त्याचा पाठलाग करून अमेरीने त्याला पकडला आणि त्याचे मानगूट धरून तलावांत त्याला बुचकळून काढलें! झाला प्रकार बरा झाला नाही म्हणून दुसरे दिवशीं अमेरीची भेट घेऊन विन्स्टन म्हणाला, " मला क्षमा कर. पण तूं इतका लहान दिसतोस कीं, तूं चवथ्या इयत्तेंतलाच विद्यार्थी असशील असा माझा समज झाला!"

गणित आणि लॅटिन या विषयांची विन्स्टनला अरुचि असली तरी इंग्रजी वाङ्मय आणि इतिहास हे त्याच्या आवडीचे विषय होते. मेकॉलेसाहेबांच्या एका ग्रन्थांतल्या बाराशे ओळी अचूक पाठ म्हणून दाखवून त्याने एकदा आपल्या शिक्षकांना चकित केलें होतें. ग्रीक आणि लॅटिन या भाषांत प्रावीण्य मिळविण्याच्या नादांत हुषार विद्यार्थीसुद्धा इंग्रजी वाङ्मयाकडे दुर्लक्ष करीत असत. विन्स्टनने तिसऱ्या इयत्तेंत प्रवेश केला, त्या वेळीं त्याचा अनुक्रमांक शेवटून तिसरा होता. परंतु, अल्प काळांतच त्याने शेवटून पहिला अनुक्रमांक पटकाविला! तिसऱ्या इयत्तेंत इतर विद्यार्थ्यांपेक्षा तिप्पट वेळ घालविल्यामुळेच त्याला इंग्रजी भाषेच्या अध्ययनाकडे अधिक लक्ष पुरवितां आलें. वाक्पटुत्वांत वरच्या वर्गातल्या विद्यार्थ्यांनासुद्धा नामोहरम केल्यामुळे त्याचा आत्मविश्वास दिवसेंदिवस वाढत होता. 'हॅरोविअन' नांवाच्या विद्यार्थ्यांनीच चालविलेल्या नियतकालिकांत तो वारंवार लेख लिहीत असला तरी त्यांत विद्यालयाविरुद्ध केलेल्या तक्रारींचाच जास्त भरणा असे.

* * *

पुलावरून उडी टाकणें म्हणजे मृत्यूच्या जबड्यांत उडी टाकण्यासारखें आहे हें विन्स्टनच्या एका क्षणांत ध्यानांत आलें! विन्स्टन गांगरला, पण क्षण-मात्रच! कारण, अगतिक होऊन शरण जाणें हें मार्लबरोच्या वंशजाला शक्यच नव्हतें! पुलापासून कांही अंतरावर असलेल्या एका वृक्षावर जर आपण उडी टाकली, तर आपण आपला पाठलाग करणाऱ्यांच्या हातावर खचित तुरी देऊं शकूं हें त्याच्या ध्यानांत आलें. झाडावर उडी टाकायची आणि पूल उतरून आपले प्रतिस्पर्धी त्या झाडानजीक येण्यापूर्वी, झाडावरून उतरून भोवतालच्या जंगलांत नाहीसें व्हायचें, असा डाव एका क्षणांत रचिला गेला! चर्चिल सांगतात, "मीं ठरविलेली रीत बरोबर होती, पण उत्तर चुकलें!"—विन्स्टनच्या उडीची झेप झाडापर्यंत न पोहोचल्यामुळे, तो एकोणतीस फूट खाली कोसळून जमिनीवर पडला आणि त्यानंतर तीन दिवसांनी शुद्धीवर आला!

त्या अपघातातून डोकें वर काढायला विन्स्टनला एक वर्ष लागलें; त्यापैकी पहिले तीन महिने तो बिछान्यावर खिळून होता. आपल्यावर उपचार करण्याकरिता लंडनमधील मोठमोठे डॉक्टर आलेले पाहून आणि त्यांना दिलेल्या मोबदल्याचे जबर आकडे ऐकून, चर्चिल कुटुंबांतील आपण एक 'महत्त्वाचे आदमी' आहों अशी विन्स्टनची खात्री झाली! जें महत्त्व आतापर्यंत केवळ अपेक्षित होतें तें त्या अपघातामुळे सूचित झालें होतें.

एका वर्षाच्या विश्रांतीनंतर कॅप्टन जेम्स यांच्या मार्गदर्शनाखाली विन्स्टनने प्रवेश-परीक्षेची पुनः तयारी केली आणि तिसऱ्या खेपेला तो त्या परीक्षेंत उत्तीर्ण झाला. शक्यांत शक्य तितके कमी, पण उत्तीर्ण होण्याला अवश्य इतके गुण त्याने मिळविले होते. चर्चिल म्हणतात, "आयुष्यांत अपघातांना किती महत्त्व असतें पाहा! केवळ आठच दिवस अगोदर गणिताचा जो एक प्रश्न मीं सोडविला होता, नेमक्या त्याच प्रश्नाचा प्रश्न-पत्रिकेंत अंतर्भाव झाला नसता तर गणिताची परीक्षा मी जन्मांत कधीच उत्तीर्ण झालों नसतों आणि माझ्या जीवनाची दिशाच बदलली असती. मी एखादा पाद्री झालों असतों किंवा व्यापारांत किंवा शेअर बाजारांत शिरलों असतों! सँढर्स्ट महाविद्यालयाची प्रवेश-परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर,

व्यवहारी अपूर्णांकादि ' भयंकर ' मंडळी मला माझ्या आयुष्यांत पुनः कधी भेटली नाहीत ! "

* * *

## लॉर्ड रॅन्डॉल्फ :

१८९३ सालीं विन्स्टनने सँढर्स्ट महाविद्यालयांत प्रवेश केला तेव्हा आपल्या मुलाला पायदळांत प्रवेश मिळावा अशी रॅन्डाल्फसाहेबांची इच्छा होती, कारण फक्त निर्बुद्धांनाच घोडदळांत पाठवतात असा त्यांचा अनुभव होता. प्रवेश-परीक्षेत विन्स्टनने मिळविलेले गुण पाहून त्याची घोडदळांत रवानगी करणें अपरिहार्य झाल्यामुळे रॅन्डॉल्फ यांना अतिशय दुःख झालें ! चर्चिल म्हणतात, " माझ्या विद्यालयीन कारकीर्दीमुळे माझे वडील अत्यंत नाराज झाले आणि मी एक नालायक मुलगा आहें अशी त्यांची खात्री झाली ! "

आपल्या मुलाबद्दलच नव्हे, तर एकंदर जीवनाबद्दलच रॅन्डॉल्फ यांच्या मनांत निराशेचे आणि वैफल्याचे विचार यावेत असा तो काळ होता. १८८० सालीं हुजूर पक्षाचा पराभव होऊन उदारमतवादी पक्ष अधिकारारूढ झाला, तेव्हापासून त्या पक्षाचे नेते, ग्लॅडस्टन, यांचे रॅन्डॉल्फ हे अत्यंत कठोर असे टीकाकार होते. " तथाकथित क्रान्तीचीं अपत्यें, धर्माचा उच्छेद करणारे दरवडेखोर, मालमत्तेचे विध्वंसक, कायदा मोडणारांचे मित्र आणि राजनिष्ठांचे शत्रु " अशीं शेलकीं विशेषणें ग्लॅडस्टन, त्यांचे सहकारी आणि अनुयायी यांना आपल्या भाषणांतून रॅन्डॉल्फ बहाल करीत असत. १८८५ सालीं रॅन्डाल्फ यांनी एक इतकें भयंकर भाषण केलें की, जणू काय, त्यामुळेच ग्लॅडस्टन यांचें मंत्रिमंडळ गडगडलें ! लॉर्ड सॅलिसबरी यांच्या नेतृत्वाखाली पुनः हुजूर पक्ष अधिकारारूढ झाला आणि रॅन्डॉल्फ यांचा हिंदुस्थानचे मंत्री म्हणून मंत्रिमंडळांत समावेश करण्यांत आला. रॅन्डाल्फ हे हिंदुस्थानचे फार मोठे कैवारी असून, पार्लमेंटचें हिंदुस्थानाकडे दुर्लक्ष होत आहे असें दिसलें म्हणजे त्यांना अतिशय चीड येत असे. कोणत्याहि पक्षाचे दास होऊन राहण्याची त्यांची वृत्ति नसल्यामुळे, हुजूर पक्षाच्या कित्येक कार्यक्रमांना त्यांचा विरोध असे. आणि म्हणूनच, " चवथा


पक्ष " या नांवाचा एक हुजूर पक्षाचा पोटपक्ष त्यांनीं स्थापन केला होता, पण त्याचे अवघे तीनच सभासद होते !

आपल्या पक्षाच्या धोरणाशीं मतभेद झाला की राजीनामा द्यावयाचा असें तंत्र रॅन्डॉल्फ यांनी अवलंबिलें होतें. परंतु, केवळ हुजूर पक्षाच्या सभासदांतच नव्हे तर बहुजनसमाजांतसुद्धा ते अतिशय लोकप्रिय असल्या-मुळे, त्यांनी ज्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला असेल त्यापेक्षा अधिक जबाबदारीच्या जागीं त्यांची नेमणूक व्हावी असा क्रम सतत तीन वर्षें चालून शेवटीं त्यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक करण्यांत आली. रॅन्डॉल्फ हे, जणू काय, हुजूर पक्षाचे वादातीत आणि अपरिहार्य असे नेतेच बनले होते. ब्रिटिशांच्या मंत्रिमंडळांत मुख्य प्रधानाच्या खालोखाल अर्थमंत्र्याचा दर्जा सर्वांत उच्च समजला जातो. परंतु, रॅन्डॉल्फ यांचा स्वतंत्र बाणा मुख्य प्रधान लॉर्ड सॅलिसबरी यांना असह्य होऊन, त्यांनी एका सुप्रभातीं रॅन्डॉल्फ यांचा राजीनामा स्वीकारल्यामुळे त्यांची राजकारणांतून कायमची उचलबांगडी होऊन त्यांच्या सर्व महत्त्वाकांक्षा धुळीला मिळाल्या—रॅन्डॉल्फ यांचें वय त्या वेळीं अवघें सदतीस वर्षांचें होतें !

आपल्या पित्याच्या राजकारणी जीवनातील चढउतार आणि अपयश पाहून विन्स्टनला त्यांच्याबद्दल फार सहानुभूति वाटत होती. परंतु, पित्याचा साधा सहवाससुद्धा विन्स्टनला दुर्लभ होता. ग्लॅडस्टनसाहेबांचा मुलगा त्याच्या वडिलांच्या उपयोगी पडतो, त्याप्रमाणे आपणहि आपल्या वडिलांच्या उपयोगी पडावें म्हणून त्यांचीं भाषणें लिहून काढण्याची विन्स्टनने तयारी दर्शविली. पण त्याची स्पष्ट नकाराने बोळवण करण्यांत आली ! एकदा रॅन्डॉल्फ झोपले होते त्या खोलीशेजारच्या आवारांत विन्स्टनने बंदुकीचा बार केला, त्यामुळे रॅन्डॉल्फ इतके संतापले की, विन्स्टनला शेलक्या शिव्यांचा गोळीबार सहन करावा लागला ! परंतु रागाचा पारा उतरल्यावर रॅन्डॉल्फ म्हणाले, " माझ्या प्रत्येक कृतीचा आणि उक्तीचा विपर्यास करण्यांत येत असल्यामुळे हल्ली माझ्या मनाचा तोल मला संभाळता येत नाही. मी तुझ्यावर विनाकारण रागावलों ! "

बापाने मुलाला सतत दोन हात दूर ठेविलें असलें तरी मिस्किलपणा, वृत्तीचें आणि विचारांचें चिरतारुण्य आणि निर्भयता हे बापाचे गुण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........



[ "फोर्थ हुसार्स" या फलटणीत, १८९५ सालीं, म्हणजे वयाच्या एकविसाव्या वर्षी – विन्स्टन चर्चिल ]

मुलाच्या, जणू काय, रक्तांतच उतरले होते. आपल्या पक्षावरील निष्ठेपेक्ष स्वतःच्या प्रामाणिक मतांवरील निष्ठा ही अधिक मोलाची आहे हें तत्त्व, आणि राजकारणांतल्या लोकप्रियतेच्या भरतीप्रमाणे ओहोटीसुद्धा समतोल मनाने स्वीकारली पाहिजे हा धडा, आपल्या पित्याच्या जीवनावरून चर्चिल शिकले.

सक्रीय राजकारणांतून पदच्युत झाल्यानंतर रॅन्डॉल्फ यांनी जागतिक प्रवासाचा कार्यक्रम आखून अमलांत आणला. घोडयांच्या शर्यतीसाठी ते स्वदेशीं परतले म्हणजे सर्व राजकीय पक्षांचे पुढारी त्यांच्या घरीं वारंवार जमत असत. बाल्फोर, ऑस्टिन चेंबरलेन, एडवर्ड कार्सन, ऑस्क्विथ, रोजबरी, मोर्ले असे त्या जमान्यांतले कितीतरी नामांकित पुढारी आणि मुत्सद्दी. त्या महान् मुत्सद्दयांचें आणि विचारवंतांचें जवळून दर्शन घेण्याची आणि विचार ऐकण्याची संधि विन्स्टनला साहाजिकच मिळून, राजकारणांत वाहणाऱ्या वाऱ्यांची आणि समरांची त्याला माहिती झाली. त्या जमान्यांतील राजकारणाच्या आखाड्याबद्दल चर्चिल लिहितात, " त्या जमान्यांत जीवनाच्या महान् मूल्यांना विलक्षण मान होता. राजकारणांतले प्रतिस्पर्धी प्रसंगविशेषीं एकमेकांवर निर्दय वाक्प्रहार करीत असले, तरी त्यांच्या मनांत एकमेकांबद्दल नितांत आदर आणि अदब वास करीत होती. "

राजकारणांतल्या आपल्या महत्त्वाकांक्षांचा चुराडा उडाला असतां आपल्या चिरंजीवांच्या नशिबांत घोडदळाची योजना व्हावी, या शल्याने रॅन्डॉल्फ यांच्या अभिमानी मनाला अत्यंत तीव्रतेने विद्ध केलें असल्यास नवल नाही. चर्चिल म्हणतात, " पक्षाचा कार्यक्रम आणि स्वतःचीं मतें यांत संघर्ष निर्माण झाला, त्या वेळीं माझ्या वडिलांनी पक्ष बदलला असता तर त्यांच्या जीवनाची अशी वाताहात झाली नसती ! "–पित्याच्या जीवनाने शिकविलेला हा धडा विन्स्टन कधी विसरला नाही !

* * *

**लष्कराच्या भाकरी :**

सँढर्स्ट विद्यालयांत विन्स्टन कालक्रमणा करीत असतांना मिसेस् चँट नांवाच्या एका समाजसेविकेने नाटकगृहांतील मद्याच्या दुकानाविरुद्ध चळवळ सुरू केली. त्या चळवळीच्या बातम्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्या तेव्हा

विद्यार्थ्यांत पुष्कळच खळबळ उडून तो अव्यापारेषु व्यापार बंद पाडला पाहिजे असें मत व्यक्त करण्यांत आलें. पण त्या व्यापाराविरुद्ध सक्रीय हालचाल करण्याची जबाबदारी एकट्या विन्स्टननेच पत्करिली! चँट बाईला विरोध करण्यासाठी एक समिति स्थापन झाली असून तिच्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा लंडनमधील एका हॉटेलांत भरणार आहे, ही बातमी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होतांच त्या सभेला हजर राहून एक परिणामकारक भाषण करण्याचें विन्स्टनने निश्चित केलें. ब्रिटिशांची राज्यघटना, मानवी स्वातंत्र्य, मद्यप्राशनाचा मूलभूत हक्क वगैरे प्रश्नांचा ऊहापोह करणारें एक भाषण त्याने तयार केलें, लिहून काढलें आणि पाठ केलें. विन्स्टनला हातखर्चासाठी दरमहा दीडशे रुपये मिळत असत, त्यांपैकी फक्त पांच–चार रुपये त्या वेळीं त्याच्या खिशांत शिल्लक असले, तरी विद्यालयांतून दोन दिवसांची रजा घेऊन त्याने लंडनचें तिकीट विकत घेतलें आणि, लंडनला पोहोचल्यावर, भाड्याच्या मोटारींतून नियोजित स्थळीं कूच केलें. हॉटेलांत पुष्कळ गर्दी जमेल, त्या गर्दीला दिपविणारें भाषण आपण करूं, आपल्या नांवासकट आणि कदाचित् छायाचित्रासकट दुसरे दिवशीं तें वृत्तपत्रांत छापून येईल आणि चँटबाईच्या चळवळीचा कपाळमोक्ष होईल अशा स्वप्नांत विन्स्टन मग्न होता! पण हॉटेलांत जाऊन पाहतो तो काय? सभेच्या आमंत्रकाशिवाय कोणीच हजर नव्हतें! आमंत्रक मात्र मुळीच नाउमेद झाला नव्हता. "कोणत्याहि चांगल्या गोष्टीचा प्रारंभ करणें कठीण असतें–पण आपण या बाबतींत कृतनिश्चयी आहोंत हें लोकांच्या ध्यानांत आलें म्हणजे आपोआप गर्दी जमेल. मला वाटतं आज आपण दोन चार दणदणीत ठराव करून ते वृत्तपत्रांकडे पाठवून कार्याची सुरुवात करूं–" असें त्याने विन्स्टनला सांगितलें.

आल्यापावलीं सँढर्स्टला परतण्याचा ठराव मनांतल्या मनांत करून विन्स्टनने त्या 'सभेचा' निरोप घेतला. त्याच्या खिशांत त्या वेळीं फक्त मोटारभाड्यापुरते पैसे, आगगाडीच्या परतप्रवासाचें तिकीट आणि तयार केलेल्या भाषणाचें हस्तलिखित इतक्याच वस्तु होत्या. पोटांत ओरडणाऱ्या कावळ्यांचें शांतवन करण्यासाठी त्याने हातांतलें घड्याळ विकलें, हॉटेलांत भरपूर जेवण केलें आणि तो सँढर्स्टला परतला. "कार्यकारी मंडळाच्या"

सभेविषयी त्याचे सहाध्यायी त्याला प्रश्न विचारूं लागले, तेव्हा " सभा सुरेख झाली—माझें भाषण तर फारच परिणामकारक झालें ", अशीं उत्तरें देऊन तपाशिलाबद्दल विन्स्टनने मौन पत्करिलेलें पाहून त्याचे सहाध्यायी निराश झालें.

चँटबाईच्या चळवळीला यश येऊन नाटकगृहांतील मद्यालयें अगदी उघडयावर तरी नसावींत, म्हणून तीं सर्वसाधारण प्रेक्षकांच्या दृष्टिआड करण्याकरिता त्यांच्या भोवती कापडाचे पडदे लावण्याची व्यवस्था नाटक-गृहाच्या मालकांनी केली अशी बातमी वाचून विन्स्टनच्या विद्यालयांत पुन्हा खळबळ उडाली. चँटबाईचा आणि त्या पडद्यांचा निषेध करण्याकरता सँढर्स्टहून एक मोर्चा लंडनला निघाला, त्यांचें नेतृत्व अर्थातच विन्स्टनने स्वीकारिलें होतें. विद्यार्थ्यांचा तो मोर्चा लंडनला पोहोचल्यावर सरळ एम्पायर नाटकगृहाकडे गेला आणि त्याने चँटबाईविरुद्ध घोषणा करायला सुरुवात करून कापडाचे पडदे स्थानभ्रष्ट केले ! रंगभूमीवर त्या वेळीं एक नाच आणि जादूचे कांही प्रयोग चालू होते. विन्स्टनने नाचांतल्या पोरींना आणि तलवार गिळणाऱ्या जादुगाराला बाजूला सारून रंगभूमीवर प्रवेश केला आणि ' कार्यकारी मंडळाच्या ' सभेच्या दिवशीं तयार केलेलें भाषण प्रेक्षकांना ऐकविलें. विन्स्टनच्या आयुष्यांतील सार्वजनिक सभेंत केलेलें तेंच पहिलें भाषण समजलें पाहिजे. तें भाषण ऐकून आनंदित झालेल्या नाटकगृहाच्या मालकाने वक्त्याला आणि सर्व श्रोत्यांना मोफत दारू पाजली ! त्यानंतर फाडलेले पडदे गोळा करून पुनः मोर्चा निघाला आणि नजीकच्या चौकांत त्या पडद्यांची होळी करण्यांत आली. एम्पायर नाटक-गृहांतील भाषण चालू असतांना आपल्याला ' स ' या अक्षराचा नीट उच्चार करता येत नाही याची विन्स्टनला जाणीव झाली—त्या दोषाचा मद्याशीं अर्थातच कांही संबंध नव्हता ! आपल्या वक्तृत्वांतला तो दोष घालविण्याचे विन्स्टनने पुष्कळ प्रयत्न केले, पण ते अयशस्वी झाल्यामुळे ' स ' या अक्षराने शेवट होणारे शब्द टाळण्याचें तंत्र त्यानें अंगीकारिलें.

सँढर्स्ट येथील विन्स्टनच्या विद्यालयीन जीवनांत याच एका संस्मरणीय प्रसंगाची नोंद आढळते. हॅरो येथील त्याच्या कारकीर्दीसंबंधी अनेक कथा आणि दंतकथा प्रचलित असल्या तरी सँढर्स्ट येथील त्याच्या जीवनाविषयी

इतिहासाने मौन पाळलें आहे. त्याचें कारण असें की, मनपसंत असा अभ्यासक्रम सापडल्यामुळे विन्स्टनचा वात्यपणा मावळला नसला तरी कांही काळ भूमिगत झाला होता. सँढर्स्टचें विद्यालय हें त्याच्या पारंपरिक शिक्षणाचें शेवटचें केंद्र होतें. लष्करी शिक्षण—मग तें निर्बुद्धांनी गजबजलेल्या घोडदळांतलें का असेना—त्याच्या वृत्तीला रुचणारें आणि वृत्तीची खुलावट करणारें होतें. ग्रीक आणि लॅटिनसारख्या मृत भाषा आणि गणितासारख्या गारद्यांचें भय आता उरलें नव्हतें ! तो मनापासून अभ्यास करीत होता, सर्व प्रकारचे कष्ट आनंदाने करीत होता, वृत्तीने शांत आणि आज्ञाधारकहि बनला होता.

तो काळ शांततेचा होता—कोणत्याहि युद्धाच्या प्रारंभाचा रंग क्षितिजावर दिसत नव्हता याचें विन्स्टनला वाईट वाटत असे. तो म्हणायचा, " हें १८९३ साल नसून १७९३ साल असतें तर किती बहार झाली असती ! नेपोलियनने सुरु केलेल्या युद्धांत सतत वीस वर्षे भाग घेण्याचें भाग्य मला लाभलें असतें ! "—निरनिराळ्या परीक्षांत उत्तीर्ण होत होत शेवटच्या परीक्षेंत, घोडदळांतील विद्यार्थ्यांत, तो चवथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला आणि ' फोर्थ हुसार्स ' नांवाच्या घोडदळाच्या एका पलटणींत ' सब ऑल्टर्न ' म्हणून त्याची नेमणूक झाली.

तें १८९४ साल होतें आणि विन्स्टन त्या वेळीं वीस वर्षांचा होता. विन्स्टनच्या व्यावसायिक जीवनाची अशा रीतीने सुरुवात होते न होते तोंच त्याच्या पित्याच्या जीवनावर, २४-१-१८९५ रोजीं, वयाच्या अवघ्या शेहेचाळिसाव्या वर्षीं, मृत्यूने अखेरचा पडदा टाकला ! रॅन्डॉल्फ यांचे चरित्रकार लॉर्ड रोजबरी म्हणतात, " लॉर्ड रॅन्डॉल्फ हे आपल्या मागे एखादा पक्ष किंवा अनुयायी ठेवून गेले नसतील—पण त्यांनी आपल्या मागे आपला मुलगा ठेवला होता ! "

* * *

३

## राणीची कारकीर्द

चर्चिल यांच्या व्यावसायिक जीवनाची सुरुवात झाली त्या वेळीं त्यांच्या पित्याच्या नांवलौकिकामुळे इंग्लंडमधील बड्या लोकांचीं त्यांना आमंत्रणें येऊं लागलीं. त्यांच्या ओठावर मिशीचा उदय दृग्गोचर होत होता आणि आपलीं राजकीय मतेंसुद्धा ते व्यक्त करूं लागले होते. बड्या लोकांच्या मजलशींत वडील मंडळी बोलत असतां ते मधे तोंड घालीत नसले, तरी स्वतःच्या लहान वयाच्या जाणिवेला त्यांनी कधीच फाजील महत्त्व दिलें नाही ! वडील मंडळीचें बोलणें संपल्यावर, जणू काय, कोणत्याहि विषयावरचा शेवटचा शब्द आपण बोलत आहोंत अशा अभिमानाने आणि आविर्भावाने ते आपलीं मतें व्यक्त करीत असत. एका मेजवानीच्या वेळीं ते तावातावाने बोलत असतां त्यांच्या शेजारी बसलेली एक युवती म्हणाली, " चर्चिल-साहेब, मला तुमचीं मतें आवडत नाहीत आणि मिश्याहि आवडत नाहीत ! "—एका क्षणाचाहि विलंब न लावतां चर्चिल म्हणाले, " बाईसाहेब, काळजी करूं नका, माझ्या मतांचा किंवा मिश्यांचा तुम्हाला स्पर्श होण्याचा मुळीच संभव नाही ! "

चर्चिल यांच्या पलटणीचे प्रमुख, कर्नल ब्रॅबझॉन, हे लॉर्ड रॅन्डॉल्फ यांचे स्नेही होते. आपल्या दिवंगत मित्राच्या मुलाबद्दल त्यांना विशेष जिव्हाळा वाटत होता. नशीब काढण्यासाठी सैन्यांत शिरलेले त्या वेळचे ब्रिटिश सेनाधिकारी हे बहुधा घरंदाज, दिलदार आणि अतिशय शूर असत. कर्नल ब्रॅबझॉन यांच्या अंगीं हे गुण भरपूर प्रमाणांत होते. चर्चिल यांना ' स ' या अक्षराचा नीट उच्चार करतां येत नसला, तर ब्रॅबझॉन हे ' र 'चा उच्चार ' व 'सारखा करीत असत ! रणांगणावर असले म्हणजे तोफेचे गोळे

छातीवर झेलण्याची तयारी असावी आणि रणांगणाबाहेर अत्यंत नखरेबाज पोषाख करून हिंडावें असा कर्नलसाहेबांचा बाणा होता. मिश्यांचा असामान्य भरदारपणा हें त्यांच्या दर्शनाचें वैशिष्टय होतें. एके दिवशीं त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने त्यांना त्या मिश्या काढण्याचा हुकूम केला तेव्हा कर्नलसाहेबांना अतिशय दुःख झालें. परंतु, वरिष्ठांची आज्ञा मानण्याची शिस्त त्यांच्या रोमरोमांत भिनलेली असल्यामुळे, त्यांनी न्हाव्याला हाक मारली आणि त्याला मिश्या उतरविण्याची आज्ञा केली. कर्नलसाहेबांच्या मिश्या काढतांना न्हाव्याच्या डोळ्यांतूनसुद्धा अश्रुधारा वाहात होत्या असें सांगतात ! इतकेंच नव्हे, तर त्यांच्या हाताखालच्या सैनिकांनासुद्धा कित्येक वर्षें कांहीतरी हरपल्यासारखें वाटत होतें !

चर्चिल यांच्या लष्करी जीवनाची सुरुवात झाली त्या वेळीं व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीला साठ वर्षें झालीं म्हणून एक महोत्सव साजरा करण्याची तयारी इंग्लंडांत सुरू होती. इंग्रजांच्या इतिहासांत कधी नव्हे इतकी प्रतिष्ठा व्हिक्टोरिया राणीने तिच्या सिंहासनाला मिळवून दिली होती. इंग्रजांची सत्ता आणि सामर्थ्य इतकें अमर्याद होतें की, " इंग्रजी साम्राज्यांत सूर्य कधीच मावळत नाही, " असा एक वाक्प्रचार रूढ झाला होता. चर्चिल यांच्या मनावर त्या परिस्थितीचा चिरकालीन परिणाम झाला. ते म्हणतात, " मी व्हिक्टोरियन्‌ कालखंडाचें अपत्य आहे. आमच्या राष्ट्राच्या व्यापाराशीं आणि आरमाराशीं त्या जमान्यांत कोणतेंहि राष्ट्र स्पर्धा करूं शकत नव्हतें. आमच्या साम्राज्याच्या थोरवीची आणि ती थोरवी कायम राखण्याच्या जबाबदारीची जाणीव प्रत्येक इंग्रजाच्या मनांत क्षणाक्षणाला वाढत होती. "

राणीच्या सुखी आणि संपन्न कारकीर्दींत ' काळ्या लोकांबरोबरच्या ' कांही ' कटकटी ' चालू असल्या, तरी गोऱ्यांवर गोळीबार करण्याची संधि मिळण्याचा मुळीच संभव नव्हता. लष्करांतल्या बहुसंख्य अधिकाऱ्यांना युद्धांत प्रत्यक्ष भाग घेण्याची संधि न मिळाल्यामुळे, ज्यांच्या शरीरावर जखमा आहेत किंवा ज्यांच्या छातीवर पदकें झळकत आहेत असे सैनिक किंवा अधिकारी क्वचितच दृष्टीला पडत असत ! तरीपण १८९५ ते १९०० या पांच वर्षांच्या कालखंडासंबंधी चर्चिल लिहितात, " माझ्या आयुष्यांतला

तो एक उत्कृष्ट कालखंड होता. या पांच वर्षांत मी एकसारखा कांहीतरी करीत होतों, आयुष्यांतील यशापयशाशीं झगडत होतों, निरनिराळे धोके पत्करीत होतों, एकसारखी आगेकूच करीत होतों आणि आशेवर जगत होतों ! ”

‘ फोर्थ हुसार्स ’ नांवाच्या पलटणींत सब ऑल्टर्नच्या हुद्यावर चर्चिल यांनी सहा महिने उमेदवारी केली तरी त्यांच्या मनाला संतोष देईल असें लष्करी दृष्ट्या कांहीच घडलें नाही. वर्षाकाठी सात महिने नोकरी आणि पांच महिने रजा असा कार्यक्रम त्यांच्यासमोर दिसत होता. आपलें धैर्य आणि चातुर्य कसाला लागेल अशा रणांगणावर उडी टाकायला ते आतुर झाले होते. सैनिकाला रणांत भाग घेण्याची संधि मिळाली नाही, तर त्याचें जीवन निष्कारणच समजलें पाहिजे असें त्यांना वाटत होतें. ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासांतला तो अत्यंत सुखाचा, शांततेचा आणि संपन्नतेचा कालखंड होता. पण तें जीवन सुखाचें असलें तरी सैनिकाचें नव्हतें. सैनिकाला नाउमेद करणाऱ्या त्या परिस्थितीचा केवळ निषेध करून स्वस्थ बसणें चर्चिल यांच्या वृत्तीला मानवण्यासारखें नसल्यामुळे, परिस्थिति सुधारण्याचा उद्योग त्यांनी सुरु केला ! एके दिवशीं त्यांनी वर्तमानपत्र उघडलें आणि आपल्या साम्राज्यांत नाही, तरी भूतलावर कोठे तरी युद्धाच्या ज्वाळा भडकल्या आहेत काय किंवा भडकण्याचा संभव आहे काय याचा छडा लावण्यासाठी त्यांनी निरनिराळ्या बातम्या वाचायला सुरुवात केली. चार दोन किरकोळ चकमकींच्या बातम्या वाचून निराश झाल्यामुळे ते वृत्तपत्र दूर भिरकावून देणार होते, इतक्यांत एका बातमीने त्यांचें लक्ष वेधलें !—
“ क्यूबा देशांत क्रांतियुद्ध ! ”

* * *

## क्यूबाच्या जंगलांतील मोहीम :

क्यूबा नांवाचें एक बेट दक्षिण अमेरिकेजवळ असून स्पेनच्या साम्राज्याचा तो एक भाग आहे हें चर्चिलना माहीत होतें, परंतु तें बेट नक्की कोठे आहे त्याची माहिती त्यांना नकाशा पाहून मिळवावी लागली ! क्यूबाच्या रहिवाशांनी राज्यकर्त्यांविरुद्ध बंड पुकारलें असून, त्या बंडाचा बीमोड

करण्याकरिता स्पेनच्या सरकारनें बंडखोरांविरुद्ध युद्ध सुरू केलें आहे, ही बातमी वाचून चर्चिलना अतिशय आनंद झाला. बंडखोरांविरुद्ध करावयाच्या 'कारवाईला' युद्ध म्हणतां आलें नाही आणि त्या घटनेशीं ब्रिटिश साम्राज्याचा कोणताहि संबंध नसला, तरी चर्चिलना त्याची फिकीर नव्हती. युद्ध कसें असतें तें पाहावयाची संधि प्राप्त झाली आहे या कल्पनेनें ते आनंदित झाले होते !

क्यूबाच्या रणभूमीवर प्रवेश करतांना, 'एकसे दो भले', या तत्त्वानुसार चर्चिलनी त्यांच्या पलटणींतला रेजिनाल्ड बार्नेस याला आमंत्रण दिलें, आणि त्यानेहि तें अत्यंत उत्साहानें स्वीकारलें ! आईची परवानगी आणि पलटणींतून रजा मिळविली. संकल्पित मुशाफरीचा खर्च परस्पर भागावा म्हणून चर्चिल यांनी लंडनमधील 'डेली टेलिग्राफ' नांवाच्या वृत्तपत्राच्या संपादकाची भेट घेऊन, "क्यूबाच्या युद्धांत भाग घेण्यासाठी मी जातों आहें. फावल्या वेळांत आपल्या वृत्तपत्राला मी युद्धाचीं बातमीपत्रें पाठवीन—अर्थातच, मोबदला देणार असाल तरच," असा आपला मनोदय कळविला. आपल्यासमोर उभ्या असलेल्या त्या बेदरकार तरुणाला पाहून संपादक महाशय आश्चर्यचकित झाले ! ज्या युद्धाशीं इंग्रजांचा कांही संबंध नाही अशा युद्धांत भाग घेण्यासाठी हा एकवीस वर्षांचा मुलगा हजारो मैलांचा प्रवास करणार, युद्धांत भाग घेणार आणि बातमीपत्रेंहि पाठविणार ही कल्पना त्यांना विलक्षण वाटली. परंतु, त्याच्या त्या उत्साहावर खुष होऊन संपादकांनी, प्रत्येक बातमीपत्रासाठी पांच पौंड या दरानें, आपल्या पत्राचा खास बातमीदार म्हणून चर्चिल यांची चुटकीसरशी नेमणूक करून टाकली ! चर्चिल म्हणतात, "अगदी लहानपणापासून सैनिकांचे आणि युद्धाचे विचार माझ्या मनांत थैमान घालीत असत आणि चोहोकडून गोळ्यांचा पाऊस पडतो आहे अशा रणांगणावर अगदी आघाडीच्या पथकांत मी आहें अशीं स्वप्नें मला पडत असत. चौफेर सुटणाऱ्या गोळ्या, त्यामुळे होणाऱ्या जखमा आणि येणारा मृत्यु अशा धोक्याशीं क्षणोक्षणीं खेळणें फार आनंददायक असेल असें माझ्या तरुण मनाला वाटत असे."

३–११–१८९५ रोजीं चर्चिल आणि बार्नेस ही जोडी क्यूबाच्या प्रवासाला निघाली. अनेक दिवसांच्या पण प्रसंगशून्य अशा समुद्रावरील

सफरीनंतर क्यूबाचा किनारा दिसूं लागला तेव्हां चर्चिलना वाटलें, " या बेटांतच खरोखरीच्या घटना घडत असून इथेच माणसाच्या कर्तबगारीला खरा वाव आहे ! "

क्यूबा बेटाची राजधानी हवाना, येथील एका सर्व सुखसोयींनी युक्त अशा हॉटेलांत त्यांनी दोन दिवस मुक्काम केला. हवाना येथे चर्चिल यांच्या आवडीचीं संत्रीं आणि चिरूट यांचा सुकाळ होता, पण युद्ध नव्हतें ! संत्र्यांचा आणि चिरूटांचा दोन दिवस मनमुराद आस्वाद घेतल्यानंतर, इंग्लंडचा किनारा सोडतांना बरोबर घेतलेलीं 'ओळखपत्रें' घेऊन ते राजधानींतील स्पॅनिश अधिकाऱ्यांना भेटले. चर्चिल आणि बार्नेस या तरुण शिलेदारांना पाहून आपल्या बाजूने ब्रिटिश साम्राज्यच रणांगणावर उतरत आहे, निदान त्याचा नैतिक पाठिंबा तरी आपल्याला लाभला आहे असा आनंद स्पॅनिश अधिकाऱ्यांना झाला !

क्यूबामधील बंडखोर जंगलांत वास्तव्य करून, गनिमीकाव्याने लढत असल्यामुळे राजधानींत त्यांचें दर्शन घडणें शक्यच नव्हतें. सबब, आणखी दोन दिवस राजधानींत घालविल्यानंतर, बंडखोरांशीं मुकाबला करण्याकरिता निघालेल्या स्पॅनिश सैनिकांच्या एका तुकडीबरोबर, घोड्यावर स्वार होऊन, चर्चिल आणि बार्नेस निघाले ! 'युद्ध कसें असतें' त्याचा अनुभव घेण्याकरिता त्यांनी तो विचित्र उद्योग आरंभिला होता ! आपल्या मातृभूमीपासून हजारो मैल दूर असलेल्या जंगलांतून ज्यांच्या बरोबर ते घोडदौड करीत होते त्यांची, किंवा ज्या बंडखोरांविरुद्ध ते आगेकूच करीत होते त्यांची आणि या दोन शिलेदारांची साधी तोंडओळखसुद्धा नव्हती. मैलामागून मैल मागे पडत चालले तरी बंडखोरांचा पत्ता नाही असें पाहून चर्चिलनी एका स्पॅनिश अधिकाऱ्याला विचारलें, " ज्या युद्धाच्या आम्ही बातम्या वाचीत होतों तें युद्ध कुठे आहे ? " " फार उतावीळ होऊं नका—लवकरच युद्ध सुरू होईल, " हें उत्तर ऐकून चर्चिल यांच्या मनांत जे विचार झाले त्यासंबंधी ते लिहितात, " कांहीतरी घडणारच अशी खात्री वाटत असली तरी आपण जायबंदी व्हावें किंवा मरावें अशी मात्र माझी इच्छा नव्हती ! "

घनदाट जंगलांत मजल दरमजल करीत दीडशे मैलांचें अंतर तोडलें,

तरी शत्रूचें तोंड दिसेना आणि युद्धाला तोंड लागेना! नोव्हेम्बर महिन्याची तीस तारीख, म्हणजे चर्चिल यांचा वाढदिवस उगवला. स्पेनचे सैनिक आणि त्यांचे पाहुणे न्याहारी करीत बसले होते, इतक्यांत नजीकच्या जंगलांतून बंदुकीचे आवाज आले आणि एक गोळी घोड्याला लागली. घोड्याच्या शरीरांतून रक्ताचें कारंजें उडालें आणि क्षणार्धांतच तो कोलमडून पडला. चर्चिलनी पाहिलेला 'रणांगणावरचा' तो पहिलाच मृत्यु! गनीम जवळ असला, तरी आपल्या न्याहारींत अडथळा आणण्याइतका असंस्कृत नसेल म्हणून चर्चिल बसल्या जागेवरून हालले नाहीत! इतक्यांत आणखी कांही गोळ्या येऊन थडकल्या आणि त्यानंतर न्याहारीचा विचार रद्द करावा लागला! स्पेनच्या सैनिकांनी सुद्धां गोळीबाराला सुरुवात केली. कांही काळानंतर पुनः सर्व सामसूम झालें, बंदुकीचे बार ऐकूं आले आणि कांहीं गोळ्या दिसल्या, तरी (एका निरपराध घोड्याव्यतिरिक्त) कोणी जखमी झालें नव्हतें—आणि शत्रूचें दर्शनहि घडलें नव्हतें!

असाच प्रकार त्यानंतर कांही दिवस चालू होता. जंगलांत लपलेला शत्रू गोळ्या झाडत होता आणि त्याला गोळ्यांनीच प्रत्युत्तर मिळत होतें. दोन्ही बाजूंच्या सर्व गोळ्या जंगलांतल्या झाडांवर आदळत होत्या. एकसुद्धा सैनिक जखमी झाला नाही, मग कामास येण्याची गोष्ट कशाला? अशा स्थितींत 'आमची मोहीम यशस्वी झाली' असें स्पॅनिश सैन्याच्या अधिकाऱ्यांनी एके दिवशीं जाहीर केलें!

'झालें इतकें ईशस्तवन पुरें झालें' असा ठराव करून, चर्चिल आणि बार्नेस यांनी १८९६ सालच्या सुरुवातीला क्यूबाच्या किनाऱ्याचा कृतकृत्य अन्तःकरणाने निरोप घेतला!

—इंग्लंडला पोहोचून ते आपल्या पलटणींत पुनः दाखल होतात, तोच त्यांच्या पलटणीला हिंदुस्थानांत जाण्याचा हुकूम मिळाला!

* * *

## हिंदुस्थानांतील वास्तव्य :

हिंदुस्थानांत कमीत कमी चवदा महिने मुक्काम करावा लागेल म्हणून चर्चिल यांच्या पलटणीला सहा महिन्यांची रजा मिळाली. त्या मुदतींत

प्रतिष्ठितांच्या, नामवंतांच्या आणि श्रीमंतांच्या वर्तुळांत चर्चिल जेवले, खेळले आणि नाचले ! अशाच एका मजलशींत सर बिन्डोन ब्लड नांवाच्या एका सेनापतीबरोबर त्यांची ओळख झाली. सर बिन्डोन हे लॉर्ड रॅन्डॉल्फ यांचे स्नेही होते. साम्राज्याच्या रक्षणासाठी केलेल्या अनेक युद्धांच्या हकीकती त्यांनी चर्चिलना ऐकविल्या. त्या मुलाखतीच्या शेवटीं, ‘ तशीच संधि आली तर मला आपल्या हाताखाली काम करण्याची संधि द्या ’, अशी चर्चिल यांनी सर बिन्डोन यांना विनंती केली आणि त्यांनी ती मान्य केली.

सहा महिन्यांच्या रजेच्या मुदतींत चर्चिल ज्या वातावरणांत मग्न झाले होते, त्या वातावरणाचा त्याग करून अनोळखी अशा हिंदुस्थानच्या दिशेने प्रयाण करायला ते नाखुश होते. पण, लष्करी जीवनांत ‘ हुकूम म्हणजे हुकूम ’ याची त्यांना जाणीव होती ! ‘ फोर्थ हुसार्स ’ या पलटणींत एकंदर बाराशे सैनिक आणि अधिकारी होते. तेवीस दिवसांचा प्रवास करून त्यांची आगबोट एका सुप्रभातीं मुंबईच्या किनाऱ्याला लागली. त्या भव्य जहाजांतून उतरून चर्चिल एका होडींत बसले आणि ‘ ससून ’ च्या धक्क्यानजीक येऊन ठेपले. होडींत उभे राहून धक्क्याची साखळी पकडतांना त्यांचा पाय निसटल्यामुळे त्यांना कांही काळ लोंबकळत राहावें लागलें, त्यामुळे त्यांच्या उजव्या हातावर भार पडून तो खांद्यापासून निखळला ! त्या घटनेचा चर्चिल यांना तत्काळ फारसा उपद्रव झाला नसला, तरी नंतरच्या आयुष्यांत त्यांना उजव्या हाताचा अतिशय जपूनच उपयोग करावा लागला. उजव्या हाताचा अनवधानाने उपयोग केला तर त्याचा आपल्या खांद्याबरोबरचा संबंध सुटतो असा अनुभव आल्यामुळे, कोणत्याहि आवेशाच्या प्रसंगीं ते डाव्या हाताचाच उपयोग करूं लागले !

मुंबईत पोहोचल्यानंतर, पुण्यांत दोन दिवस मुक्काम करून चर्चिल यांची पलटण बंगलोरला जाऊन तेथे स्थायिक झाली. रोजच्या कवायती-व्यतिरिक्त फारसें काम नसल्यामुळे बंगलोरचें जीवन कंटाळवाणें होणार अशी चर्चिल यांना सुरुवातीला भीति वाटली. पण अखिल भारतीय महत्त्वाच्या ‘ पोलो ’ नामक खेळाचे सामने बंगलोरला होतात अशी माहिती मिळाल्यामुळे त्यांनी आणि त्यांच्या पलटणीने पोलो खेळायला सुरुवात केली. पोलो हा खेळ घोडयावर बसून खेळावयाचा असल्यामुळे एक

मोठें मैदान, एक सशक्त घोडें, एक चेंडू आणि त्या चेंडूला टोलविणारी काठी अशी सामग्री अवश्य असते. चर्चिल आणि त्यांच्या सोबत्याचा सर्व पगार खाणें, पिणें आणि तंबाखू ओढणें यांतच खर्च होत होता. पोलोसाठी चलाख आणि तल्लख घोडयाची गरज होती. पगाराव्यतिरिक्त चर्चिलना आईकडून दरसाल साडेसात हजार रुपये मिळत असत, पण ती रक्कम त्यांच्या हातखर्चाला आणि पोलोसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाला अपुरी पडूं लागली! सबब, उत्पन्नाची आणि खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरिता त्यांना आणि त्यांच्या सवगडयांना, दरमहा दरशेंकडा दोन रुपये व्याजाने, मारवाडयांची मदत घ्यावी लागली! 'लठ्ठ, अदबशीर आणि प्रामाणिक, पण अतिशय निर्दय आणि लोभी', असें त्या सावकारांचें चर्चिल यांनी वर्णन केलें आहे. इंग्रज पलटणीच्या दिमतीला सदैव सिद्ध असणारे हिंदी नोकर चर्चिलना अतिशय प्रिय होते. 'आपले कपडे धोब्याच्या, घोडें मोतद्दारांच्या आणि पगार खानसाम्याच्या स्वाधीन करून निष्काळजीपणाने राहावें' असें त्यांनी आपल्या बंगलोरच्या जीवनाचें वर्णन केलें आहे. 'सेवा कशी करावी त्याचा अनुभव, ज्ञान आणि प्रामाणिकपणा या गुणांनी युक्त असलेले ते नोकर आमची काळजी वाहायला सदैव सिद्ध आणि तत्पर असत' असें ते सांगतात.

चर्चिल आणि त्यांच्या सोबत्यांनी बंगलोरला पोलोचा जो 'रियाझ' केला तो अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी झाला. त्या जमान्यांत 'गोवळकोंडा कप' या नांवाचे सामने हैदराबाद येथे होत आणि त्यांत बहुधा 'गोवळ-कोंडा संघ' विजयी होत असे. त्या संघाने पतियाळा आणि जोधपूर येथील बलाढ्य संघांचासुद्धा पराभव केला होता. परंतु, चर्चिल यांच्या पलटणीच्या संघाने सर्व संघांचा पराजय करून अजिंक्यपद मिळविलें.

हैदराबादच्या एका मुक्कामांत चर्चिल यांनी निझामाच्या सैन्याची कवाईत पाहिली. जें भव्य आणि सुंदर असेल तें त्यांच्या मनाला तत्काळ मोहित करतें. त्या कवायतीसंबंधी चर्चिल लिहितात, "पाठीवर तोफा घेतलेली हत्तींची रांग सैनिकांच्या मागोमाग मोठ्या डौलाने चालत होती. निशाणा-जवळून जातांना त्या हत्तींना सलामी देतांना पाहून मला फार मौज वाटली. प्रचंड तोफा वाहणाऱ्या यंत्रसिद्ध मोटारींनी आता हत्तींची जागा पटकाविली

आहे. ही सुधारणा असेल, पण ते हत्ती आणि त्यांनी दिलेली ती सलामी आता पुनः दिसणार नाही म्हणून मला अतिशय दुःख होतें!" जुन्या जमान्यांतल्या युद्धाशीं चालू जमान्यांतल्या युद्धांची तुलना करून ते म्हणतात, "पुरातन कालापासून प्रतिष्ठा पावलेल्या शस्त्रांच्या सहाय्याने जुन्या जमान्यांतले सैनिक आपापल्या देशासाठी लढत असत. रणांगणांत उतरलेल्या राष्ट्रांचे सर्व नागरिक एकमेकांचा नायनाट करण्यासाठी आता जे पाशवी अत्याचार करतात, त्याला लोकशाही आणि शास्त्रज्ञ जबाबदार आहेत— आधुनिक काळांतलीं युद्धें हीं सद्गृहस्थांचीं युद्धेंच नव्हेत!"

इंग्लंडसारख्या थंड प्रदेशांतून आलेल्या सैनिकांना बंगलोरची दुपार 'तापदायक' वाटत असल्यामुळे, भोजनोत्तर वामकुक्षीचा प्रघात होता. दुपारच्या जेवणानंतर वामकुक्षीची चर्चिल यांना बंगलोरच्या मुक्कामांत जी संवय लागली ती त्यांच्या जीवनाला कायमची चिकटली. दुपारीं एक तास जरी वामकुक्षी घेतली, तर त्यानंतर मनुष्य पुनः ताजातवाना होऊन दिवसाकाठी दोन तास अधिक काम करूं शकतो असें त्यांचें मत आहे. परंतु, फक्त एका तासाच्या वामकुक्षीची शिफारस करण्यासाठी सबंध दुपार आळसांत घालविणें शक्य नसल्यामुळे, चर्चिल यांनी निरनिराळ्या विषयांवरील नामांकित ग्रंथ वाचायला सुरुवात केली. ॲरिस्टॉटल, प्लेटो, गिबन, शेक्सपीअर, माल्थस, डार्विन आणि मेकॉले अशा विचारवंतांच्या आणि साहित्यिकांच्या ग्रंथांचीं त्यांनी पारायणें केलीं. ते म्हणतात, "वयाच्या बाविसाव्या वर्षीं ज्ञानाची खरी लज्जत मला समजली. जें शाळेंत शिकविलें नव्हतें तें मी या दोन वर्षांत शिकलों!"

धार्मिक ग्रंथांचें आणि पुराणांचें वाचनसुद्धा त्यांनी याच काळांत केलें. देवाधर्मावर त्यांची पूर्ण श्रद्धा असली, तरी तिचें प्रदर्शन ते कधी करीत नसल्यामुळे ते नास्तिक आहेत असा अनेकांचा गैरसमज झाला आहे. 'देवाला भेटायची तुमची तयारी आहे काय?' असा प्रश्न त्यांना विचारला असतां, 'पण मला भेटायची देवाची तयारी आहे काय?' असा उलट सवाल त्यांनी एकदा केला होता! पुराणांतल्या अनेक चमत्कारांसंबंधी चर्चिल म्हणतात, "पुराणांतल्या कथा आधुनिक विज्ञानाच्या निकषावर तपासून पाहण्याचा अट्टाहास कशाला करावा? चमत्कार घडणें हें निसर्गाच्या

विरुद्ध असलें, तरी मनाला आनंद आणि विरंगुळा प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य जर चमत्कारांच्या हकीकतींत असेल, तर त्यांच्यावर विश्वास कां ठेवूं नये ? —"

आपण जें वाचलें असेल त्याचा आपल्या सोबत्यांवर भडिमार करण्याची खोड चर्चिलना बंगलोरच्या मुक्कामांत जडली. एके दिवशीं त्यांनी सतत एक तास इतकी बडबड केली की त्यांचे सोबती चिडले, त्यांनी त्यांना जबरदस्तीने एका पलंगाखाली ढकललें आणि पत्त्यांचा डाव सपेपर्यंत त्यांना अक्षरशः स्थानबद्ध करून ठेविलें !

लष्करीदृष्ट्या बंगलोर येथे कांहीच घडत नसल्यामुळे, तीन महिन्यांची रजा घेऊन, १८९७ सालीं चर्चिल इंग्लंडला गेले. इतक्यांत हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर पठाणांचा उपद्रव सुरू झाला असून, त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी ब्रिटिश सैन्याची रवानगी होणार आहे अशी बातमी त्यांनी वाचली.

—रजा रद्द करून ते तत्काळ हिंदुस्थानच्या सफरीला निघाले !

* * *

## ४

### मलकंदची मोहीम

सरहद्दीवरील पठाणांना वठणीवर आणण्यासाठी करावयाच्या मोहिमेचे सर ब्रिंडोन ब्लड हे नेते असल्यामुळे, त्यांच्या हाताखालील सैन्यांत आपल्यासाठी एखादी जागा राखून ठेवलीच असली पाहिजे असा विश्वास चर्चिलना वाटत होता ! परंतु " माझ्या सैन्यांत जागा नाही—एखाद्या वृत्तपत्राचे वार्ताहार या नात्याने तुम्हाला माझ्याबरोबर नेता येईल " असें उत्तर मिळाल्यामुळे क्षणकाळ ते नाउमेद झाले. आपल्या तलवारीच्या तेजाने भूतलाला दिपविण्याचा घाट घातला असतां, 'तलवार मोडून लेखणी हातांत धरा ' असा सल्ला कोणत्या वीरपुरुषाला मानवेल ?–पण ते निराश झाले नाहीत ! लेखणीच्या शिफारसीने रणांगणावर प्रवश केला तरी तरवार गाजवायला मिळेल असा विश्वास त्यांना एकाएकी वाटूं लागला ! अलाहाबाद येथे प्रसिद्ध होणाऱ्या 'पायोनिअर' नांवाच्या वृत्तपत्राच्या संपादकाची त्यांनी भेट घेतली आणि त्या पत्राचे वार्ताहर म्हणून चर्चिल कचेरीबाहेर पडले. चर्चिल यांचीं बातमीपत्रें लंडन येथील ' डेली टेलिग्राफ ' या वृत्तपत्रांत, एका स्तंभाला पंचाहत्तर रुपये या दराने, प्रसिद्ध होतील अशी व्यवस्था त्यांच्या मातेने केली तीं निराळीच ! चर्चिल यांच्या लेखणीचा भाव प्रत्येक बातमीपत्राला पंचाहत्तर रुपयांपासून प्रत्येक स्तंभाला पंचाहत्तर रुपयांपर्यंत वाढला तो असा !

सरहद्दीच्या बंदोबस्तासाठी नेमलेल्या त्या सैन्याला ' मलकंद फील्ड फोर्स ' असें नांव दिलें होतें. त्या सैन्यांत वार्ताहार म्हणून स्वखर्चाने दाखल होण्यासाठी चार्चिल प्रथम बंगलोरला गेले. आपल्या पलटणींतून त्यांनी रजा मिळविली, महंमद बे नांवाच्या नोकराला बरोबर घेऊन ते स्टेशनवर गेले

आणि नौशेराचीं दोन तिकिटें त्यांनी विकत घेतलीं. नौशेरा हें गांव हिंदुस्थानांत कोठे आहे तें त्यांना माहीत नव्हतें. पांच दिवसांच्या सतत प्रवासानंतर बंगलोर ते नौशेरामधील दोन हजार अठ्ठावीस मैलांचें अंतर ओलांडून ते सर बिंडोन यांच्या सैन्यांत दाखल झाले !

नौशेराजवळच्या डोंगराळ मुलखांत सैन्याचा तळ पडला होता. पुढील प्रवासासाठी चर्चिलनी दोन घोडीं विकत घेतलीं आणि एक मोतद्दार मिळविला. चार–पांच दिवसांच्या मुक्कामानंतर त्या प्रदेशांतला सुरुवातीला असह्य वाटणारा उन्हाळा त्यांच्या अंगवळणीं पडला. याच मुक्कामांत 'व्हिस्की' नांवाच्या मद्याच्या एका नव्या जातीशीं त्यांचा प्रथम परिचय झाला. चर्चिल म्हणतात, "व्हिस्कीच्या वासाचा दर्प सुरुवातीला नकोसा वाटतो, पण संवयीने त्याचें विलक्षण आकर्षण वाटूं लागतें. मलकंदच्या मोहिमेच्या वेळीं व्हिस्कीची लज्जत मीं प्रथम चाखली आणि त्यानंतर ती पिण्याच्या कलेंत दिवसेंदिवस प्रगति करीत मीं अखेर प्रावीण्य संपादन केलें."

सर बिंडोन ब्लड यांनी आपल्या सैन्याची तीन तुकड्यांत विभागणी केल्यानंतर तें मामुंद खोऱ्यांतून आगेकूच करूं लागलें. ज्या तुकडीबरोबर चर्चिल वाटचाल करीत होते, ती एका निर्जन दिसणाऱ्या खेड्याजवळ येऊन ठेपली. या ठिकाणांतून पठाण निघून गेले असतील असा सुरुवातीला भास झाला, पण थोड्याच वेळांत पठाणांच्या आरोळ्या आणि बंदुकींचे बार ऐकूं येऊं लागले, त्याबरोबर वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन चर्चिल आघाडीवर दाखल झाले—प्रत्यक्ष युद्धांत भाग घेण्याचा त्यांच्या आयुष्यांतला तो पहिलाच प्रसंग.

इतरांच्या पराक्रमाच्या हकीकती आपण लिहिण्यापेक्षा आपल्या पराक्रमाच्या हकीकती इतरांनी लिहाव्या अशी चर्चिल यांची महत्त्वाकांक्षा असल्यामुळे, वार्ताहराची सरहद्द ओलांडून सैनिकांच्या प्रदेशांत ते वारंवार आक्रमण करीत होते. केवळ आत्मसंरक्षणासाठी त्यांच्या हातांत दिलेल्या शस्त्राचा ते शत्रूवर प्रहार करण्यासाठी वारंवार उपयोग करूं लागले. एका प्रसंगीं ते आणि एक शीख सैनिक असे दोघेच आघाडीवर असतां, एक अक्राळविक्राळ पठाण शेजारच्या डोंगरांतून कोसळला आणि त्याने आपल्या तलवारीने शीख सैनिकाला जायबंदी केलें ! चर्चिल यांनी निमिषार्धांत



[ चर्चिल यांनीं १८९९ सालीं पार्लमेंटांतील पहिली निवडणूक लढविली त्यावेळीं – ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम ..... दि .....

मिळत होते! या पुस्तकाची सर्वत्र प्रशंसा झाल्यामुळे, जगांत पुढे येण्याचा एक नवा आणि अनपेक्षित मार्ग मला दिसू लागला!"—

रणांगणावरील आणि साहित्यसृष्टींतील चर्चिल यांच्या कारकीर्दींचा प्रारंभ जवळजवळ एकदमच झाला. त्यावेळीं त्यांचें वय अवघें तेवीस वर्षांचें होतें!

* * *

**कादंबरीकार चर्चिल :**

क्यूबा आणि मलकंदच्या रणांगणांवरील चर्चिल यांचा संचार आणि वार्ताहर म्हणून त्यांनी मिळविलेला नांवलौकिक व पैसा, यामुळे त्यांच्या पलटणीचे कर्नल त्यांच्याशीं आदराने आणि आदबीने वागूं लागले होते. पण भूतलावर कोठेहि पेटलेल्या युद्धांत सामील होण्यासाठी चर्चिल वारंवार रजा घेतात हें कर्नलसाहेबांना पसंत नव्हतें. 'वार्ताहरच्या वेषांत आपल्या देशाच्या लढाया खेळणारा गृहस्थ' असें त्यांचें वर्णन वृत्तपत्रांत केलें जात होतें. मलकंदच्या पठाणांच्या पाठोपाठ खैबर खिंडींतल्या आफ्रिडी लोकांनी उठाव केला असून त्यांच्याविरुद्ध मोहीम सुरू करावी लागणार आहे ही बातमी वाचून चर्चिल पुनः रणांगणावर जाण्याच्या तयारीला लागले. पण कर्नलसाहेबांचा संयम आता ढळूं लागल्यामुळे चर्चिलना रजा देण्याचें त्यांनी नाकारलें. चर्चिल यांच्या मातेने लंडनमधील अधिकाऱ्यांना केलेली विनंतीसुद्धा फुकट गेली. त्या वेळीं कलकत्ता हें भारताच्या राजधानीचें शहर होतें. अखेरचा प्रयत्न करण्यासाठी चर्चिल कलकत्याला गेले, पण तेथील सेनाप्रमुखांनी त्यांची भेट घेण्याचेंसुद्धा नाकारल्यामुळे, मुठींत नाक धरून पुनः ते बंगलोरला परतले!

हिंदुस्थानांतील सैनिकी जीवनाचा चर्चिलना आता कंटाळा आला होता! हिंदुस्थानांतील भाषांसंबंधीच्या अज्ञानामुळे त्यांच्या मनांत बंगलोर येथील वास्तव्याबद्दल अरुचि निर्माण झाली होती. खरें सांगायचें, म्हणजे इंग्रजीशिवाय दुसऱ्या कोणत्याहि भाषेशीं त्यांचें सूत जमणें अशक्य होतें. ग्रीक आणि लॅटिन या भाषांनी त्यांच्या शालेय जीवनाचा अक्षरशः खेळखंडोबा केला होता. हिंदुस्थानांत इतके दिवस राहून 'मारो' आणि 'चलो' या दोन शब्दांव्यतिरिक्त एकसुद्धा हिंदी शब्द त्यांना येत नव्हता! पलटणींतला

रिकामा वेळ कसा घालवावा तें त्यांना कळेना, म्हणून त्यांनी कोणतीहि पूर्व-सूचना न देतां एक कादंबरी लिहायला सुरुवात केली !

चर्चिल यांनी लिहिलेल्या कादंबरीचें नांव ‘ सॅव्हरोला ’ असें होतें. ती प्रथम सुप्रसिद्ध मॅकमिलन कंपनीच्या मासिकांत प्रसिद्ध झाली आणि नंतर ‘ लाँगमन्स ’ या सुप्रसिद्ध प्रकाशकांनी पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली. आपल्या त्या कादंबरीवर चर्चिल फारसे खुष नव्हते. ‘ माझी कादंबरी वाचूं नका ’ असें ते आपल्या मित्रांना सांगत असत. पण तिच्या लेखनाचा मोबदला म्हणून चर्चिल यांना एकंदर दहा हजार रुपये प्राप्ति झाली. हुकूमशाहीचें उच्चाटन करणाऱ्या, पण अखेर जनतेच्या क्रांतींत बळी पडणाऱ्या नेत्याचें चित्र चर्चिल यांनी आपल्या कादंबरींत रंगविलें होतें. त्यायोगें त्यांनी स्वतःच्या राजकीय कारकीर्दीचें अचूक भविष्य स्वतःच्या नकळत वर्तविलें होतें, असें कांही टीकाकार म्हणतात !

* * *

## सुदानची मोहीम :

सॅव्हरोला कादंबरीच्या लेखनांत रमलेलें चर्चिल यांचें मन पुन्हा बंगलोरच्या बराकींत नांदायला नाखुष होतें—इतक्यांत एका युद्धाच्या नौबती झडूं लागल्या !

ईजिप्त आणि सहारा वाळवंट यांच्या दक्षिणेला असलेला आफ्रिका खंडांतला सुदान प्रांत त्या वेळीं ईजिप्तच्या हुकमतींत होता आणि ईजिप्तवर ब्रिटिशांची सत्ता होती. महमद अहमद ऊर्फ महादी नांवाचा एक मुसलमान नेता सुदानमध्ये उदय पावला होता आणि त्याचे अनुयायी दरवीश या नांवानें ओळखले जात होते. सुदानमधील धर्मवेडया मुसलमानांना महादीनें संघटित करून ईजिप्त आणि इंग्रजांविरुद्ध चिथावल्यामुळे, दरवीशांनी अनेक इजिप्शियनांची कत्तल करून इंग्रज सेनापति लॉर्ड गॉर्डन याचा खून केला ! महादीच्या बंडामुळे आपला सेनापति मारला गेला आणि आफ्रिकेंतल्या आपल्या प्रतिष्ठेलासुद्धा धक्का बसला, म्हणून महादी आणि त्याच्या दरवीशांचा नायनाट करण्याचा ब्रिटिश सरकारनें निश्चय केला. महादी हा ईश्वराचा प्रेषित आहे अशी सुदानमधील धर्मवेडया मुसलमानांची श्रद्धा असल्यामुळे,

ब्रिटिशांविरुद्ध करावयाच्या युद्धाला दरवीशांच्या दृष्टीने एखाद्या धर्मयुद्धाचें स्वरूप प्राप्त झालें होतें. आणि म्हणूनच, ब्रिटिश साम्राज्यासाठी तितक्याच निष्ठेने आणि कडवेपणाने युद्ध करणारा आणि ईजिप्तचा 'सरदार' म्हणून प्रसिद्ध असलेला ब्रिटिशांचा अग्रगण्य सेनापति लॉर्ड हरबर्ट किचनेर, याच्या हुकुमतीखाली वीस हजार ब्रिटिश सैनिकांची फौज महादीवर स्वारी करण्यासाठी सिद्ध झाली होती.

* * *

## 'सरदार' किचनेर :

शक्यांत शक्य तितक्या मोठ्या युद्धाची शक्यता निर्माण झाली असतां, चर्चिल यांचें मन सुदानकडे धाव घेऊं लागलें नसतें, तरच नवल! 'पदकांचा हव्यासी' आणि 'स्वतःची जाहिरात करणारा' अशीं विशेषणें चर्चिल यांचा उल्लेख करतांना कांही मत्सरग्रस्तांनी वापरलीं असलीं,तरी किचनेरच्या सैन्यांत आपला समावेश व्हावा म्हणून चर्चिलनी प्रयत्न केला. त्यांच्या मातेनेसुद्धा अनेक वशिले लावले, पण ईजिप्तच्या सरदाराने स्पष्ट नकार दिला! युद्धवार्ताहर या नात्याने चर्चिल यांनी इतका लौकिक संपादन केला होता की, लष्करांतले मोठमोठे अधिकारीसुद्धा त्यांचा मत्सर करूं लागले होते. 'हा आहे तरी कोण?—प्रत्येक मोहिमेंत हा कसा सामील होऊं शकतो?—सैन्यांत नोकरी करीत असतां वृत्तपत्रांत लेखन कसें करतो? लष्करांतल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रशंसा किंवा त्यांच्यावर अधिकारवाणीने टीका करायला हा धजतो तरी कसा? याला वारंवार रजा कशी मिळते?'— असे अनेक प्रश्न विचारले जात असतां, पुनः एकदा रजा मिळवून चर्चिल इंग्लंडांत दाखल झाले होते!— पण 'सरदाराच्या' नकारांत ढवळाढवळ करण्याची मंत्रिमंडळाची सुद्धा प्राज्ञा नव्हती!

—पण चर्चिल यांचें दैवच बलवत्तर होतें तिथे सरदाराचा इलाज काय?—

इंग्लंडचे मुख्य प्रधान, लॉर्ड सॅलिसबरी, यांनी चर्चिल यांचें मलकंदच्या मोहिमेवरील पुस्तक याच वेळीं वाचावें हा एक योगायोगच समजला पाहिजे. पुस्तक वाचून लॉर्डसाहेब इतके मोहित झाले, की त्यांनी चर्चिलना ताबडतोब भेटण्याची इच्छा दर्शवून रीतसर आमंत्रण दिलें. ती मुलाखत

फार तर पंधरावीस मिनिटांत संपुष्टांत येईल अशी चर्चिल यांची अपेक्षा होती, पण ती जवळजवळ दीड तास चालली. मुलाखत आटोपून चर्चिलना निरोप देतांना सॅलिसबरीसाहेब म्हणाले, ‘ तुमच्यासाठी कांही करतां येण्यासारखें असल्यास मला केव्हाहि सांगा, मला शक्य तें अवश्य करीन. ’

दुसऱ्या एखाद्या माणसाने आपल्या हुद्दयांत आणि पगारांत बढती मागितली असती—पण सुदानच्या युद्धांत सामील होण्यापेक्षा अधिक मोठी बढती असूं शकेल असें चर्चिलना वाटतच नव्हतें ! क्षणाचाहि विलंब न लावतां त्यांनी आपली इच्छा व्यक्त केली, सॅलिसबरीसाहेबांनी लॉर्ड किचनेरना ताबडतोब पत्र लिहिलें आणि त्याचें उत्तरहि तितक्याच वेगाने आलें–‘ शक्य नाही ! ’

पण सॅलिसबरींनी आपल्या अधिकाराचा उपयोग करून सुदानच्या मोहिमेवर जाणाऱ्या ‘ एकविसावे लॅन्सर्स ’ नांवाच्या पलटणींत ‘ जादा सैनिक ’ म्हणून युद्धखात्यामार्फत चर्चिल यांची नेमणूक करून टाकली ! ‘ जादा सैनिक ’ या नात्याने चर्चिलना पगार तर मिळणार नव्हताच, पण नेमणुकीच्या हुकुमाबरोबरच त्यांना एक लेखी इषारासुद्धा देण्यांत आला होता. ‘ चर्चिल यांनी स्वतःच्या खर्चाने आणि जबाबदारीवर जावें—लढाईत त्यांचें कांही बरें वाईट झालें तर त्याचे ते जबाबदार राहतील ! ’ आपल्या मृत्यूची जबाबदारी कोणावर, यासंबंधी मृत्यूनंतर ‘ विचार ’ करण्याची कोणतीच गरज नाही असें चर्चिल यांचें मत होतें !

लढाईत ‘ खर्ची ’ पडण्याची त्यांना भीति नसली तरी खर्चाचा प्रश्न होताच ! सुदानच्या प्रवासांतला खर्च भागवितां यावा म्हणून पुनः त्यांनी अनेक संपादकांच्या भेटी घेतल्या. त्या सार्थकीं लागून, दर स्तंभाला सव्वादोनशे रुपये या दराने ‘ मॉर्निंग पोस्ट ’ नांवाच्या इंग्लंडमधील सुप्रसिद्ध वृत्तपत्राने ‘ आमचा खास बातमीदार ’ म्हणून त्यांची नेमणूक केली. त्यांच्या युद्धविषयक साहित्याचा भाव आता स्तंभासाठी पंचाहत्तर रुपयांपासून सव्वादोनशे रुपयांपर्यंत वाढला होता.

* * *

**एक खेचर आणि दोन गाढवें :**

' एकविसावे लॅन्सर्स ' ही पलटण जितकी सुप्रसिद्ध तितकीच आढ्यताखोर होती. आपल्या पलटणीवर झालेला ' जादा सैनिकाचा ' तो बलात्कार पाहून एकविसाव्या लॅन्सर्सचें पित्त खवळलें होतें. सैनिकी जीवनाचा एकच एक व्यवसाय करणारे आणि वार्ताहराचा वेष पांघरून मागच्या दाराने सैन्यांत शिरणारा यांच्यांतला तो लढा होता. त्या बिनपगारी जादा सैनिकाचा पदोपदीं पाणउतारा करण्याचा ठराव एकविसाव्या लॅन्सर्सच्या पलटणींत संमत होऊन, त्याला अत्यंत हलक्या दर्जाचीं कामें देण्यांत आलीं ! एक खेचर आणि दोन गाढवें यांच्यावर देखरेख ठेवण्याचें काम एके दिवशीं करीत असतां एका मित्राजवळ चर्चिलनी उद्गार काढले, " अशीं कामें करायला सांगून माझा काटा काढावा असा या मंडळींचा विचार असावा; ते जसे मनाने क्षुद्र आहेत तसाच मीसुद्धा असेन अशी त्यांची कल्पना आहे ! या युद्धासंबंधी एक उत्कृष्ट पुस्तक लिहिण्याचा माझा विचार असल्यामुळे, येन केन प्रकारेण मला रणांगणावर राहिलेंच पाहिजे. त्यासाठी मला एखाद्या भंग्याचें काम करावें लागलें तरी मी करीन." क्षुल्लक गोष्टीवरून रागावणें, वैयक्तिक कटकटी निर्माण करणें किंवा सूडाचे विचार मनांत आणणें अशा गोष्टींत कालाचा अपव्यय करण्याची चर्चिल यांना संवय नाही. त्यांचा अपमान करण्याचा किंवा त्यांच्या अंगीकृत कार्यांत व्यत्यय आणण्याचा कोणीं प्रयत्न केला तरी त्यांची स्थितप्रज्ञता भंग पावत नाही.

ओमदूरमन आणि खार्टूम या शहरांत महादीच्या दरवीशांचा तळ होता, तेथे पोहोचायला किचनेरच्या सैन्याला जंगलांतून आणि उजाड वाळवंटांतून साडेनऊशे मैलांचा प्रवास करावा लागला. विमानें, रणगाडे आणि चिलखती वाहनें अशासारख्या साधनांनी युद्ध करण्याचा जमाना अजून दूर होता. चर्चिल म्हणतात, " आघाडीवर घोडदळ, त्याच्या मागील पायदळाबरोबर खुद्द किचनेर, त्यांच्यामागे तोफखाना आणि शेवटीं युद्धसाहित्याचीं ओझीं वाहणाऱ्या उंटांच्या रांगा—अशा प्रकारची इतिहासांतली ती शेवटचीच लढाई असावी. "

* * *

**किचनेरला सलामी :**

वार्ताहराची भूमिका झुगारून देऊन चर्चिल आगामी युद्धांत सक्रिय भाग घेण्यासाठी सिद्ध झाले होते. आघाडीच्या अग्रभागीं टेहळणी करणाऱ्या घोडदळाच्या पथकांत संचार करून, प्रसंगविशेषीं ते सैनिकांना हुकूमहि सोडत होते अजून युद्धाला तोंड लागावयाचें असलें तरी चर्चिल यांच्या तोंडाचा तोफखाना एकसारखा चालू होता. " किचनेर सरदारांनी रजा घेतली, तरी मी आहें--" असा त्यांचा आविर्भाव होता. ब्रिटिशांची वीस हजार फौज आपल्यावर चाल करून येते आहे असें पाहून महादीने साठ हजार सैनिक जमविले होते. इतकेंच नव्हे, तर ब्रिटिश सैन्याने आपल्यावर हल्ला करण्याची वाट न पाहतां एका सुप्रभातीं महादीच्या सैन्यानेच ब्रिटिशांच्या सैन्याच्या रोखाने आगेकूच करायला सुरुवात केली. महादीच्या पुढे सरसावणाऱ्या सेनेचें दर्शन सूर्याच्या सोनेरी किरणांबरोबर प्रथम चर्चिलनाच घडलें. " महादीचें सैन्य दिसूं लागलें आहे, " अशी बातमी त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली, तेव्हा ती बातमी किचनेरच्या कानावर घालण्याची कामगिरी चर्चिल यांच्यावरच सोपविण्यांत आली.

आपल्या सैन्यांत चर्चिल यांचा समावेश करण्याबाबत किचनेरनी तीनदा नकार दिला होता. त्यानंतर चर्चिलनी " मागच्या दाराने " आपल्या सैन्यांत प्रवेश केला आहे याची किचनेरना माहितीसुद्धा नसेल ! अशा परिस्थितींत आपण जर त्यांच्या दृष्टीला पडलों, तर महादीचा समाचार घेण्याचा बेत कांही काळ तहकूब करून ते आपलाच समाचार घेतील अशी चर्चिलना भीति वाटत होती. ते म्हणतात, " युद्ध सुरू होणार म्हणून मी उत्तेजित झालों असलों तरी सरदारासमोर उभे राहण्याच्या प्रसंगामुळे अधिकच उत्तेजित झालों. "

चर्चिलनी घोडा भरधाव सोडला, पायदळाबरोबर घोड्यावरून आस्ते आस्ते मार्ग कापीत असलेल्या किचनेरची मूर्ति दिसतांच आपल्या घोड्याचा लगाम त्यांनी खेचला, किचनेरच्या जवळ जाऊन त्यांना अदबीने सलामी दिली आणि महादीची बातमी त्यांना सांगितली. किचनेरनी त्य.च्याकडे साधा दृष्टिक्षेपहि न करतां विचारलें, " दोन्ही सैन्यांची गाठ पडायला किती वेळ

लागेल"—त्यावर चर्चिलनी एखाद्या तज्ज्ञाचा आव आणून हमखास उत्तर दिलें, "माझ्या अंदाजाप्रमाणे दीड तास !"

नुसती मान हालवून किचनेरनी चर्चिल यांना आपल्या जागीं परत जाण्याची आज्ञा केली आणि चर्चिलनी पुनः घोडा पिटाळला. ते म्हणतात, "सूर्योदय होत असतांना घोड्यावर स्वार असावें, आपल्यावर चाल करून येणारी शत्रूची सेना नजरेच्या टप्प्यांत असावी, जें घडतें आहे तें सर्व पाहण्याची संधि मिळावी, आपली आणि आपल्या सरसेनापतीची प्रत्यक्ष भेट व्हावी—यापेक्षा अधिक मौज कोणती असूं शकेल ?"

चर्चिल पुनः आघाडीवर गेले. महादीचें सैन्य अगदी जवळ आलें तरी आपलें सैन्य स्वस्थ आहे असें पाहून त्यांनीच हुकूम सोडला, "शत्रु चारशे पावलांवर आला आहे—एकदम गोळीबाराला सुरुवात करा"—सप्टेंबरच्या दोन तारखेला ओमदूरमनच्या इतिहासप्रसिद्ध युद्धाचा प्रारंभ झाला. ज्या ज्या ठिकाणीं भीषण रणकंदन चालू असेल त्याठिकाणीं चर्चिल संचार करीत होते. एका प्रसंगीं एका दरवीशाबरोबर तलवारीचें द्वंद्व खेळत खेळत त्यांनी हातांतली तलवार खाली टाकली आणि एका निमिषार्धांत पिस्तुल हातांत घेऊन गोळी झाडली—दरवीश गतप्राण झाला असें पाहून चर्चिलनी शेजारच्या सैनिकाला विचारलें, "गंमत आहे की नाही ?"

"गंमत आहे असं म्हणता येणार नाही—पण सरावाने गंमत वाटेलहि कदाचित्"—त्या सैनिकाने उत्तर दिलें.

—भाले, बरच्या आणि तलवारीनी खेळलें गेलेलें इतिहासांतलें तें शेवटचेंच महत्त्वाचें युद्ध होतें. महादीकडे बंदुका होत्या, पण ब्रिटिशांच्या बंदुका आणि तोफा अधिक अद्ययावत् असल्यामुळे अखेर महादीचा संपूर्ण पराभव झाला.

महादीवरील विजयानंतर इंग्लंडला परततांना चर्चिलनी ईजिप्तची राजधानी कायरो येथे छोटा मुक्काम केला. युद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत त्यांच्या एका सहकारी अधिकाऱ्याच्या हातावर तलवारीचा जबरदस्त घाव बसला होता. कायरो येथील इस्पितळांतच त्यांच्या हातावर शस्त्रक्रिया करण्यांत आली, त्या वेळीं चर्चिल हजर होते. शस्त्रक्रिया पूर्ण झाल्यावर जखम शिवून टाकण्याकरिता माणसाच्या कातडीची गरज होती. आपल्या हाताची जरूर

तितकी कातडी एका सूतिकेने देऊं केली, पण तिच्या हाताला सुरीचा स्पर्श होतांच ती बेशुद्ध पडली ! तें पाहून आपली कातडी द्यावयास चर्चिल पुढे सरसावले ! चर्चिलनी हात पुढे केला आणि त्यांच्या हाताची जरूर तितकी कातडी आणि मांसाचा एक बारीकसा तुकडा कापला जात असतां, ते चिरूट ओढीत निर्विकारपणाने उभे होते !

* * *

५

## लष्करी नोकरीचा राजीनामा

लॉर्ड रॅन्डॉल्फ यांचेजवळ फारसा पैसा नव्हता इतकेंच नव्हे, तर खर्चिक स्वभावामुळें त्यांनी कर्जसुद्धा करून ठेविलें होतें. वडिलांच्या मृत्यूनंतर आईचें उत्पन्न फारच माफक असल्यामुळे, आईच्या पैशाने आपल्या पगाराला पुस्ती जोडणें चर्चिलना प्रशस्त वाटत नव्हतें. पोलोसारखा श्रीमंती खेळाचा खर्च भागवायला त्यांचा पगार अपुरा पडत होता. "मी फक्त लष्करी विद्या शिकलों होतों, पण माझा चरितार्थ चालवायला ती असमर्थ होती" असे उद्गार त्यांनी काढले आहेत. उलटपक्षीं, पुस्तकांमुळे आणि वृत्तपत्रीय लेखनामुळे चर्चिल यांना आजपर्यंत मिळालेल्या पगाराच्या पांचपट प्राप्ति झाली होती. सुदानमधील युद्धाचीं बातमीपत्रें अतिशय लोकप्रिय होऊन त्यांना एकंदर पंधराशे रुपयांचा मोबदला मिळाला होता. अशा परिस्थितींत लष्करांतल्या नोकरीचा राजीनामा देण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

राजीनामा देण्यापूर्वी ते आपल्या पलटणींत दाखल झाले. कारण मीरत येथे चालू असलेल्या पोलोच्या चुरशीच्या सामन्यांत त्यांना भाग घ्यावयाचा होता. चर्चिल यांच्या उत्कृष्ट खेळामुळे त्या सामन्यांत त्यांच्या पलटणीने विजय मिळविला. नोकरीच्या काळांत ते कितीतरी महिने रजेवर असल्यामुळे, पलटणींत नव्यानेच आलेल्या अधिकाऱ्याशीं त्यांची तोंडओळखसुद्धा नसली, तरी त्यांचें नांव प्रत्येकाच्या परिचयाचें होतें. पलटणींतले त्यांचे सोबती ठराविक साच्याचें आणि क्रियाशून्य जीवन जगत असतां, चर्चिल यांनी तीन युद्धांत भाग घेतला होता आणि वार्ताहर म्हणून पुष्कळच नांवलौकिक मिळविला होता. त्यांना निरोप देण्यासाठी एक मोठी मेजवानी झाली त्या वेळीं भाषण करतांना चर्चिल गहिंवरले होते असें सांगतात.

सुदानमधील युद्धासंबंधी ' रिव्हर वॉर ' नांवाचें एक पुस्तक ते लिहीत होते. त्या पुस्तकाच्या हस्तलिखितावरून शेवटचा हात फिरविण्याकरिता, हिंदुस्थानांतून लंडनला परत जातांना चर्चिलनी कायरोला मुक्काम केला. सुप्रसिद्ध इंग्रज इतिहासकार गिबन आणि मेकॉले यांच्या शैलींचें मिश्रण करून, सुदानच्या लढाईबरोबरच सुदानच्या इतिहासाचा सुद्धा त्यांनी आपल्या पुस्तकांत समावेश केला होता. त्या वेळच्या अनुभवासंबंधी चर्चिल लिहितात, " पुस्तकांतला प्रत्येक परिच्छेद आणि प्रकरण स्वयंपूर्ण असावें, पण सर्व परिच्छेद आणि प्रकरणें एका सूत्रात गोंविलीं पाहिजेत. एखादें घर बांधणें, एखादें चित्र काढणें किंवा एखाद्या लढाईचा व्यूह रचिणें आणि एखादें पुस्तक लिहिणें यांत पुष्कळ साम्य असतें. कोणत्याहि पुस्तकाचें लेखन हा एक अत्यंत मनोरंजक उद्योग असतो. या काळांत मी आणि माझें पुस्तक एकमेकांचे जिवलग दोस्त बनलों होतों—माझ्या पुस्तकांत वर्णिलेलं जीवन मी पुन्हा जगत होतों ! "

' रिव्हर वॉर ' हें पुस्तक १८९९ सालीं प्रसिद्ध झालें तेव्हा त्याच्या लागोपाठ दोन आवृत्त्या निघाल्या. पुस्तकाची सार्वत्रिक प्रशंसा झाली, पण लॉर्ड किचनेर यांच्यावर केलेल्या टीकेमुळे अनेक वाचक नाखुष झाले ! किचनेरच्या विजेत्या सैन्याने महादीच्या कबरीचा विध्वंस केला आणि त्याचें शव उकरून काढून धडापासून डोकें वेगळें केलें वगैरे अत्याचारांना अनुलक्षून, " जेत्यांची ही वृत्ति पाहतां किचनेरला विजय मिळाला नसता तर बरें झालें असतें असें वाटूं लागतें, " अशी टीका चर्चिल यांनी केली होती.

याच वेळीं विन्स्टन चर्चिल याच नांवाचा एक कादंबरीकार अमेरिकेंत उदयाला आल्यामुळे पुष्कळ घोटाळा होऊं लागला. चर्चिल यांच्या युद्धविषयक लिखाणाबद्दल ' अमेरिकन चर्चिलला ' आणि त्याच्या कादंबऱ्याबद्दल ' इंग्रजी चर्चिलला ' अभिनंदनपर पत्रें येऊं लागलीं ! हा घोटाळा थांबविण्यासाठी एक ठराव सामोपचाराने केला तो असा की, दोघांनी अमेरिकन चर्चिलने ' विन्स्टन चर्चिल ' आणि इंग्रजी चर्चिलने ' विन्स्टन स्पेन्सर चर्चिल ' असें नांव आपल्या लेखांसाठी आणि पुस्तकांसाठी वापरावें. चर्चिल लिहितात, " त्यानंतर एक वर्षाने मी अमेरिकेंत

व्याख्यानें देण्यासाठी गेलों त्या वेळीं मी जहाजांतून उतरतांच ‘ अमेरिकन चर्चिलने ’ सर्वांच्या अगोदर माझें स्वागत केलें आणि माझ्या सन्मानासाठी एक मेजवानीसुद्धा दिली. पण थोडासा घोटाळा झालाच ! इंग्लंडहून मला येणारीं पत्रें त्याच्याकडे जाऊं लागलीं आणि त्याने दिलेल्या मेजवानीचें ‘ बिल ’ माझ्याकडे आलें ! ”

* * *

## निवडणुकींतला पहिला पराभव :

लष्करांतली नोकरी सोडल्यावर ऑक्सफोर्ड येथील महाविद्यालयांत प्रवेश करून विद्वानांच्या मेळाव्यांत प्रवेश करण्याचा चर्चिल यांचा बेत होता. परंतु महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमांतील ग्रीक आणि लॅटिन भाषेंतील पुस्तकांचा बेसुमार भरणा पाहून त्यांनी पद्धतशीर माघार घेतली. त्यानंतर एके दिवशीं वडिलांचा कित्ता गिरवून राजकारणांत प्रवेश करण्याचे विचार चर्चिल यांच्या मनांत घोटाळूं लागले आणि त्यासंबंधांत हुजूर पक्षाच्या मंत्रि-मंडळांतल्या एका सदस्याशीं त्यांनी विचारविनिमय केला, तेव्हा ‘ हुजूर पक्षाच्या कचेरींत जाऊन आपलें नांव नोंदवा ’ असा सल्ला त्यांना मिळाला. तो सल्ला चर्चिलना इतका पटला की, लगेच दुसरे दिवशीं ते हुजूर पक्षाच्या कचेरींत दाखल झाले. मतदारांसमोर निवडणुकीसाठी उभें राहावयाचें असेल तर सार्वजनिक भाषणाचा सराव पाहिजे अशी पक्षाच्या दुय्यम नेत्यांनी त्यांना सूचना केल्यामुळे, आपल्या वक्तृत्वाने मतदारांना दिपविण्याची तयारी चर्चिल यांनी आरंभिली.

फ्रान्स आणि इंग्लंड या देशांचे संबंध त्या वेळीं कांहींसे गढूळ झाले होते. फ्रेंचांचे नेते आपल्या पुढाऱ्यांशीं बेपर्वाईने वागत आहेत या समजामुळे फ्रेंचांचा दोनदा पाडाव करणाऱ्या मार्लब्ररोच्या वंशजाचें पित्त खवळलें असल्यास नवल नाही. चर्चिल यांनी आपल्या पहिल्या भाषणासाठी एक गाव निवडलें आणि त्या भाषणांत फ्रान्सवर जोरदार हल्ला चढविला. “फ्रेंचांच्या वागणुकीमुळे युद्धाचे ढग जमूं लागले आहेत ” असें विधान त्यांनी केलें, तेव्हा त्या गंभीर परिस्थितीची गंधवार्तासुद्धा वृत्तपत्रांना कशी नाही याचें श्रोत्यांना आश्चर्य वाटलें! “ हे ढग नाहीसे होतील असा संभव आहे ”

असा चर्चिल यांनी समारोप केला, तेव्हा मात्र श्रोत्यांची चिंता दूर झाली ! चर्चिल यांचें हें पहिलें सार्वजनिक भाषण त्यांच्या पक्षातर्फे नसल्यामुळे त्याची वृत्तपत्रांनी मुळीच दखल घेतली नाही. हुजूर पक्षातर्फे त्यांचें पहिलें भाषण बाथ या गावीं झालें तेव्हा अनेक बातमीदार हजर होते. बाथ येथे केलेल्या भाषणांत चर्चिल यांनी आपल्या पक्षाच्या आर्थिक कार्यक्रमाची तरफदारी केली. त्या भाषणाचे वृत्तान्त अनेक वृत्तपत्रांत प्रसिद्ध होऊन, " राजकारणाच्या क्षितिजावर एक नवा तारा उगवला आहे " असा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला. आपल्या पहिल्या भाषणासंबंधी चर्चिल म्हणतात, " आतुरता आणि भीति यांचें मिश्रण माझ्या मनांत दाटलें होतें. काय बोलायचें तें ठरविलें होतें आणि श्रोत्यांवर परिणाम करतील अशीं कांही वाक्यें पाठ केलीं होतीं. लाकडाच्या एका चौथऱ्यावर उभे राहून मला भाषण करावें लागलें—ना टेबल ना खुर्ची ! माझें भाषण श्रोत्यांना आवडतें आहे असें दिसूं लागतांच, माझ्या मनांत आत्मविश्वास जागृत झाला ! "

त्यानंतर कांहीं दिवसांनी ओल्डहॅमच्या मतदारसंघांत दोन पोट-निवडणुकी व्हावयाच्या होत्या, त्यांपैकी एका जागेसाठी हुजूर पक्षाने चर्चिल यांची आणि दुसऱ्या जागेसाठी मॉडस्ले नांवाच्या उमेदवाराची निवड केली. दोघांचे प्रतिस्पर्धी अर्थातच उदारमतवादी पक्षाचे होते. या निवडणुकीला हुजूर पक्षाने द्यावें तितकें महत्त्व दिलें नसल्यामुळे, चर्चिल आणि मॉडस्ले यांनी ठिकठिकाणीं केलेल्या भाषणांत विसंवाद निर्माण होऊन मतदार कांहीसे गांगरले ! गरिबांचा उद्धार करून पृथ्वीवर स्वर्ग आणण्याचीं वचनें मॉडस्ले देत होते, तर ज्यांची कास धरून स्वर्गलोकाचा पल्ला गाठावयाचा त्या ख्रिस्ती देवळांच्या व्यवस्थेवर चर्चिल यांनी हल्ला चढविला होता ! चर्चिल यांचीं कांही स्वतंत्र मतें हुजूर पक्षाच्या मतांशीं जुळणारीं नव्हतीं. उलटपक्षीं, विरुद्ध पक्षाच्या उमेदवारांच्या भाषणांत सुसंगती होती. अशा अनेक कारणांमुळे, उदारमतवादी पक्ष त्या पोटनिवडणुकींत यशस्वी होऊन मॉडस्ले आणि चर्चिल पराभूत झाले.

निकाल जाहीर झाला तरी मतमोजणीच्या वेळीं जमलेल्या गर्दींत चर्चिल अशा बेफिकीर ऐटींत हिंडत होते, की विजयी कोण आणि पराभूत कोण हें समजणें कठीण झालें होतें. निकालानंतर जीं भाषणें झालीं त्यांत चर्चिल

यांचें भाषण सर्वांत उत्कृष्ट झालें. आपल्या विजयी प्रतिस्पर्ध्यांचें अभिनंदन करून त्याचा निरोप घेतांना, " आपल्या लढतीवर शेवटचा पडदा पडला आहे असें मात्र समजूं नका " असें चर्चिल यांनी त्याला बजाविलें!

ओल्डहॅमच्या पोटनिवडणुकींत पराभव झाल्यानंतर ' आता कोणता कार्यक्रम हातीं घ्यावा ' असा विचार चर्चिल करीत होते, इतक्यांत इतिहास-प्रसिद्ध ' बोअर ' युद्धाची सुरुवात झाली !

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत.
अनुक्रम ३४८२८ वि: चरित्र
क्रमांक ........ नों दि २-५-८३

६

## बोअर युद्धाची सुरुवात

'बोअर' म्हणजे शेतकरी. स्वतःच्या जमिनीवर मातेप्रमाणे प्रेम करणारे शेतकरीच तिच्या स्वातंत्र्यासाठी, नांगराऐवजीं तलवार हातीं धरून, युद्धाला सिद्ध झाले होते. दक्षिण आफ्रिकेंतील ट्रान्सव्हाल प्रदेशांत त्यांची वसति असून त्यांचा अध्यक्ष, प्रेसिडेंट क्रूगर, हा अतिशय करड्या शिस्तीचा आणि धार्मिक वृत्तीचा मनुष्य होता. 'पृथ्वी वाटोळी नसून सपाट आहे' असें त्याच्यासमोर विधान करण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती! आपल्या भोवतालचे नाताळ आणि केप टाऊन वगैरे प्रदेश ब्रिटिश वसाहतवाल्यांनी व्यापिले आहेत हें त्याला पसंत नव्हतें. ब्रिटिशांचा ट्रान्सव्हालशीं असलेला व्यापार त्याने बंद पाडला होता. उलटपक्षीं, ट्रान्सव्हालमधील हिऱ्याच्या खाणींवर ब्रिटिशांचा डोळा होता. जर्मनी आणि हॉलंड यांची क्रूगरला मदत असल्यामुळे त्याने भरपूर दारूगोळा जमविला होता. पॉमपॉम् नांवाच्या अद्ययावत् तोफा त्याच्या सैन्याजवळ होत्या. क्रूगरची वाढती तयारी पाहून ब्रिटिशांनीसुद्धा त्या विभागांतील आपल्या सैन्यांत वाढ करून, ट्रान्सव्हालच्या सरहद्दीसमीप मोर्चे बांधले होते. क्रूगर आणि ब्रिटिश सरकार यांच्यामधील रेंगाळलेल्या वाटाघाटी शेवटीं अयशस्वी होऊन, सरहद्दीवरील फौज तीन दिवसांत मागे घेतली नाही तर युद्ध सुरू होईल असा क्रूगरचा निर्वाणीचा खलिता ११ ऑक्टोबर १८९९ रोजीं लंडन येथे थडकला होता!

'ट्रान्सव्हाल' हा एकच विषय वृत्तपत्रांत चर्चिला जात होता. 'युद्धाशिवाय गत्यंतर नाही' आणि 'कोणतीहि किंमत द्यावी लागली तरी युद्धाचा मार्ग टाळला पाहिजे' असें प्रतिपादन करण्यांत ब्रिटिश जनतेची,

जणू काय, विभागणी झाली होती--अखेर युद्धाचाच मार्ग मंत्रिमंडळाने पसंत केला !

चर्चिल यांना या खेपेला रणांगणावर जाण्यासाठी कोणाची मनधरणी करावी लागली नाही की 'मागच्या दाराचा' अवलंब करावा लागला नाही. क्रूगर याचें आव्हान प्रसिद्ध झाल्यापासून एका तासाचा अवधि लोटतो न लोटतो, तोंच 'मॉर्निंग पोस्ट' या वृत्तपत्राच्या कचेरींतून त्यांना मानाचें आमंत्रण आलें आणि संभाव्य युद्धासंबंधांत खास बातमीदार म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत आली. दरमहा साडेसदतीसशे रुपये पगार–शिवाय प्रवासाचा आणि जेवणाचा वगैरे सर्व खर्च, युद्धक्षेत्रांत स्वतःच्या पसंतीप्रमाणे मनमानेल तिथे संचार करण्याचें स्वातंत्र्य, या त्यांच्या नेमणुकीच्या अटी होत्या. त्या जमान्यांत किचनेरसारख्या रणांगण गाजविणाऱ्या सेनापतीप्रमाणेच, स्वतःचा जीव धोक्यांत घालून आपल्या वृत्तपत्राला बातम्या पुरविणाऱ्या अनेक बातमीदारांनी नांवलौकिक कमाविला होता, पण अवघ्या चोवीस वर्षें वयाच्या चर्चिलना या खेपेला जो मोबदला मिळाला तितका मोबदला त्यापूर्वी कोणीच मिळविला नव्हता.

बोअर युद्धासाठी सर रेडव्हर्स बुलर या ब्रिटिश सेनापतीची नेमणूक करण्यांत आली. बुलर हे ब्रिटिशांचे एक प्रख्यात आणि अनुभवी सेनापति होते. चर्चिल म्हणतात, "बुलर हे फार कमी बोलत असत आणि जें बोलत असत तें समजत नसे. कोणतीहि गोष्ट समजावून सांगण्याचा ते कंटाळा करीत असत. त्यांची मूर्ति भव्य असून शांत आणि गंभीर होती. चुकामागून चुका करीत आणि अरिष्टामागून अरिष्टें ओढवून घेण्यांत ते पटाईत असले तरी आश्चर्य असें की, त्यांच्याबद्दलचा त्यांच्या देशाचा आदर आणि सैनिकांचा विश्वास कधी कमी झाला नाही !"

बोअर लोकांसारख्या मुरख्या सैनिकांचा ब्रिटिशांच्या सुसज्ज सैनिकांसमोर चार दिवससुद्धा निभाव लागणार नाही, किंबहुना नुसत्या सामर्थ्याच्या प्रदर्शनाबरोबर युद्धाचा संभव विरघळेल असें अनेकांचें मत होतें. जवळ जवळ पन्नास वर्षांत कोणतेंहि मोठें युद्ध करण्याची संधि न मिळालेल्या ब्रिटिशांच्या युद्धखात्यांतील अधिकाऱ्यांचीसुद्धा तीच समजूत होती. युद्धाची सुरुवात झाली तर तें फार तर तीन महिन्यांत संपेल असें भविष्य

वर्तविलें जात असल्यामुळे, युद्ध केव्हाहि थांबलें तरी कमीत कमी चार महिन्यांचा पगार आपल्याला मिळालाच पाहिजे ही चर्चिल यांची अट त्यांच्या वृत्तपत्राच्या संपादकाने मान्य केली होती. बोअर लोकांना मिळत असलेल्या युरोपांतल्या कांही राष्ट्रांच्या मदतीची माहिती युद्धखात्याशीं संलग्न असलेल्या माहितीखात्याला असून बोअर सैनिक, त्यांच्याजवळचीं शस्त्रें, त्यांचें रणकौशल्य आणि त्यांचा प्रदेश यांसंबंधी माहिती देणारीं दोन पुस्तकें त्या खात्याने सेनापतीसाहेबांकडे पाठविण्याची खबरदारी घेतली होती. परंतु 'मला सर्व माहिती आहे' असा शेरा मारून बुलरसाहेबांनी तीं पुस्तकें आलीं तशीं परत केलीं ! यासंबंधांत चर्चिल म्हणतात, "कोणत्याहि युद्धांत चुटकीसरसा जय मिळविता येईल किंवा ज्याने युद्धाची सफर आरंभिली आहे त्याला त्या सफरींतल्या अनपेक्षित प्रवाहांची आणि वादळांची आगाऊ कल्पना करतां येईल असा विश्वास कधीच बाळगूं नये. जो मुत्सद्दी युद्धाच्या नादीं लागतो त्याने हें खूप लक्षांत ठेवावें की, युद्धाचा हुकूम देतांच ज्यांची आगाऊ कल्पना नसते अशा आटोक्याबाहेरच्या घटनांचा तो गुलाम बनत असतो ! जुन्या जमान्यांत वावरणाऱ्या युद्धकचेऱ्या—मिजासखोर, नालायक किंवा कच्च्या दिलाचे सेनापति, अविश्वासू मित्र, आपल्या वांकड्यावर असलेले तटस्थ, चुकीचे अंदाज, नाउमेद करणाऱ्या घटना आणि पाठमोरें झालेलें नशीब अशा अनेक गोष्टींशीं रणांगणावरच्या प्रवाश्याला मुकाबला करावा लागतो. विजयाबद्दल तुमची कितीहि खात्री असली तरी आपल्यालाच विजय मिळेल असें तुमच्या शत्रूलासुद्धा वाटत असतें—तसें नसलें तर युद्धाची सुरुवातच होणार नाही !"

सर विल्यम जीराल्ड नांवाचे लॉर्ड रॅन्डॉल्फ यांचे एक जुने मित्र होते. "कधी काळीं युद्धाचा प्रसंग आला तर मला तुमच्याबरोबर न्या" अशी इच्छा त्यांनी सेनापति बुलर यांच्याजवळ व्यक्त केली असल्यामुळे, बुलरसाहेबांनी त्यांचा ट्रान्सव्हालच्या मोहिमेंत समावेश केला होता. इंग्लंडचा किनारा सोडण्यापूर्वी जीराल्ड आणि चर्चिल यांना मेजवान्यांचीं अनेक आमंत्रणें आलीं. एका मेजवानीच्या प्रसंगीं तर ब्रिटिशांचे युवराजसुद्धां हजर होते. त्या दिवशीं आफ्रिकेंतील रणांगणावर उपयोगी पडाव्या म्हणून जीराल्ड

यांना उत्तमोत्तम आणि उंची मद्याच्या अनेक बाटल्यांचा ' अहेर ' करण्यांत आला. त्या बाटल्या जशाच्या तशा आपल्या मुक्कामीं पोहोचाव्या या हेतूने, त्या ज्या खोक्यांत भरल्या होत्या त्या खोक्यांवर जीरार्ड यांनी ' एरंडेल तेल ' अशा चिठ्ठ्या चिकटविल्या होत्या ! आफ्रिकेंत स्थायिक होऊन दोन महिने झाले तरी बाटल्यांचीं खोकीं आलीं नाहीत म्हणून त्यांनी चौकशी केली त्या वेळीं त्यांना उत्तर मिळालें, " एरंडेल तेलाचीं खोकीं चुकून तुमच्या सामानांत शिरलीं होतीं, तीं इस्पितळांत पाठवून दिलीं. तुम्हांला एरंडेल तेल पाहिजेच असेल तर ताबडतोब कळवा—इथे भरपूर पुरवठा आहे ! "

ऑक्टोबरच्या अकरा तारखेला चर्चिल प्रवासाला निघाले. ते ज्या बोटींतून प्रवास करीत होते त्याच बोटींतून बुलरसाहेब आणि लष्करांतली इतर अनेक ' बडी मंडळी ' प्रवास करीत होती. त्या जमान्यांत बिनतारी संदेशांची सोय नसल्यामुळे, किनारा सोडल्यानंतर आगबोटीचा आणि जगाचा संबंधच सुटल्यासारखा होत असे. दक्षिण आफ्रिकेच्या मोहिमेवर चाललेल्या सैनिकांना, त्यांनी इंग्लंडचा किनारा सोडल्यावर, कोणकोणत्या घटना घडल्या असतील याची कल्पना येणें शक्य नव्हतें. क्रूगरच्या सैन्याने युद्धाला सुरुवात केली असेल तर त्या भुरट्यांचा आपल्या सैनिकांनी पराभव केल्यामुळे आपण मुक्कामाला पोहोचेपर्यंत युद्धाची समाप्तीसुद्धा होईल अशी अनेकांची कल्पना होती ! ती केवळ कल्पनाच असली, तरी रणाशिवाय रणांगणावरून परतण्याची कल्पना जातिवंत सैनिकाचा हिरमोड करणारी होती!

* * *

### चिलखती गाडींत :

ऑक्टोबरच्या ३१ तारखेला चर्चिल आणि त्यांचे सहप्रवासी दक्षिण आफ्रिकेंत पोहोचले त्याच दिवशीं बोअर लोकांनी नाताळ प्रांतावर हल्ला चढविल्याची बातमी येऊन थडकली ! इतकेंच नव्हे, तर ब्रिटिशांच्या सैन्याला बोअर सैन्याने ठिकठिकाणीं वेढलें आहे, एका क्षेत्रांत बारा हजार ब्रिटिश सैनिक शरण गेले आहेत आणि जनरल सायमन्स नांवाचा सेनापति मारला गेला आहे, अशा अनेक अशुभ बातम्यांनी त्यांचें स्वागत केलें.

939(9)

बोअर लोकांना घोड्यावर नीट बसतांहि येत नसेल असें सांगणाऱ्या इंग्रजांना, अन्न आणि विश्रांति मिळाली नाही तरी बोअर लोक कित्येक दिवस घोडदौड करूं शकतात, त्यांच्या परिचयाच्या प्रदेशांत ते चपलतेने हालचाल करूं शकतात आणि त्यांच्या बंदुकीचा नेम अचूक असतो याची कल्पनासुद्धा नव्हती ! चर्चिल म्हणतात, "बोअर सैनिक सोशिक होते आणि अनुभवाच्या शाळेंत युद्धकला शिकले होते. ते खेडवळ आणि अशिक्षित आहेत ही अवहेलनेची भावना आणि अज्ञान फार घातक ठरलें. हें युद्ध तीन महिन्यांत संपून फार तर एक कोटी पौंड खर्च येईल असा इंग्लंडांतील अधिकाऱ्यांचा आणि मुत्सद्द्यांचा अंदाज होता—युद्ध तीन वर्षें चाललें आणि एकंदर वीस कोटी पौंड खर्च आला !"

बोअर लोकांनी नाताळ प्रांतावर हल्ला चढविल्यामुळे इंग्रजांच्या सैन्याने लेडीस्मिथ येथे माघार घेतली होती. चर्चिल आणि 'मँचेस्टर गार्डियन' नामक वृत्तपत्राचे बातमीदार, जे. बी. ॲटकिन, हे प्रथम दरबानला पोहोचले, आणि रणांगणापासून शक्यांत शक्य तितक्या जवळ असावें म्हणून, एस्टकोर्ट येथे गेले, तेव्हा बोअरांनी लेडीस्मिथलासुद्धा वेढा घातल्याचें वर्तमान त्यांना समजलें ! एस्टकोर्ट येथील सैन्य तुटपुंजें असून त्याच्यावर बोअरांची केव्हा धाड पडेल याचा नियम नव्हता. एस्टकोर्ट येथे चर्चिल आणि त्यांचे मित्र कॅप्टन हालडेन यांची भेट झाली.

एस्टकोर्टपासून लेडीस्मिथकडे जाणाऱ्या आगगाडीच्या मार्गावरील वाहतूक बंद झाली होती. परंतु, सुमारे सोळा मैलांचा मार्ग मोकळा असून शत्रूच्या हालचालीची टेहळणी करण्यासाठी त्या मार्गावर एक चिलखती गाडी पाठवावी असें ठरून त्या कामगिरीवर कॅप्टन हालडेन यांची नेमणूक करण्यांत आली. शत्रूने व्यापलेल्या अपरिचित प्रदेशांतली ती कामगिरी हालडेन यांना फारशी प्रिय नाही असें पाहून, "घाबरूं नका ! मी तुमच्या बरोबर येतों" असा दिलासा चर्चिलनी दिल्यामुळे हालडेनना 'हायसें' वाटलें ! परंतु, प्रत्यक्ष कामगिरीवर निघण्यापूर्वी, "शत्रूने रुळांची नासधूस केली तर टेहेळणीपथक धोक्यांत येईल. कारण, कोणत्याहि चिलखती गाडीची शक्ति तिच्या मार्गांतल्या सर्वांत कमकुवत रुळाइतकीच असते" असा इषारा चर्चिल यांनी एस्टकोर्ट येथील लष्करी प्रमुखाला दिला, तेव्हा

त्यांना उत्तर मिळालें, "बादशहाच्या फौजेला उपद्रव देण्याची या खेडवळांचा काय बिशाद आहे !"

एक इंजिन, सहा चिलखती डब्यांत कांही सैनिक आणि एका डब्यावर डागलेली एक तोफ अशा संरजामानिशी हालडेन यांचें टेहळणीपथक एस्ट-कोर्टहून निघालें.

त्या गाडीने चौदा मैलांचा प्रवास सुखरूपपणें केला असेल नसेल, तोच शेजारच्या एका टेकडीवरून गोळीबार सुरू होऊन तिच्या डब्यांवर गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. प्राप्त परिस्थितींत गाडी पुनः एस्टकोर्टकडे न्यावी ही चर्चिल यांची सूचना हालडेनना मान्य झाली आणि आल्या दिशेने गाडी पुन्हा मागे फिरली ! इतक्यांत टेकडीवरून बंदुकांऐवजी तोफांचे आवाज ऐकूं येऊं लागले, गाडीवर तोफेचा एक गोळा येऊन आदळला, पहिला डबा रुळावरून दूर फेकला गेला आणि त्याच्या मागचे दोन डबे रुळावरून खाली घसरले !

हालडेन यांना काय करावें तें सुचेना ! चर्चिल यांनी सूचना केली, "तुम्ही मागच्या डब्यांतून शत्रूवर गोळ्या झाडा––तोपर्यंत गाडी सुरू करण्याचा मी प्रयत्न करतों."

रुळावरून खालीं घसरलेले डबे बाजूला काढून बाकीच्या तीन डब्यांचा प्रवास सुरू करावा अशी चर्चिल यांची योजना होती. सैनिकांना आदेश देत ते गाडीभोवती फिरत होते, हालडेनला सल्लामसलत देत होते, मधूनच विनोद करीत होते ! पण टेकडीवरून चालू असलेला गोळीबार क्षणाक्षणाला वाढत होता. बोअर लोकांनी मारलेल्या कित्येक गोळ्या चर्चिल यांच्या शरीरापासून एका इंचाच्या अंतरावरून जात होत्या, त्यांपैकी एकसुद्धा गोळी त्यांच्या शरीराला लागली नाही याचें श्रेय त्यांच्या सुदैवालाच दिलें पाहिजे.

परंतु त्यांपैकी एक गोळी इंजिन ड्रायव्हर, वॅगनर, याच्या तोंडाला चाटून गेल्यामुळे त्याचा चेहरा रक्तबंबाळ झाला ! आपण लष्करांतले नसून हा अत्याचार कां ?––अशा दृष्टीने तो चर्चिल यांच्याकडे पाहूं लागला. वॅग-नरनेच जर हातपाय गाळले तर मग सुटकेची आशाच नको––कारण, त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणालाच इंजिन चालविण्याचें ज्ञान नव्हतें ! चर्चिल त्याच्याजवळ जाऊन, त्याचा तोंडावरून वाहणारें रक्त पुशीत म्हणाले,

"घाबरूं नकोस !—एकाच दिवशीं दोन जखमा कधीच होत नाहीत. शिवाय या आणीबाणीच्या प्रसंगीं जर तूं आपलें कर्तव्य बजावलेंस तर तुझे देशबांधव तुझा किती सन्मान करतील ? अशी संधि आयुष्यांत एकदाच येत असते !——"

वॅगनर आपलें कर्तव्य करायला सिद्ध झाला. बोअरांचा गोळीबार चालू असल्यामुळे बाकीचे डबेसुद्धा हालचाल करायला असमर्थ झाले आणि आता फक्त इंजिनच चालू शकेल अशी परिस्थिति प्राप्त झाली !

चाळीस सैनिक जखमी झाले होते. त्यांना इंजिनमध्ये भरावें आणि बाकीच्यांनी पायी चालावें, ही चर्चिल यांची शेवटची सूचना हालडेननी मान्य केली.

वॅगनर याने त्या दिवशीं खरोखरच फार धैर्याने आपली कामगिरी बजावली. पण ट्रान्सव्हालची लढाई संपली तरी त्याचा कोणीं मानसन्मान केला नाही. १९१० सालीं चर्चिल इंग्लंडचे गृहमंत्री झाले तेव्हा असाधारण शौर्यासाठी पदकें देण्याची संधि त्यांना मिळाली. त्या वेळीं वॅगनरचा शोध करून त्यांनी त्याला दहा वर्षांपूर्वी दाखविलेल्या शौर्याबद्दल पदक अर्पण केलें.

चाळीस जखमी सैनिकांना इंजिनमधे कोंबलें आणि इंजिन ड्रायव्हरला सूचना देण्यासाठी चर्चिलसुद्धा दाटीवाटीने उभे राहिले. बाकीचे सैनिक आणि कॅप्टन हालडेन पायीं चालू लागले. इंजिन हळू चालत असलें तरी त्याचा वेग भारी ठरून, पांथस्थ मंडळी मागे पडूं लागली ! आपले सोबती फार मागे राहिले आहेत असें पाहून चर्चिलनी इंजिनमधून उडी टाकली आणि ते पांथस्थांकडे जावयास निघाले ! सुमारे दोनशे पावलें चालून गेले नसतील तोच दोन शत्रुसैनिक त्यांच्यासमोर, जमिनींतून उगवल्याप्रमाणे, उभे राहिले ! ते बोअर सैनिक आहेत हें पाहून चर्चिल यांनी पुन्हां इंजिनच्या दिशेने पळ काढला ! जवळपासचीं झाडें आणि उंचवटे यांचा आश्रय घेत चर्चिल त्या दोन बोअरांना चुकवीत होते, इतक्यांत त्यांच्यावर पिस्तुल रोखलेला एक घोडेस्वार त्यांना समोर दिसला ! एका क्षणांत घोडा निश्चल, घोडेस्वारहि निश्चल आणि चर्चिलहि निश्चल असा देखावा दिसला !

आपल्या समोरच्या घोडेस्वाराने आपल्यावर पिस्तुल रोखलें असलें तर

आपणहि त्याच्यावर पिस्तुल रोखावें--काय होईल तें होईल, असा विचार करून चर्चिलनी खिशांत हात घातला तेव्हा त्यांच्या लक्षांत आलें की, आपल्याजवळ पिस्तुल नाही ! मध्यंतरीच्या धावपळींत त्यांनी तें इंजिनमधे ठेविलें होतें, तें तिथेच टाकून चर्चिल हालडेनकडे जावयास निघाले होते. चर्चिल म्हणतात, " अशा परिस्थितींत शरण जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. नेपोलिअननेच सांगितलें आहे की, एकाकी आणि निःशस्त्र स्थितींत शरण जाणें क्षम्य आहे "—१८९९ सालच्या नोव्हेंबर महिन्याची ती पंधरा तारीख होती !

घोडेस्वाराने चर्चिलना ताब्यांत घेतलें आणि त्याच्या घोड्याबरोबर चर्चिल चालू लागले. हालडेन आणि इतर मंडळी वाटेंत भेटतील अशी आशा चर्चिलना वाटत होती, पण शत्रूने त्यांना त्यापूर्वीच ' गिरफदार ' केलें होतें.

आपल्याला पकडणारा हा घोडेस्वार कोण तें चर्चिलना कसें समजणार? पण त्याची ती भव्य मूर्ति, त्याच्या डोळ्यांतली चमक आणि त्याचा चेहरा चर्चिल विसरले नव्हते. त्यानंतर तीन वर्षांनी चर्चिल हे ब्रिटिशांच्या मंत्रिमंडळांत वसाहतींचे उपमंत्री असतांना दक्षिण आफ्रिकेच्या एका शिष्ट-मंडळाचें स्वागत करण्याची कामगिरी त्यांच्या वाटेला आली. शिष्टमंडळांतील सदस्यांची आणि चर्चिल यांची ओळख करून देणाऱ्याने एका सदस्याची ओळख करून देतांना, " हे विन्स्टन चर्चिल आणि हे जनरल बोथा " अशी ओळख करून देतांच जनरल बोथा म्हणाले, " मला आपण ओळखत नाही ? "—

" अरे हो !–तो चिलखती गाडीचा दिवस ! "—चर्चिल उद्गारले.

" होय, मींच तुम्हाला त्या दिवशीं कैद केलें होतें ! "

चर्चिल म्हणतात, " त्या चमत्कारिक प्रसंगीं झालेल्या आमच्या परिचयाला पुढे गाढ मैत्रीचें स्वरूप प्राप्त झालें. जनरल बोथा हा बोअरांच्या राष्ट्राचा पिता, चतुर मुत्सद्दी, शेतकरी, योद्धा आणि एकान्ताचा उपासक होता. १९०६ सालीं ट्रान्सव्हालचा तो पहिला निवडलेला मुख्य प्रधान झाला. ट्रान्सव्हालला स्वायत्तता देण्याचा कायदा पार्लमेंटांत मांडण्याचें भाग्य मला लाभलें होतें. पहिल्या महायुद्धांत जर्मनांच्या ताब्यांतल्या आफ्रिकेंतील

प्रदेशांत युद्ध सुरू होतांच त्यांचा कब्जा घेऊन त्याने आम्हाला फार मोठी मदत केली. शांततेच्या काळाप्रमाणे युद्धकालांत, दुःखाप्रमाणे सुखाच्या काळांत आणि बंडाप्रमाणे सलोख्याच्या काळांत आपल्या देशाचा तो महान् त्राता होता ! "

* * *

**जनरल बोथाच्या कैदेंत :**

बोथा यांच्याबरोबर--नव्हे, त्यांच्या घोड्याबरोबर चिखलांतून आणि पावसांतून वाटचाल करीत चर्चिल चालले होते. अखेर त्यांना एका छावणींतील बोअर सैनिकांच्या स्वाधीन करून बोथा निघून गेले. त्या वेळचे आपले विचार व्यक्त करतांना चर्चिल म्हणतात,

" मीं माझ्या नशिबालाच नव्हे तर माझ्या निर्णयाला अनंत शिव्याशाप दिले. मी त्या चिलखती गाडीच्या इंजिनांत बसून एस्टकोर्टला सुखरूप पोहोचलों असतों. मी ज्या संकटांत सापडलों होतों तें संकट माझ्यावर मीं विनाकारण आणि प्रयत्नपूर्वक ओढवून घेतलें होतें. इंजिनांतून बाहेर पडून कोणाच्याच उपयोगी पडलों नव्हतों.

" परंतु, मला जर भविष्याचा भेद करतां आला असता तर माझ्या ध्यानांत आलें असतें, की ज्या संकटांत मी सापडलों होतों त्या संकटामुळेच माझ्या भावी आयुष्याचा पाया रचिला जाणार होता—त्या संकटामुळेच माझे देशबांधव मला ओळखूं लागले आणि निरनिराळ्या निवडणुकींत मतदारांच्या मान्यतेला मी पात्र झालों. इतकेंच नव्हे तर त्या संकटामुळे मला जो पैसा मिळाला त्याच्या जोरावरच मी स्वतःच्या पायावर उभा राहूं शकलों आणि पार्लमेंटांत प्रवेश करण्याचें साधन माझ्या हातीं आलें.

" त्या दिवशीं जर माझ्या हातांत पिस्तुल असतें तर जनरल बोथासारखा माझा आणि माझ्या देशाचा मित्र आणि माझें भविष्य--या दोन्ही गोष्टींना मी पारखा झालों असतों ! "

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम.................. दि: ..............

## ७

## प्रिटोरियाच्या तुरुंगांत

आपण वृत्तपत्राचे बातमीदार असून लष्कराच्या बरोबरीने गोळीबारांत भाग घेतला म्हणून आपल्याला देहान्त शासन देण्यांत येईल अशी भीति चर्चिल यांना वाटत होती ! आकाश ढगांनी व्यापिलें असून पाऊस पडत होता. चर्चिल यांना ज्या एका गळक्या तंबूंत पाहाऱ्यांत ठेविलें होतें तो तंबू गळूं लागल्यामुळे ते भिजून चिंब झाले होते. आपला कैदी हा इंग्लंडांतील एका उमरावाचा मुलगा आहे हें त्या ठाण्यावरील अधिकाऱ्यांना कसें समजलें तें कळायला मार्ग नाही ! पण कांही काळ गेल्यानंतर त्या ठाण्याचा मुख्य अधिकारी चर्चिल यांचेकडे आला आणि म्हणाला, " तुम्हाला देहान्त शासन न देतां अटकेंत ठेवावें असें आम्हीं ठरविलें आहे; कारण उमरावाचा मुलगा कांही दररोज आमच्या हातीं सापडणार नाही "—चर्चिल यांना सैनिकी बंदोबस्तांत प्रिटोरिया येथे पाठविण्याचें नक्की झालें.

इतका वेळ चर्चिल यांना देहान्त शासनाची भीति वाटत होती, पण तुरुंगांत बेमुदत खितपत पडण्यापेक्षा मृत्यु पुरवला असें त्यांना आता वाटूं लागलें. ते म्हणतात, " इतर कैद्यांपेक्षा युद्धकैद्याचें जीवन कमी त्रासदायक असलें, तरी तो शत्रूच्या ताब्यांत असतो, त्याच्या माणुसकीमुळे तो जगत असतो आणि शत्रूच्या सदयतेवर त्याचें रोजचें अन्नपाणी अवलंबून असतें. शत्रूचे हुकूम त्याने मानले पाहिजेत, तो सांगेल तिकडे गेलें पाहिजे आणि हुकूम करील तिथे राहिलें पाहिजे. कोणत्याहि गोष्टीचा त्याला आनंद वाटेनासा होतो. वाचन कठीण होतें आणि लेखन तर सर्वस्वीं अशक्यच होतें. एक एक दिवस कसा जाईल याची भ्रांत पडते आणि सकाळपासून संध्याकाळपर्यंतचें जीवन अतिशय कंटाळवाणें वाटतें. पूर्वी कधी जर तुम्ही

तुरुंगांत गेला नसाल तर एका चिंचोळ्या खोलींत तुम्हाला अटकेंत ठेविलें आहे, तुमच्याभोवती तारांचें कुंपण आहे, सशस्त्र पहारेकरी तुमच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवतो आहे हा एकंदर प्रकार अत्यंत अपमानास्पद वाटतो. माझ्या आयुष्यांतील तो अत्यंत तिरस्करणीय काळ होता."

प्रिटोरियाच्या प्रवासाला निघण्यापूर्वी चर्चिल यांनी आपल्या पहारेकऱ्याबरोबर चर्चा करून, "या युद्धांत बोअर लोकांचा पराजय होणार हें नक्की आहे" असें त्याला पटवून देण्याचा प्रयत्न केला ! आपण लष्करांतले नसून बातमीदार असल्यामुळे आपल्याला अटकेंत ठेवणें बेकायदेशीर आहे अशी तक्रार केली—पण व्यर्थ !

अखेर प्रिटोरियाच्या प्रवासाची सुरुवात झाली. मुसळधार पावसांत चार्चिल यांना चिखलांतून सतत सहा तास अन्नपाण्यावाचून पायपीट करावी लागली ! त्यानंतर आगगाडीचा प्रवास सुरू झाला तेव्हा त्याच गाडींतून आपले मित्र; कॅप्टन हालडेन, यांना प्रिटोरियाकडे नेण्यांत येत आहे असें चर्चिलना समजलें. अटकेंत सापडल्यापासून, पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी देऊन, निसटण्याचे विचार चर्चिल यांच्या मनांत थैमान घालीत होते ! आगगाडींतल्या संडासांत आपल्याला संधि मिळेल असा त्यांचा विश्वास होता, पण संडासाची खिडकी पावसामुळे फुगून उघडण्याच्या स्थितींत नसल्यामुळे त्यांची फसगत झाली !

नोव्हेंबरच्या अठरा तारखेला चर्चिल आणि त्यांच्या बरोबरीचे कैदी प्रिटोरियांत दाखल झाले. त्या कैद्यांपैकी चर्चिल आणि तिघा लष्करी अधिकाऱ्यांना एका शाळेच्या इमारतींत पाठविलें—ही नवी आयात जमेस धरून एकंदर साठ युद्धकैदी त्या इमारतींत होते.

'लॉर्ड चर्चिल दिसतो तरी कसा' हें पाहण्यासाठी अनेक 'बघे लोक' त्या शाळेच्या आवारांत जमत असत.—चर्चिलना एकदोन दिवस त्याची मजा वाटली, पण त्यानंतर चर्चिल आणि त्यांचे प्रेक्षक--दोघेहि कंटाळले ! इतर कैदी पत्ते, बुद्धिबळें वगैरे बैठे खेळ खेळत असत--पण चर्चिल यांना बैठ्या खेळांचा तिटकारा होता. 'करण्यासारखें' कांहीच नसल्यामुळे पुनः अटकेंतून निसटण्याचे विचार त्यांच्या मनांत सुरू झाले.

चर्चिल आणि त्यांच्या कांहीं सोबत्यांनी एक धाडसी व्यूह रचायला सुरुवात केली. शाळेच्या आवारांत एकंदर साठ कैदी असले तरी आवारांत त्यांना हालचालींचें संपूर्ण स्वातंत्र्य होतें. या आवारावर देखरेख ठेवणार फक्त तीस पोलीस असून, रात्रीं फक्त दहा पोलीसच आळीपाळीने पहाऱ्यावर असतात हें त्यांच्या ध्यानांत आलें. जे पहाऱ्यावर नसतात असे वीस पोलीस आपलीं शस्त्रें बाजूला ठेवून झोपलेले असून, पहाऱ्यावरील दहा पोलिसांपेक्षा पुष्कळच अंतरावर असतात. साठ कैद्यांनी वीस पोलिसांच्या शस्त्रांवर झडप घालून त्यांचीं शस्त्रें कबजांत घ्यावीं, त्याच वेळीं विजेचे दिवे घालवून पहाऱ्यावरच्या गोंधळलेल्या पोलिसांवर झडप घालून त्यांना अटक करावी, शाळेच्या आवाराच्या बाहेर पडून रेसकोर्सवर अटकेंत ठेवलेल्या दोन हजार इंग्रज कैद्यांना बंधमुक्त करावें आणि 'हां हां म्हणतां' प्रिटोरिआ शहराचा कबजा घेऊन, तेथे वास करीत असलेले प्रेसिडेंट क्रूगर यांनाच अटक करावी असा तो कल्पनारम्य व्यूह, शेवटीं अशक्य म्हणून नुसता कल्पनेंतच राहिला आणि वैयक्तिक सुटकेचा मार्ग चर्चिल हुडकूं लागले.

पहिल्या तीन आठवड्यांत चर्चिल यांनी आपल्या अटकेच्या कायदेशीरपणासंबंधी बोअर अधिकाऱ्यांशीं पुष्कळच पत्रव्यवहार केला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नसला तरी त्याच अवधींत त्यांनी आपल्या सुटकेचा एक मार्ग शोधून काढला होता.

शाळेच्या आवाराच्या दोन बाजूंला लोखंडाचें कुंपण आणि दोन बाजूला पत्र्याची दहा फूट उंच भिंत होती. पूर्वेकडील भिंतीच्या एका भागावर दिव्यांचा प्रकाश पडत नव्हता. त्या भिंतीशेजारीं पंधरा पावलांवर कांहीं खोल्या होत्या आणि दर पन्नास फुटांगणिक सशस्त्र पोलीस उभे असत. त्यापैकी एका खोलींत लपून बसावें, संधि मिळतांच भिंतीवर चढावें आणि पलीकडच्या आवारांत उतरावें असा सुटकेचा मार्ग चर्चिलनी शोधून काढला व तो हालडेन यांना पसंत पडला. भिंतीपलीकडे एक घर आणि त्या घराची बाग होती. त्या आवारांतून बाहेर पडल्यावर कोणीं हटकलें तर 'आपण पुनः पकडले जाऊं, कारण इंग्रजीशिवाय दुसरी भाषा आपल्याला येत नाहीं,' हें दोघांच्या लक्षांत आलें म्हणून, ज्याला डच आणि बोअर लोकांची प्रादेशिक बोली येत होती अशा लेफ्टनंट ब्रॉकीला

चर्चिलनी आपल्या कटांत सामील करून घेतलें! शाळेच्या आवारांतून सुटका झाल्यानंतर, अडीचशे मैलांचें अंतर पायीं तोडून पोर्तुगिझांच्या अमलाखालील पूर्व आफ्रिकेंत पोहोचायचें असा त्यांचा बेत होता. . .

आपण लष्करी माणूस नसून बातमीदार आहोंत म्हणून स्वतःची सुटका करून घेण्याचा चर्चिल यांचा प्रयत्न फसला होता. "तुम्ही बातमीदार असलां तरी आमच्या हातून आगगाडीचें इंजिन आणि चाळीस सैनिक तुमच्या कारवाईमुळे सुटले म्हणून तुम्हाला 'लष्करी माणूस' समजून अटकेंत ठेवलें आहे" असें त्यांना उत्तर मिळालें होतें. त्यानंतर त्या बंधनांतल्या जीवनाशीं आपण, जणू काय, समरस झालों आहों असें भासविण्यासाठी वीस पौंड खर्च करून चर्चिल यांनी एक नवा पोषाख विकत घेतला. त्यांचें डोकें ठिकाणावर असलें तरी आपली टोपी ते इंजिनांत विसरून आले होते, परंतु टोपीची उणीव लवकरच दूर झाली. 'पृथ्वी वाटोळी आहे' असें विधान केल्याबद्दल तुरुंगांत टाकलेल्या एका पाद्रयाला प्रेसिडेंट क्रूगर यांनी शाळेच्या आवारांतच अटकेंत ठेवलें होतें. सर्कशींतले विदूषक वापरतात तशी एक टोपी त्याच्या खोलींतल्या खिळ्याला अडकवलेली आहे हें चर्चिलनी पाहिलें होतें. त्या पाद्याची मुलाखत घेण्यासाठी म्हणून चर्चिल त्याच्या खोलींत गेले, पृथ्वी वाटोळीच आहे असें त्याला त्यांनी आश्वासन देऊन क्रूगरच्या अज्ञानाची कीव केली आणि मुलाखत संपल्यावर त्याची टोपी हस्तगत करून ते खोलीच्या बाहेर पडले.

* * *

## अटकेंतून सुटका :

अटकेंतून बाहेर पडतांना बरोबर थोडें चॉकलेट, मासाचे तुकडे, एक नकाशा आणि होकायंत्र बरोबर घ्यावें असें ठरलें होतें. डिसेंबरच्या अकरा तारखेला चर्चिल यांच्या बरोबरीचे ते तीन शिलेदार योग्य संधीची वाट पाहात भिंतीजवळच्या खोलींत लपून बसले. पण त्यांच्या दुर्दैवाने त्या दिवशीं भिंतीच्या अंधाऱ्या भागांत कांही पोलीस जमले, ते तेथून हलेनात म्हणून पुढील कार्यक्रम रद्द करावा लागला! दुसरे दिवशीं, त्यांच्या नेहमीच्या संवयीप्रमाणे, चर्चिल यांनी आपल्या आचरणाने इतरांना उदाहरण

घालून देण्याचें नक्की केलें. रात्रीं झोपाझोप झाल्यावर चर्चिल आणि त्यांचे साथीदार भिंतीजवळच्या खोलींत दडून बसले. गस्त घालणारा पाहरेकरी भिंतीच्या अंधाऱ्या भागांतून पंधरा पावलें पुढे गेला नसेल, तोच चर्चिलनी भिंतीवर आरोहण केलें. भिंतीच्या एका भागांत त्यांचा कोट अडकला तो कसा तरी सोडवून त्यांनी पलीकडच्या बागेंत उडी टाकली ! बागेच्या मध्यभागीं असलेल्या घरांतलीं माणसें जागीं असून कांही मंडळी बागेंत फिरताहेत असें पाहून ते एका वेलीच्या मागे लपले आणि त्यांनी ती वेल आपल्या शरीराभोवती गुंडाळून घेतली.

एक तास झाला तरी त्यांच्या साथीदारांचा पत्ता नाही असें पाहून कांही तरी घोटाळा झाला असावा असें चर्चिलना वाटलें. काय घोटाळा झाला तें पाहण्याकरिता पुनः शाळेच्या आवारांत उडी टाकणें म्हणजे मृत्यूच्या जबड्यांतच उडी टाकण्यासारखें होतें ! आपल्या साथीदारांना मागे टाकून जाणें प्रशस्त वाटत नव्हतें आणि पुढील प्रवासाच्या दृष्टीने तें धोक्याचेंहि होतें. पण त्याला इलाज नव्हता ! कांही काळानंतर " भिंती-जवळ पोलीस जमले आहेत--आम्हाला येता येणें शक्य नाही--तूंसुद्धा परत ये " असे हालडेनचे शब्द चर्चिल यांना ऐकूं आले, पण आता परत फिरणें शक्य नव्हतें ! " मी जातों–तुम्ही सावकाश या " असें चर्चिलनी उत्तर दिल्यानंतर पुनः सामसूम झालें !

अंगाभोवती वेल गुंडाळून किती वेळ उभे राहावें लागणार त्याचा चर्चिलना अंदाज लागेना. त्यांनी खिशांत हात घातला तेव्हा चाकोलेटचे चार तुकडे त्यांच्या हातीं आले. दुसरे खिसे रिकामे होते. कारण होकायंत्र, नकाशा आणि मासाचे तुकडे या वस्तु हालडेनच्या खिशांत राहिल्या होत्या! इतक्यांत एक कुत्रा एका मांजराच्या मागे लागला आणि त्याला चुकविण्यासाठी तें मांजर चर्चिल होते त्याच वेलींत शिरून अक्राळविक्राळ आवाज काढूं लागलें ! इतःपर वेलीला चिकटून राहणें आपल्या प्रतिष्ठेला बाधक आहे असें वाटून चर्चिलनी वेलीचा आश्रय झुगारून दिला आणि बाग ओलांडून ते फाटकांतून बाहेर पडले. फाटकानजीक एक पोलीस पाठमोरा उभा होता, त्याने चर्चिलना पाहिलें किंवा नाही याबद्दलची माहिती आतापर्यंत अज्ञातच आहे !

पोलिसाला पाहून पळण्याचे विचार चर्चिल यांच्या मनांत आले, पण ते मनांतल्या मनांत दाबून टाकून ते शांतपणाने चालूं लागले ! त्या वेळीं त्यांच्या अंगावर नवे कपडे होते, खिशांत चाकोलेटचे फक्त चारच तुकडे होते, डोक्यावर पाद्र्याची विदूषकी टोपी होती आणि इंग्रजीशिवाय दुसरी भाषा त्यांना अवगत नव्हती !

* * *

**पंचवीस पौंडांचें बक्षीस :**

आपल्या खोलींतून बाहेर पडतांना चर्चिल यांनी आपल्या बिछान्यावरील उशा आणि पांघरूण यांची अशी रचना केली होती की, ते झोपले आहेत असेंच पाहणाऱ्याला वाटावें. दुसरा दिवस उजाडला--पुष्कळ वेळ झाला तरी त्यांच्या खोलींत सर्व सामसूम आहे असें पाहून ते झोपले आहेत असें हालडेन आणि ब्रॉकी यांच्याशिवाय इतरांना वाटलें. पण तो हजामतीचा दिवस असल्यामुळे न्हावी चर्चिल यांच्या खोलींत गेला तेव्हा बिछान्यांत चर्चिल नाहीत हें त्याच्या लक्षांत आलें. बिछान्यांत चर्चिल नव्हते पण बोअर लोकांच्या युद्धमंत्र्याला त्यांनीं लिहून ठेवलेलें एक पत्र होतें. "अगदी निराळ्या वातावरणांत आपली लवकरच प्रिटोरियांत भेट होईल—" या वाक्याने त्या पत्राचा लेखकाने शेवट केला होता !

इतक्या कडक बंदोबस्तांतून हा लाल केसांचा कैदी निसटला कसा तें बोअर अधिकाऱ्यांना कळेना. हें एकट्यादुकट्या माणसाचें काम नसून त्याच्या पाठीमागे एखादा कट असावा या संशयामुळे, त्यानंतर बरेच दिवस कैद्यांना एकमेकांच्या खोलींत जाण्यास मनाई करण्यांत आली. जिकडेतिकडे धावपळ सुरू होऊन प्रिटोरिया शहरांतल्या प्रत्येक घराची झडती घेण्यांत आली--'चर्चिलचा शोध' करण्याच्या कार्यक्रमाला प्रत्यक्ष युद्धापेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झालें ! चर्चिलना पकडणाऱ्याला बक्षीस दिलें जाईल अशीं हस्त-पत्रकें वाटलीं, त्यांतील मजकूर खालीलप्रमाणे होता--

"सुमारे पंचवीस वर्षें वयाचा—अदमासें पांच फूट आणि आठ इंच उंचीचा, फिक्कट रंग—लालसर केस आणि बारीक मिशी, थोडें नाकांत बोलतो आणि 'स' हा शब्द नीट उच्चारतां येत नाही. फरारी चर्चिल

यास सजीव अगर मृत स्थितींत पकडून आणणारास पंचवीस पौंड बक्षीस देण्यांत येईल—"

कालांतराने या हस्तपत्रकांची चार्चिल यांना माहिती मिळाली त्या वेळीं बक्षिसाच्या रकमेबद्दल नाराज होऊन ते म्हणाले, "माझी किंमत पंचवीस पौंडांपेक्षा खचित अधिक होती--निदान पन्नास पौंड बक्षीस ठेवलें असतें तर मला बरें वाटलें असतें !"

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 34855 वि. चरित्र
क्रमांक ............ नों दि. 2.3.60

८

## मालगाडीच्या डब्यांत

आपली सुटका साजरी करण्याकरता म्हणूनच की काय, एक गाणं गुणगुणत चर्चिल वाटचाल करीत होते. वाटेंत त्यांना कांहीं माणसें भेटलीं, पण संशयित नजरेने त्यांच्याकडे कोणींहि पाहिलें नाही. बराच वेळ चालल्यानंतर ते प्रिटोरिया शहरांतून बाहेर पडले आणि एका पुलावर बसले. सुटकेचा आनंद मनांत दाटला होता, पण तो किती वेळ टिकेल तें सांगतां येत नव्हतें. आपण पुनः पकडले जाणारच ही खात्री असल्यामुळे पलायनाच्या मार्गांतल्या कोणत्याच अडथळ्याची किंवा संभाव्य संकटाची भीति चर्चिल यांना वाटेनाशी झाली होती. शत्रूला त्यांच्या पलायनाचा सुगावा लागण्यापूर्वी प्रिटोरियापासून शक्यांत शक्य तितकें दूर जाणें अवश्य होतें. खास प्रिटोरिया शहरांत त्यांना कोठेच आसरा मिळणें शक्य नव्हतें. पोतुगीझ अमलाखालील पूर्व आफ्रिकेचा आश्रय घ्यावयाचा हें निश्चित असलें, तरी तें उद्दिष्ट गाठण्यासाठी तीनशे मैलांचें अंतर तोडणें अवश्य असून त्या प्रदीर्घ प्रवासांत नुसती पायांवर भिस्त ठेवून भागण्यासारखें नव्हतें ! आगगाडीच्या रुळांच्या मार्गाने वाटचाल करून जी आगगाडी प्रथम दिसेल तिच्यांत शिरण्याचा चर्चिल यांनी बेत केला. पूर्व आफ्रिकेंतील डेलागोवा बे येथे गाडी पोहोचली म्हणजे चर्चिल निर्धास्त होणार होते. परंतु, त्या ठिकाणाकडे नेणारा आगगाडीचा मार्ग कोणता तें त्यांना माहीत नव्हतें. अखेर आकाशांतलें मृग नक्षत्र नजरेसमोर ठेवून वाटचाल करावी असें त्यांनी ठरविलें. त्या वेळीं चर्चिल यांच्या तुमानीच्या खिशांत फक्त पंचाहत्तर पौंड होते !

आगगाडीचा मार्ग चर्चिलना सापडल्यानंतर रुळांच्या शेजारच्या वाटेने

ते चालूं लागले. वाटेंतल्या प्रत्येक पुलावर पोलिसांचा पहारा होता पण ते अशा बेछूटपणाने चालत होते की, 'हा फरारी इंग्रज असेल' असा कोणालाच संशय आला नाही. अशा रीतीने दोन तास पायीं प्रवास केल्या-नंतर ते आगगाडीच्या एका स्टेशनजवळ आले. त्या ठिकाणीं येऊन थांबलेली गाडी पुनः वेगाने चालू लागण्यापूर्वी तिच्यांत शिरावयाचें, अशा अंदाजाने स्टेशनपासून दोनशे पावलांच्या अंतरावर चर्चिल लपून बसले. अशा स्थितींत एक तास गेल्यानंतर एक गाडी आली, स्टेशनवर थांबली आणि कांही काळानंतर चालूं लागली. तिचा वेग वाढण्यापूर्वी चर्चिल यांनी ज्या डब्यांत मोठ्या प्रयासाने प्रवेश केला तो डबा मालगाडीचा असून त्यांत कोळशाचीं रिकामीं पोतीं भरलीं आहेत हें त्यांच्या ध्यानांत आलें!

ती गाडी कोठे चालली होती हें चर्चिलना माहीत नव्हतें. रात्र संपून सूर्योदयाच्या वेळीं काय होईल त्याचा अंदाज करतां येत नव्हता. पण अटकेपासून आपण कोठे तरी दूर चाललों आहोंत हें समाधान त्यांच्या मनांत दाटलें होतें. 'उद्याचें उद्या पाहतां येईल' असा विचार करून, कोळशाच्या बारदानाच्या डब्यांत चर्चिल झोपी गेले. ते म्हणतात, "शत्रूच्या मुलखाबाहेर नेणाऱ्या आगगाडीच्या घडघडाटापेक्षा एखादं अधिक सुरेल 'अंगाईगीत' तुरुंगांतून पळालेल्या कैद्याला लाभूं शकेल असें मला वाटत नाही!"––कांही मिनिटांतच चर्चिलना गाढ झोप लागली.

* * *

**फरारी कैद्याचा प्रवास :**

पहाट होण्यापूर्वी चर्चिल एकाएकी जागे झाले तेव्हा त्यांच्या मनांत पुन्हा चिंतेच्या छाया पसरल्या. दिवसाउजेडी आपण कोणाच्या दृष्टीला पडलों तर पकडले जाऊं, म्हणून दिवसा एखाद्या जंगलांत लपून बसावें आणि रात्रीं पुनः एखाद्या आगगाडींत शिरावें असें त्यांनी ठरविलें. सूर्योदयाला अजून अवकाश होता. आगगाडी वेगाने चालली होती–पण तिचा वेग कमी होण्यापूर्वी सूर्योदय झाला तर आपण इतरांच्या दृष्टीस पडूं या भीतीने, चर्चिल यांनी गाडींतून उडी टाकली––जमिनीला त्यांचे पाय

ठागले, पण फार काळ जमिनीवर टिकले नाहीत! दोन कोलांट्या खाऊन ते एका खड्डयांत जाऊन पडले! सुदैवाने शरीराला इजा झाली नसली तरी मनाला धक्का बसला होता!

कांही वेळाने त्यांनी आपले खिसे चापसले तेव्हा त्यांना सर्व वस्तु जागच्या जागीं आढळल्या. आता त्यांना भूक लागली होती. चॉकोलेटचा एक तुकडा त्यांनी खाल्ला आणि जवळच असलेल्या एका ओढ्याचें पाणी ते प्याले—इतक्यांत सूर्योदय झाला. आपली आगगाडी सूर्याच्या दिशेनेच—म्हणजे पूर्वेकडे चालली होती हें पाहून त्यांना समाधान वाटलें—कारण पूर्व आफ्रिकेंत पोहोचायचें हें एकच उद्दिष्ट त्यांच्या मनांत होतें.

चर्चिल म्हणतात, "मी कोठे आहें हें माझ्या शत्रूंना माहीत नव्हतें, कारण तें माझें मलाच माहीत नव्हतें." परंतु, बोअर लोकांनी आपल्याला दिवसाउजेडी पाहिलें आणि आपण इंग्रज आहोंत हें त्यांच्या ध्यानांत आलें तर ते आपल्याला पकडतील ही भीति त्यांना वाटतच होती. तसा प्रसंग येऊं नये म्हणून ते जवळच्या दाट झाडींत लपून बसले. पुनः अंधार व्हायला अजून चौदा तासांचा अवकाश होता.

चॉकोलेट खाल्लें असल्यामुळे चर्चिल यांना पुनः तहान लागली तरी झाडींतून बाहेर पडून ओढ्याजवळ जाण्याचा मोह त्यांनी टाळला. कांही घोडेस्वार त्या भागांत फिरत होते. कांही शेतकरी आणि त्यांचीं जनावरें हिंडूं लागलीं होतीं. चर्चिल लपून बसले होते आणि, त्यांच्या शेजारीं, त्यांच्याकडे एकसारखें टक लावून पाहात असलेलें एक गिधाड बसलें होतें.

सूर्य मावळल्यानंतर ते पुनः आगगाडीच्या मार्गाजवळ जाऊन उभे राहिले. दिवसभरांत तीन गाडया त्या मार्गावरून गेलेल्या पाहिल्यामुळे रात्रीं तितक्याच गाडया जातील असा त्यांचा अंदाज होता. चढणीच्या रस्त्यावर गाडया हळू चालतात, आणि तिथे एखादें वळण असलें तर फारच हळू चालत असल्यामुळे जेथे चढण आहे आणि वळणहि आहे असें एक ठिकाण त्यांनी पसंत केलें. तीन तास वाट पाहिली, सहा तास लोटले आणि सातवा तासुद्धा संपला तरी एकसुद्धा आगगाडी त्या मार्गाने आली नाही. आता इथे उभे राहण्यांत अर्थ नाही, वाट फुटेल तिकडे पायींच गेलें पाहिजे असें ठरवून पूर्वदिशेच्या रोखाने चर्चिल चालूं लागले!

आगगाडीच्या मार्गावरील प्रत्येक पुलावर पहारा आहे असें आढळून आल्यामुळे, त्या मार्गापासून बऱ्याच अंतरावरून ते वाटचाल करीत होते. जंगलांतले खाचखळगे, नाले आणि दवामुळे ओलें झालेलें गवत यांतून मार्गक्रमणा करतां करतां त्यांचे कपडे कमरेपर्यंत भिजले. चॉकोलेटमुळे भूक कमी झाली असली तरी समाधान वाटलें नव्हतें. जेवणाची इच्छा प्रबळ झाली असली तरी इलाज नव्हता. चर्चिल म्हणतात, " परमेश्वराची कृपा असेल तरच मी या संकटांतून सुटेन असें वाटून मीं मनांतल्या मनांत प्रार्थना केली."

असेच किती तरी चालल्यावर दिव्यांचा एक पुंजका दिसूं लागला. या ठिकाणीं माणसांची वसति असेल आणि आपल्याला आसराहि मिळेल अशी चर्चिलना आशा वाटल्यामुळे, ते त्या दिव्यांच्या दिशेने चालू लागले. पण प्रत्येक पावलागणिक ते दिवे आपल्यापासून दूर जात आहेत असा त्यांना अनुभव आला. जवळजवळ तास दीड तास पायपीट केल्यावर, पहाटे तीन वाजायच्या सुमारास, ते त्या प्रकाशित आवारांत पोहोचले तेव्हा कांही घरें त्यांना दिसलीं. त्या आवाराची दुरून पाहणी केली तेव्हा तें एका कोळशाच्या खाणीचें आवार आहे असें त्यांना आढळून आलें. त्या भागांतल्या कोळशाच्या खाणी इंग्रजांच्या मालकीच्या आहेत असें चर्चिलनी वाचलें असल्यामुळे, जिवाचा धडा करून, त्या आवारांतल्या पहिल्याच घराच्या दारावर त्यांनी थाप मारली ! ते म्हणतात, " मीं शत्रूच्या दारावर थाप मारली की मित्राच्या, तें मला माहीत नव्हतें."

* * *

## अनोळखी माणसाचा आसरा :

दारावरची थाप ऐकून वरच्या मजल्याच्या खिडकींतून "कोण आहे ?" असे शब्द ऐकूं आले. दिव्याचा उजेड दिसला. " मला आपली मदत पाहिजे आहे. नुकताच मी एका अपघातांत सापडलों होतों "–चर्चिलनी उत्तर दिलें.

वरच्या मजल्यावरून खाली येणाऱ्या माणसाचीं पावलें जिन्यावर ऐकूं आलीं, दार उघडलें आणि एक उंच माणूस दृष्टीस पडला.

" तुला काय पाहिजे आहे ?"—त्याने इंग्रजी भाषेंत विचारलें.

" आगगाडींतून प्रवास करीत असतां मी खाली पडलों—कित्येक तास बेशुद्ध होतों "—चर्चिलनी सांगितलें.

त्या अनोळखी माणसाने चर्चिल यांच्याकडे भेदक नजरेने आपादमस्तक पाहिलें आणि " आंत या " असें म्हणून त्यांना घरांत घेतलें. चर्चिलनी एका अंधाऱ्या खोलींत प्रवेश केला. त्या उंच गृहस्थाने दिवा पेटवला तेव्हा त्याच्या हातांतलें पिस्तुल चर्चिलना दिसलें. पुनः एकदा चर्चिल यांच्याकडे निरखून पाहिल्यानंतर तो गृहस्थ म्हणाला, " तुमच्या त्या अपघाताची सविस्तर हकीकत ऐकावी अशी माझी इच्छा आहे. "

" तुम्हाला खरी हकीकत सांगतों. "

" जें खरें असेल तेंच सांगा. "

" माझं नांव विन्स्टन चर्चिल—मी ' मॉर्निंग पोस्ट ' या वृत्तपत्राचा बातमीदार आहें. प्रिटोरियांतून मी काल रात्रीं निसटलों. मी सरहद्दीकडे चाललों आहें. मला तुम्ही मदत कराल का ? "

तो गृहस्थ कांही काळ गप्प होता; त्यानंतर त्याने दाराला कडी घातली आणि कुलूप लाविलें. ही कृति त्याने आपल्या संरक्षणासाठी केली, की आपल्याला स्थानबद्ध करण्यासाठीं केली तें चर्चिल यांना कळेना ! अशा संभ्रमावस्थेंत असतांना तो गृहस्थ त्यांच्याजवळ आला आणि म्हणाला, " परमेश्वराची कृपा म्हणून तुम्ही या घरांत आलांत. तुम्हाला परत पोलिसांच्या ताब्यांत देणार नाही असें भोवतालच्या वीस मैलांच्या टापूंत हें एकच घर आहे. आम्ही इंग्रज आहोंत. कांही काळजी करूं नका. "

चर्चिल म्हणतात, " मला त्या वेळीं किती आनंद झाला त्याचें वर्णन करतां येणें अशक्य आहे. मी पुनः पकडला गेलों अशी शंका मला एका क्षणापूर्वी वाटली होती. पण आता अन्न, मित्र आणि मदत या तिन्ही गोष्टी उपलब्ध होत्या. पाण्यांत बुडणाऱ्या माणसाला बाहेर काढावें आणि शिवाय तुला डर्बीच्या ' लॉटरींत ' बक्षीस मिळालें आहे असें सांगावें, अशासारखा तो प्रकार झाला. "

चर्चिल यांचा आश्रयदाता, जॉन हॉवर्ड, हा त्या कोळशाच्या खाणीचा मालक होता. त्याच्या हाताखालचे चार नोकर इंग्रजच होते. " तुम्हाला पकडण्यासाठी पोलीस आकाशपाताळ धुंडाळताहेत—आज दुपारींच ते

खाणींत येऊन गेले—" हॉवर्डने चर्चिलना ताजी बातमी दिली! आपल्यामुळे या माणसावर संकट ओढवूं नये असें चर्चिलना वाटून ते म्हणाले, "मला थोडें अन्न, एक पिस्तुल, एक वाटाड्या आणि एक घोडें मिळालें तर मी ताबडतोब पुढील प्रवासाची सुरुवात करीन–" पण चर्चिल यांची अवस्था पाहून हॉवर्डला ती कल्पना पटली नाही. तो म्हणाला, "मी तुम्हाला इतक्यांत जाऊं देणार नाहीं. मात्र अतिशय जपून वागलं पाहिजे. कारण, आमच्या कामगारांत बोअर आणि डच लोकांचाच जास्त भरणा आहे."

अन्न आणि मद्य यांच्या संगतींत चर्चिलना सोडून त्यांच्या झोपण्याची व्यवस्था करण्याकरिता हॉवर्ड निघून गेला तो एका तासाने परत आला. दरम्यानच्या काळांत चर्चिल यांच्या तंदुरुस्तींत पुष्कळच फरक पडला होता. चर्चिल यांनी कांही काळ भूमिगत असावें म्हणून हॉवर्डने त्यांची व्यवस्था जमिनीपासून दोनशे फूट खोल असलेल्या खाणीच्या पोटांत केली होती. हॉवर्ड आणि त्याच्या इंग्रज सहकाऱ्यांनी चर्चिलना नियुक्त स्थळीं नेलें, तेथे एक बिछाना पसरला होता. कांही मेणबत्त्या, एक मद्याची बाटली आणि कांही चिरूट चर्चिल यांच्या स्वाधीन करून आणि "काय वाटेल तें झालें तरी तळघरांतून बाहेर पडूं नका," असा इषारा देऊन हॉवर्ड आणि त्याचे सहकारी निघून गेले.

चर्चिल म्हणतात, "त्या तळघरांतल्या काळोखांतसुद्धा मला प्रकाश दिसूं लागला. पुन्हा पकडला जाण्याची बेअब्रू आणि एखाद्या तुरुंगांत खितपत पडण्याची भीति नाहीशी होऊन, स्वातंत्र्याचा मार्ग मला सापडला होता. अतिशय श्रमामुळे मी फार थकलों होतों. बिछान्यावर अंग टेकतांच मला गाढ झोप लागली. ती झोप जशी थकव्याची होती तशीच समाधानाची सुद्धा होती."

* * *

**आणखी एका मालगाडींत :**

चर्चिल जागे झाले त्या वेळीं दुपार झाली असली तरी त्यांच्याभोवती अंधार पसरला होता. उशीशेजारी ठेवलेल्या मेणबत्त्यांचा शोध सुरू केला पण एकसुद्धा मेणबत्ती सापडेना! त्या चमत्काराचा उलगडा होण्यापूर्वी एक

दिवा आणि जेवणाचा डबा घेऊन हॉवर्डने प्रवेश करून " तुम्ही मेणबत्ती कां पेटविली नाही ? " असा प्रश्न केला, तेव्हा "सर्व मेणबत्त्या फरारी आहेत" असें त्याला उत्तर मिळालें.

" तुम्हीं मेणबत्त्या कुठे ठेविल्या होत्या "—हॉवर्डनी विचारलें.

" उशीजवळ "—त्यांना उत्तर मिळालें.

" तरीच ! इथे उंदीर मुबलक आहेत, त्यांनी त्या पळविल्या. मेणबत्त्या बिछान्याच्या खाली ठेवीत जा–" हॉवर्डने चमत्काराचा उलगडा करून भविष्यकाळासाठी सूचना दिली.

कोळशाच्या खाणींतील त्या भूमिगत जीवनाचा त्याग करून प्रवासाला निघण्यासाठी चर्चिल उतावळे झाले होते. पण, " या प्रदेशांत तुमचा जारीने शोध सुरु आहे. उतावळेपणाने बाहेर पडलांत तर नक्की पकडले जाल, " असें हॉवर्डने बजावल्यामुळे चर्चिल यांचा नाइलाज झाला. चर्चिल यांनी डॉक्टर बेनटॉक असें नांव धारण करून कांही दिवस खाणींतच राहावें असा निर्णय घेण्यांत आला.

दोन तीन दिवसांनंतर चर्चिल यांचा शोध थंडावला. " प्रिटोरियांतल्या एखाद्या ब्रिटिश-धार्जिण्या माणसाच्या घरांत ते लपून बसले असावेत—आमचा पहारा चुकवून ते प्रिटोरियाच्या बाहेर पडले असतील हें मुळी शक्यच नाहीं, " असा शोध बोअरांच्या लष्करी अधिकाऱ्यांनी लाविला होता. तीन दिवसांच्या भूमिगत जीवनानंतर, हॉवर्डने चर्चिल यांचा पृथ्वीच्या पोटांतला मुक्काम हालवून, त्यांना आपल्या कचेरीशेजारच्या गुदामांत नेऊन ठेविलें. लोकरीचा व्यापार करणारा एक डच व्यापारी हॉवर्डचा मित्र होता. लोकरीच्या गोणी मालगाडीच्या डब्यांत भरून डिसेंबरच्या १९ तारखेला तो पूर्व आफ्रिकेंत पाठविणार होता. मालाचे डबे त्याच्या आवारांतच भरले जाणार होते. दोन गोण्यांच्यामधे एका माणसाला झोपता येईल इतकी जागा मोकळी ठेवून त्यांत चर्चिलनी स्थानापन्न व्हावें आणि ते कोणाला दिसूं नयेत म्हणून डब्यावर ताडपत्री पसरावी अशी योजना हॉवर्डने आखली.

डिसेंबरच्या तेरा तारखेपासून इंग्लंडमधील वृत्तपत्रांत चमत्कारिक बातम्या प्रसिद्ध होत होत्या :

ता. १३ – चर्चिल यांनी अत्यंत चातुर्याने पळ काढला असला तरी ते फार दिवस मोकळे राहतील असें वाटत नाही.

ता. १४ – सरहद्दीवरील एका स्टेशनवर चर्चिल पकडले गेले असें समजतें.

ता. १५ – चर्चिल हे पुनः पकडले गेले तर त्यांना गोळी घालून मारण्यांत येईल असा अंदाज आहे.

—चर्चिल यांना या बातम्यांची माहिती नसल्यामुळे ते कांहीसे निर्धास्त होते ! परंतु, ताडपत्रीने बंद केलेल्या डब्यांतून प्रवास करायला ते फार नाखुष होते. एखाद्या स्टेशनवर डब्याची झडती घेतली तर, साधी हालचालसुद्धा न करतां, आपल्याला शत्रूच्या स्वाधीन व्हावें लागेल ही संभाव्य परिस्थिति त्यांना भेडसावीत होती. हॉवर्डच्या खाणीच्या आवारांत एखाद्या चोरासारखें राहावें लागत असल्यामुळे, काय वाटेल तें करून त्या धोक्याच्या प्रदेशांतून बाहेर पडलेंच पाहिजे असेंसुद्धा त्यांना वाटत होतें. ते म्हणतात, " रणांगणावर मृत्यु येईल ही भीति निराळी आणि आपल्या पाळतीवर पोलीस आहेत ही भीति निराळी. पोलिसांना चुकविण्यासाठी जो लपंडाव खेळावा लागतो त्यामुळे आपण खरोखरच गुन्हेगार आहोंत की काय असें कांही दिवसांनी वाटूं लागतें "—तो लपंडाव चुकविण्यासाठी चर्चिलनी अखेर हॉवर्डची योजना मान्य केली.

डिसेंबरच्या १९ तारखेला लोकरीच्या गोण्यांबरोबर चर्चिल प्रवासाला निघाले. हॉवर्डने त्यांच्या दिमतीला मद्याच्या कांही बाटल्या, एक पिस्तुल आणि कांही खाद्यपदार्थ दिले होते. सरहद्दीवर पोहोचण्यापूर्वीच्या अठरा स्टेशनांचीं नांवें चर्चिलनी पाठ केलीं असलीं, तरी गाडी उभी राहिली म्हणजे डोकें वर उचलून स्टेशनचें नांव वाचायला ते विसरत नसत. तीन दिवसांच्या प्रवासानंतर शेवटचें स्टेशन ओलांडून गाडीने पोर्तुगिझांच्या हद्दींत प्रवेश केला तेव्हा चर्चिल यांना झालेला आनंद गगनांत मावेना ! त्यांनी ताडपत्रीच्या बाहेर डोकें काढून एकदम गायला सुरुवात केली आणि पिस्तुलाचे तीन बारसुद्धा हवेंत उडवले !

* * *

सुटका :

लॉरेन्को मार्क्स् या स्टेशनवर गाडी थांबतांच ते डब्यांतून बाहेर पडले, स्टेशनच्या फाटकांतून बाहेर पडले आणि ब्रिटिश वकिलातीकडे चालूं लागले. बरेच रस्ते ओलांडल्यानंतर एका इमारतीवर ब्रिटिशांचें निशाण ( युनियन जॅक) फडकतांना पाहून त्यांना अत्यंत आनंद झाला. वकिलातीच्या कचेरींत शिरून तेथील ब्रिटिश वकिलाला भेटण्याची त्यांनी इच्छा दर्शविली, पण "आता नाही, कांही काम असेल तर उद्या सकाळीं नऊ वाजतां या" असें चिटणिसाने त्यांना उत्तर दिलें. तें ऐकून चर्चिल संतापले आणि इतक्या उंच स्वरांत बोलूं लागले की, ती गडबड ऐकून खुद्द वकीलसाहेबच खाली आले. वकीलसाहेबांनी चर्चिलना एका क्षणांत ओळखलें आणि मग काय ? चार्चिल मागतील त्या सुखसोयी त्यांच्या सेवेला हजर झाल्या. गावांतले सर्व इंग्रज वकिलातीच्या इमारतींत जमले आणि चार्चिल यांचा त्यांनी मुक्तकंठाने जयजयकार केला.

दुसरे दिवशींच्या बोटीने चर्चिल दरबानला गेले. तेथे तर त्यांच्या सत्काराला आणि जयजयकाराला, जणू काय, सीमाच उरली नाही. चर्चिलना जनरल बोथाने कैद केलें त्या दिवसानंतर बोअर सैनिकांनी ब्रिटिशांना अनेक महत्त्वाच्या लढायांत पराभूत केलें होतें. परंतु, चार्चिल यांचें आगमन ही त्या पराभवांवर मात करणारी घटना आहे अशा उत्साहाने त्यांचें दरबान येथे स्वागत झालें. चर्चिल यांनी, जणू काय, एखाद्या महत्त्वाच्या लढाईत विजय मिळविला होता अशा रीतीने त्यांचा जयजयकार करण्यांत आला. दरबानच्या बंदरांत विजयपताका फडकत होत्या, वाजंत्रीं वाजत होतीं, फार मोठा जमाव जमला होता ——त्या जमावाच्या खांद्यावरून त्यांची मिरवणूक काढण्यांत आली. भूतलाच्या कानाकोपऱ्यांतून अभिनंदनाच्या तारांचा वर्षाव होत होता. वार्ताहराच्या वेषांत रणांगणावर संचार करणारा सैनिक ही भूमिका मागे पडून, चर्चिल यांनी एखाद्या नायकाची भूमिका पटकाविली होती——त्या क्षणाला त्यांची लोकप्रियता अक्षरशः अमाप होती.

चिलखती डब्याचें रक्षण करीत असतां चर्चिल पकडले गेले, त्या-

नंतरच्या युद्धाच्या वार्ता त्यांना आता समजल्या होत्या. आफ्रिकेंतल्या रणांगणावर ब्रिटिशांचा पराभव होतो आहे हें पाहून त्यांना अत्यंत वाईट वाटलें आणि ताबडतोब लष्करांत प्रवेश करण्याचा त्यांनी निश्चय केला!

* * *

**रणांगणावरील संचार :**

डिसेंबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत चर्चिल पायपीट करीत होते, त्याच काळ्या आठवड्यांत बोअर सैनिकांनी ब्रिटिश फौजांना पराभूत केलें होतें. आपल्या फौजांच्या पीछेहाटीच्या बातम्या समजतांच ब्रिटिश सरकारने बोअर युद्धासाठी आपले दोन नामवंत आणि कुशल सेनापति, लॉर्ड किचनेर आणि लॉर्ड रॉबर्टस्, यांची नेमणूक केली---त्याच वेळीं चर्चिल यांनी लष्करांतली नोकरी पत्करली होती.

वर्तमानपत्राच्या बातमीदाराला लष्करांत नोकरी देऊं नये आणि लष्करांत नोकरी करणाराने वर्तमानपत्राचा बातमीदार असूं नये असें एक तत्त्व सुदानच्या लढाईनंतर प्रस्थापित झालें होतें. 'मॉर्निंग पोस्ट' या पत्राशीं त्याचा बातमीदार या नात्याने केलेला करार मोडायला चर्चिल तयार नसले तरी त्यांना युद्धांत भाग घ्यावयाचा होता. अखेर प्रस्थापित तत्त्वाचा भंग न होईल अशा रीतीनें, त्या तत्त्वाला वळसा घालून, बुलरसाहेबांनी त्यांची एका पलटणींत बिनपगारी नेमणूक केली आणि सैनिक व बातमीदार या दुहेरी नात्याने ते रणांगणावर संचार करूं लागले. लष्करी विभागांत शक्य ती कामगिरी करीत असतां ते आपल्या वृत्तपत्राला लढाईच्या बातम्या पाठवीत होते आणि त्या बातम्यांत युद्धांतील डावपेचांवर टीकाहि करीत होते. त्यामुळे त्यांच्यावर आधीच नाराज असलेले लॉर्ड किचनेर अधिकच नाराज झाले! लॉर्ड रॉबर्टस् हे लॉर्ड रॅन्डॉल्फ यांचे स्नेही असूनहि त्यांनी चर्चिल यांना दोन हात दूर ठेविलें आणि इतर सैन्याधिकारीसुद्धा त्यांना टाळूं लागले.

या परिस्थितीची पर्वा न करतां ज्या ज्या ठिकाणीं तुमुल युद्ध चालू असेल त्या त्या रणांगणावर चर्चिल धावून जात होते. चर्चिल हे, जणू काय, एकटेच बोअर सैन्याविरुद्ध लढत आहेत असा त्यांचा त्या वेळचा

आविर्भाव होता. "भूतकाळाबद्दल विषाद वाटत नव्हता--भविष्याची भीति वाटत नव्हती--मन अगदी निष्काळजी होतें." अखेर युद्धाचा रंग पालटला आणि ब्रिटिशांची सरशी होऊं लागली. त्या सरशीला चर्चिल हे कारण नसून, आफ्रिकेंतील ब्रिटिश सैन्यांत आणि शस्त्रांत झालेल्या वाढीमुळे अंतिम विजय अटोक्यांत येत चालला होता.

दोन महिन्यांनंतर विजयी ब्रिटिश सेनेने लेडीस्मिथचा वेढा उठवून नाताळ प्रांताची लढाई जिंकली, त्या वेळीं शहरांत प्रवेश करणाऱ्या विजयी सैन्याच्या पहिल्या तुकडीबरोबर चर्चिलहि होते. नाताळमधील विजयानंतर चर्चिल यांनी लॉर्ड रॉबर्टस्ची परवानगी मिळवून ट्रान्सव्हालच्या प्रदेशांत प्रवेश केला. १८९९ सालच्या डिसेंबर महिन्यांत ज्या प्रिटोरिया शहरांत चर्चिल यांनी कैदी म्हणून प्रवेश केला होता, त्या शहरांत ५ जून १९०० रोजीं ब्रिटिश सैनिकांनी प्रवेश केला तेव्हा त्यांच्या अग्रभागीं चर्चिल हे अर्थात् होतेच!

नाताळ आणि ट्रान्सव्हाल या युद्धक्षेत्रांतल्या पराजयानंतर आपण हें युद्ध हरलों याची खात्री पटून, सैन्यांत दाखल झालेले बोअर शेतकरी आपापल्या घरादारांकडे आणि जमिनीकडे परतूं लागले. त्या वेळीं "जे लढतील त्यांचा निःपात करा, पण जे शरण येतील त्यांच्याशीं सहानुभूतीने आणि औदार्याने वागा" असा 'मॉर्निंग पोस्ट' पत्रामार्फत चर्चिल यांनी दिलेला सल्ला लष्करी अधिकाऱ्यांना पसंत न पडल्यामुळे, कांही काळ युद्ध चालूच राहिलें. चर्चिल यांनी पाठविलेल्या त्या संदेशांतून त्यांचें एक सुप्रसिद्ध वचन निर्माण झालें.

"–युद्धांत खंबीरपणा, पराजयाच्या प्रसंगीं बेगुमानपणा, विजयाच्या क्षणीं औदार्य आणि शांततेच्या काळांत सद्भावना"–

* * *

९

## पार्लमेंटांत प्रवेश

जुलै महिन्यांत चर्चिल स्वदेशीं परतले. त्यापूर्वीं ते एक प्रसिद्ध पुरुष झाले होते. एस्टकोर्ट येथील चिलखती गाडीच्या संबंधांत त्यांनी केलेल्या कामगिरीची प्रशंसा करणारीं अतिशयोक्त वृत्तें अनेक वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालीं होतीं. प्रिटोरियांतील शाळेच्या आवारांतून त्यांनी स्वतःची करून घेतलेली धाडसी सुटका आणि त्यानंतरचा त्यांचा रणांगणावरील संचार यासंबंधीसुद्धा अनेक कथा आणि दंतकथा प्रसिद्ध झाल्या होत्या. युद्धाचें मार्गदर्शन, रणांगणावरील डावपेंच आणि वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी ( चर्चिल यांच्या दृष्टीनें ) केलेल्या चुका, यासंबंधीचीं त्यांचीं खमंग बातमीपत्रें इंग्लंडांतले वाचक अतिशय आवडीनें वाचत होते. परंतु, कांही वृत्तपत्रांतून त्यांची अवहेलनासुद्धा वाचायला मिळत होती. एस्टकोर्ट येथील चिलखती गाडीसंबंधांत एका वृत्तपत्रानें लिहिलें, " त्या गाडींतल्या बावरलेल्या सैनिकांना चर्चिल यांनी धीर दिला असें म्हणतात. असें असेल तर लष्करी अधिकारी त्या वेळीं काय करीत होते ? अधिकारी जागेवर असतांना सैनिकांना धीर देण्याची जबाबदारी वृत्तपत्राच्या एका बातमीदारावर पडावी – आश्चर्य आहे ! " दुसऱ्या एका वृत्तपत्रानें लिहिलें, " या सद्‌गृहस्थांचा त्या गाडीशीं संबंध काय ? त्या गाडींत बसून प्रवास करण्याचा यांना कोणता अधिकार होता ? बोलूनचालून हे एका वृत्तपत्राचे बातमीदार ! यांना आपल्याजवळ शस्त्र बाळगण्याचा आणि तें वापरण्याचा काय अधिकार ? – खरोखर, या गृहस्थाला देहान्त शासन दिलें असतें तरी बोअर सेनापतीला दोष देतां आला नसता. " शाळेच्या आवारांतील सुटकेसंबंधीं आणखी एका वृत्तपत्रानें लिहिलें, " अटकेंतून निसटण्यांत चर्चिल यांनी फार चातुर्य दाखविलें किंवा

एखादी भूषणावह कृति केली असें म्हणतां येणार नाही. इतर कैद्यांप्रमाणे यांनीसुद्धा चांगल्या वर्तनाची हमी दिली होती. दिलेला शब्द मोडणें हें सद्गृहस्थाचें लक्षण नव्हे !"—— चर्चिल अगर त्यांच्या बरोबरच्या कैद्यांनी अशी कोणतीच हमी दिली नसल्यामुळे, स्वदेशीं परतल्यावर त्या विधानासंबंधांत अब्रूनुकसानीच्या चार दोन फिर्यादी करून चर्चिलनी नुकसानभरपाई मिळविली !

बोअर सैनिकांच्या सहनशीलतेची, चापल्याची आणि रणकौशल्याची आपल्या बातमीपत्रांतून चर्चिल मुक्तकंठाने प्रशंसा करीत होते, ती लष्करी खात्यांतील अहंमन्यांना पसंत नव्हती. बोअर सैनिकांइतकेच निष्णात सैनिक रणांगणावर उतरविले पाहिजेत किंवा संख्येने प्रचंड अशी सेना आणि विपुल शस्त्रास्त्रें तरी नेलीं पाहिजेत, त्याशिवाय या युद्धांत विजय मिळणार नाही असें मत चर्चिल यांनी व्यक्त केलें होतें. "कमीत कमी अडीच लाख सैनिक नेले तरी पैशांचा आणि रक्ताचा अपव्यय झाला असें म्हणतां येणार नाही" असा हिशेब त्यांनी इंग्लंडमधील जनतेसमोर मांडला होता. त्याला अनुलक्षून एका वृत्तपत्राने लिहिलें, "लॉर्ड रॉबर्टस् आफ्रिकेंत जाईपर्यंत चर्चिल यांची सरसेनापति म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे या बातमीला दुजोरा मिळत नाही !" लष्करी कंपूपैकी अनेकांनी त्यांना उपदेश केला, "मेहेरबान, कृपा करून स्वतःला असे हास्यास्पद करून घेऊं नका.—" पण वस्तुस्थिति मात्र अशी की, अडीच लाख सैनिक रणांगणावर उभे केल्यानंतरच ब्रिटिशांना आफ्रिकेच्या रणांगणावर विजय मिळाले.

ट्रान्सव्हाल आणि नाताळ प्रांतांतल्या निर्णायक विजयानंतर शत्रूशीं तह करावा असें चर्चिल यांचें मत होतें. विजय मिळेपर्यंत शक्तिसर्वस्व गुंतवून लढावें—विजय मिळाल्यानंतर पराजितांसमोर स्नेहाचा हात पुढे करावा, हें तत्त्व चर्चिलना पसंत होतें. परंतु, ब्रिटिश सरकार आणि लष्करी अधिकारी यांनी बोअरांचा बीमोड करण्याकरता निर्दयपणाने युद्ध चालू ठेविलें, त्यामुळे पराभूत झाले तरी त्यांच्या विस्तीर्ण प्रदेशांत, जनरल बोथा आणि जनरल स्मटस् यांच्यासारख्या कुशल नेत्यांच्या प्रोत्साहनाने बोअर लोक लढत होते. चर्चिल म्हणतात, "ते विजयाच्या आशेने लढत नसून, स्वाभिमान शाबूत राहावा म्हणून लढत होते !"—त्यामुळे युद्ध रेंगाळत राहून अखेर ३१ मे

१९०२ रोजीं तें संपलें.

कांही वृत्तपत्रांनी चर्चिल यांच्या आफ्रिकेंतील संचाराची कुचेष्टा केली असली तरी त्यांना पाहण्यासाठी आणि त्यांचीं भाषणें ऐकण्यासाठी इंग्लंड-मधील जनता अत्यंत उत्सुक झाली होती. इंग्लंडांत परततांच ठिकठिकाणीं त्यांच्या मिरवणुका काढण्यांत आल्या. 'चर्चिल' हें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं कांही दिवस खेळत होतें. ज्या ओल्डहॅम विभागांत निवडणुकीला उभे राहून ते पराजित झाले होते, त्या विभागांत तर त्यांची सर्वांत मोठी मिरवणूक काढली गेली.

आफ्रिकेंतलें युद्ध रेंगाळत असलें तरी त्याच्या शेवटासंबंधी शंका उरली नसल्यामुळे, तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेण्याकरिता, हुजूर पक्षाच्या सरकारने सप्टेंबर महिन्यांत पार्लमेंट बरखास्त करुन सार्वत्रिक निवडणुकी-साठी दंड थोपटले. ओल्डहॅम मतदारसंघांतून चर्चिल पुनः निवडणुकीला उभे राहिले. निवडणुकीच्या मोहिमेंत त्यांनी जवळ जवळ दीडशें भाषणें केलीं. ते म्हणतात, " त्या जमान्यांत मतदारांची संख्या कमी असल्यामुळे आपलीं मतें आणि कार्यक्रम सर्वांना स्वतः समजावून सांगणें शक्य होतें. पक्षोप-पक्षांचे उमेदवार आणि नेते मतदारांसमोर आपले कार्यक्रम मांडीत असत आणि मतदारसुद्धा आपला कौल विचारपूर्वक देत असत. त्या वेळची लोकशाही ही जातिवंत मुत्सद्द्यांचें नेतृत्व लाभलेली लोकशाही होती, वृत्त-पत्रीय प्रचाराने बुद्धिभ्रष्ट झालेला जमाव नव्हता. "

त्या निवडणुकींत हुजूर पक्ष विजयी झाला. चर्चिलसुद्धा आपल्या विभागांतून निवडून आल्यामुळे १ आक्टोबर १९०० रोजीं वयाच्या सव्वि-साव्या वर्षीं त्यांनी पार्लमेंटांत प्रवेश केला.

निवडणुकींतील विजयाबद्दल हुजूर पक्षाचा नेता, लॉर्ड सॅलिसबरी, याने चर्चिल यांचें अभिनंदन केलें. निरनिराळ्या शहरांतून त्यांना व्याख्यानाचीं आमंत्रणें येऊं लागलीं. हुजूर पक्षाचा विजय साजरा करण्याकरिता सुप्रसिद्ध मुत्सद्दी बाल्फोर मँचेस्टर येथे भाषण करणार होता, तेव्हा आपल्याबरोबर भाषण करण्याकरिता त्यांनी चर्चिलना आमंत्रण दिलें. चर्चिल (नेहमी-प्रमाणे) उशीरा गेले तेव्हा बाल्फोरचें भाषण सुरु होतें. त्या सभेंत चर्चिलनी प्रवेश करतांच सर्व श्रोते उठून उभे राहिले. चर्चिल म्हणतात,

“ ती एक प्रचंड सभा होती आणि त्या दिवसापासून प्रचंड सभांमधूनच मी भाषणें करूं लागलों ! ”

—एका दृष्टीनें चर्चिल आता ‘ मार्गाला ’ लागले होते !

* * *

## मैदानी वक्तृत्वाचा महापूर :

पार्लमेंटच्या सभासदांना त्या जमान्यांत पगार मिळत नव्हता. चर्चिल यांचेकडे त्या वेळीं जवळ जवळ साठ हजार रुपये शिल्लक असले, तरी बिनपगारी सार्वजनिक जीवनाची तरतूद करण्याकरिता अधिक पैसे मिळविणें अवश्य होतें. त्यांचीं भाषणें फार लोकप्रिय होत चाललीं होतीं. वक्ता या नात्यानें आपण जर अमेरिकेंत लोकप्रिय झालों, तर आपल्याला एक सोन्याची खाणच सापडली असें होईल अशी माहिती त्यांना मिळाली होती. म्हणून त्यांनी प्रथम इंग्लंडमध्ये आणि नंतर अमेरिकेंत व्याख्यानें देण्याची योजना आखली. इंग्लंडमधील कांही व्याख्यानांना लॉर्ड रोजबरी, लॉर्ड डफरीन आणि ऑर्थर कोनन्डॉईल यांच्यासारखे अध्यक्ष लाभले. चर्चिल यांची ‘ओळख’ करून देतांना, “ ज्या वयांत विश्वविद्यालयाच्या आवारांतून तरुण मंडळी बाहेर पडलेलीं नसतात, त्या वयांत युरोपांतील कित्येक सेनापतींपेक्षा रणांगणाचा अधिक अनुभव या तरुणाने मिळविला आहे ” अशी लॉर्ड डफरीन यांनी भलावण केली ! अमीर-उमरावांप्रमाणे साधे कामगारसुद्धा तिकिटें विकत घेऊन चर्चिल यांच्या व्याख्यानांना गर्दी करीत होते. कोणत्याहि व्याख्यानाला त्यांना पंधराशे रुपयांपेक्षा कमी पैसे मिळाले नाहीत आणि एकट्या नोव्हेंबर महिन्यांत तर एकंदर पासष्ट हजार रुपये मिळाले.

इंग्लंडांतील भाषणांच्या असामान्य यशानंतर ते अमेरिकेच्या सफरीला निघाले तेव्हा त्यांच्या व्याख्यानाच्या व्यवस्थापकानें “ पांच युद्धांचा अनुभव असलेला वीरपुरुष, सहा ग्रंथांचा लेखक आणि इंग्लंडचा भावी पंतप्रधान” अशी त्यांची जाहिरात केली होती. चर्चिलना ही हकीकत समजतांच त्यांनी ती जाहिरात ताबडतोब बंद करण्याचा आदेश दिला आणि, नाइलाजानें का होईना, त्यांच्या व्यवस्थापकाला तो मान्य करावा लागला. सुप्रसिद्ध विनोदी

लेखक मार्क ट्वेन हे चर्चिल यांच्या अमेरिकेंतल्या पहिल्या व्याख्यानाचे अध्यक्ष होते. परंतु, बोअर युद्धाबद्दल किंवा चर्चिल यांच्याबद्दल अमेरिकेंत फारसें कुतूहल नसल्यामुळे, गर्दी जमेना ! अमेरिकेंत बोअर लोकांबद्दल सहानुभूति होती हेंसुद्धा त्या बिनगर्दीच्या व्याख्यानांचें एक कारण होतें–परंतु चर्चिल डगमगले नाहीत. त्यांचा विलक्षण आत्मविश्वास आणि त्यांच्या भाषेची मोहिनी या दोन गोष्टींमुळे त्यांच्या व्याख्यानांचें आस्ते आस्ते श्रोत्यांना आकर्षण वाटूं लागलें. प्रसंगविशेषीं स्वत:वर टीका करून आणि बोअर सैनिकांची तारीफ करून त्यांनी शेवटीं शेवटीं लोकप्रियता मिळविली. उत्तर अमेरिकेची सफर आटोपून कॅनडांत त्यांनी दहा दिवस मुक्काम केला, तेथे मात्र त्यांनी मुबलक पैसा मिळविला.

अशा रीतीने सतत पांच महिने चर्चिल व्याख्यान देत होते. रविवार-खेरीज ते दररोज भाषणें करीत होते. कोणत्याहि दोन रात्री त्यांनी एका गावांत काढल्या नाहीत. त्या पांच महिन्यांत मिळालेल्या पैशांतून, झालेला खर्च वजा जातां, त्यांच्याकडे दोन लाख रुपये शिल्लक उरले !

प्रभावी वक्तृत्व आणि सांपत्तिक स्वास्थ्य या दोन गोष्टी संपादन करून चर्चिल सार्वजनिक राजकीय जीवनासाठी सिद्ध झाले ! पार्लमेंटचें पहिलें अधिवेशन झालें त्या वेळीं ते अमेरिकेंत होते. दुसरें अधिवेशन सुरू होण्या-पूर्वी, २२ जानेवारी १९०१ रोजीं, जिच्या अमदानींत ते लहानाचे मोठे झाले होते ती व्हिक्टोरिया महाराणी मरण पावल्यामुळे ब्रिटिशांच्या इतिहासांतला एक कालखंड संपून दुसऱ्या कालखंडाची सुरुवात झाली. राणीच्या अमदानींत चर्चिल यांनी पांच युद्धांत भाग घेतला होता. तिचा मुलगा, सातवा एडवर्ड, याच्या कारकीर्दीच्या सुरुवातीलाच ते आपल्या राजकारणी आयुष्याची सुरुवात करीत होते.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय

१०

## पार्लमेंटांतील पहिलीं भाषणें

ब्रिटिशांच्या पार्लमेंटची बैठक त्या जमान्यांत सूर्यास्तानंतर सुरू होऊन मध्यरात्रीपर्यंत चालत असे. रात्रीं साडेनऊ वाजल्यानंतर सभासदांची गर्दी वाढायची. पार्लमेंटांतील कामाच्या पद्धतीचा जवळजवळ वर्षभर अनुभव घेतल्यावर आणि ज्येष्ठ सभासदांचीं अनेक भाषणें ऐकल्यानंतरच कोणताहि नवा सभासद आपलें पहिलें भाषण करीत असे. लॉर्ड रॅन्डॉल्फ यांच्या-सारख्या अनावर सभासदाने सुद्धा दोन महिन्यांनंतर आपलें पहिलें भाषण केलें होतें. पण ' सदैव घाईत ' असणाऱ्या चर्चिलना इतका विलंब कसा खपावा ?

फेब्रुवारी महिन्यांत सुरू झालेल्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीं चर्चिलनी सभागृहांत प्रवेश केला, त्या वेळीं ते कोठे बसणार तें इतरांना माहीत नसलें तरी आपली जागा निश्चित करूनच ते घराबाहेर पडले होते. लॉर्ड रॅन्डॉल्फ ज्या जागीं बसत असत त्या जागीं ते सरळ जाऊन बसले. काळ्या, निळ्या आणि लाल रंगाच्या पेन्सिली, अनेक कागद आणि इतर साहित्य आपल्या समोरच्या टेबलावर पसरून ते अत्यंत एकाग्रतेने सभागृहांतलीं भाषणें ऐकत होते. आपण या सभागृहांतले नवे सभासद नसून ' जुने आणि जाणते ' आहोंत असाच त्यांचा आविर्भाव दिसत होता. या माणसाचें भाषण आपल्याला लवकरच ऐकावें लागेल अशी सर्व सभासदांची पहिल्याच दिवशीं खात्री झाली !

" इतक्या लवकर भाषणाच्या भानगडींत पडूं नका " असा सल्ला कांही सभासदांनी चर्चिलना दिला, तर बोअर युद्धाचाच विषय चालू असल्यामुळे, " हा तुमचा विषय आहे–तुम्ही आताच बोला " अशी चिथावणी इतरांनी

दिली ! दुसऱ्याच दिवशीं भाषण करण्याची इच्छा चर्चिल यांनी व्यक्त केली. तिसरे दिवशीं सरकारविरोधी उदार पक्षाचा लॉईड जॉर्ज या नांवाचा एक उदयोन्मुख सभासद बोलणार होता, त्याच्या नंतर चर्चिल यांनी भाषण करावें असा कार्यक्रम निश्चित झाला.

त्यापूर्वीच्या पांच महिन्यांत चर्चिल यांनी दररोज भाषणें केलीं असलीं तरी पार्लमेंटमधील पहिल्या भाषणाची त्यांना धास्ती वाटत होती. मैदानांतलें भाषण आणि कायदेमंडळांतलें भाषण यांतील फरक न समजण्याइतके ते बेजबाबदार नव्हते. ते म्हणतात, " पहिल्या भाषणासाठी मीं केलेली तयारी आणि ती तयारी कोणाच्या लक्षांत येऊं नये यासाठी केलेली खटपट याचें वर्णन काय करावें ? जें अगोदर लिहून काढून जवळजवळ पाठ केलेलें नाही असें भाषण मीं त्या दिवसानंतरसुद्धा कित्येक वर्षें केलें नाही. "

त्या दिवशीं लॉईड जॉर्ज यांनी इतकें सुंदर आणि अस्खलित भाषण केलें की, चर्चिल यांनी निश्चित केलेले मुद्दे आणि तयार केलेलीं वाक्यें कुचकामाचीं ठरून, वेळेवर सुचेल तें बोलणें त्यांना भाग पडलें ! लॉईड जॉर्ज यांच्या सरकारविरोधी भाषणामुळे सभागृहाचें वातावरण तप्त झालें होतें. इतक्यांत, " एका नव्या सभासदाचें भाषण ऐकायला आपण आतुर झाला असाल म्हणून मी आपला जास्त वेळ घेत नाहीं " असा आपल्या भाषणाचा समारोप करून ते खाली बसले.

चर्चिल यांची शून्यघडी भरली ! उत्कंठा आणि भीति या दोन विकारांनी त्यांचें मन व्यापिलें होतें. ते उभे राहिले तेव्हा जुन्या सभासदांना लॉर्ड रॅन्डॉल्फ यांची आठवण झाली. तेंच मोठे डोळे आणि तेंच चौकोनी कपाळ ! त्याच जागीं उभे राहून मंत्रिपदाचा राजीनामा देतांनाचें त्या सभागृहांतलें शेवटचें भाषण रॅन्डॉल्फ यांनी केलें होतें. चर्चिल यांनी बोलायला सुरुवात केली—मधून मधून ते अडखळत होते—पण बोअर लोकांच्या धैर्याची त्यांनी प्रशंसा केली त्या वेळीं विरोधी पक्षाने टाळ्या वाजविल्यामुळे, त्यांचा आत्मविश्वास जागृत झाला. चर्चिल म्हणतात, " मी गटंगळ्या खातों आहे असें वाटत होतें, इतक्यांत किनारा दिसूं लागला—तो दूर होता म्हणून सर्व शक्ति एकवटून मी पोहूं लागलों–अखेर किनाऱ्याला माझे पाय लागले त्या वेळीं मी थकलों होतों–धापा टाकीत होतों. "

भाषण वाईट झालें नाही—अनेकांनी चर्चिल यांचें अभिनंदन केलें. त्यांच्यानंतर भाषण करतांना सर रॉबर्ट रीड म्हणाले, "या तरुण सभासदाचें भाषण ऐकून आज मला त्याच्या पित्याची आठवण झाली." लॉईड जॉर्ज आणि चार्चिल यांची त्याच दिवशीं ओळख झाली.

त्या अधिवेशनांत चर्चिल यांनी एकंदर तीन भाषणें केलीं. तिसऱ्या भाषणाची तयारी ते जवळ जवळ सहा आठवडे करीत होते. सबंध भाषण लिहून काढून त्यांनीं तें मुखोद्गत केलें होतें. तें भाषण सर्वांनाच आवडलें.

बोअर लोकांशीं तह, शस्त्रकपात आणि काटकसर या गोष्टींसंबंधीचीं स्वतःचीं आग्रही मतें चर्चिल यानी निर्भयपणाने त्या अधिवेशनांत व्यक्त केलीं. हुजूर पक्षाच्या पुढाऱ्यांची त्यांच्यावर मेहेरनजर असली तरी चार्चिल यांना विरोधी पक्षांतील रोजबेरी, ॲस्क्विथ आणि विशेषतः मोर्ले हे पुढारी जास्त जवळचे वाटत होते आणि आपलीं मतें त्यांना पटत असतील असा विश्वास वाटूं लागला होता. ते म्हणतात, "खरें सांगायचें म्हणजे दोन्ही पक्षांशीं अनेक बाबतींत माझे मतभेद होते. आपलें जें प्रामाणिक मत असेल तें निर्भयपणाने मांडावे इतकेंच माझें कर्तव्य आहे असें मला वाटत होतें. पक्षाची शिस्त आणि एकवाक्यता या गोष्टी मला समजत नव्हत्या आणि त्यांच्यासाठी माझ्या प्रामाणिक मतांचा बळी द्यायला मी तयार नव्हतों!"

* * *

## उदार पक्षांत प्रवेश :

बोअर लोकांसमोर स्नेहाचा हात पुढे करून तह करावा या एकाच गोष्टीवर चार्चिल आणि हुजूर पक्षाचे पुढारी यांच्यांत मतभेद होता असें नाही. लष्करी खर्च कमी केला पाहिजे हें त्यांचें मतसुद्धा पक्षप्रमुखांना संमत नव्हतें. "आमची सुरक्षितता आणि मान लष्करावर अवलंबून नसून आरमाराच्या सामर्थ्यावर अवलंबून आहे. युद्धाचा वणवा पेटला तर आरमाराच्या जोरावर आमच्या शत्रूंना दोन हात दूर ठेवून, दरम्यानच्या काळांत, प्रत्येक प्रजाजनाचें सैनिकांत आणि शहराचें किल्ल्यांत रूपांतर करूं शकूं."

त्यापूर्वीच्या पन्नास वर्षांत ब्रिटिशांनी खुल्या व्यापाराचें धोरण अवलंबून संरक्षित व्यापाराचा निषेध केला होता. परंतु, नव्या निवडणुकीनंतर हुजूर पक्षाचे पुढारी, जोसेफ चेंबरलेन, आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने एकाएकी संराक्षित व्यापाराचें धोरण अवलंबिलें, तें तर चर्चिल यांना पूर्णपणें नापसंत होतें. आपल्या पक्षाच्या त्या धोरणाला विरोध करण्याकरिता, लॉर्ड रॅन्डॉल्फ यांच्याप्रमाणे, चर्चिलनी आपल्याभोवती एक लहानसा गट तयार केला त्यांत लॉर्ड सेसिल प्रमुख होते. चर्चिल आणि सेसिल हे निरनिराळ्या ठिकाणीं भाषणें करून संरक्षित व्यापाराच्या धोरणाचा निषेध करूं लागल्यामुळे त्यांनी हुजूर पक्षीय सभासदांची आणि मतदारांची इतराजी संपादन केली, पण त्यांनी त्याची पर्वा केली नाही. चर्चिल यांच्या बर्मिंगहॅम येथील व्याख्यानाच्या वेळीं त्यांच्यावर नाराज असलेल्या हुजूर पक्षीयांचा फार मोठा जमाव जमला होता. पण चर्चिल उघड्या गाडींतून त्या जमावांत शिरले, गाडींतून उतरण्यापूर्वी त्यांनी चिरूट शिलगावला आणि आपण, जणू काय, एखाद्या नाटकगृहांत आहोंत अशा निर्व्याज वृत्तीने चिरूट फुंकीत ते व्यासपीठावर जाऊन बसले. त्यांची ती बेदरकार वृत्ति पाहून भोवतालचा जमाव प्रथम थक्क झाला, कांही काळाने शांत झाला आणि अखेर कौतुकाने टाळ्या वाजवूं लागला !

चर्चिल यांनी स्वतःच्या पक्षाविरुद्ध बंड उभारलेलें पाहून ओल्डॅहम येथील मतदारांनी त्यांच्यावर निंदाव्यंजक ठराव केला. पार्लमेंटच्या सभागृहांत ते बोलायला उभे राहिले म्हणजे हुजूर पक्षीय सभासद आरडाओरड करून त्यांचीं भाषणें बंद पाडूं लागले, त्यांच्याविषयी अपशब्द वापरूं लागले, त्यांची अवहेलना करूं लागले ! एका पोटनिवडणुकीच्या वेळीं चर्चिल यांनी विरोधी पक्षाच्या उमेदवाराचा जय व्हावा अशी इच्छा व्यक्त करून, " आपल्या देशांत उदारपक्ष आहे ही परमेश्वराची कृपाच समजली पाहिजे " असे उद्गार काढल्यामुळे, ' फितूर '—' विश्वासघातकी ' अशीं विशेषणें हुजूरपक्षीय सभासद त्यांना बहाल करूं लागले.

याच वेळीं चर्चिल यांनी आपल्या वडिलांचें आठशें पृष्ठांचें चरित्र लिहून तें प्रसिद्ध केलें. त्याचीं स्थूलमुद्रितें तपासण्याचें काम जॉन मोर्ले यांनी केलें होतें. " इंग्रजी भाषेंतल्या चरित्रविषयक ग्रंथांतील पहिल्या सहा

ग्रंथांत या ग्रंथाचा अनुक्रम लागेल" असे उद्गार लॉर्ड रोजबेरी यांनी काढले. त्या ग्रंथाचा मोबदला म्हणून चर्चिल यांना जवळ जवळ एक लक्ष रुपयांची प्राप्ति झाली. परंतु केवळ सांपत्तिक प्राप्तीपेक्षा अधिक मोलाचा मार्ग त्याच ग्रंथाने त्यांना दाखविला असें म्हणतां येईल. ज्या पक्षाच्या आधिकृत मताशीं आपण सहमत होऊं शकत नाही, अशा पक्षाशीं एक नाखुष बंडखोर या नात्याने चिकटून राहण्याच्या चुकीमुळे आपल्या वडिलांचें राजकीय जीवन उद्ध्वस्त झालें असा निष्कर्ष चर्चिल यांनी काढला होता. आपलीं प्रामाणिक मतें आपल्याला जिकडे नेतील तिकडे गेलें पाहिजे असें त्यांना वाटूं लागल्यामुळे, हुजूर पक्षीय सभासदांनी पार्लमेंटांतलें त्यांचें एक भाषण असामान्य कोलाहल करून बंद पाडलें त्या दिवशीं ते विरोधी पक्षाच्या रांगेंत लॉईड जॉर्ज यांच्या शेजारीं जाऊन बसले !

हुजूर पक्षीय सभासद चर्चिल यांच्या भाषणांत व्यत्यय आणीत असल्यामुळे, लिखित किंवा पाठांतरित भाषणाऐवजी ऐन वेळीं सुचतील ते विचार व्यक्त करण्याची सिद्धि याच काळांत त्यांनी संपादन केली. पक्षत्यागाच्या काळांत, पुढे लॉर्ड बर्कनहेड म्हणून प्रसिद्धि पावलेले, त्या वेळचे एफ. ई. स्मिथ हे लॉर्ड सेसिल यांच्याप्रमाणेच चर्चिल यांचे सोबती होते.

* * *

## स्त्रियांचा विरोध :

१९०६ सालच्या सार्वत्रिक निवडणुकींत चर्चिल यांनी हिरीरीने भाग घेण्याचें निश्चित केलें. ओल्डहॅम विभागांतील मतदारांनी त्यांच्यासंबंधी निंदाव्यंजक ठराव केला असल्यामुळे या खेपेला ते उदार पक्षातर्फे मँचेस्टर विभागांत निवडणुकीसाठी उभे राहिले.

तत्काळपावेतो इंग्लंडमधील निवडणुकांत स्त्रियांना मतदानाचा हक्क नव्हता. स्त्रियांसाठी मतदानाचा हक्क मिळविण्याकरिता कांही बेदरकार बायकांनी मोहीम सुरू केली होती. स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्याच्या विरोधकांत चर्चिल हे अग्रभागीं असल्यामुळे, मतदानाचा हक्क मागणाऱ्या स्त्रियांनी त्यांच्या सभेंत व्यत्यय आणण्याचा आणि त्या उधळून टाकण्याचा

निश्चय केला. मतदानाचा हक्क मिळवूं इच्छिणाऱ्या स्त्रियांचें पुढारीपण सिल्व्हिया पॅंखर्स्ट या बाईने पत्करिलें होतें. चर्चिल यांच्या निवडणुकीच्या प्रचाराचीं भित्तिपत्रकें बायकांनी फाडलीं त्या वेळीं, "माझ्यावर सत्ता गाजविण्याचा या असंतुष्ट स्त्रिया प्रयत्न करताहेत" अशी चर्चिल यांनी ओरड केली. एका महिलेने एकदा त्यांच्या थोबाडींत मारली, तर दुसरीने त्यांना चाबकाचा प्रसाद दिला ! अशा परिस्थितींत चर्चिलना गुप्तपोलीस आणि संरक्षकांच्या संरक्षणाखाली त्यांच्या मतदारविभागांत हिंडणें अवश्य झालें तरी, "स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्याच्या मागणीला मी कधीहि पाठिंबा देणार नाहीं. अशा महत्त्वाच्या बाबतींत मी कधीहि बाईलबुद्ध्या होणार नाहीं," असें त्यांनी जाहीर केलें ! एका पोलिस चौकीभोवतालच्या खांबांना चळवळ्या स्त्रियांनी स्वतःला बांधून घेतलें असून, स्त्रियांना मताधिकार मिळेपर्यंत त्या सत्याग्रह करणार आहेत ही बातमी ऐकून चर्चिल यांनी उद्गार काढले, "एखाद्या प्रसूतिगृहाभोवतालच्या खांबांना स्वतःला जखडून टाकून, 'मी बाळंत होईपर्यंत इथेच राहणार' असें एखाद्या पुरुषाने म्हणण्यासारखाच हा प्रकार आहे !" १९२८ सालीं ब्रिटिश बेटांत स्त्रियांना संपूर्ण मताधिकार मिळाला तोंपर्यन्त मताधिकार नसलेल्या स्त्रियांना चर्चिल हा आपला एकच एक शत्रु आहे असें वाटत होतें.

१९०६ सालच्या निवडणुकींत चर्चिल यशस्वी झाले, इतकेंच नव्हे तर वसाहतींचे उपमंत्री म्हणून त्यांची मंत्रिमंडळांत नेमणूक झाली—त्या वेळीं ते तीस वर्षांचे होते.

* * *

**वसाहतींचे उपमंत्री :**

ट्रान्सव्हालला स्वायत्तता देण्याचा निश्चय उदार पक्षाने केला होता. त्या संबंधांत पार्लमेंटांत भाषण करतांना चर्चिल म्हणाले, "आमच्या पक्षाच्या बहुमताच्या जोरावर आम्ही ट्रान्सव्हालला स्वायत्तता देऊं शकूं—पण ती केवळ एका पक्षाची देणगी ठरेल. उलट पक्षी तुम्ही हुजूरपक्षीयांनी जर आमच्याशीं सहकार्य केलें तर ती आपल्या राष्ट्राची देणगी होईल."

वसाहतींचे उपमंत्री या नात्याने त्या काळांत चर्चिल शासनविषयक अनेक उद्योगांत अहोरात्र मग्न होते. " सबंध जगाला मी माझ्या हातांवर उचलूं शकेन " असा विश्वास त्यांना त्या काळांत वाटत होता !

* * *

**मंत्रिपद आणि विवाह :**

१९०८ सालीं व्यापारमंत्री म्हणून चर्चिल यांची मंत्रिमंडळांत नेमणूक झाली तेव्हा, त्या वेळीं प्रचलित असलेल्या रूढीप्रमाणे, स्वतःच्या मतदार-विभागांतून त्यांना पुनः निवडणुकीसाठी उभें राहावें लागलें. मतदानाचा हक्क मिळवूं इच्छिणाऱ्या स्त्रियांनी चर्चिल यांच्या सभेंत पुनः गोंधळ माजवायला सुरुवात केली आणि आश्चर्य असें की--चर्चिल पराभूत झाले ! मतमोजणीच्या ठिकाणांतून ते बाहेर पडत होते तेव्हा त्यांना हटकून एक बाई म्हणाली, " आम्ही बायकांनी तुमचा पराभव केला आहे, आता तरी आम्हाला मतदानाचा हक्क देण्याच्या आड तुम्ही येऊं नका ! "

चर्चिल यांचा पराभव होऊन कांही दिवस लोटतात न लोटतात तोंच स्कॉटलंडमधील डंडी विभागांतल्या पोटनिवडणुकीसाठी ते पुनः रंगणांत उतरले. मतदानाचा हक्क मिळविण्याचा विडा उचललेल्या चळवळ्या बायकांनी पुनः चर्चिल यांच्या विरुद्ध आघाडी उघडली. कोणत्याहि सभेंत त्यांचें भाषण सुरू झालें म्हणजे एकसारखा घंटानाद करून तें बंद पाडावयाचा मक्ता मिस् मॅलोरी नांवाच्या चळवळ्या बाईने घेतला होता. परंतु, अखेर चर्चिल बहुमताने निवडून आले.

पंतप्रधान ॲस्क्विथ यांच्या मंत्रिमंडळांत हालडेन, एडवर्ड ग्रे आणि मोर्ले यांच्यासारखे मंत्री असल्यामुळे तें, जणू काय, इंग्लंडच्या भावी पंतप्रधानांचेंच मंत्रिमंडळ होतें. चर्चिल यांचें वय त्या वेळीं तेहतीस वर्षांचें होतें. पार्लमेंटच्या सभागृहांत ते मोर्लेसाहेबांशेजारी बसत असत. मोर्ले यांना त्यांच्याविषयी अतिशय प्रेम आणि कौतुक वाटत होतें. " कधीहि नाउमेद न होणारी उद्योगप्रियता, उत्साह, अंगीकृत कार्याशीं एकाग्रता, इंग्रजी भाषेवरील असामान्य प्रभुत्व आणि वादविवादांतील कौशल्य " या चर्चिल यांच्या गुणांची नेहमी प्रशंसा करून मोर्लेसाहेब त्यांचें मार्गदर्शन करीत होते.

मँचेस्टर येथील पराभवाची डंडी येथील विजयानें परतफेड केल्यावर, चर्चिल यांनी स्त्रियांचा मतदानाचा हक्क जरी नाही तरी एका सुंदर स्त्रीचा आपल्या जीवनयात्रेंतला अधिकार मान्य केला. कर्नल होजीअर यांची लावण्यवती कन्या, क्लेमंटाईन, हिजबरोबर त्यांचा विवाह झाला.

तो १९०८ सालचा सप्टेंबर महिना होता–चर्चिल म्हणतात, "—त्या दिवसापासून मी अत्यंत सुखांत कालक्रमणा करीत आहे"––!

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वागत
अनुक्रम ...३४८४८ ...... वि: ......चरित्र
क्रमांक ..................... नों दि: २-५-६७

११

## उमरावांचे विरोधक

सदोदित घाईत असलेल्या या माणसाने ‘ लगीनघाई ’ मात्र केली नाही. आपल्याला योग्य अशी सहचारिणी भेटेपर्यंत लग्न करावयाचें नाही असें चर्चिल यांनी ठरविलें होतें. राजकारणांतील धकाधकीच्या जीवनांत पतीला सतत मदत करील, त्याच्याकडे येणारांचें सुहास्यवदनाने आदरातिथ्य करील आणि राजकारणाचासुद्धा विसर पडणारें ‘ घर ’ निर्माण करील अशी सहचारिणी त्यांना पाहिजे होती, ती मिळाली तेव्हाच त्यांनी लग्न केलें.

चर्चिल यांची सर्व मित्रमंडळी लग्नसमारंभाच्या वेळीं गोळा झाली होती. भोवताली उत्तमोत्तम आणि अद्ययावत् पोषाख दिसत होते, पण स्वतः ‘ नवरदेव ’ मात्र पोषाखाच्या बाबतींत बेफिकीर होता. लग्नसमारंभाच्या वेळीं शिष्टसंप्रदायाने निषिद्ध मानलेलें पिवळ्या रंगाचें पादत्राण त्यांच्या पायांत पाहून, अनेक उच्चभ्रू आमंत्रितांना धक्का बसल्यासारखा दिसत होता. पोषाखाच्या बाबतींतली बेफिकिरी ही चर्चिल यांच्या, जणू काय, पांचवीलाच पुजलेली आहे. एडवर्ड बादशहाच्या भेटीला बकिंगहॅम राजवाड्यांत जावयाचें असलें तरी त्यांनी कधी पोषाखाची पर्वा केली नाही.

नवविवाहित दांपत्याचें वर्णन करतांना, “ वधू सुंदर आहे—नवरा तडफदार असला तरी दिसायला यथातथाच आहे ” असे उद्गार ऐकूं येत असले, तरी त्यांच्याशीं चर्चिल सहमत नसावेत ! त्यांना पहिली मुलगी झाली तेव्हा लॉईड जॉर्ज यांनी प्रश्न केला,

“ मुलगी कशी दिसते ? ”

“ अतिशय सुंदर आहे. ”

" आईच्या वळणावर गेलेली दिसते "—लॉईड जॉर्ज खवचटपणाने म्हणाले.

" छे—माझ्या वळणावर आहे "—चर्चिलनी खुलासा केला !

चर्चिल यांच्या जीवनावर लॉईड जॉर्ज यांच्या सहवासाचा फार परिणाम झाला. दोघांचेंहि शिक्षण अनुभवाच्या शाळेंत झालें होतें. परंपरागत मतें आणि समजांतलीं बडीं धेंडें यांच्यासमोर मान न वाकविण्याइतके दोघेहि निर्भय, स्वतंत्र प्रज्ञेचे आणि स्वाभिमानी होते. इंग्लंडच्या राजकारणावर सतत पंचवीस वर्षें छाप पाडणारी त्यांची मैत्री ही एक राजकीय घटनाच समजली पाहिजे.

मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून चार्चिल यांच्या वृत्तींतला व्रात्यपणा कमी होऊन ते गंभीर बनत चालले होते. नेपोलियनसंबंधीच्या अनेक ग्रंथांचा त्यांनी अभ्यास सुरू केला होता. सर्वांत अधिक काम करणारा, मध्यरात्रीपर्यंतसुद्धा कचेरींत असणारा आणि आपल्या खात्याची वारंवार तपासणी करणारा मंत्री असा लौकिक त्यांनी अल्पकाळांत संपादन केला.

मंत्रिमंडळाच्या बैठकींत चर्चिल वारंवार भाषणें करीत असत. त्यांच्या जिव्हेइतकीच त्यांची लेखणी प्रभावी होती. अनेक प्रश्नांसंबंधीचीं स्वतःचीं मतें लिहून काढून त्याच्या प्रती सहकारी मंत्र्यांकडे पाठवायची संवय त्यांना जडली होती. चर्चिल यांच्या वक्तृत्वासंबंधांत, " विन्स्टनचें भाषण ऐकतांना मला कधी कधी त्याचा मत्सर वाटतो " असे उद्गार लॉईड जॉर्ज यांनी काढले होते, तर त्यांच्या अविरत उद्योगाला अनुलक्षून, ' मंत्रिमंडळांत पंतप्रधानाशिवाय दुसरें स्थान स्वीकारणें विन्स्टनला लवकरच अशक्य होईल असा रंग दिसतो " असे उद्गार एडवर्ड ग्रे यांनी काढले.

दलितांबद्दल सहानुभूतीचें आणि निरुद्योगी श्रीमंतांसंबंधीं निषेधाचें धोरण चर्चिल यांनी अंगीकारलें होतें. बेकारांच्या विम्याची योजना आखून त्यांनी ती प्रथम अमलांत आणली. उदार पक्षाच्या योजना अमलांत आणण्याकरिता पुरेसा पैसा जमा करण्यासाठी, लॉईड जॉर्ज यांनी १९०९ सालीं प्राप्ति करांत वाढ करून ' मृत्यु कर ' बसविला तो चर्चिल यांना सुरुवातीला पसंत नव्हता, परंतु त्या करापासून येणारें उत्पन्न दलितांची स्थिति सुधारण्याकरिता खर्च करण्यांत येईल असें आश्वासन मिळाल्यावर त्यांनी त्याचें हिरीरीनें समर्थन केलें. त्या काळांत चर्चिल यांनी केलेलीं भाषणें

'जनतेचे हक्क' या नांवाने पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्यांत आलीं. उमरावांच्या सभेचे ते कट्टे विरोधक होते. "स्वतःच्या मालमत्तेच्या संरक्षणाच्या एकमेव दृष्टीने राजकारण खेळणारे, शेअरबाजारांतील भावां-व्यातिरिक्त दुसरें कोणतेंहि वाचन करण्याची आवड नसलेले आणि घोड्यांच्या शर्यतीच्या वर्तुळाबाहेर न पडणारे" असें उमरावांचें त्यांनी एकदा वर्णन केलें होतें.

जर्मनीचा बादशहा विल्यम कैसर याच्या आमंत्रणावरून चर्चिल १९०९ सालीं जर्मनींत गेले तेव्हा सुसज्ज जर्मन सेनेची कवाईत पाहून ते खुष झाले. परंतु, ब्रिटिशांच्या आरमाराला शह देण्यासाठी कैसर आपल्या आरमारांत वाढ करतो आहे, ही गोष्ट त्यांना ब्रिटन आणि जर्मनीच्या मैत्रीच्या दृष्टीनें पसंत पडली नाही.

१९१० सालच्या सार्वत्रिक निवडणुकींत पुन्हा उदार पक्ष विजयी झाला आणि डंडी येथील मतदारविभागांतून चर्चिलहि निवडून आले. मंत्रिमंडळांत त्यांना पुन्हा बढती मिळून गृहखात्यासारखें महत्त्वाचें खातें त्यांच्याकडे सोपविण्यांत आलें. त्या वेळच्या आपल्या जीवनासंबंधीं चर्चिल लिहितात, "एखाद्या लोण्याच्या गोळ्याप्रमाणे माझें जीवन माझ्या तोंडांत विरघळत होतें." वयाच्या पस्तिसाव्या वर्षीं इंग्लंडसारख्या बलाढ्य देशाचे ते गृहमंत्री होते, लॉइड जॉर्ज याच्या समवेत ते उदार पक्षाचे नेते बनत चालले होते आणि त्यांचें वैवाहिक जीवन सर्वतोपरी सुखी होतें.

* * *

## गृहमंत्रिपद :

गृहमंत्रिपदाचीं सूत्रें हातीं घेतल्यापासून चर्चिल यांनी अत्यंत ईर्षेने काम करायला सुरुवात केली. आठवड्यांतून एकदा तरी एखादी धाडसी आणि अशक्य वाटणारी योजना घेऊन ते कचेरींत प्रवेश करीत असत आणि कांही तासांत एखादी धाडसी पण शक्य कोटींतली योजना तयार होत असे. तुरुंगांतील कैद्यांच्या जीवनांत सुधारणा आणि कामगारांचें जीवन सुखी करण्याचे प्रयत्न हीं उद्दिष्टें त्यांनी आपल्या नजरेसमोर ठेविलीं होतीं. लोकसभेंतील कार्यांची दैनंदिन माहिती देणारें पत्र राजाला लिहिण्याची

एक नवीनच पद्धत त्यांनी सुरू केली. परंतु, चार्चिल यांनी कामगारांना जी सहानुभूति दाखविली तिने ते संतुष्ट न होतां प्रथम गोदी कामगारांनी आणि नंतर आगगाड्यांच्या कामगारांनी प्रचंड संप केले, ते सैनिकांच्या मदतीने मोडून काढणें भाग पडलें.

उमरावांच्या सभेवरील त्यांचे हल्ले द्विगुणित होऊन, उमरावांची नाचक्की करणारीं भाषणें चार्चिल वारंवार करूं लागले. चर्चिल यांचे पूर्वज उमरावांच्या सभेंत ज्या वेळीं बेफिकीर आणि आत्मसंतुष्ट वृत्तीने बसत असतील, त्या वेळीं आपल्या घराण्यांत हें 'काळें मेंढरूं' जन्माला येणार आहे याची त्यांना कल्पना नसेल! अखेर १९११ सालच्या कायद्याने उमरावांच्या सभेचे हक्क कमी करून तिला कायमची पांगळी करून टाकली.

"राजा आणि लोकसभा या दोघांनी मिळून उमरावांना नेस्तनाबूत केलें पाहिजे" असे उद्गार चार्चिल यांनी एकदा काढले, तेव्हा हुजूर पक्षांतील त्यांचे स्नेही, एफ. ई. स्मिथ, अतिशय संतापून म्हणाले, "उमरावांच्या सभेला नेस्तनाबूत करावयाचें धोरण हें या लोकसभेचें धोरण नसून फक्त उदार पक्षाचें धोरण असल्यामुळे, अशा पक्षनिष्ठ धोरणाशीं राजाचा संबंध जोडणें सर्वस्वी गैरच समजलें पाहिजे. लोकसभेंत इतकें लाजिरवाणें भाषण अद्याप पावेतो कोणीं केलें नसेल!" परंतु स्मिथ आणि चर्चिल यांच्या अशा चकमकी वारंवार झडत असल्या तरी त्यांच्या स्नेहांत कधी अंतर पडलें नाही. त्यामुळे "जनतेचें मन आकर्षून घेण्याकरिता एकमेकांनी एकमेकांवर कोणते शब्दप्रहार करावयाचे ते दोघे मिळून अगोदर ठरवीत असतात," असें लोक चेष्टेने बोलूं लागले. उमरावांच्या सभेसंबंधांत अनेक चकमकी झडल्यानंतर चार्चिल इटालीच्या सफरीला गेले, तेव्हा त्यांच्या सोबतीला स्मिथसाहेब होतेच! क्रीट बेटावर गृहमंत्र्यांचा फार मोठ्या प्रमाणावर सत्कार करावयाचा कार्यक्रम निश्चित झाला होता. चार्चिल यांची बोट धक्क्याला सकाळीं लागली त्या वेळीं ते झोपलेले असल्यामुळे, स्मिथसाहेब धक्क्यावर उतरले आणि 'गृहमंत्री ते हेच' असें समजून बेटाच्या पुढाऱ्यांनी त्यांच्या गळ्यांत सत्काराचा हार घातला! इटालियन मद्यासंबंधी स्मिथसाहेबांनी विशेष कुतूहल दाखविल्यामुळे निरनिराळ्या उंची मद्यांचे नमुने त्यांना चाखायला मिळाले. कांही वेळाने चार्चिल धक्क्यावर उतरले

तेव्हा ' हे गृहस्थ गृहमंत्री नसून मी गृहमंत्री आहें ' असा खुलासा त्यांना करावा लागला ! तो खुलासा ऐकून स्मिथसाहेबांखेरीज इतरांची अवस्था फार चमत्कारिक झाली. स्मिथसाहेबांनी मात्र मद्याचा घोट घेत, " मला ग्रीक आणि इटालियन भाषा अवगत नसल्यामुळे हा घोटाळा झाला" असा खुलासा केला ! " झाला इतका घोटाळा पुरे झाला—उगाच कालापव्यय नको " अशा आविर्भावाने चर्चिल यांनी त्यानंतर मद्यपानाला सुरुवात केली.

इटालीच्या सफरीहून गृहमंत्री स्वदेशीं परत आल्यानंतर लंडन शहरांत एक अभूतपूर्व प्रकार घडला. ' पीटर रंगारी ' नांवाच्या एका रशियन गुन्हेगाराच्या टोळीने लंडनमध्ये कांही दरवडे घातले असले तरी त्यांचा तपास लागत नव्हता. पीटरच्या टोळीने एका जवाहिऱ्याच्या दुकानावर धाड घातली आहे असें समजतांच पोलिसांची एक तुकडी धावून गेली, त्या वेळीं तिच्यावर गोळ्या झाडून पीटर आणि त्याचे साथीदार पळून गेले. या घटनेशीं चर्चिल यांचा प्रत्यक्ष असा कांहीच संबंध नव्हता. परंतु त्या चकमकींत दोन पोलीस मरण पावल्यामुळे ' गृहमंत्र्यांच्या भोंगळ कारभारावर ' कांही वृत्तपत्रांनी टीका केली. ती वाचून पीटरबरोबर वृत्तपत्रकारांनासुद्धा धडा शिकविण्याचा चर्चिल यांनी संकल्प केला.

त्यानंतर कांही दिवसांनी पीटर आणि त्याचे साथीदार सिडने स्ट्रीट-वरील एका घरांत आहेत असें समजल्यावरून, सशस्त्र पोलिसांनी त्या घराला वेढा दिल्यामुळे पोलीस आणि टोळीवाले यांच्यांत दुतर्फी गोळीबाराची सुरुवात झाली. ही बातमी चर्चिल यांना समजतांच ते स्वतः ' रणांगणावर ' दाखल झाले टोळीवाल्यांच्या गोळीबाराच्या टप्प्यांत संचार करूं लागले आणि पोलिसांना निरनिराळे हुकूम करूं लागले. वेढा घातलेल्या घरांत पीटरची टोळीच नव्हे, तर रशियन क्रांतिकारकांचें एखादें पथकसुद्धा असूं शकेल या संशयाने चर्चिलनी लष्कराची मदत मागितली आणि त्यामुळे लंडन शहरांतल्या एका साध्या चकमकीला एखाद्या युद्धाचें स्वरूप प्राप्त झालें ! अविरत गोळीबारामुळे वेढा घातलेल्या घराला आग लागून तें जमीनदोस्त झालें. घरांत लपलेल्या गुन्हेगारांचीं प्रेतें सापडलीं पण त्यांत पीटरचें प्रेत नव्हतें—तो बहुधा पळून गेला असावा किंवा त्या घरांत नसावाच !

गृहमंत्र्याच्या ' भोंगळ कारभारावरचा कलंक ' चर्चिल यांनी जातीने पुसून काढला तरी ते टीकाविषय झालेच ! अशा धोक्याच्या ठिकाणीं गृहमंत्र्याने स्वतः जाणें हें शहाणपणाचें लक्षण नव्हे असा अभिप्राय कांही वृत्तपत्रांनी दिला. सिडने स्ट्रीटवरील रणांगणाच्या मध्यभागीं चर्चिल उभे आहेत असें एक छायाचित्र वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें होतें. त्याला उद्देशून एका सभासदाने पार्लमेंटांत प्रश्न विचारला, “ या ठिकाणीं छायाचित्रकार कां गेला तें आपल्याला समजतें—पण आमचे गृहमंत्री कशाला गेले होते ? ”

* * *

**चहाच्या पेल्यांतलें वादळ :**

सिडने स्ट्रीटवरील ' युद्धांत ' भाग घेतल्यानंतर चर्चिल यांची लष्करी वृत्ति पुनः जागृत व्हांवी अशा कांही घटना घडूं लागल्या. जर्मन लोकांच्या वसतीसाठी भूतलावर अवश्य तितकी जागा मिळविण्याकरिता कैसर बादशहाच्या सेनापतींनी एक प्रचंड लष्करी यंत्र तयार केलें असल्या-मुळे, एखादें युद्ध ' खेळण्याची ' खुमखुमी त्यांच्या मनांत निर्माण झाली होती. फ्रान्स आणि जर्मनी यांच्यांतलें वितुष्ट जुनें आणि इतिहासप्रसिद्ध आहे. आफ्रिकेंतील मोरोक्को प्रांत हा फ्रेन्च साम्राज्याचा एक भाग असून तेथील रहिवाश्यांनी फ्रेन्चांच्या सत्तेचें उच्चाटन करण्याची मोहीम नुकतीच सुरू केली होती. अशा प्रसंगीं मोरोक्कोजवळच्या अगादीर बंदरांत जर्मनीचें एक लढाऊ जहाज संचार करू लागलें आहे असें पाहून फ्रेन्चांनी फार मोठा गहजब केला. फ्रान्स आणि जर्मनी यांचें युद्ध सुरू होणार की काय असें वाटूं लागलें आणि फ्रान्सच्या मदतीसाठी इंग्लंडला रणांगणांत उतरावें लागेल असा रंग दिसूं लागला !

अगादीर बंदरांतलें जर्मनांचें ' लढाऊ जहाज ' आलें तसें गेलें आणि चहाच्या पेल्यांतलें एक वादळ थंडावलें. परंतु, त्या अवकाशांत पंतप्रधान ॲस्क्विथ यांनी चर्चिल यांची संरक्षणविषयक प्रश्नांचा खल करणाऱ्या एका समितीचे सभासद म्हणून नेमणूक केली. गृहखात्याबरोबर संरक्षणखातेंसुद्धा आपल्याकडे सोपविलें आहे अशा समजुतीने, लष्कराचे प्रमुख हेन्री विल्सन आणि परराष्ट्रमंत्री एडवर्ड ग्रे यांच्याकडे चर्चिल यांनी खलित्यावर खलिते

पाठवायला सुरुवात केली. संभाव्य युद्धाची रुपरेषा दाखविणारा एक खलिता तयार करून त्यांनी तो मंत्रिमंडळाकडे आणि लष्करी प्रमुखांकडे पाठविला. फ्रान्स आणि जर्मनी यांचें युद्ध सुरू झाल्यापासून विसाव्या दिवशीं फ्रेन्च लष्कराची फळी दुभंगून, इंग्रज सैनिकांच्या साहाय्याने चाळिसाव्या दिवशीं प्रतिहल्ल्याला सुरुवात करतां येईल असें भाकित चर्चिल यांनी वर्तविलें होतें. लष्करी अधिकाऱ्यांच्या मतें नवव्या दिवशीं प्रतिहल्ल्याची सुरुवात होऊन तेराव्या दिवशीं जर्मनांचा पराभव होणार होता ! लष्करी विषयांत लष्कराबाहेरच्या माणसाने मतें द्यावीं हें लष्करी तज्ज्ञांना कधीच खपत नाही. "इतक्या मूर्खपणाने भरलेला खलिता आजपर्यंत कोणीच तयार केला नव्हता," असा शेरा चार्चिल यांच्या खलित्यावर लष्करी प्रमुखांनी मारला ! इतिहासाची साक्ष मात्र अशी की, पहिल्या महायुद्धांत, फ्रान्सची लढाई सुरू झाल्यापासून एकविसाव्या दिवशीं फ्रेन्च सैन्याची दाणादाण उडाली आणि दोस्तांच्या फौजेने छत्तिसाव्या दिवशीं प्रतिहल्ल्याची सुरुवात केली.

युद्ध सुरु होईल त्या दिवशींच इंग्रजांचें सैन्य फ्रान्समधें उतरविलें पाहिजे हें चर्चिल यांचें मत आरमारी खात्याच्या मंत्र्याला मान्य न झाल्यामुळे, आरमाराच्या नेतृत्वांत बदल करण्याचे विचार पंतप्रधान ॲस्क्विथ यांच्या डोक्यांत खेळूं लागले. कारण, "आमच्या सर्व आशा आमच्या आरमारावर केंद्रित झाल्या आहेत" असें त्यांचें मत होतें. एके दिवशीं चर्चिल आणि त्यांचे पंतप्रधान गोल्फ खेळत असतांना, पंतप्रधानांनी प्रश्न केला,

"आरमारी खातें तुम्ही संभाळाल कां?"—एका क्षणाचाहि विचार न करतां चर्चिल यांनी होकार दिला !—आणि त्यानंतर कांही दिवसांतच आरमारी खातें चर्चिल यांच्याकडे सोपविलें गेलें. आपल्या आरमाराच्या सामर्थ्यावर आपल्या विशाल साम्राज्याचें रक्षण करणाऱ्या राष्ट्राच्या आरमाराचा प्रमुख, हा मान किती मोठा असेल आणि त्या नेमणुकीने चर्चिल यांच्या कर्तबगारीला किती मोठें आव्हान दिलें गेलें असेल त्याची कल्पनाच करावी.

* * *

**आरमाराचे मंत्री :**

लष्करी नोकरी करीत असतांना किंवा वृत्तपत्रांच्या बातमीदाराच्या पेशांत ‘ लष्करच्या भाकऱ्या भाजीत असतांना ’ चर्चिल यांना आरमाराच्या गरजांचा, तंत्राचा आणि डावपेचांचा मुळीच अनुभव नव्हता. परंतु, आरमाराच्या प्रमुखपदीं त्यांची योजना होतांच त्याची आमूलाग्र माहिती मिळवून, त्याच्या संरक्षणात्मक आणि संहारक शक्तींत सुधारणा करण्याकरिता ते कायावाचामनेंकरून झटूं लागले ! जळीं, स्थळीं, काष्ठीं आणि पाषाणीं त्यांना आरमाराखेरीज कांहीहि दिसेना. जर्मनांच्या आरमाराची अद्ययावत् हालचाल दर्शविणारा उत्तर समुद्राचा नकाशा त्यांच्या कचेरींत दिसूं लागला. “ आज जर युद्धाचा प्रारंभ झाला तर कसें ? ”–असा प्रश्न ते आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना विचारूं लागले. युद्ध सुरू होतांच आपल्या आरमाराने कोणती उपाययोजना केली पाहिजे त्याचा आराखडा तयार करण्यांत चर्चिल मग्न झाल्यामुळे, आपल्या आरमाराबद्दल त्यांना विलक्षण आपलेपणा आणि अभिमान वाटूं लागला.

ब्रिटिशांच्या आरमारांत जास्त जलद गतीचीं लढाऊ जहाजें आणि त्या जहाजांवर जास्त मोठ्या तोफा पाहिजेत असें चर्चिलना वाटत असलें, तरी आरमारी अधिकाऱ्यांना आरमाराचा अनुभव नसलेल्या एका मुत्सद्द्याचा हा एक फाजील उत्साह आहे असें वाटत होतें. आपल्या कल्पना ज्याला पटतील असा लॉर्ड फिशर हा एकच माणूस आहे हें चर्चिलना माहीत होतें, पण फिशरसाहेब सेवानिवृत्त झाले होते. सेवानिवृत्तीची तांत्रिक अडचण बाजूला सारून चर्चिलनी फिशरसाहेबांना परत पाचरण करून आरमाराच्या सुधारणेची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. कचेरीच्या आणि मंत्रिमंळाच्या कामांतून सुटका होतांच चर्चिल आपला सर्व वेळ आरमाराच्या सहवासांत घालवीत असत, आरमारी अधिकाऱ्यांशीं चर्चा करीत असत आणि भूमध्य-समुद्रांतील ब्रिटिशांच्या आरमारी ठाण्यांची तपासणी करीत असत. आपली कचेरी आणि आपलें घर कांही काळ त्यांनी लढाऊ बोटींत हालविलें होतें असेंसुद्धा म्हणतां येईल. आरमाराशीं ते इतके एकरूप झाले होते की, “ आरमारासंबंधीच्या माहितीचा आणि प्रश्नांचा विन्स्टन माझ्यावर एक-

सारखा भडिमार करीत असतो" अशी तक्रार लॉईड जॉर्ज यांना करावी लागली !

जर्मनी हा आपला शत्रु आहे याबद्दल चर्चिलना संशय उरला नसला तरी आरमारी स्पर्धा थांबवून उभय राष्ट्रांत सलोखा व्हावा असा त्यांनी प्रयत्न केला, पण तो निष्फळ झाला. युद्धाचा वणवा भडकलाच तर प्रत्येकाने राष्ट्रीय दृष्टीने वागलें पाहिजे म्हणून, स्मिथसाहेबांच्या मार्फत, उदार पक्षाला युद्धकाळांत पाठिंबा देण्याचें वचन त्यांनी हुजूर पक्षाकडून मिळविलें होतें.

ब्रिटिशांच्या आरमारांत चर्चिल यांनी कितीतरी सुधारणा केल्या. नव्या पद्धतीच्या पाणबुड्या बांधल्या, जलद गतीचीं लढाऊ जहाजें बांधून त्यांच्यावर जास्त मोठ्या तोफा बसविल्या आणि कोळशाऐवजी तेलावर चालणारीं जहाजेंहि बांधलीं. आरमारी अधिकाऱ्यांची बढती केवळ नोकरींतील वडीलकीवर अवलंबून न ठेवतां, कर्तबगारीच्या निकषावर पारखण्याची पद्धत चर्चिल यांनीच सुरू केली. त्या वेळीं बाल्यावस्थेंत असलेल्या विमानांचें लष्करी अधिकाऱ्यांना कोणतेंच कौतुक वाटत नसलें तरी विमानांमुळे युद्धाच्या स्वरूपांत आणि डावपेचांत क्रान्ति होईल हें चर्चिल यांनी हेरलें असल्यामुळे, आरमारी विभागांत विमानांचा उपयोग करण्याचें ठरवून त्यांनी शंभर विमानांची एक तुकडी तयार केली. आरमाराच्या सुसज्जतेसाठी चर्चिल यांनी जितका खर्च केला तितका खर्च त्या पूर्वीं ब्रिटिशांच्या इतिहासांत कधीहि केलेला नव्हता.

"युद्धाची सुरुवात आजच झाली तर आरमाराचें कर्तव्य कोणतें," हा प्रश्न चर्चिल आरमारी अधिकाऱ्यांना विचारीतच होते. अशा स्थितींत १९१४ सालच्या जून महिन्याच्या २८ तारखेला ऑस्ट्रियाच्या युवराजाचा एका सर्व्हियन विद्यार्थ्यानें खून केल्याच्या निमित्तानें युद्धाचीं चक्रें फिरूं लागून जुलै महिन्याच्या २९ तारखेला ऑस्ट्रिया आणि हंगेरीच्या फौजांनी सर्व्हियावरील हल्ल्याला सुरुवात केली. त्यानंतर सर्व्हियाच्या बाजूने रशिया, ऑस्ट्रियाच्या बाजूने जर्मनी आणि जर्मनीच्या विरुद्ध फ्रान्स आणि इंग्लंड रणांगणावर उतरले.

जुलै महिन्याच्या २८ तारखेनंतरचा प्रत्येक क्षण चर्चिलना महत्त्वाचा वाटत होता. युद्ध अटळ आहे अशी त्यांची खात्री झाली होती. युद्ध-

काळाला अवश्य अशा रीतीने आपल्या आरमाराची हालचाल करायला त्यांनी सुरुवात केली होती. बेल्जमसारख्या छोट्या आणि निरपराध राष्ट्रावर जर्मन फौजांनी निष्कारण हल्ला चढविला म्हणून ब्रिटिशांनी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें, त्या दिवशीं चर्चिल निर्धास्त होते.

—कारण त्यांच्या अविरत प्रयत्नांमुळे ब्रिटिशांचें आरमार कोणताहि लढा द्यावयास सिद्ध आणि सुसज्ज होतें !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 3८८२५ दि:
क्रमांक नोंद दि: २-५-८३

# १२

## पहिलें महायुद्ध

" युद्ध सुरू झालें तर दुसऱ्या कोणाला जमणार नाहीत अशा गोष्टी विन्स्टन करून दाखवील " असे उद्गार एकदा मोर्लेसाहेबांनी काढले होते, तर " विन्स्टनला तारतम्य नाही " असें ॲस्क्विथसाहेब म्हणत असत. पहिल्या महायुद्धाची सुरुवात झाली त्या वेळीं ब्रिटिशांचा जय किंवा पराजय ज्या शाही आरमारावर अवलंबून होता त्याचे नियंते चार्चिल होते—वयाची चाळिशी उलटण्यापूर्वी त्यांनी हा मान संपादन केला होता.

शाही आरमाराचे प्रमुख म्हणून चर्चिल यांनी आपलें कार्य इतक्या धाडसाने आणि वेगाने सुरू केले, की युद्धकालीन उद्योगांच्या इतिहासांत त्याला तोड नाही. ऑगस्ट महिन्याच्या ४ तारखेला ब्रिटिशांनी अधिकृत रीत्या युद्धांत प्रवेश केला असला तरी, राजाच्या संमतीशिवाय, १ ल्या तारखेलाच चार्चिलनी आपल्या आरमाराच्या हालचाली सुरू केल्या, म्हणून सुरुवातीला ते टीकाविषय झाले तरी त्यांच्या दाक्षिण्यामुळे नाही तरी दक्षतेमुळे दोस्त राष्ट्रांचा फार फायदा झाला हें इतिहासाने मान्य केलें आहे. युद्धाच्या सुरुवातीला समुद्रावरील गार वाऱ्याने जें आरमार झोपीं गेलेलें असावें, तें त्या महायुद्धाच्या सुरुवातीला सर्वांत अधिक जागृत होतें. त्या वेळच्या आपल्या चिमुकल्या कारकीर्दींत चर्चिल यांनी क्रांतिकारक कार्य केलें.

कांही विमानें त्या जमान्यांत आकाशांत उडत असलीं तरी तीं अत्यंत निकृष्ट प्रकारचीं होतीं. अशा स्थितींतसुद्धा, विमानांचा युद्धांत उपयोग करतां येईल आणि त्यांचा उपयोग अत्यंत प्रभावी ठरेल हें फक्त चार्चिल यांनीच ओळखिलें होतें. युद्धाचें एक शस्त्र म्हणून विमानांचा कोणी विचार-

सुद्धा करावयाला तयार नव्हता; अशा वेळीं, ‘ आरमाराचा एक बाहु ’ म्हणून लढाऊ विमानांचा एक काफिला तयार करण्याची परवानगी चर्चिल यांनी मंत्रिमंडळाकडून मिळविली. ‘ आरमाराचा एक बाहु ’ म्हणून त्यांनी जें ‘ विमानदल ’ निर्माण केलें त्याचेंच पुढे ‘ शाही विमानदलांत ’( रॉयल एअर फोर्स ) पर्यवसान झालें. वाटेंतला कोणताहि अडथळा न जुमानतां आगेकूच करणारा आणि शत्रूच्या गोळीबाराचा ज्याच्यावर यत्किंचितहि परिणाम होत नाही असा ‘ रणगाडा ’ शोधून काढण्याचें श्रेयसुद्धा इतिहासाने चर्चिल यांनाच दिलें आहे. रणगाड्याच्या निर्मितीची कल्पना लष्कराने फेटाळून लावली म्हणून आरमारी विभागांत चर्चिल यांनी कांही रणगाडे तयार केले. महायुद्ध सुरू झाल्यानंतर दोन वर्षांनी ते रणगाडे जेव्हा फ्रान्सच्या रणभूमीवर अवतीर्ण झाले त्या वेळीं, तें विक्षिप्त वाहन पाहून, जर्मनांनी हातांतल्या बंदुका खाली टाकून पळ काढला ! आरमारी खात्याचे प्रमुख म्हणून चर्चिल समुद्रांची सफर तर करीत होतेच पण, त्या काळांतल्या निकृष्ट विमानांत बसून, फ्रान्सच्या रणभूमीलासुद्धा भेट देत होते. विमानें इतकीं निकृष्ट आणि म्हणूनच भीतिदायक होतीं की, आपल्या एका मित्राला चर्चिल यांनी विमानांतून मुशाफरी करण्याचें आमंत्रण दिलें, त्या वेळीं त्यानें अगोदर मृत्युपत्र केलें आणि नंतरच तो विमानांत बसला असें सांगतात !

चर्चिलनी इतका व्याप—आणि त्या वेळच्या तज्ज्ञांच्या मतें उपद्व्याप—आरंभिला, तरी ‘दोस्तांना’ रणांगणावर एकसुद्धा नेत्रदीपक विजय मिळत नव्हता! जर्मन जहाजें-व्यापारी आणि लढाऊ—सप्तसमुद्रांतून पिटाळून लावण्यांत ब्रिटिश आरमाराने यश मिळविलें असलें, तरी जर्मन आरमाराचा नायनाट करण्याची चर्चिल यांची प्रतिज्ञा सफल झाली नव्हती. जर्मन लष्कर विजयामागून विजय मिळवीत रणभूमीवर आगेकूच करीत होतें. अशा स्थितींत ज्या पद्धतीने युद्ध केलें पाहिजे त्या पद्धतीने तें केलें जात नाही असें चर्चिल यांचें ठाम मत झाल्यामुळे, ते निरनिराळ्या धाडसी योजना सुचवीत होते. आरमारी खात्याच्या मर्यादा ओलांडून इतर खात्यांनासुद्धा खलिते पाठवीत होते. त्यामुळे पंतप्रधान कोण ?—ॲस्क्विथ कीं चर्चिल ?—असा संदेह निर्माण होत होता ! शिवाय, सुदानच्या मोहिमेपासून चर्चिल यांचेकडे ज्यांची

वक्रदृष्टि होती ते किचनेरसाहेब लष्कराचे प्रमुख असल्यामुळे, चर्चिल यांच्या सूचनांची कशी वासलात लागणार तें जवळजवळ निश्चितच होतें.

* * *

**बेल्जमच्या रणभूमीवर :**

त्या महायुद्धांत फ्रान्स, बेल्जम, रशिया आणि इंग्लंड हीं दोस्त राष्ट्रं जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी आणि तुर्कस्थान यांजबरोबर लढत होतीं. बेल्जमचा फार मोठा भाग पादाक्रान्त करून जर्मन सेना फ्रान्समधे घुसल्या असल्या आणि फ्रेंचांचासुद्धा सुरुवातीच्या एका मोठ्या लढाईत पराभव झाला असला, तरी बेल्जममधील अजिंक्य समजला गेलेला अँटवर्प हा किल्ला अजून शाबूत होता. अँटवर्पचा पाडाव शक्य तितक्या लवकर झालाच पाहिजे असा आदेश जर्मनीच्या कैसर बादशहाने आपल्या सेनाधिकाऱ्यांना दिला होता. एके दिवशीं चर्चिलना किचनेरसाहेबांनी भेटीला बोलाविलें तेव्हा त्यांना आश्चर्य वाटलें. पंतप्रधान त्या दिवशीं राजधानींत नव्हते, चर्चिल ताबडतोब किचनेरसाहेबांना भेटले. किचनेर म्हणाले, " जर्मनांच्या प्रचंड हल्ल्यामुळे अँटवर्प विभागांतले आपले आणि बेल्जियन सैनिक भांबावले आहेत. अंतिम यशाची खात्री पटवून देऊन आपल्या सैनिकांच्या मनांत आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. त्यासाठी तुम्ही जाल का ? " किचनेरच्या प्रश्नामुळे त्यांना वाटलेलें आश्चर्य ओसरण्यापूर्वी चर्चिल यांनी होकार दिला आणि ते बेल्जमच्या प्रवासाला निघाले. युद्धाचा विषय निघाला म्हणजे चर्चिल हे वक्ते आणि बाकीचे सर्व श्रोते असेंच दृश्य नेहमी दिसत असे. चर्चिल बेल्जमला गेले असें पंतप्रधान ॲस्क्विथ यांना समजलें तेव्हा ते म्हणाले, " बेल्जमचा राजा आणि पुढारी यांनी युद्धासंबंधी आजपर्यंत ऐकलें नसेल असें भाष्य त्यांना आता ऐकावें लागेल ! "

अँटवर्पच्या रणभूमीवर पाऊल टाकल्यापासून चर्चिल यांनी बेल्जमचा राजा, पुढारी आणि सेनाधिकारी या सर्वांवर हुकमत गाजवायला सुरुवात केली. " आपण नेपोलियनच आहोंत अशा तोऱ्याने विन्स्टन वागत होता " असें वर्णन चर्चिल यांचा मित्र, इआन हॅमिल्टन, याने केलें होतें. अँटवर्प येथील परिस्थितीचा अंदाज घेतल्यावर चर्चिल अतिशय उत्तेजित झाले.

जर्मन सेनेला इथे केवळ थोपवून धरतां येईल असें नसून, तिचा पराजय-सुद्धा इथेच करतां येईल अशी त्यांना खात्री वाटूं लागली ! “ सामान्य बुद्धीच्या लष्करी अधिकाऱ्यांना हें कार्य पेलण्यासारखें नसल्यामुळे, मला जर या रणांगणावरचे सर्वाधिकार दिले तर मंत्रिपदाचा राजीनामा देऊन मी येथील जबाबदारी पत्करायला तयार आहें ” असें त्यांनी पंतप्रधानांना कळविलें. त्यासंबंधांत पंतप्रधान त्यांच्या एका मित्राजवळ म्हणाले, “ लष्करांत विन्स्टनचा हुद्दा फक्त लेफ्टनंटचा आहे. त्याची सूचना जर मीं मान्य केली तर चार मेजर जनरल, कित्येक ब्रिगेडिअर आणि अनेक कर्नल अशा अधिकाऱ्यांना त्याच्या हाताखाली काम करावें लागेल ! ”

आपली सूचना मान्य झाली नाही याचा विषाद वाटूं न देतां, जर्मन सैन्याचा पराभव करण्याकरिता चर्चिल यांनी त्या विभागांतील सर्व सैनिक रणांगणावर गोळा केले. अँटवर्पचा अभेद्य किल्ला अभेद्यच राहील--निदान महिनाभर तरी तग धरील अशी दोस्तांच्या मुत्सद्द्यांची आणि सेनाधिकाऱ्यांची कल्पना होती. परंतु त्याचा पांच दिवसांत पाडाव होऊन त्या अपयशाचें खापर चर्चिल यांच्या माथीं फोडण्यांत आलें ! “ कांही चुकलें किंवा बिनसलें म्हणजे त्याचें खापर माझ्या डोक्यावर फोडतात ” ही त्यांची तक्रार खरी झाली ! अँटवर्पच्या लढाईत चर्चिल यांनी निष्कारण नको तितके सैनिक बळी दिले असा आरोप त्यांच्यावर करण्यांत आला. परंतु, युद्ध संपल्यानंतर निर्विकारपणाने जो इतिहास लिहिला गेला त्यांत नमूद करण्यांत आलें की, त्या पांच दिवसांच्या प्रतिकारामुळे फ्रेंचांना आपली फळी सावरतां आली आणि ब्रिटिशांचें बहुसंख्य सैन्य सुरक्षित राहिलें. त्या वेळीं प्रतिकार केला नसता तर जर्मन सैन्याचा प्रचंड लोंढा इंग्लंडच्या किनाऱ्यासमोर येऊन उभा राहिला असता !

* * *

## दार्दानेल्सची दुर्दैवी मोहीम :

बेल्जममधील बेत फसला म्हणून चर्चिल नाउमेद झाले नाहीत. युरोपच्या आग्नेय कोपऱ्यांत दार्दानेल्सच्या सामुद्रधुनीवर आरमारी हल्ला चढवून तुर्कस्थानचा त्याच्या मित्रांशीं संबंध तोडण्याचा आणि मागच्या दाराने

९३७७३



युरोपांत प्रवेश करून रशियाशीं हातमिळवणी करण्याचा व्यूह त्यांनी रचिला. या योजनेला किचनेर यांचा पाठिंबा मिळाल्यामुळे १८ मार्च १९१५ रोजीं आरमारी हल्ल्याची सुरुवात झाली. पण सुरुवातीलाच ब्रिटिशांचीं महत्त्वाचीं अशीं तीन लढाऊ जहाजें शत्रूने बुडविल्यामुळे त्या विभागांतल्या आरमाराचा प्रमुख, ॲडमिरल रोबेक, याने हल्ला थांबविला. वस्तुस्थिति मात्र अशी होती, की शत्रूजवळचा सर्व दारूगोळा संपल्यामुळे, ॲडमिरल रोबेकने हल्ला चालू ठेविला असता तर त्याला जय मिळाला असता. निदान दुसरे दिवशीं तरी पुन्हा हल्ला करावा अशी चर्चिल यांची इच्छा होती, पण ती मान्य झाली नाही. आरमाराला जें साधतां आलें नाही तें लष्कराने साध्य करावें म्हणून चर्चिल यांनी एका लष्करी मोहिमेचा व्यूह रचिला आणि कांही दिवसांनी गॅलिपोलीवर हल्ला चढविला, पण त्या लढाईत इंग्रजांचा पराभव होऊन जवळ जवळ तीन लक्ष सैनिकांचा संहार झाला.

दार्दानेल्सच्या मोहिमेंत सुरुवातीपासून आरमार आणि लष्कर यांचें सहकार्य साधलें असतें तर १९१५ सालींच युद्ध संपुष्टांत आलें असतें असें अनेक लष्करी तज्ज्ञांचें मत आहे. परंतु ती मोहीम फसल्यामुळे तिच्या अपयशाची जबाबदारी पुन्हा चर्चिल यांचेवरच टाकली गेली. " ज्यांना आरमाराची माहिती नाही असे लोक माझ्या योजनेंत निष्कारण ढवळाढवळ करतात " असा शेरा मारून लॉर्ड फिशर यांनी राजीनामा दिला, पण तेवढ्याने भागण्यासारखें नव्हतें ! ज्याने आपल्यावर गेलीं कांही वर्षे प्रखर टीका केली त्याला स्थानभ्रष्ट करण्याचा हुजूर पक्षाने चंग बांधला होता. उदार पक्षाच्या युद्धविषयक कारभाराविषयी सुद्धा देशांत फार मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला होता. युद्ध जिंकण्यासाठी संयुक्त सरकार स्थापन केलें पाहिजे हा हुजूर पक्षाचा आग्रह ॲस्क्विथ यांना पटला आणि, हुजूर पक्षाच्या सहकार्याचा मोबदला म्हणून, त्यांनी चर्चिलना मंत्रिमंडळांतून स्थानभ्रष्ट केलें !

त्या वेळीं चर्चिलनी उद्गार काढले, " सर्व कारभार आटोपला ! जर्मनांचा पराजय करून युद्धांत जय मिळविण्यासाठी मी जगत होतों—माझ्या सर्व महत्त्वाकांक्षा संपुष्टांत आल्या आहेत ! "

आरमारी खात्यांतील आपल्या सहकाऱ्यांचा निरोप घेऊन चर्चिल कचेरीच्या बाहेर पडत होते त्या वेळीं किचनेर यांनी अचानक प्रवेश केला. चर्चिल यांच्या खांद्यावर हात ठेवून ते म्हणाले, "या युद्धाला सुरुवात झाली त्या वेळीं आपलें आरमार सुसज्ज होतें—हें तुमचें यश आहे आणि तें कोणालाहि हिरावितां येणार नाही!"

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 3 ...
अंक ... दि ...

१३

## फ्रान्सच्या रणांगणावर

आरमाराच्या प्रमुख पदावरून उच्चाटन झाल्यामुळे, उच्च पातळीवरील युद्धकारणाशीं चर्चिल यांची फारकत झाली. युद्धांत प्रत्यक्ष भाग घेण्याची अनिवार इच्छा असल्यामुळे मानहानीपेक्षा निष्क्रियतेच्या यातना त्यांना असह्य झाल्या. सागरी युद्धाशीं आपला संबंध संपला असला तरी लष्करांत नांव दाखल करून फ्रान्सच्या रणांगणावर शत्रूशीं चार हात करावे असें त्यांना वाटूं लागलें आणि ॲस्क्विथ यांची त्यांना परवानगी मिळाल्यामुळे चर्चिल यांचा रणप्रवेश निश्चित झाला. फ्रान्समधील इंग्रज सेनेचे सर जॉन फ्रेंच हे सरसेनापति होते. आपल्या कर्तबगारीला वाव मिळेल या आशेने चर्चिल रणांगणावर उतरत होते. परंतु, " यांना मेजरच्या हुद्दयावर दाखल करून घ्या आणि शक्यांत शक्य तितके कमी सैनिक त्यांच्या तुकडींत असतील अशी खबरदारी घ्या ", असा एक गुप्त संदेश ॲस्क्विथ यांनी सरसेनापतिसाहेबांना पाठविला होता !

१९१५ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत चर्चिल लष्करांत दाखल झाले, त्या वेळीं रणक्षेत्रावर प्रत्यक्ष चकमकी चालू नव्हत्या. दोन्ही बाजूंच्या सैनिकांनी खंदक खणून बसावें आणि एकमेकांवर गोळीबार करीत राहावें असा प्रकार चालू होता. ' कडक शिस्तीचा तऱ्हेवाईक माणूस ' असें चर्चिल यांचेबद्दल त्यांच्या हाताखालच्या सैनिकांचें मत झालें असलें, तरी औदार्य आणि विनोद या दोन गुणांमुळे ते अतिशय प्रिय झाले होते. चर्चिलना गातां येत नसलें तरी सैनिकांनी चालण्याची कवाईत करतांना संघगीत म्हटलेंच पाहिजे असा हुकूम काढून त्याची ते कटाक्षाने अंमलबजावणी करीत होते. एखाद्या सैनिकाला साधी जखम झाली तरी चर्चिलना

अतिशय वाईट वाटायचें. जखमी सैनिकांची शुश्रूषा कशी करावी यासंबंधी त्यांचीं प्रदीर्घ प्रवचनें सैन्यांतील डॉक्टर लोकांना वेळीं अवेळीं ऐकावीं लागत होतीं ! सैनिकांवरील प्रेमामुळे चर्चिल आपल्याला एखाद्या चपराश्या-प्रमाणे वागवतात अशी तक्रार एक दोघां डॉक्टरांनी केली. रणांगणावर ज्या खाद्यपेयाच्या पदार्थांचें दुर्भिक्ष होतें ते पदार्थ शेजारच्या गावांतून स्वतःच्या खर्चानें विकत आणून चर्चिल त्यांच्या हाताखालच्या सैनिकांना देत असत. सबंध जगांत ज्यांचा नांवलौकिक आहे असे हे गृहस्थ रणांगणावरील खंदकांतलें जीवन कसें जगत आहेत तें पाहण्यासाठी किती तरी लोक रणभूमीवरील त्यांच्या तुकडीच्या विभागाला भेट देत असत. पण दिवसामागून दिवस गेले तरी प्रत्यक्ष युद्धाला तोंड लागत नाही असें पाहून चर्चिल यांचा विरस झाला आणि १९१६ सालच्या मे महिन्यांत ते पुनः स्वदेशीं परतले !

* * *

**चित्रकलेवर आक्रमण :**

१९१६ साल दोस्त राष्ट्रांना अतिशय वाईट गेलें. रणभूमीवर त्यांचे सहा लक्ष सैनिक मारले गेले आणि सागरी युद्धांतसुद्धा ब्रिटिशांच्या आरमाराची फार मोठी हानि झाली. दोस्त राष्ट्रांच्या पुढाऱ्यांनी आणि सेनाधिकाऱ्यांनी केलेल्या चुकांसंबंधी पार्लमेंटांत भाषणें करून आणि वृत्त-पत्रांत लेख लिहून चर्चिल प्रखर टीका करीत होते. हुजूर आणि उदार पक्षांचें संमिश्र सरकार स्थापन झालें तेव्हापासून पार्लमेंटांत विरोधी पक्ष उरला नसल्यामुळे जी पोकळी निर्माण झाली होती, ती भरून काढण्याचा हा एकांडा शिलेदार प्रयत्न करीत असल्यामुळे लोकशाहीचा देखावा दिसत होता ! आपल्या भाषणांचा आणि लेखांचा कांही उपयोग होत नाही असें पाहून चर्चिल निराश झाले असतां, सर जॉन लॅव्हेरी नांवाचा एक प्रख्यात चित्रकार त्यांचें तैलचित्र काढीत होता ! त्याच्या जवळचे रंग आणि कुंचले पाहून चर्चिल यांना चित्रकलेबद्दल एकाएकी आकर्षण वाटून, रिकामा वेळ घालवायला हा उद्योग बरा आहे अशी त्यांची खात्री झाली. त्यांनी रंग आणि कुंचले खरेदी केले आणि तैलचित्रें काढायला सुरुवात केली ! चित्र-

कलेच्या कोणत्याहि शाळेंत न जातां आणि कोणत्याहि गुरूच्या हाताखालीं अभ्यास न करतां, चर्चिल चित्रकार बनले ! इतकेंच नव्हे, तर ' चार्लस् मॉरिन ' हें टोपण नांव धारण करून काढलेल्या आपल्या कांही तैल-चित्रांचें प्रदर्शनसुद्धा त्यांनी पॅरिस शहरांत भरविलें !

दार्दानेल्सच्या मोहिमेच्या अपयशाच्या कारणांची चौकशी करण्याकरिता सरकारने एक समिति नेमली होती तिचा अहवाल याच सुमाराला प्रसिद्ध झाला. चर्चिल यांनी अतिशय चातुर्याने आखलेली मोहीम लष्कराचें अवश्य तितकें सहकार्य न मिळाल्यामुळे फसली, असा निष्कर्ष त्या समितीने काढल्यामुळे चर्चिल यांच्या कारकीर्दीवरील कलंक नाहीसा झाला ! त्याच वेळीं दोस्तांच्या अनेक पराभवांचें खापर मंत्रिमंडळाच्या माथीं फोडण्यांत येऊन, लॉईड जॉर्ज यांच्या नेतृत्वाखाली १९१६ सालच्या डिसेंबर महिन्यांत नवें मंत्रिमंडळ स्थापन झालें.

* * *

**हुजुरांचा विरोध :**

आपल्या मंत्रिमंडळांत चर्चिल यांचा समावेश करण्याची लॉईड जॉर्ज यांची फार इच्छा असली, तरी हुजूर पक्ष त्यांचा अतिशय द्वेष करीत असल्यामुळे सुरुवातीला तरी चर्चिलना मंत्रिमंडळाच्या बाहेर राहावें लागलें. अखेर १९१७ सालच्या जुलै महिन्यांत मंत्रिमंडळांत समावेश होऊन युद्ध-साहित्य निर्मितीचें खातें त्यांच्या स्वाधीन केलें तरी, हुजूर पक्षाची समजूत घालण्याकरिता, निवडक मंत्र्यांचें जें एक ' युद्धमंडळ ' होतें त्यांत लॉईड जॉर्ज यांनी चर्चिलसाहेबांचा समावेश केला नाही !

आपल्या स्वाधीन केलेल्या खात्याच्या कार्याला चर्चिलनी अत्यंत धडाडीने सुरुवात केली. ' युद्धमंडळां ' त त्यांना घेतलें नसलें तरी त्या मंडळाच्या सदस्यांपेक्षा रणभूमीशीं अधिक निकटचा संबंध ठेवण्याचा त्यांनी, जणू काय, विडाच उचलला होता. फ्रान्सच्या वाऱ्या वारंवार करून आपल्या युद्धविषयक कल्पनांचा, योजनांचा आणि व्यूहांचा ते फ्रेंचांच्या पुढाऱ्यांवर आणि लष्करी अधिकाऱ्यांवर भडिमार करीत असत ! " चर्चिलना चुकविण्यासाठी फ्रेंच मुत्सद्दी आणि लष्करी अधिकारी लपून

बसतात" अशी टीका कांही वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली. "चालू युद्धाची जबाबदारी जर माझ्यावर टाकली तर मी तें जिंकून दाखवीन" असाच, जणू काय, त्यांचा आविर्भाव होता. मंत्रिमंडळांत 'खुद्द' असूनसुद्धा, "हें युद्ध जिंकण्याची आपली कांही योजना आहे का?–असल्यास तिचा उत्कर्षबिंदु कधी गाठला जाणार आहे?–निदान १९१८ सालीं तरी युद्ध जिंकण्याचा बेत आहे का?"–असे प्रश्न पार्लमेंटांत ते संमिश्र सरकाराच्या नेत्यांना विचारीत होते!

—या प्रश्नांचें उत्तर चर्चिलना कोणींहि दिलें नाही. परंतु दोस्त राष्ट्रांच्या बाजूने अमेरिका रणांगणावर उतरतांच युद्धाचा रंग पालटला आणि १९१८ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत कैसर बादशहाच्या सैन्याचा संपूर्ण पाडाव झाला!

—अमेरिकन सेना युरोपच्या रणांगणावर उतरल्या त्या वेळीं त्या मागतील तितका दारुगोळा पुरविण्याची चोख व्यवस्था चर्चिल यांनी ठेविली होती. चर्चिल यांच्या त्या कामगिरीचा गौरव करण्याकरिता युद्ध संपल्यानंतर त्यांना अमेरिकन सरकारने जें सुवर्णपदक अर्पण केलें, तें त्यापूर्वी कोणत्याहि इंग्रजाला मिळालें नव्हतें!

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ दि: ........
ग्रंथांक ........ नों. दि. ........

## १४

### अंतराळांतला संचार

महायुद्ध संपलें त्या दिवशीं चर्चिल–पतिपत्नी उघड्या मोटारींतून पार्लमेंटच्या सभागृहाकडे गेलीं तेव्हा हजारो लोकांनी विजयोत्साहाच्या भरांत त्यांचा जयजयकार केला असला, तरी चर्चिल यांच्या युद्धकाळांतील कामगिरीची राष्ट्रावर कोणतीच छाप पडली नव्हती! विजयप्राप्तीनंतर युद्धकाळांतील चुका आणि पराजयांकडे जनतेचें पुन्हा लक्ष वेधलें जाऊन, अँटवर्प आणि दार्दानेल्स येथील पराजयांशीं चर्चिल यांचा संबंध जोडण्यांत येऊं लागला! हुजूर पक्षाचा त्यांच्यावर राग होता आणि, युद्धकाळांतले मजुरांचे संप त्यांनी लष्कराच्या मदतीने मोडून काढल्यामुळे, मजूर पक्षहि त्यांच्यावर नाखूष होता! संमिश्र मंत्रिमंडळांत उदार पक्षाचे सदस्य म्हणून त्यांना स्थान मिळालें, तरी पंतप्रधान लॉईड जॉर्ज यांच्या तुलनेंत इतर मंत्र्याचें स्थान सूर्यासमोरील काजव्याप्रमाणे होतें! १९१८ सालच्या निवडणुकींत चर्चिल डंडी विभागांतून पुन्हा निवडून आले आणि लॉईड जॉर्ज यांच्या संमिश्र मंत्रिमंडळांत युद्धमंत्री आणि हवाई मंत्री म्हणून त्यांची नेमणूक झाली!

विमानें बाल्यावस्थेंत होतीं तेव्हापासून चर्चिलना विमानांचें विलक्षण आकर्षण वाटत होतें. विमानांचा उपयोग करून युद्धाच्या डावपेचांत क्रान्तिकारक बदल घडून येतील याची रणविशारदांना कल्पना नव्हती तेव्हापासून, म्हणजे १९११ ते १९१५ या काळांत, ब्रिटनच्या आरमाराची वैमानिक शाखा निर्माण करण्याचें श्रेय चर्चिल यांनी संपादन केलें होतें. १९१७ आणि १९१८ या काळांत विमानांची पैदास करण्याची कामगिरी त्यांनी पत्करिली होती आणि आता तर हवाई खातेंच त्यांच्या अमलाखाली आलें होतें.

१९११ सालीं ब्रिटिश आरमाराच्या वैमानिक शाखेंत फक्त सहा विमानें होतीं. वैमानिकाची धाडसी कारकीर्द पत्करायला फारसे तरुण उद्युक्त नसल्यामुळे, आपल्या कृतीने त्यांना उदाहरण घालून देण्याचा निश्चय करून, चर्चिल यांनी १९१२ सालीं प्रथम विमानांतून आकाशांत संचार केला. त्या वेळच्या विमानांची बनावट दोषपूर्ण असल्यामुळे केव्हा अपघात होईल याचा नियम नसे! त्यामुळे विमानाला अपघात होऊन तें भूमीवर पडलें तर आपण थेट स्वर्गांत जाऊं अशी चर्चिलना एकसारखी भीति वाटत होती! परंतु, आकाशांतला त्यांचा पहिला संचार निर्विघ्नपणें पार पडल्यामुळे त्यांना वैमानिक संचाराचें व्यसनच लागलें!

१९१२ सालीं विमानांत सुधारणा होऊन, विमानें दोघां वैमानिकांनी आळीपाळीने चालविण्याची सोय झाली तेव्हा, वैमानिक कलेचें शिक्षण घेऊन, वैमानिकाप्रमाणे स्वतः विमान चालविण्याचा अट्टाहास चर्चिल करूं लागले. १९१७ आणि १९१८ या सालांत ते फ्रान्सची सफर विमानांत बसून वारंवार करूं लागले! 'चर्चिलसारखा वाईट वैमानिक अद्याप झाला नाही' असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे! १९१९ ते १९२१ या काळांत जॅक स्कॉट नांवाच्या एका कुशल वैमानिकाच्या सहवासांत ते आकाशांत सतत संचार करीत असत! एकदा त्यांचें विमान आकाशांत उड्डाण करण्यापूर्वी विमानमार्गावर ताशी पन्नास मैलांच्या वेगाने फेऱ्या मारूं लागलें, आणि गवताने झाकलेल्या एका खड्डयांत गेल्यामुळे पालथें झालें! विमानाचा चक्काचूर झाला! त्या वेळीं चर्चिल हे त्यांच्या आसनाला कातडयाच्या पट्टयाने जखडलेले असून, खाली डोकें आणि वर पाय अशी त्यांची आणि वैमानिकाचीसुद्धा स्थिति होती! आपल्या पोटाभोवतालचे पट्टे सोडवून चर्चिल आणि त्यांचे वैमानिक असे दोघेहि बाहेर पडले--सुदैवाने दोघांचे सर्व अवयव शाबूत होते! त्यानंतर एका महिन्याने चर्चिल स्वतः विमान चालवीत असतां तें जमिनीपासून नव्वद फूट गेलें असतां, ताशीं साठ मैलांच्या वेगाने खाली येऊन जमिनीवर आपटलें! पेट्रोलची टाकी फुटून तें इतस्ततः वाहूं लागलें. जमिनीवर विमान आपटलें त्या वेळच्या धक्क्यामुळे चर्चिल यांच्या पोटाभोवतालचा पट्टा तुटला आणि ते दूर फेकले गेले! स्कॉट बेशुद्ध होऊन पडला होता! परंतु, आपलें विमान आतां निमिषार्धांत

जमिनीवर आपटणार याची खात्री होतांच त्याने पेट्रोलचा प्रवाह बंद केला नसता, तर विमानाला आग लागून त्या आगींत चर्चिल आणि स्कॉट या दोघांचा अंत झाला असता. स्कॉटच्या त्या असाधारण प्रसंगावधानाची चर्चिल यांनी कृतज्ञतापूर्वक प्रशंसा केली आणि त्या दिवसापासून स्वतः विमान चालविण्याचा अट्टाहास पुन्हा केला नाही !

* * *

**रशियांत हस्तक्षेप :**

पराभूत जर्मन लोकांना अन्नधान्य पुरविलें नाहीं तर रशियाप्रमाणे जर्मनींतसुद्धा क्रांति होईल असें लॉईड जॉर्ज आणि चर्चिल यांचें मत असल्या-मुळे, बारा जहाजें भरून जर्मनींत ताबडतोब अन्नधान्य पाठविण्याची त्यांनी योजना आंखली होती. परंतु, चार वर्षांच्या युद्धानंतर इंग्रज मतदारांचें धोरण जर्मनीविरुद्ध फार कडवें बनल्यामुळे ती योजना अमलांत येऊं शकली नाही.

झारच्या अमलाखालील रशियन सैनिकांनी युद्धाच्या सुरुवातीला जर्मनांशीं जो निकराचा सामना दिला होता, त्याबद्दल चर्चिल हे त्यांचे अतिशय कृतज्ञ होते, पण तेच सैनिक बोल्शेव्हिक क्रान्तीनंतर बोल्शेव्हिकांच्या तुरुंगांत खितपत होते ! बोल्शेव्हिक क्रान्तिकारकांनी रशियांत जे अत्याचार केले होते त्यांच्या बातम्या ऐकून चर्चिल यांच्या मनांत बोल्शेव्हिकांबद्दल चीड उत्पन्न झाली होती. "जो आपल्या मालमत्तेची लूट आणि बायका-मुलांची कत्तल करूं देणार नाही तो प्रतिगामी, अशी एक नवी व्याख्या रशियन भाषेंत निर्माण झाली आहे" असें ते म्हणत असत. बोल्शेव्हिकां-बद्दलची आपल्या मनांतली चीड पार्लमेंटांत व्यक्त करतांना चर्चिल म्हणाले, "रशियाच्या वेदनांचें जें चित्र आपण पाहतों आहों तितकें भयानक दृश्य यापूर्वी कधी दिसलें असेल काय ? या विस्तीर्ण देशांत युद्धपूर्वकाळांत पुरेसें धान्य होतें इतकेंच नव्हे, तर इतर देशांना धान्याचा पुरवठा करणारें तेंच एक संपन्न कोठार होतें. आता मात्र धान्याच्या तुटवडयामुळे नव्हे, तर लेनिन आणि ट्रॉटस्की यांच्या कृतीमुळे तेथे न भूतो न भविष्यति असा दुष्काळ पसरला आहे ! मोठ्या देशाचें जीवन ज्यांच्यावर अवलंबून आहे

अशीं वाहतुकीचीं सर्व साधनें त्यांनी नष्ट करून टाकल्यामुळे, धान्याची वाहतूक अशक्य होऊन कोट्यवधि गरीब उपाशी मरत आहेत. एकमेकांचा विनाश करणारा वर्गकलह बोल्शेव्हिकांनी चेतविला असून, सुखीं खेडीं आणि संपन्न शहरें त्यांनी लांडग्यांच्या आणि अस्वलांच्या स्वाधीन केलीं आहेत ! विसाव्या शतकांतल्या सुसंस्कृत मानवाला बोल्शेव्हिकांनी अंधार युगांतील राक्षसी अवस्थेंत लोटलें असून, सांप्रत रशियन जनतेची स्थिति अत्यंत भयानक आणि अनुकंपनीय झाली आहे !"

पॅरिसच्या शांतता परिषदेंत बसून इंग्लंडचे पंतप्रधान लॉईड जॉर्ज, फ्रान्सचे पंतप्रधान क्लेमेन्को आणि अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन या त्रिमूर्ति विजयी राष्ट्रांचें मार्गदर्शन करीत होत्या. सोव्हिएट रशियाला मान्यता द्यावी की रशियांत चालू असलेल्या यादवी युद्धांत बोल्शेव्हिकांविरुद्ध हस्तक्षेप करावा या बाबतींत, ब्रिटिशांचे युद्धमंत्री या नात्याने, चर्चिलनी स्पष्ट आदेश मागितला असतां हस्तक्षेप करण्याचा आदेश त्रिमूर्तींनी दिला. परंतु, तिघा विजयी राष्ट्रांनी केवळ नाममात्र हस्तक्षेप केल्यामुळे तो अयशस्वी होऊन, अखेर बोल्शे-व्हिकांची राजवट रशियांत प्रस्थापित झाली आणि ब्रिटिश सरकारने तिला मान्यतासुद्धा दिली ! रशियांतील हस्तक्षेपाचें खापर अखेर चर्चिल यांच्या माथीं मारण्यांत येऊन, "हा गृहस्थ नको त्या भानगडींत पडतो--युद्ध निष्कारण आणि बेमुदत लांबविण्याची याची इच्छा होती" असे आरोप हुजूर आणि मजूर पक्षांनी त्यांचेवर केले !

* * *

### इराक, पॅलेस्टाईन आणि आयर्लंड :

युद्धच संपल्यामुळे युद्ध खात्याचें महत्त्व कमी होऊन चर्चिल यांच्या-सारख्या माणसाची अधिक महत्त्वाच्या जागीं नेमणूक करावी, म्हणून १९२० सालच्या अखेरीला लॉईड जॉर्ज यांनी त्यांची वसाहतींचे मंत्री म्हणून नेमणूक केली. इराक, पॅलेस्टाईन आणि आयर्लंड या देशांच्या बाबतींत चर्चिल यांची कारकीर्द संस्मरणीय झाली.

आपला देश, वेष आणि वंश सोडून अरबांत मिसळलेला, अरबी वेष धारण करणारा आणि अरबांशीं एकरूप झालेला कर्नल लॉरेन्स याला

चर्चिलनी जेव्हा अरबांच्या बाबतींत आपला सल्लागार नेमला त्या वेळीं इंग्लंडांत फार गवगवा झाला. इराकमधील इंग्रज सैन्यासाठी दरवर्षी सत्तर कोटी रुपये खर्च करावे लागत असत. तेथील सैन्य काढून इराकच्या रक्षणाचीं सूत्रें चर्चिलनी विमानदलाकडे सोपविल्यामुळे पन्नास कोटी रुपयांची बचत झाली. लॉरेन्सच्या साहाय्याने सर्व अरब देशाच्या कारभारांत चर्चिलनी एकसूत्रीपणा प्रस्थापित केला. इराक स्वतंत्र करण्यासंबंधी युद्ध-काळांत अरबांना दिलेल्या वचनांचा दोस्तांच्या मुत्सद्द्यांना शांततापरिषदेच्या वेळीं विसर पडला होता, पण चर्चिल आणि लॉरेन्स यांच्या खटपटीमुळे अखेर इराक स्वतंत्र झाला. त्याचप्रमाणे पॅलेस्टाईनचा प्रश्न सोडवून चर्चिल यांनी ज्यू लोकांना स्वतःचें असें ' घर ' मिळवून दिलें. अरबांच्या भावना, युद्धकालीन वचनें आणि ज्यू लोकांच्या गरजा यांचा समन्वय साधून त्यांनी पॅलेस्टाईनचा प्रश्न सोडविला.

आयर्लंडच्या स्वातंत्र्याचे चर्चिल हे सुरुवातीपासून प्रचारक होते. चर्चिल यांच्या कारकीर्दींत ' आयरिश फ्री स्टेट ' हें नांव धारण करणारें स्वायत्त राज्य निर्माण झालें. त्यानंतर आयरिश लोकांचा नेता, मायकेल कॉलिन्स, हा चर्चिल यांच्या घरीं एका मेजवानीला आला असता म्हणाला, " मला मृत किंवा जिवंत स्थितींत पकडण्याकरिता ब्रिटिश सरकारने दीड लक्ष रुपयांचें बक्षीस जाहीर केलें होतें त्याची आठवण झाली म्हणजे वाईट वाटतें ! "– बोअर लोकांनी आपल्याला पकडण्यासाठी जें बक्षीस लाविलें होतें त्याची कॉलिन्सला आठवण देऊन चर्चिल म्हणाले, " भल्या गृहस्था, दीड लक्ष रुपयांच्या बक्षिसाचें तुला वाईट वाटतें–मग मला पकडण्यासाठी जाहीर केलेल्या अवघ्या चारशे रुपयांच्या बक्षिसाचें मला किती दुःख होत असेल ? "–चर्चिल यांचा निरोप घेतांना कॉलिन्सने उद्‌गार काढले, "तुम्ही वसाहतमंत्री नसता तर आम्हाला स्वातंत्र्य मिळालें नसतें !–"

* * *

**मतदारांचा अविश्वास :**

उदार पक्षाच्या प्रागतिक योजना, आयर्लंडला दिलेलें स्वातंत्र्य वगैरे गोष्टी हुजूर पक्षाला आवडल्या नसल्यामुळे आणि मतदारांनासुद्धा निदान

र्ाचपालटासाठी तरी मंत्रिमंडळांत बदल अवश्य वाटल्यामुळे, १९२२ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत संयुक्त मंत्रिमंडळाचा कारभार आटोपून नव्या निवडणुका जाहीर झाल्या. डंडी विभागांतील मतदारांचा कल या खेपेला निश्चितपणाने हुजूर पक्षाकडे झुकला असला, तरी चर्चिल यांनी त्यांच्या नेहमीच्या धडाडीने निवडणुकीचा नारळ फोडून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. निवडणुकीच्या दौऱ्यांत ब्रिस्टल विभागांत प्रवास करीत असतां त्यांच्या पोटांत एकाएकी कळा येऊं लागल्यामुळे त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यांत आली व त्यांना 'अपेंडिसायटिसचा' विकार झाला असून ताबडतोब शस्त्रक्रिया करणें अवश्य आहे असें डॉक्टरनी सांगितलें. "ब्रिस्टलहून परत आल्यावर बघूं" असें सांगून चर्चिलनी पुढील प्रवासाला निघण्याची तयारी दर्शविली, तेव्हा "ब्रिस्टलला गेलात तर त्यानंतर स्वर्गांतच जावें लागेल" असें बजावून, त्यांच्या डॉक्टरनी आणि मित्रांनी त्यांना जबरदस्तीने इस्पितळांत नेऊन त्यांच्यावर अवश्य ती शस्त्रक्रिया केली.

शस्त्रक्रिया यशस्वी झाली, पण निवडणूक दोन दिवसांवर आली तरी त्यांची जखम भरून आली नव्हती. तशा स्थितींत ते अट्टाहासाने डंडी येथे गेले आणि आपल्या मतदारांना उद्देशून त्यांनी एक भाषण केलें. १९२२ च्या ऑक्टोबर महिन्यांत निवडणुकींत त्यांचा पराजय झाला तेव्हा त्यांनी उद्गार काढले, "इतकें चांगलें काम करून मतदारांनी मला दूर लोटलें— डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच मी मंत्रिपद, पार्लमेंटचें सभासदत्व आणि माझ्या पोटांतलें अपेंडिक्स गमावून बसलों!"

* * *

## एकांडा शिलेदार :

"आरामखुर्चीवर बसून डुलक्या घेण्याची मला आता सवय होत चालली आहे, पण करणार काय?—या जगांत हातीं सत्ता नसली तर कांही करतां येत नाही" असे उद्गार चर्चिल वारंवार काढूं लागले! अपेंडिसायटिसच्या शस्त्रक्रियेमुळे त्यांची प्रकृति आणि निवडणुकींतील पराभवामुळे त्यांची मनःस्थिति व्यथित झाली होती. त्यांना टक्कल पडत चाललें होतें, ते

वाकून चालत होते आणि त्यांच्या शरीरावर वार्धक्याच्या छाया पसरूं लागल्या होत्या. त्या वेळीं ते सत्तेचाळीस वर्षांचे होते आणि त्यांचे वडील-सुद्धा अल्पवयांत मरण पावले याची आठवण त्यांच्या आप्तस्वकीयांना भेडसावीत होती ! चर्चिल–कुटुंबाचे वैद्यकीय सल्लागार, लॉर्ड मोरॅन, यांना-सुद्धा त्यांच्या प्रकृतीची चिंता वाटूं लागली होती. त्यांच्या प्रकृतीची निगा राखणें हें काम फार दुष्कर होतें. ताप पाहण्याची नळी डॉक्टरांच्या हातांतून हिसकावून घेऊन अगोदर ते स्वतः पाहात असत. “ मला ताप आहे या सबबीखाली ही मंडळी मला निष्कारण बिछान्यावर खिळवून ठेवतात ” असा त्यांचा डॉक्टरांवर आरोप होता. प्रकृतीप्रमाणे पोषाखाबद्दलसुद्धा चर्चिल दिवसेंदिवस अधिकच बेफिकीर बनत चालले होते. आईबरोबर घोड्यावरून सहल करायला ते निघाले म्हणजे, त्यांच्या विचित्र पोषाखामुळे, हा तिचा मोतद्दार असावा असा अनेकांचा समज होत असे ! पण चर्चिल यांचा उत्साह, आत्मविश्वास आणि लढाऊ वृत्ति शाबूत होती. दक्षिण फ्रान्समधील एका उत्तम हवेच्या ठिकाणीं उत्तम अन्न आणि मद्याचें सेवन करीत आणि जुगार खेळत सतत सहा महिने घालविल्यानंतर ते पुनः ताजेतवाने दिसूं लागले.

१९२२ सालीं चर्चिल यांच्या कुटुंबांत मेरी नांवाच्या मुलीची भर पडली. पैसे मिळवितांना चर्चिल यांचें धोरण अत्यंत हिशेबी असलें तरी मिळविलेला पैसा ते बिनहिशेबीपणाने खर्च करतात. खाणें, पिणें आणि पाहुणे यांच्याखातर त्यांचा किती तरी पैसा खर्च होत होता. आपल्या नोकरांच्या सुखसोयी पाहणें आणि त्यांना लागतील तितक्या सवलती देणें हें चर्चिल यांचें वैशिष्ट्य आहे. संपवाल्या कामगारांनी चर्चिल यांचें शत्रुत्व पत्करल्यापासून, त्यांच्या संरक्षणासाठी थॉंपसन नांवाच्या एका गुप्तपोलिसाची नेमणूक करण्यांत आली होती. चर्चिल यांच्या खर्चावर देखरेख ठेवली नाही तर आपलें दिवाळें वाजायला वेळ लागणार नाही अशी भीति त्यांच्या पत्नीला त्या काळांत नेहमी भेडसावीत असे.

परंतु, याच काळांत त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारत चालली होती. मासिकांतील आणि वृत्तपत्रांतील लेखांसाठी त्यांना दुसऱ्या कोणत्याहि लेखकापेक्षा अधिक मोबदला मिळत होता. महायुद्धाच्या इतिहासाचे चार

खंड लिहून प्रसिद्ध करण्याचा त्यांनी संकल्प सोडला होता, त्यांपैकी पहिला खंड १९२२–२३ सालीं प्रसिद्ध झाला. "युद्धाच्या इतिहासाचें निमित्त करून चार्चिल यांनी आत्मचरित्र लिहिलें आहे" असे उद्गार बाल्फोर यांनी त्या खंडासंबंधी काढले. चार्चिल यांच्या मातोश्री मरण पावल्या तेव्हा त्यांच्या मृत्युपत्राप्रमाणे त्यांना साडेचार लक्ष रुपये मिळाले. याच काळांत केंट विभागांतील चार्टवेल येथे त्यांनी एक मोठा वाडा विकत घेतला. त्यांच्या मातेने त्यांच्यासाठी पैशाइतकीच एक 'मौल्यवान्' वस्तु ठेविली होती—अर्थमंत्री म्हणून जो पोषाख त्यांचे वडील परिधान करीत असत तो पोषाख ! पित्याप्रमाणे मुलगासुद्धा अर्थमंत्री व्हावा अशी त्यांच्या मातोश्रींची इच्छा होती.

अर्थमंत्रिपद दूरच राहो, पण १९२३ सालीं चार्चिल यांच्या राजकीय जीवनाला फारसा अर्थच उरला नव्हता ! महायुद्धाच्या इतिहासाच्या पहिल्या खंडासाठी त्यांना अनेकांनी धन्यवाद दिले असले तरी त्यांच्या राजकारणी जीवनाच्या वर्तमानकाळांत तथ्य नव्हतें, मग भविष्याची काय कथा ? रशियांतील क्रान्तिपर्वासंबंधीच्या त्यांच्या मतांमुळे ते प्रतिगामी वृत्तीचे आहेत असा उदार आणि मजूर पक्षाचा समज झाला होता. चार्चिल हे स्वतःला रणतज्ज्ञ समजत असून नेपोलियनचा पोषाख परिधान करून ते हिंडत आहेत, अशीं चित्रें अनेक व्यंगचित्रकार काढीत होते ! "भूतलावरील जीवन अनेक नाट्यप्रसंगांनी परिपूर्ण असून त्यांत अनेक खलपुरुष आणि आपण एकटेच नायक आहोंत, असें चार्चिलना वाटतें" असें मत, सुप्रसिद्ध इंग्रजी लेखक एच. जी. वेल्स यांनी व्यक्त केलें होतें ! हुजूर, उदार किंवा मजूर या पक्षांपैकी कोणत्याहि पक्षाच्या अधिकृत मतांशीं चार्चिल यांचीं मतें जुळत नव्हतीं. मजूर पक्षाबरोबर पाऊल टाकणें म्हणजे बोल्शेव्हिकांशीं घरोबा करण्यासारखें आहे, उदार पक्ष सुधारणावादी असला तरी त्याने बोल्शेव्हिकांची राजवट मान्य केली आहे आणि हुजूर पक्षाला ती मान्य नसली तर तो प्रतिगामी वृत्तीचा आहे असें चार्चिलना वाटत होतें. सारांश, राजकारणांतल्या महत्त्वाच्या मुद्द्यासंबंधांत स्वतःचीं स्वतंत्र मतें धारण करणारे आणि आपलीं मतें कोणत्याहि पक्षाशीं जुळत नाहीत असें अनुभवास आलेले ते एकांडे शिलेदार होते. आपल्या पित्याच्या

राजकारणी कारकीर्दीच्या शोकांतिकेला कारणीभूत झालेल्या हुजूर पक्षावर त्यांचा विशेष राग होता. बोल्शेव्हिकांनी रशियांत जी हिंसात्मक क्रांति केली तशा क्रान्तीपासून आपल्या राष्ट्राचें रक्षण केलें पाहिजे हें एकच ध्येय चर्चिलना भुलवीत होतें आणि त्याकरिता हुजूर आणि उदार पक्षांनी मजूर पक्षाविरुद्ध एकजूट केली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता!

१९२३ सालीं हुजूर पक्षाचे पुढारी, स्टॅन्ले बाल्डविन, यांनी पुनः संरक्षित व्यापाराच्या धोरणाचा पाठपुरावा केल्यामुळे चर्चिल यांनी खुल्या व्यापाराच्या धोरणाचा हिरीरीने प्रचार करून वेस्ट लीस्टरच्या विभागांतून निवडणूक लढविली. खुल्या व्यापाराप्रमाणेच समाजवादाला पायबंद घालणें हें आपलें मुख्य धोरण राहील असें त्यांनी जाहीर केलें, पण त्या निवडणुकींत त्यांचा पराभव झाला. त्या निवडणुकीनंतर उदार पक्षाचे पुढारी ऑस्क्विथ यांनी मजूर पक्षाचे पुढारी, रॅम्से मॅक्डोनाल्ड, यांच्याशीं गट्टी केल्यामुळे, मजूर पक्षाचें सरकार स्थापन झालेलें पाहून चर्चिल हे उदार पक्षांतून बाहेर पडले आणि त्यांनी स्वतःचा 'घटनानुवर्ती' नांवाचा पक्ष स्थापन केला--त्या पक्षाचे ते एकुलते एक सभासद होते!

वयाच्या पन्नासाव्या वर्षाच्या सन्निध चर्चिल येऊन ठेपले होते--निवडणुकांतील दोन पराभव त्यांनी नुकतेच पचविले होते. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर ज्याप्रमाणे ब्रिटिशांचा प्रख्यात मुत्सद्दी, एडमंड बर्क, याने पक्षांतर केलें तसें पक्षांतर रशियन राज्यक्रांतीनंतर आपण कां करूं नये असे विचार त्यांच्या मनांत डोकावूं लागले होते! समाजवाद आणि संरक्षित व्यापार या दोन धोरणांविरुद्ध त्यांनी चंग बांधल्यामुळे, हुजूर पक्षांतील अनेक सभासद त्यांच्याभोवती जमूं लागले होते. समाजवादाप्रमाणेच हुजूर पक्षांतील प्रतिगामी वृत्तीला पायबंद घालण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असें त्यांना वाटूं लागलें होतें--अशा अवस्थेंत इंग्लंडमधील निवडणुकीच्या इतिहासांतला एक अभूतपूर्व बनाव घडून आला!

१९२४ सालच्या सुरुवातीला वेस्टमिन्स्टर मतदारसंघांतील पोट निवडणुकीसाठी आपल्या एकच सभासद असलेल्या पक्षातर्फे चर्चिल यांनी अर्थात् एकच उमेदवार हुजूर आणि मजूर पक्षांच्या उमेदवाराविरुद्ध उभा

केला—तो उमेदवार म्हणजे खुद्द चर्चिल ! वेस्टमिन्स्टर विभाग हा हुजूर पक्षाचा बालेकिल्ला समजला जात असे. मजूर पक्षाचें सरकार स्थापन झाल्यापासून अनेक हुजूर पक्षीय मतदार बेचैन झाले होते. आपल्या पक्षाच्या अधिकृत उमेदवारापेक्षा अधिक लढाऊ वृत्तीचा उमेदवार निवडला पाहिजे, असें असंतुष्ट हुजूर पक्षीयांना एकाएकी वाटूं लागलें आणि त्यांनी चर्चिलना पाठिंबा देण्याचें ठरविलें—मग काय विचारतां ? ख्यालीखुशाली, मेजवान्या, शिकार आणि घोडयांच्या शर्यती, बाहेरच्या जगाची ज्यांनी कधी दखल घेतली नव्हती असे उमराव आणि त्यांच्या बायका चर्चिल यांच्या प्रचारासाठी घरोघर फिरूं लागल्या ! इतिहासकार सांगतात की, मार्लबरोच्या ड्यूक-साहेबांचा नोकर मतदारांच्या दारावर त्याच्या हातांतल्या सोन्याच्या मुठीच्या काठीने धक्के मारीत होता आणि त्याच्या मागे असलेले ड्यूक-साहेब चर्चिल यांच्यासाठी मताची याचना करीत होते ! नाटकांतल्या आणि नाचांतल्या मुली चर्चिल यांच्या लढाऊपणाची आणि मुत्सद्देगिरीची प्रशंसा करणारीं गाणीं म्हणत रस्त्यांतून हिंडत होत्या. चर्चिल जातील तेथे त्यांच्या सभा उधळावयाच्या आणि प्रसंगविशेषीं दगडफेक, खुर्चीफेक आणि मारामाऱ्या करायच्या हें एकच धोरण मजूर पक्षीय मतदारांनी आणि स्वयंसेवकांनी अवलंबिलें होतें. त्यामुळे इतका गोंधळ उडाला की, एका इटालियन प्रवासी कुटुंबाचा या विभागांत क्रान्तीचा वणवा भडकला आहे असा समज झाला ! हुजूर पक्षीयांतील जुन्या पिढींतले मतदार आपल्या अधिकृत उमेदवाराला आणि नव्या पिढींतले मतदार चर्चिल यांना मत देण्यासाठी सिद्ध झाल्यामुळे, अनेक कुटुंबांत दुही माजण्याचा रंग दिसूं लागला ?

* * *

**हुजूर पक्षांत प्रवेश :**

त्या निवडणुकींत चर्चिल पराभूत होऊन हुजूर पक्षाचा अधिकृत उमेदवार निवडून आला तरी आपल्या लोकप्रियतेचा साक्षात्कार होऊन चर्चिल यांचा आत्मविश्वास वाढला. १९२४ सालच्या अखेरीस झालेल्या सार्वत्रिक निवडणुकींत एपिंग विभागांतून ते निवडून आले. या खेपेला

हुजूर पक्षीयांनी चर्चिल यांच्या विरुद्ध उमेदवार उभा केला नव्हता. त्या निवडणुकीनंतर हुजूर पक्षाचें जें सरकार स्थापन झालें त्यांत स्टॅन्ले बाल्डविन मुख्यमंत्री, ऑस्टिन चेंबरलेन परराष्ट्रमंत्री, नेव्हिल चेंबरलेन आरोग्यमंत्री, लॉर्ड बर्कनहेड भारतमंत्री आणि चर्चिल अर्थमंत्री झाले ! चर्चिल यांच्या मातोश्रींची महत्त्वाकांक्षा त्यांच्या मृत्यूनंतर सफल होऊन चर्चिल यांना त्यांनीं दिलेला लॉर्ड रॅन्डॉल्फ यांचा पोषाख चर्चिलनी परिधान केला !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

## १५

### संपकाळांतले संपादक

व्यापाराचे, वसाहतींचे, गृहखात्याचे, आरमाराचे, शस्त्रास्त्र–उत्पादनाचे, युद्धाचे आणि वैमानिक खात्याचे मंत्री, आणि अर्थमंत्री !–आपल्या आयुष्याचें पन्नासावें वर्ष ओलांडण्यापूर्वी, ब्रिटनसारख्या एका अत्यंत बलाढ्य आणि अग्रगण्य देशाच्या लोकशाहींत इतकीं निरनिराळीं मंत्रिपदें संभाळून चर्चिल यांनी एक विक्रमच केला होता. ‘ बहुजनांच्या आणि जनतारूपी जनार्दनाच्या ’ पाठिंब्यावर लहान माणसांनी मंत्रिपद मिळविण्याचा तो जमाना नव्हता. ब्रिटिश बेटांतल्या लोकशाहीचें नेतृत्व बुद्धिवंतांच्या आणि तज्ज्ञांच्या हातीं होतें. मंत्रिमंडळांतल्या महत्त्वाच्या सर्व खात्यांचा अनुभव घेतल्यामुळे, पंतप्रधानकीची माळ चर्चिल यांच्या गळ्यांत पडणें अवश्य होतें; पण तें शक्य नव्हतें ! १९२६ सालची निवडणूक हुजूर पक्षातर्फे लढवून त्यांनी आपल्या ‘घटनानुवर्ती’ पक्षाचें विसर्जन केलें पण, एकेकाळीं हुजूर पक्षांतून बाहेर पडून त्याजवर चर्चिल यांनी अत्यंत कठोर टीका केली असल्यामुळे, त्या पक्षाचें पुढारीपण त्यांना लाभेल ही गोष्ट सर्वस्वी अशक्य होती. हुजूर पक्षाचा त्यांच्यावर विश्वास नव्हता आणि “ उतावळेपणामुळे हा मनुष्य काय करील त्याचा नियम नाही ” असें हुजूर पक्षीय सभासदांचें प्रामाणिक मत होतें. कोणत्याहि पक्षाचे चर्चिल हे पुढारी नसल्यामुळे, ब्रिटनची पंतप्रधानकी त्यांना दुर्लभ होती.

आपल्या वडिलांचा वेष परिधान करून चार्चिल यांनी अर्थमंत्रिपदावरून जें पहिलें भाषण केलें त्या वेळीं त्यांचा नेहमीचा बेछूटपणा नाहीसा झाला होता. ते अडखळत बोलत होते आणि प्रेक्षकांच्या विभागांत बसलेल्या आपल्या पत्नीकडे आणि मुलांकडे मधूनमधून पाहात होते. अर्थमंत्री या

खात्याने एखाद्याची कारकीर्द जितकी गाजूं शकते तितकी चर्चिल यांची गाजली नसली, तरी त्यांचें मंत्रिमंडळांतलें अस्तित्व त्यांच्या सहकाऱ्यांना एकसारखें जाणवत होतें. चर्चिल यांना इतर अनेक खात्यांचा अनुभव असल्यामुळे, निरनिराळ्या खात्यांच्या कारभाराविषयीच्या सूचना ज्या त्या खात्याच्या मंत्र्यास पाठविण्याचा त्यांचा जुना क्रम अव्याहत चालू होता. " चर्चिल मंत्रिमंडळाच्या बैठकीला उपस्थित असले म्हणजे कार्यक्रम-पत्रिकेवरील विषयांचा परामर्श घेण्यापूर्वी, स्वतःच्या खात्याशिवाय इतर प्रत्येक खात्यासंबंधी त्यांनी केलेल्या सूचनांवर अगोदर चर्चा करावी लागते, " असे उद्गार पंतप्रधान बाल्डविन यांनी एकदा काढले होते. चर्चिल यांच्या या ' आक्रमक ' वृत्तीमुळे बाल्डविनसाहेब त्यांच्यावर कांहींसे नाराज असले तरी त्यांच्या बुद्धीचें, ' शंभर अश्वशक्तीचा मेंदू ' असें वर्णन ते करीत असत !

हुजूर पक्षाचे अर्थमंत्री झाल्यापासून चर्चिल यांच्या खुल्या व्यापाराच्या धोरणाला मुरड घातली गेली. समाजवादाच्या भीतीमुळे मजुरांविषयीची त्यांच्या मनांतली सहानुभूतिसुद्धा पुष्कळ कमी झाली होती. चर्चिल यांच्या त्या विसंगतीवर मजूर पक्षाचे माजी अर्थमंत्री, फिलिप स्नोडाऊन, यांनी टीका केली तेव्हा चर्चिल म्हणाले, " कोणाच्याहि मतांत देशाला हितकारक असा बदल झाला असेल तर तो स्वागतार्हच समजला पाहिजे. " त्यावर " बदलाच्या बाबतींत तुम्ही खरोखरच अधिकारवाणीने बोलूं शकतां, " असा टोमणा स्नोडाऊन यांनी मारला ! तो टोमणा आपल्या पक्षांतराला उद्देशून आहे हें चर्चिल यांनी ओळखलें, पण वादविवादांत त्यांना पराभूत करणें ही गोष्ट सोपी नव्हती ! त्यांनी तत्काळ उत्तर दिलें, " बदलणें म्हणजे सुधारणें आणि वारंवार बदलणें म्हणजे पूर्णत्वाला पोहोचण्यासारखें आहे ! " चर्चिल आणि स्नोडाऊन यांचें वाग्युद्ध ऐकण्याकरिता पार्लमेंटच्या सभागृहांत आणि प्रेक्षकांच्या विभागांतसुद्धा गर्दी होत असे. त्या लढतीसंबंधी स्नोडाऊन यांनी आपल्या आत्मचरित्रांत लिहिलें, " चर्चिल हे मला साजेसे प्रतिस्पर्धी होते. आमची लढत पाहण्याकरिता प्रेक्षकांची खूप गर्दी जमत असे. पूर्वतयारी करून भाषणें करण्याची संवय सोडून या काळांत ऐनवेळीं सुचणाऱ्या वाक्चातुर्यावर चर्चिल अधिक भर देऊं लागले.

त्यांच्या प्रत्येक कृतींत एक प्रकारचा आकर्षकपणा असतो. अंदाजपत्रक शिलकेचें असो अगर तुटीचें असो, तें सभागृहापुढे मांडतांनाचा त्यांचा उत्साह सारखाच असतो." 'राष्ट्राचें उत्पन्न वाढविण्याकरिता मद्यावरील कर वाढविला पाहिजे' असें एकदा प्रतिपादन करतांना आपल्या समोर अगोदरच ठेवलेल्या मद्याच्या पेल्यांतला एक घोट घेऊन चर्चिल म्हणाले, "या क्षणींसुद्धा मी राष्ट्राचें उत्पन्न वाढवतों आहें !"

खाणींतल्या मजुराचा संप विकोपाला जाऊन १९२६ सालीं सार्वत्रिक संप पुकारला गेला, त्या वेळीं राष्ट्रनिष्ठ कामगारांच्या आणि स्वयंसेवकांच्या मदतीने सार्वत्रिक उपयुक्ततेचीं सर्व कामें चालू ठेवण्यासाठी चर्चिल यांनी जातीने पुढाकार घेऊन फार श्रम केले. भल्या पहाटे उठून ते दूध-पुरवठा करणाऱ्या स्वयंसेवकावर देखरेख ठेवीत असत !—छापखान्यांतल्या संपामुळे सर्व वृत्तपत्रें बंद पडून, जनतेला कोणतेंच वृत्त समजणें अशक्य झालें ! अधिकृत वृत्ताच्या अभावीं निरनिराळ्या अफवा पसरून परिस्थिति जास्तच चिघळेल हें ओळखून, चर्चिलनी 'मॉर्निंग पोस्ट' वृत्तपत्राचा छापखाना ताब्यांत घेतला आणि 'ब्रिटिश गॅझेट' नांवाच्या वृत्तपत्राचें संपादन आणि प्रकाशन करायला स्वतः सुरुवात केली ! लंडनमधील प्रमुख वृत्तपत्रांचे संपादक हे चर्चिल यांचे मदतनीस म्हणून काम करूं लागले. चर्चिल आपला सारा वेळ 'ब्रिटिश गॅझेट'च्या संपादनांत, मुद्रणांत आणि प्रकाशनांत घालवूं लागले. वृत्तपत्रव्यवसाय आणि मुद्रणव्यवसाय यांच्या पांचवीला पुजिलेल्या 'कॉपी'—'प्रुफ' वगैरे शब्दांच्या गर्जनांनी 'मॉर्निंग पोस्ट'चा छापखाना निनादूं लागला ! चर्चिल यांचें संपादनकार्य पाहण्याकरिता लंडनचे अनेक नागरीक छापखान्यांत फेरी मारूं लागले. अशा रीतीने सबंध एक आठवडाभर आपल्या देशबांधवांना अधिकृत बातम्या पुरविण्याचें कार्य चर्चिल करीत होते. दुसरें कोणतेंच वृत्तपत्र चालू नसल्यामुळे ब्रिटिश गॅझेटच्या तीस लक्ष प्रती दररोज खपत होत्या—परंतु अर्थमंत्रिपदाचा आणि चर्चिल यांच्या संपादकीय कामगिरीचा कोणता बादरायण संबंध आहे हें शेवटपर्यंत कोणालाच समजलें नाही !

१९२९ च्या सार्वत्रिक निवडणुकींत चर्चिल निवडून आले तरी हुजूर पक्षाचा पराभव होऊन मजूर पक्षाचें सरकार स्थापन झाल्यामुळे, चर्चिल

यांचें मंत्रिपद संपुष्टांत आलें. सँढर्स्टचें महाविद्यालय सोडल्यापासून १९२९ सालपर्यंत त्यांनी पांच युद्धांत भाग घेतला होता, निरनिराळीं नऊ मंत्रिपदें भूषविलीं होतीं आणि आठ हजार जाहीर व्याख्यानें दिलीं होतीं——जनतेच्या तोंडून जयजयकाराप्रमाणे धिक्काराचे शब्दसुद्धा ऐकिले होते.

* * *

**अधिकारशून्यता आणि अप्रियता :**

१९२९ ते १९३९ हा दहा वर्षांचा कालखंड हा चर्चिल यांच्या जीवनांतला आळसाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. १९२९ सालीं मजूर पक्षाचें सरकार स्थापन झाल्यामुळे चार्चिल यांना अधिकारसंन्यास करावा लागला यांत नवल नाही. १९३१ सालीं ब्रिटनच्या अर्थकारणांत असामान्य मंदी ओढवल्यामुळे जें राष्ट्रीय सरकार स्थापन झालें त्याचे पंतप्रधान मजूर पक्षाचे रॅम्से मॅक्डोनाल्ड असले, तरी खरी सत्ता हुजूर पक्षाचे स्टॅन्ले बाल्डविन यांच्याच हातीं होती–पण राष्ट्रीय सरकारांत चर्चिल यांना स्थान मिळालें नाही ! १९३५ मधे पुनः हुजूर पक्ष अधिकारावर आला तरीसुद्धा स्टॅन्ले बाल्डविन किंवा त्यांच्या नंतरचे पंतप्रधान, नेव्हिल चेंबरलेन, यांनी चार्चिल यांचा मंत्रिमंडळांत समावेश केला नाही. त्याचें कारण असें, की हुजूर आणि मजूर पक्षांच्या नेत्यांच्या अनेक धोरणांचे ते कठोर टीकाकार होते. मॅक्डोनाल्ड यांच्या अत्यंत लवचिक अशा धोरणावर टीका करतांना, मॅक्डोनाल्ड म्हणजे 'एक हाड नसलेली चमत्कृति आहे' असे इतिहासप्रसिद्ध उद्गार त्यांनी काढले होते! मॅक्डोनाल्डची संभ्रमित ध्येयनिष्ठा आणि बाल्डविन यांचा न-कर्तेपणा यामुळे आपला देश संकटांत सापडणार आहे असा चर्चिल यांचा ठाम समज होता. " अनिश्चयाच्या बाबतींत निश्चयी, अनिर्णयाच्या बाबतींत निर्णयी आणि कर्तुमकर्तुम् अशी सत्ता हातीं असलेला पण कमकुवत " असें बाल्डविनसाहेबांचें वर्णन त्यांनी केलें होतें. १९३० सालीं भाषण करतांना चर्चिल म्हणाले, " महायुद्धाच्या काळाइतकाच हा काळ महत्त्वाचा आहे. युद्धकाळांत पादाक्रान्त केलेलीं विजयाचीं शिखरें तदानंतरच्या काळांत आम्ही गमावून बसलों आहों. आमच्या ऐतिहासिक कार्यासंबंधी आम्ही साशंक बनत चाललों

असून, आमच्या तत्त्वांवरील आमचा विश्वास ढळत चालला आहे."

हिंदुस्थानसंबंधी मॅक्डोनाल्ड यांनी आखलेल्या धोरणाला बाल्डविन विरोध करीत नाहीत हें पाहून चर्चिल फार नाखूष झाले होते. केवळ तलवारीच्या जोरावर हिंदुस्थान ताब्यांत ठेवावा असें त्यांचें मत नव्हतें. जालियनवाला बागेंत जनरल डायर याने जी हत्या केली तिजसंबंधांत "एका तोल सुटलेल्या माणसाचें हें काम आहे," असे उद्गार चर्चिल यांनी काढले होते. परंतु, "आमच्या राजाच्या मुकुटांतलें हें सर्वांत देदीप्यमान आणि मौल्यवान् रत्न–ब्रिटिश साम्राज्याची ही शक्ति सुखासुखी फेकून देण्याच्या कल्पनेशीं मी सहमत होऊं शकत नाहीं," हें त्यांनी स्पष्ट केलें होतें! कोणत्याहि पक्षाचें सरकार अधिकारावर असलें तरी विरोधी पक्षाचें एक संकल्पित मंत्रिमंडळ ब्रिटनमध्ये नेहमी तयार असून, राज्यकर्ता पक्ष पराभूत होतांच अधिकार–स्वीकार करायला तें नेहमी सिद्ध असतें. मजूर पक्षाचें सरकार अधिकारावर असतां हुजूर पक्षाच्या हिंदुस्थानविषयक धोरणाचा निषेध करण्याकरिता, त्या पक्षाच्या संकल्पित 'मंत्रिमंडळांतून' चर्चिल यांनी राजीनामा दिला! राजीनामा देतांना चर्चिल म्हणाले, "जो मार्ग पत्करिला असतां हिंदुस्थानांतील जनतेवर, ब्रिटनमधील जनतेवर आणि ब्रिटिश साम्राज्याच्या रचनेवर फार मोठा प्रहार होईल, अशा मार्गाविरुद्ध लोकमत जागृत करण्याच्या हक्काकरिता मीं ही किंमत दिली आहे. माझें कर्तव्य बजावण्याकरिता अधिकाराच्या जागांचा विचार मीं माझ्या मनांतून हद्दपार केला आहे—" पण चर्चिल यांच्या विरोधाला न जुमानतां हिंदुस्थानला स्वायत्ततेचे अधिक हक्क देणारा कायदा पार्लमेंटने १९३५ सालीं संमत केला!

बाल्डविन यांच्या धोरणांसंबंधी आणि कृतीसंबंधी चर्चिल यांच्या मनांत अधिकच अरुचि निर्माण करणारी आणखी एक घटना १९३६ सालच्या डिसेंबर महिन्यांत घडून आली. पांचव्या जॉर्जच्या मृत्यूनंतर आठवा एडवर्ड, इंग्लंडचा राजा आणि ब्रिटिश साम्राज्याचा बादशहा म्हणून, सिंहासनावर विराजमान झाला. त्याच्या राज्याभिषेकाची तारीख निश्चित होऊन त्याची तयारी करण्याकरता ब्रिटिश जनता सिद्ध झाली होती. इतक्यांत सिंम्पसन नांवाच्या एका अमेरिकन बाईवर एडवर्डचें प्रेम बसलें असून तो तिजबरो-बर लवकरच लग्न करणार आहे अशी बातमी सर्वंध देशभर पसरली. सिंम्प-

सनबाईने त्यापूर्वी दोनदा घटस्फोट घेतला असून तिचे दोघेहि माजी पति हयात आहेत, या कारणाखातर ती इंग्लंडच्या राणीच्या सिंहासनावर बसावयास पात्र नाही असें ब्रिटनमधील सर्व धर्मोपदेशक, स्वतः बाल्डविनसाहेब आणि त्यांचें मंत्रिमंडळ यांचें मत होतें. एक सामान्य आणि स्वतंत्र व्यक्ति या नात्याने एडवर्डने त्याच्या प्रेमाला मात्र झालेल्या कोणाहि स्त्रीबरोबर लग्न करावें, पण मंत्रिमंडळाचा सल्ला धाब्यावर बसवून एखाद्या स्त्रीबरोबर लग्न करून तिला महाराज्ञीपदावर बसविण्याचा त्याला अधिकार नाही असा बाल्डविनसाहेबांचा दावा होता. तडजोडीचे सर्व प्रयत्न विफल होऊन, 'प्रेम किंवा राज्यपद'—'प्रियतमा किंवा सिंहासन' असा अत्यंत कठोर पर्याय बाल्डविन आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने आठव्या एडवर्डसमोर मांडला, इतकेंच नव्हे तर त्याला योग्य वाटेल तो निर्णय तत्काळ घेण्याची त्याच्यामागे निकड लाविली ! अशा वेळीं ब्रिटिशांच्या नामवंत मुत्सद्द्यांपैकी एकटे चर्चिल हे एडवर्डची बाजू घेऊन उभे पाहिले ! "राज्यत्याग करण्याची राजावर सक्ती करण्याचा पार्लमेंटला अधिकार नाही—त्यासाठी इतकी घाई करण्याचें तर कांहीच कारण नाही ! या बाबतींत निर्णय घेण्याकरिता राजाला अवश्य तितकी सवड दिली पाहिजे" असा चर्चिल यांनी युक्तिवाद केला. परंतु, बाल्डविन यांनीं लोकसभेचा इतक्या प्रचंड प्रमाणांत पाठिंबा मिळविला होता की, "पुरे करा—खाली बसा" अशा आरोळ्या सुरू होऊन चर्चिल यांना त्यांचें भाषण बंद करावें लागलें ! आठव्या एडवर्डने अखेर प्रेमाचा मार्ग पत्करून सिंहासनाचा त्याग केला !

आपल्या आत्मचरित्रांत आठवा एडवर्ड लिहितो, "राज्यपदाबद्दल बाल्डविन बोलत होते तेव्हा मला तें निःसत्त्व आणि निर्जीव वाटलें, पण ज्या वेळीं चर्चिल बोलले त्या वेळीं राज्यपद एकदम प्रकाशित झाल्यासारखें दिसलें ! १९३६ सालीं राष्ट्राच्या जीवनांत तर नव्हेच, पण त्यांच्या स्वतःच्या पक्षांतसुद्धा चर्चिल यांना मान नव्हता—त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेबद्दल आणि निर्भयतेबद्दल हुजूर पक्षीयांना आदरयुक्त भीति वाटत असली, तरी चर्चिल यांना त्यांनी जवळ जवळ वाळींत टाकलें होतें !"

* * *

**मानवी संस्कृतीची कथा :**

परंतु या अधिकारशून्यतेच्या, अपयशाच्या आणि मनस्तापाच्या काळांतसुद्धा चर्चिल मनाने खचले नव्हते. चित्रकलेची आराधना त्यांच्या मनाला आनंद देत होती. चार्टवेल येथील वाड्याभोवतालची भिंत, तेथील पोहण्याचा तलाव आणि कांही नव्या खोल्या चर्चिल यांनी याच काल-खंडांत स्वहस्तें बांधून काढल्या आणि घरबांधणीचीं कामें करणाऱ्या गवंड्यांच्या संघांत त्यांनी आपलें नांव दाखल केलें! त्यांच्या साहित्य-संपदेला या काळांत, जणू काय, पूरच आला होता. महायुद्धाच्या इतिहासाचे चार खंड, स्वतःच्या लग्नापर्यंतची आत्मचरित्रात्मक जीवन-कथा आणि पहिल्या मार्लबरोच्या चरित्राचे एकंदर एक हजार पृष्ठांचे चार खंड याच काळांत त्यांनी लिहून प्रसिद्ध केले. पहिल्या महायुद्धाच्या इतिहासापासून एकंदर साडेतीन लक्ष रुपये मिळून, 'इंग्रजी गद्याचा कारागीर' अशी प्रतिष्ठा त्यांनी संपादन केली. "वर्तमानकालीन ब्रिटिश मुत्सद्द्यांत ज्याला साहित्यांत अमर स्थान प्राप्त होईल असा दुसरा कोणी नाही" असें मत अनेक साहित्य-समालोचकांनी व्यक्त केलें.

साहित्याच्या अमेरिकन बाजारपेठेंत चर्चिल याच्या साहित्याचा भाव अतिशयच वाढला होता. अमेरिकेंत एक व्याख्यानमाला गुंफण्यासाठी ते न्यूयॉर्कला गेले. इंग्लंडांत वाहनें रस्त्याच्या डाव्या बाजूने चालत असलीं तरी अमेरिकेंत तीं उजव्या बाजूनें चालत असतात हें ध्यानांत न राहिल्यामुळे, फक्त डाव्या बाजूकडे लक्ष ठेवून एक रस्ता ओलांडीत असता भरधाव जाणाऱ्या मोटारीचा त्यांना धक्का बसला! त्या धक्क्यामुळें मूर्च्छितावस्थेंत विलीन होण्यापूर्वीं "चूक माझी होती" असे अपघाताच्या ठिकाणीं धावून आलेल्या पोलिसाला सांगायला ते विसरले नाहीत! अपघातानंतर त्यांना कांही दिवस इस्पितळांत राहावें लागलें त्या वेळीं त्यांनी जो एक प्रदीर्घ लेख लिहिला, त्याचा मोबदला म्हणून त्यांना नऊ हजार रुपये मिळाले—त्या लेखाचें नांव 'न्यू यॉर्कमधील माझें दुर्दैवी साहस" असें होतें.

अमेरिकेंतील 'कोलिअर्स' नांवाच्या साप्ताहिकासाठी भारी मोबदला घेऊन या कालखंडांत चर्चिल यांनी विविध विषयांवर कितीतरी लेख

लिहिले. चार्ली चाप्लिन याचा एक मूक चित्रपट पाहून 'स्वारी' इतकी खूष झाली, की त्यासंबंधांत ताबडतोब एक लेख लिहून "बोलपटाची पीछेहाट होऊन मूक चित्रपटांचा जमाना पुनः सुरू होणार आहे" असें भविष्य त्यांनी वर्तविलें ! अमेरिकेंत त्या वेळीं जारी असलेल्या दारूबंदीच्या विफलतेबद्दल किती तरी लेख लिहून "मद्याची कथा ही मानवी संस्कृतीची कथा आहे" असें त्यांनी प्रातिपादन केलें !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ३४८०८
२.५.७३

## १६

### सिंहावलोकन

चर्चिल यांच्या येथपर्यंतचा चरित्राचें सिंहावलोकन केलें तरी सुद्धा त्यांच्या संपन्न आणि असामान्य जीवनक्रमाचा अचंबा वाटूं लागतो. उमरावाच्या घराण्यांत त्यांचा जन्म झाला तरी विद्यार्जनाचा काल संपतांच ते स्वतःच्या पायावर उभे राहिले. इतकेंच नव्हे, तर केवळ शर्यती, शिकार आणि शेअरबाजारांत लोळत पडणाऱ्या उमरावांचा तिटकारा करीत, उमरावांच्या सभेचे ब्रिटिश राजकारणांतले हक्क नष्ट करण्याची आघाडी उघडून त्यांनी अखेर ती यशस्वी केली. विद्यार्जनाच्या काळांत अत्यंत अयशस्वी ठरलेला हा विद्यार्थी अखेर इंग्रजी साहित्याचा प्रमुख कारागीर बनला. चित्रकलेच्या एकाहि वर्गांत पाऊल न टाकतां, केवळ निसर्गाशीं तादात्म्य पावल्यामुळे, एक स्वयंभू आणि प्रतिभावान् तैल चित्रकार म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. स्वकुलाचा अभिमान बाळगणारा वंशज, निष्ठावंत पुत्र आणि वैऱ्यांनी सुद्धा ज्याच्या शीलासंबंधी कधी शंका घेतली नाही असा पत्निनिष्ठ पति हे त्यांच्या खासगी आयुष्याचे विशेष आहेत. प्रेमळ मालक, चिरूट आणि मद्याचा भोक्ता आणि सढळ हाताने खर्च करणारा आतिथ्यशील यजमान असाहि त्यांचा नांवलौकिक आहे. निर्भय आणि पट्टीचा वक्ता या नात्याने त्यांच्या अनेक कथा आणि दंतकथा प्रचलित आहेत. केवळ सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवलेल्या घोडदळांत चर्चिलना प्रवेश मिळाला म्हणून त्यांच्या वडिलांना वाईट वाटलें असलें, तरी कोणाहि समकालीना-पेक्षा चर्चिलनी रणांगणावर अधिक प्रेम केलें. आमंत्रणें लावूनच नव्हे, तर आगंतुक म्हणूनसुद्धा, संकटें आणि अपमान सहन करीत, ते संधि मिळेल त्या वेळीं रणांगणावर धावून गेले. सुप्रसिद्ध इंग्रजी लेखक ए. जी. गार्डिनर

म्हणतो, " वयाचें पंचविसावें वर्ष संपण्यापूर्वी चर्चिल यांनी रणांगणाचा जितका अनुभव घेतला, तितका नेपोलियनशिवाय दुसऱ्या कोणीहि घेतला नव्हता. " युद्धासाठी विमानांचा उपयोग करण्याची खटपट करून त्यांनी ब्रिटिशांच्या सुप्रसिद्ध शाही विमानदलाची सुरुवात करून दिली. चर्चिल यांनाच रणगाड्यांचे जनक समजण्यांत येतें. पण पहिल्या महायुद्धाच्या योजना आखण्याची जबाबदारी ज्या वेळीं त्यांच्यावर येऊन पडली, तेव्हा त्यांच्या वाटेला आलेलें अपयश त्यानंतर जवळ जवळ पंचवीस वर्षेंपर्यंत त्यांना पुरून उरलें. सुरुवातीला केवळ बातमीदार या नात्याने त्यांनी रणांगणावर प्रवेश मिळविला असला, तरी केवळ रणांगणाच्या कडेवर न राहतां जिथे जिथे तीव्र रणकंदन चालू असेल तिथे तिथे त्यांनी संचार केला. युद्धांतील घटनांच्या बातम्या पुरविण्यावर समाधान न मानतां, रणधुरंधर सेनापतींच्या रणनीतीवर टीका केल्यामुळे किचनेरसारख्या युद्धविशारदांचा राग त्यांनी ओढवून घेतला. राजकारणांतसुद्धा पक्षनिष्ठेपेक्षा स्वमतांवरील निष्ठेला त्यांनी अधिक महत्त्व दिलें.


हें जीवन संपन्न आणि असामान्य असलें, तरी स्वतःच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी जिवावर उदार होऊन लढणाऱ्या वीरपुरुषांच्या जीवनापेक्षा तें निराळें आहे. गुलाम बनलेल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या वीरपुरुषांचें चरित्र ज्या प्रकारच्या तेजानें धवळून निघतें, त्या प्रकारच्या तेजाचा प्रकाश चार्चिल यांच्या चरित्रावर पडणें त्यांच्या जन्मापासूनच अशक्य झालें होतें. चार्चिल हे जर एखाद्या परतंत्र देशांत जन्माला आले असते तर त्यांनी काय केलें असतें या कल्पनाविलासाच्या वाटेला न जातां, साम्राज्याचीं सुखें आणि सत्ता उपभोगणाऱ्या वंशांत आणि जवळजवळ एक हजार वर्षें ज्या भूमीवर परकीय सैन्याचें पाऊल पडलें नव्हतें अशा देशांत चर्चिल यांचा जन्म झाला हें लक्षांत ठेविलें पाहिजे. चार्चिल हे पराकाष्ठेचे साम्राज्यवादी आहेत हें ते स्वतःसुद्धा नाकबूल करणार नाहीत. स्वातंत्र्यवाद्यांच्या चरित्राची थोरवी साम्राज्यवाद्यांच्या चरित्राला कशी प्राप्त होणार ? परंतु, चर्चिल यांच्या साम्राज्यवादाचा अर्थ काय, या प्रश्नाचा सुद्धा विचार करणें अवश्य आहे.

चर्चिल यांचा जन्म झाला त्या वेळीं इंग्लंड देशांत आणि इंग्रजी

साम्राज्यांत व्हिक्टोरिया राणीची कारकीर्द चालू होती. ब्रिटिश वंश वैभवाच्या शिखरावर होता, त्यांच्या साम्राज्यावरून सूर्य मावळत नव्हता. साम्राज्याच्या रक्षणासाठीसुद्धा युद्ध करावयाची गरज उरली नव्हती आणि ब्रिटिशांच्या राज्यव्यवस्थेच्या मध्यभागीं असाधारण वैभवानें आणि प्रतिष्ठेनें चमकणाऱ्या राजसिंहासनाला अभूतपूर्व असें महत्त्व प्राप्त झालें होतें. व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीचें सूत्र तिच्यानंतर सिंहासनावर विराजमान झालेला तिचा मुलगा, सातवा एडवर्ड, याच्या कारकीर्दींतसुद्धा कायम राहिलें. या दोन कारकीर्दींतच चर्चिल यांच्या विचारांचा आणि वृत्तीचा पिंड पोसला गेला. पण याच कारकीर्दींत ब्रिटिश बेटांत लोकशाही अधिष्ठित असून डिसरेली, ग्लॅडस्टन, बाल्फोर यांच्यासारखे लोकशाहीचे महान् नेते, राजाच्या आणि प्रजेच्या, दोघांच्याहि—आदराला मान्य झाले होते. राजाचा वध करणारी, राजाला पदच्युत करणारी आणि राजाची पूजा बांधणारी अशी ती सर्वसमर्थ आणि निष्ठावंत लोकशाही होती. राजाकडून जनतेने पदोपदीं मिळविलेल्या अधिकारांचे सर्व दस्तैवज पार्लमेंटच्या वास्तूंत मोठ्या दिमाखानें मिरवीत होते, आणि म्हणूनच, चर्चिल हे जसे राजसिंहासनाचे तसेच लोकशाहीचे कट्टर उपासक बनले. लोकशाहीने घेतलेला कोणताहि निर्णय त्यांना कितीहि अप्रिय वाटो, त्यांनी तो नेहमी मुकाट्याने मान्य केला आहे. मग तो स्वतःच्या निवडणुकीसंबंधीचा असो, आठव्या एडवर्डच्या पदच्युतीबद्दलचा असो किंवा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासंबंधीचा असो !

व्हिक्टोरिया आणि सातवा एडवर्ड यांच्या कारकीर्दींत उदयाला आलेल्या चर्चिलना ब्रिटिशांचें वैभव कायम राहावें असें सदोदित वाटत असल्यास नवल नाहीं, पण ब्रिटिशांचें साम्राज्य नामशेष होऊं नये असेंसुद्धा त्यांना वाटत होतें. ब्रिटिशांचें साम्राज्य ही भूतलाच्या फार मोठ्या विभागावर शांतता प्रस्थापित करणारी संस्था आहे असें चर्चिलसारख्या साम्राज्यवाद्यांचेंच नव्हे, तर ब्रिटिशांशीं स्पर्धा करणाऱ्या राष्ट्रांचेंसुद्धा मत होतें. एका देशाचें अधिराज्य आणि बाकीचे देश केवळ गुलाम अशी आपल्या साम्राज्याची व्यवस्था नसून, आपल्याला अखेर लोकशाहीची उपासना करणाऱ्या स्वायत्त देशांचें एक विशाल राष्ट्रकुलकुटुंब निर्माण करावयाचें आहे अशी चर्चिल यांची श्रद्धा होती. कारण, ते जसे साम्राज्याचे तसेच लोक-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५८२८ वि: ....
क्रमांक ११७३ नों. दि. २.५.८३



[ जागतिक युद्धाचे विजेते – विन्स्टन चर्चिल – १९४५ ]

शाहीचेसुद्धा कट्टे उपासक आहेत. आयर्लंड आणि बोअर लोक यांच्या स्वायत्ततेच्या मागणीला त्यांनी नेहमीच पाठिंबा दिला होता आणि म्हणूनच, " तुम्ही होतां म्हणूनच आम्ही स्वतंत्र झालों " असे उद्गार आयरिश पुढारी कॉलिन्स याने काढले आणि जनरल बोथा आणि जनरल स्मटस् यांच्यासारखे बोअर पुढारी अखेर त्यांचे परममित्र बनले.

साम्राज्यांतल्या परतंत्र देशांनी लोकशाहीच्या मार्गाने स्वायत्तता संपादन केली पाहिजे, स्वायत्ततेच्या प्राप्तीनंतर लोकशाहीशीं प्रामाणिक राहिलें पाहिजे आणि साम्राज्यांतच राहून राष्ट्रकुलाचें सामर्थ्य वाढविलें पाहिजे असा चर्चिल यांचा आग्रह होता. लोकशाहीच्या नेत्यांत आणि लष्करी अधिकाऱ्यांत उन्माद उत्पन्न होऊं न देणारी आणि राष्ट्रकुलांतील निरनिराळ्या घटकांत एकात्मता उत्पन्न करणारी एक बिनमोल संस्था म्हणूनच ते राजाला मान देत होते--ब्रिटिश मुत्सद्देगिरीच्या प्रतिभाशाली प्रभावामुळे राजा हा लोकशाहीचाच एक प्रमुख घटक बनला होता. आठव्या एडवर्डच्या बाजूने उभे राहिल्यावरसुद्धा राजा हा लोकशाहींतल्या वादांचा विषय होऊं नये याची त्यांनी फार कसोशीने खबरदारी घेतली, कारण तसें झालें असतें तर राजाच्या भोवतीचें मांगल्यच नष्ट झालें असतें ! स्वातंत्र्य-प्राप्तीबरोबर राष्ट्रकुलाच्या बाहेर पडण्याचा निर्धार हिंदी पुढाऱ्यांनी जाहीर केला नसता आणि अठरा पगड जातींचा हा खंडप्राय देश अजून स्वायत्त लोकशाहीला लायक झालेला नाही असें जर चर्चिलना वाटलें नसतें, तर भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीकडे त्यांनी निराळ्या दृष्टीने पाहिलें असतें.

चर्चिल हे रणभूमीचे उपासक असले तरी युद्धपिपासू नाहीत. अंतर्गत यादवी आणि रक्तपात त्यांना नामंजूर असल्यामुळे ते समाजवादाचे कट्टे विरोधक बनले आहेत. आपल्या देशावर आणि साम्राज्यावर प्रहार होत असतां, उच्च मानवी ध्येयांचा अर्थशून्य उच्चार करीत निष्क्रिय राहणाऱ्या पुढाऱ्यांचा ते तिरस्कार करतात. स्वदेशाचा विचार त्यांच्या साम्राज्या-शिवाय चर्चिल करूं शकत नसले, तरी साम्राज्यापेक्षा स्वदेशावर त्यांचें अधिक प्रेम होतें. मातृभूमीसाठी वाटेल तो स्वार्थत्याग करून रक्त सांडायला ते तयार होते म्हणूनच, " आपल्या इतिहासांत या माणसाचें नांव फार ठळक

अक्षरांनी लिहिलें जाणार आहे–तें रक्ताने लिहिलें जाणार नाही अशी खबरदारी घ्या ”–असा इषारा १९१६ सालींच गार्डिनरसाहेबांनी चर्चिल यांचेवरील लेखांत देऊन ठेविला होता.

—१९२९ ते १९३९ या कालखंडांतील ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या निष्क्रियतेमुळे तो क्षण जवळ येत चालला होता––आणि म्हणूनच दिवसेंदिवस चर्चिल बेचैन होत चालले होते !

* * *

## १७

### तह नव्हे, युद्धतहकुबी

स्टॅन्ले बाल्डविन यांचा ब्रिटिशांच्या राजकारणांत १९२२ सालीं उदय झाला आणि त्यानंतरच्या सात वर्षांत हुजूर पक्षाचें नेतृत्व त्यांनी संपादन केलें. १९२९ सालीं रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांच्या नेतृत्वाखाली मजूर पक्ष अधिकारावर आला तरी, १९३१ सालच्या आर्थिक मंदीच्या तडाख्यापुढे एकट्या मजूर पक्षाचा निभाव लागण्यासारखा नसल्यामुळे, हुजूर आणि मजूर पक्षांचें संयुक्त सरकार स्थापन झालें. संयुक्त मंत्रिमंडळांत मॅक्डोनाल्ड पंतप्रधान असले तरी खरी सत्ता बाल्डविन यांच्या हातांत होती. चर्चिल म्हणतात, " जोपर्यंत सत्तेचा लगाम आपल्या हातांत आहे तोपर्यंत पंतप्रधान कोणीहि असला तरी चालेल अशी बाल्डविन यांची वृत्ति होती." १९३१ नंतरच्या काळांत मॅक्डोनॉल्ड शरीराने थकत जाऊन पंतप्रधानकीची जबाबदारी संभाळायला असमर्थ झाल्यामुळे, १९३५ सालच्या जून महिन्यांत संयुक्त सरकारचीं सूत्रें आणि पंतप्रधानकीचीं वस्त्रें त्यांनी बाल्डविन यांजकडे सोपविलीं. हुजूर पक्षाचे एकमेव पुढारी आणि ब्रिटिशांचे पंतप्रधान या नात्याने त्यानंतर आपली कारकीर्द गाजवून १९३७ च्या जून महिन्यांत बाल्डविन-साहेब सेवानिवृत्त झाले. १९२९ ते १९३७ याच कालखंडांत युरोपच्या राजकारणांत आश्चर्यकारक बदल होऊन अखेर त्याचा अखिल भूतलावर अत्यंत भयंकर परिणाम झाला.

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर लष्करी दृष्ट्या बलाढ्य अशीं दोन राष्ट्रें उरलीं, एक फ्रान्स आणि दुसरी अमेरिका. पराभूत जर्मनी दोस्त राष्ट्रांच्या पायदळीं पडला होता. बोल्शेव्हिक क्रांतीनंतर अंतर्गत यादवी आणि दुष्काळामुळे रशिया कमकुवत झाला होता आणि, पुरातन ऑस्ट्रो-

हंगेरियन साम्राज्याचीं छकलें होऊन, झेकोस्लाव्हिया आणि युगोस्लाव्हिया-सारखीं नवीं लहान लहान राष्ट्रें युरोपखंडाच्या नकाशांत दिसूं लागलीं होतीं. युरोप खंडांतल्या सर्व लहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची भिस्त फ्रान्सवर होती. एखाद्या बलाढ्य राष्ट्राने भूतलाला पुनः युद्धाच्या खाईत लोटूं नये आणि सर्व सुप्रवृत्त राष्ट्रांच्या संघटित शक्तीचा आधार छोट्या राष्ट्रांना सतत मिळावा, या हेतूने राष्ट्रसंघाची (लीग ऑफ नेशन्स) स्थापना होऊन त्याच्या सभा जिनेव्हा येथे भरत होत्या. महायुद्धाचा भडका उडविण्यास कारणीभूत झालेल्या जर्मनीच्या आक्रमक लष्करी शक्तीचें पुनरुज्जीवन होऊं नये म्हणून त्याला निःशस्त्र करून, दोस्त राष्ट्रांची युद्धांत झालेली नुकसानी भरून काढण्या-करिता खंडणीचें जबरदस्त ओझें जर्मनीवर लादलें गेलें होतें. पराभूत जर्मनींतील राजेशाही पदच्युत होऊन तेथे लोकशाही सरकार स्थापन झालें होतें.

जर्मनांची कार्यकुशलता, शिस्त आणि रणचातुर्य त्यांच्या पराभवामुळे नष्ट झालें नसल्यामुळे, त्यांच्या लष्करी शक्तीचें, आज ना उद्या, पुनरुज्जीवन होऊन महायुद्धाचा वणवा पुन्हा भडकूं नये अशीच युरोपांतल्या लहान-मोठ्या राष्ट्रांची इच्छा होती. त्यापूर्वींच्या चाळीस वर्षांत जर्मनांनी भडक-विलेल्या दोन युद्धांमुळे फ्रान्सची अतोनात हानि झाली होती. १९१४ सालीं सुरू झालेल्या महायुद्धांत तर फ्रेंचांचा कितीतरी मोठा भूप्रदेश सतत चार वर्षें जर्मन लष्कराच्या टाचेखाली चिरडला होता. जर्मनीच्या भोवतालचीं बेल्जम, हॉलंड, बल्गेरिया आणि रुमानियासारखीं जुनीं आणि झेकोस्लाव्हिया आणि युगोस्लाव्हियासारखीं नवीं राष्ट्रें जर्मन लष्करशाहीच्या पुनरुज्जीव-नाच्या नुसत्या कल्पनेने सुद्धा भयभीत होत होतीं ! जर्मनीची लष्करी शक्ति जर पुनरुज्जीवित झाली, तर महायुद्धांतल्या पराभवाचा बदला घेण्यासाठी ती पुन्हा नव्या युद्धाची सुरुवात करील आणि त्यांत आपल्या स्वास्थ्याचा आणि स्वातंत्र्याचा बळी पडेल असें छोट्या राष्ट्रांना वाटत होतें. आणि म्हणूनच, फ्रान्सच्या मित्रराष्ट्रांचें जर्मनीभोवतीं कडें निर्माण करून, जर्मनांची चोहोकडून नाकेबंदी करण्याची व्यवस्था दोस्तराष्ट्रांनी केली होती. जर्मनांना नुसतें निःशस्त्र करून भागणार नसून, ऱ्हाईन नदीच्या पूर्व किनाऱ्याच्या पलीकडे जर्मनीची पश्चिम सरहद्द हालवून, नदीभोवतालचा भूप्रदेश सतत

फ्रेंच सैन्याने व्यापिला पाहिजे असा दोस्तांचा सरसेनापति मार्शल फॉश याचा आग्रह होता. पण जर्मनीची पश्चिमेकडील सरहद्द ऱ्हाईन नदीच्या पश्चिमेकडे ठेवून फक्त ऱ्हाईन-प्रदेशांत जर्मन लष्कराने केव्हाहि प्रवेश करतां कामा नये इतकीच व्यवस्था तहपरिषदेंतल्या मुत्सद्द्यांनी मान्य केली, तेव्हा फॉशने उद्गार काढले, "हा तह नसून फक्त वीस वर्षांपुरती युद्धतहकुबी आहे!"

जर्मनीची संपूर्ण नाकेबंदी झाली आहे—जर्मन लष्कराने क्षणमात्र हालचाल करायला सुरुवात केली तर त्याची नांगी तत्काळ ठेचतां येईल अशी दोस्त राष्ट्रांची खात्री झाली असली, तरी महायुद्धांत जो असामान्य आणि भयानक संहार झाला होता त्याची आठवण झाली म्हणजे " काय वाटेल तें झालें तरी पुन्हा युद्ध नको " अशी विचारसरणी सर्व देशांत पसरली होती. शांततेचा आणि सुरक्षिततेचा जप सर्वत्र चालू होता. जगाच्या इतिहासांत झालेल्या तत्पूर्वीच्या कोणत्याही युद्धापेक्षा १९१४ सालचें महायुद्ध अतिभीषण होतें—केवळ सैनिकांच्या युद्धाचा काळ संपून, समस्त नागरिकांनी युद्धाच्या खाईत भाजून निघावें अशा कालखंडाची आता सुरुवात झाली होती. विमानांच्या शोधामुळे संहाराचें क्षेत्र वाढलें होतें. शास्त्रीय शोधांमुळे नवीं शस्त्रें आणि अस्त्रें निर्माण होण्याचा समय जवळ आला होता. किचनेरच्या रागालोभाची पर्वा न करतां सुदानच्या लढाईत धावून जाणाऱ्या चर्चिलनी १९२९ सालीं लिहिलें,

" मानवी वंशाच्या संहारकर्त्याचें रूप युद्धाने विसाव्या शतकांत धारण केलें. रणांगणावरील सैनिकांचीच नव्हे, तर सबंध देशाची उपासमार करण्याचीं साधनें उपलब्ध झालीं. युद्धाच्या ज्वालांपासून नेहमी सुरक्षित राहणाऱ्या स्त्रिया, म्हातारे, लहान मुलें आणि व्याधिग्रस्तांची सुद्धा कत्तल करण्याचा मार्ग विमानांनी उपलब्ध करून दिला. महायुद्धाच्या पहिल्या चार वर्षांत जें घडलें ती पांचव्या वर्षासाठी केलेल्या योजनांची केवळ नांदीच होती असें म्हटलें पाहिजे. १९१९ सालीं जर जर्मनांची प्रतिकारशक्ति शिल्लक उरली असती तर दोस्तांच्या हजारो विमानांनी त्यांच्या नगरांच्या नायनाट केला असता, हजारो तोफांनी त्यांची आघाडी उद्ध्वस्त केली असती आणि विषारी धुराने त्यांचें जीवन असह्य करून टाकलें असतें!

" महायुद्ध जितक्या आकस्मिक रीतीने सुरू झालें होतें तितक्याच

आकस्मिकतेने थांबलें—१९१९ सालच्या संकल्पित लढाया कराव्या लागल्या नसल्या तरी त्या वेळीं लाविलेले संहारक शोध आणि आखलेल्या योजना प्रत्येक राष्ट्राने भावी युद्धासाठी जतन करून ठेविल्या आहेत. १९१९ सालीं जीं शस्त्रास्त्रें वापरलीं गेलीं असतीं त्यांपेक्षाहि अधिक संहारक अशीं शस्त्रास्त्रें यानंतर होणाऱ्या युद्धांत वापरलीं जातील. भविष्य काळांतल्या युद्धांत यच्चयावत् सर्व नागरिकांना भाग घ्यावा लागेल, प्रत्येकाला आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल आणि शत्रूचा प्रहार प्रत्येकाला सहन करावा लागेल. आपलें अस्तित्व धोक्यांत आहे असें ज्या राष्ट्राला वाटेल तें राष्ट्र, स्वतःचें अस्तित्व टिकविण्यासाठी, अवश्य त्या कोणत्याहि शस्त्राचा आणि मार्गांचा अवलंब करील अशी शक्यता आहे, नव्हे हें निश्चितच समजलें पाहिजे, की त्या वेळीं अमर्याद संहाराचीं अशीं शस्त्रें निर्माण झालेलीं असतील की, तीं एकदा उपयोगांत आणलीं म्हणजे त्यांना आवरणेंसुद्धा शक्य होणार नाहीं !

" मनुष्यजात अशा स्थितींत कधीच सापडली नव्हती ! सद्‌गुणांची वाढ होणें किंवा अधिक चतुर अशा मार्गदर्शनाचा लाभ होणें तर दूरच राहिलें, पण स्वतःचाच सर्वनाश करण्याचीं हत्यारें मात्र तिने संपादन केलीं आहेत. माणसाच्या बुद्धिचातुर्याने, यशाने आणि कष्टांनी शेवटी ही मजल गाठली आहे ! या वेळीं आपल्या जबाबदारीचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे. मानवाची सेवा करायला, मानवाचा जथाबंद संहार करायला, उरल्यासुरल्या संस्कृतीचा अखेरचा नायनाट करायला मृत्यु हा एखाद्या आज्ञाधारक आणि उत्सुक सेवकाप्रमाणे आपल्यासमोर उभा आहे——माणसाच्या त्या शेवटच्या हुकमाची तो वाट पाहतो आहे. "

हा लेख चर्चिल यांनी १–१–१९२९ रोजीं लिहिला. ते म्हणतात, " सर्वनाशापासून सुक्तता होण्याकरिता किंवा आक्रमकांचा प्रतिकार करण्याकरिता शस्त्रबलाचा उपयोग करायला मी सतत सिद्ध होतों. परंतु, पहिल्या महायुद्धानंतर मीं जें जें केलें आणि बोललों त्याचा दुसरें महायुद्ध टाळावें आणि तो भयानक प्रसंग उद्भवलाच तर आम्हीं यशस्वी व्हावें—निदान नामशेष तरी होऊं नये, हा एकच हेतु होता. "

* * *

**हिटलरचा उदय :**

“ पुन्हा युद्ध नको ” असें चर्चिलना वाटत होतें, तर इतरांना युद्धाची किती धास्ती वाटत असेल त्याची कल्पनाच करावी ! १९३४ सालपर्यंत तरी दोस्त राष्ट्रांच्या सामर्थ्याला कोणीहि आव्हान देऊं शकत नव्हतें आणि त्यामुळे युद्धाचा संभव शक्य वाटत नव्हता. परंतु जर्मनीचा पराभव झाला असला तरी प्रत्यक्ष जर्मनांच्या भूमीवर युद्ध झालें नसल्यामुळे त्यांचे सर्व कारखाने शाबूत होते. रणांगणावर पराभव होण्यापूर्वी शरणागती पत्करल्यामुळे जर्मन सेनाधिकाऱ्यांची खुमखुमी शिल्लक होती. आपल्याला निःशस्त्र केलें, आपल्या देशाचे लचके तोडले आणि जबरदस्त खंडणी द्यावयास आपल्याला भाग पाडलें याचें त्यांना वैषम्य वाटत होतें. पुन्हा युद्ध नको म्हणून निःशस्त्रीकरणाचे गोडवे गाण्याची सुरुवात राष्ट्रसंघांत झाली त्या वेळीं चर्चिल यांनी सांगितलें, “ जेत्यांनी शस्त्रत्याग करण्यापूर्वी पराजितांच्या तक्रारी दूर केल्या पाहिजेत. ” १९२९ सालानंतर जर्मनांनी पुन्हा गुप्त रीतीने शस्त्रनिर्मितीची सुरुवात केली आहे हें स्पष्ट झालें होतें. परंतु तत्पूर्वी युरोपखंडाच्या भानगडींपासून अलिप्त राहण्याचें धोरण अमेरिकेने स्वीकारलें, फ्रान्सच्या लोकशाही कारभारांतल्या मंत्रिमंडळांच्या अस्थिरतेमुळे इतर महत्त्वाच्या घटनांकडे लक्ष द्यावयाला फ्रेंच मुत्सद्द्यांना सवड सापडेनाशी झाली आणि इंग्लंडचे मॅक्डोनॉल्ड यांनी तर शांततेच्या सहस्रनामाचाच जप चालविला ! १९३१ सालीं इंग्लंडवर कोसळलेल्या आर्थिक संकटामुळे शस्त्रास्त्रांत कपात करून खर्चांत बचत करणें त्यांना अपरिहार्य वाटूं लागलें. त्या वेळीं चर्चिल म्हणाले, “ जर्मनांच्या तक्रारी दूर करण्यापूर्वी जर त्यांना सशस्त्र बनूं दिलें, तर नव्या युद्धाची सुरुवात झाल्याशिवाय राहणार नाही ! ”—युद्धाची भीति आणि शांततेचा उदोउदो या भावनांच्या आहारीं गेलेल्या मुत्सद्द्यांचा सुळसुळाट झाला असतांनाच, ॲडॉल्फ हिटलर या नांवाचा एक पुढारी जर्मनींत उदयाला आला !

युद्धाच्या भीतीमुळे सांप्रतच्या परिस्थितींत आपला हात धरायला ब्रिटन किंवा फ्रान्स यांपैकी कोणतेंहि राष्ट्र सिद्ध होणार नाही, हा अचूक अंदाज बांधून हिटलरने जर्मनीच्या शस्त्रीकरणाची झपाट्याने सुरुवात केली.

महायुद्धांतल्या पराभवाची बदनामी पुसून टाकून, राष्ट्रांच्या मेळाव्यांत पुन्हा एकदा मानाचें स्थान संपादन करायला उद्युक्त असलेल्या जर्मन जनतेची एकजूट हिटलरच्या पाठीशीं उभी होती. त्या परिस्थितीला उद्देशून चर्चिल म्हणाले, " हिटलर ही जर्मन राष्ट्राची प्रेरक शक्ति आहे. आम्ही दिवसें-दिवस असमर्थ बनत चाललों असून, आमच्या असमर्थतेचा काळ हा युरोपखंडाच्या संकटाचा काळ समजला पाहिजे. " हिटलरने जर्मनांचें वैमानिक सामर्थ्य वाढवायला सुरुवात केली आहे हें निश्चित झालें तेव्हा चर्चिलनी इषारा दिला, " १९१४ सालीं आमचें आरमार आमचें सर्वतो-परीने संरक्षण करूं शकत होतें. परंतु, अंतरिक्षांतील युद्धाला जन्म देणाऱ्या भयानक शोधामुळे आमच्या परिस्थितींत जमीन–अस्मानाचा फरक पडला आहे. वीस वर्षांपूर्वीं आपलें रक्षण समुद्र करीत होता. लढाऊ विमानांच्या शोधामुळे आता ती सुरक्षितता राहिली नसल्यामुळे, आमच्यावर हल्ला करूं शकेल अशा कोणत्याहि राष्ट्रापेक्षा आमचें वैमानिक सामर्थ्य मोठें असलें तरच आमचा निभाव लागेल ! "

मॅक्डोनॉल्ड आणि बाल्डविन यांनी चर्चिल यांचे अंदाज आणि माहिती चुकीची आहे असें पार्लमेंटच्या सभासदांना सांगितलें, तर मजूर पक्षाचे पुढारी, मेजर ॲटली, यांनी तर शाही विमानदलांत पांच वर्षांत आठशे-वीस विमानांची भरती करण्याच्या चिमुकल्या कार्यक्रमालासुद्धा विरोध केला ! सध्या चालू आहे त्या हिशेबाने १९३६ सालीं जर्मनीचें वैमानिक सामर्थ्य आमच्या दीडपट आणि १९३८ सालीं दुप्पट होईल या चर्चिल यांच्या भाकिताची बाल्डविन-मॅक्डोनॉल्ड या जोडीने १९३४ सालीं चेष्टा केली असली, तरी " जर्मनीचें वैमानिक सामर्थ्य आता आमच्या बरोबरीचें झालें असून, या पूर्वींची आमची माहिती चुकीची होती " अशी कबुली बाल्डविन यांना १९३५ सालीं द्यावी लागली. चर्चिल म्हणतात, " गोड आणि मऊ शब्दांच्या योजनेंत आनंद वाटणें, अप्रिय अशा घटनांकडे डोळेझाक करणें, राष्ट्राच्या हिताकडे दुर्लक्ष करून सवंग लोकप्रियता आणि निवडणुकींतील यशाची हाव धरणें, शांततेचा प्रामाणिक ध्यास, प्रेमाच्या पायावरच शांतता नांदूं शकते असा केविलवाणा विश्वास आणि या सर्वांच्या पाठीशीं उभें असलेलें पार्लमेंटमधील निर्विवाद बहुमत––ब्रिटिशांच्या कमकुवत-

पणाचें हें चित्र होतें. हे लोक लबाड नसले तरी अपराधी होते. वैमानिक सामर्थ्यासारख्या राष्ट्राच्या जीवनमरणाच्या बाबतींत माझीं विधानें आणि अंदाज खरे ठरले असूनसुद्धा, त्यांचा पार्लमेंटवर आणि राष्ट्रावर यत्किंचित-सुद्धा परिणाम होऊं नये हा अनुभव अतिशय तापदायक होता. त्यानंतरच्या सार्वत्रिक निवडणुकींत बाल्डविनसाहेबांच्या हुजूर पक्षाला इतर सर्व पक्षांच्या एकत्रित मतांपेक्षा अधिक मतें मिळालीं. आमच्या इतिहासांतल्या सर्वांत अनिष्ट अशा सरकारच्या सर्व चुकांचा आणि अवगुणांचाच, जणू काय, मतदारांनी गौरवच केला!"

* * *

**बाल्डविन यांची निष्क्रियता :**

मतदारांचा असा कौल मिळाल्यामुळे बाल्डविनसाहेबांना त्यांच्या शांततेच्या आणि निष्क्रियतेच्या धोरणाच्या अचूकतेसंबंधी खात्री वाटूं लागली असल्यास नवल कोणतें? निवडणुका जिंकण्याच्या तंत्रांत बाल्डविन अतिशय वाकबगार होते. "शस्त्रास्त्रांची वाढ मी करणार नाहीं आणि युद्ध होऊं देणार नाहीं" हें त्यांनी मतदारांना दिलेल्या वाचनांचें पालुपद होतें. निवडणूक जिंकल्यानंतर त्यांनी सांगितलें, "युद्धाचा धोका पत्करून-सुद्धा आम्ही राष्ट्राला सुसज्ज करण्यासाठी शस्त्रास्त्रांत वाढ करूं असें जर मीं सांगितलें असतें, तर आम्ही निवडणूक हरलों असतों!" चर्चिल म्हणतात, "केवळ एका निवडणुकींतील यशासाठी राष्ट्राच्या सुरक्षितते-संबंधीचें महान् कर्तव्य बाल्डविन यांनी बजाविलें नाही, असाच याचा अर्थ नाही का?"

निवडणुकीच्या पूर्वी इटालीचा हुकुमशहा बेनीटो मुसलोनी याने अबि-सीनिया देशावर हल्ला केला, त्या वेळीं मात्र राष्ट्रसंघांत त्याचे विरुद्ध पन्नास राष्ट्रांची आघाडी उभारून त्याजवर आर्थिक बहिष्कार घालण्याचें भरपूर नाटक ब्रिटिश सरकारने केल्यामुळे, तसाच प्रसंग आला तर आपलें सरकार कच खाणार नाही असा देखावा निर्माण करून मतदारांना संतुष्ट करण्यांत आलें. परंतु, वास्तवांत मात्र तो बहिष्कार केवळ नाममात्र ठरून मुसलोनीने अखेर असहाय अबिसीनिया पादाक्रांत केला!

आबिसीनियाच्या बाबतींत बाल्डविन यांनी जें धोरण आखलें आणि ज्या धोरणाला फ्रेंच मुत्सद्द्यांनीसुद्धा साद दिली, त्याचा जागतिक राजकारणावर फार वाईट परिणाम झाला! पहिल्या महायुद्धांत इटाली हा दोस्तांच्या बाजूचा होता व त्यामुळे जर्मनीला आपल्या दक्षिणेकडील आघाडी संभाळावी लागत होती. बाल्डविन यांनी अमलांत न आणलेलें पण उद्‌घोषित केलेलें आर्थिक बहिष्काराचें धोरण पाहून, मुसलोनी आपोआप हिटलरच्या गळ्यांत पडला आणि त्यामुळे रोम–बर्लिन गट्टी निर्माण झाली! इटालीने ॲबिसीनियावर घाला घातला असूनहि बाकीचीं राष्ट्रें स्वस्थ बसल्यामुळे, राष्ट्रसंघाच्या इभ्रतीला फार मोठा धक्का बसून सामुदायिक आणि संघटित संरक्षणाच्या घोषणा म्हणजे एक अर्थशून्य बकवा ठरला. सर्वांत महत्त्वाचा परिणाम असा, की तहाच्या सर्व अटी झुगारून देऊन आपण काय वाटेल तें केलें तरी दोस्त राष्ट्रें स्वस्थ राहतील, असा ठाम विश्वास त्यामुळेच हिटलरच्या मनांत उत्पन्न झाला.

जर्मनीचें शस्त्र-सामर्थ्य दिवसेंदिवस वाढून सबंध राष्ट्रालाच एखाद्या सैनिकांच्या छावणीचें स्वरूप प्राप्त होत चाललें होतें. महायुद्धांतील पराभवाचा कलंक पुसून काढण्याच्या महत्त्वाकांक्षेने जर्मन जनता आणि लष्कर प्रज्वलित झालें होतें. त्या परिस्थितीसंबंधी बोलतांना पार्लमेंटांत चर्चिल म्हणाले, “सशस्त्र आणि खंबीर मनाच्या दुष्टपणापुढे सुप्रवृत्त पण कमकुवत आणि निष्क्रिय उद्दिष्टांचा कधीहि टिकाव लागणार नाही! शांततेवरील तुमचें प्रेम कितीहि प्रामाणिक असलें, तरी त्याच्यासाठी लक्षावधि अज्ञ आणि भाबड्या जीवांना अखेर महायुद्धाच्या खाईत लोटणें कधींहि समर्थनीय ठरणार नाही. संहाराच्या भीतीमुळे युद्ध लांबणीवर टाकलें तरी तें टळणार नाही— दरम्यानच्या काळांत शत्रु अधिकाधिक प्रबळ बनेल, आपले मित्र त्याच्या पंखाखालीं जातील किंवा आपल्याला पारखे होतील. सुप्रवृत्त पण कमकुवतांच्या मजलशींतल्या टाळ्यांचा आवाज आस्ते आस्ते लुप्त होतो, मतांच्या मोजणींतला अर्थ नाहीसा होतो––कारण, विनाशकाल एकएक पावलाने पुढे सरकत असतो!”

लोकशाहींतील पक्षोपपक्षांच्या भांडणामुळे फ्रान्समध्ये एकहि मंत्रिमंडळ स्थिर राहात नाही आणि आहे ती परिस्थिति शांततेच्या नांवाखालीं

कायम ठेवण्यांत ब्रिटिश मुत्सद्दी गर्क आहेत असें पाहून, ७ मार्च १९३६ रोजीं, हिटलरने आपल्या फौजा ऱ्हाईन नदीच्या प्रदेशांत घुसवून त्याचा ताबा घेतला !

* * *

## संरक्षणाकडे दुर्लक्ष :

जर्मन राष्ट्राची लष्करी तयारी प्रत्यही किती प्रचंड प्रमाणावर वाढते आहे त्याचे बोलके आकडे चर्चिल पार्लमेंटांत वारंवार प्रकट करीत होते, पण त्याचा कांहीहि उपयोग होत नव्हता. पहिल्या महायुद्धामुळे जनतेच्या आणि पुढाऱ्यांच्या मनांत युद्धासंबंधीची दहशत निर्माण झाली होती आणि येनकेन प्रकारेण शांतता टिकविण्याच्या मृगजळाच्या नादीं हुजूर पक्षाचे प्रमुख पुढारी लागले होते. सुप्रसिद्ध मुत्सद्दी जॉर्ज लॅन्सबरी याने तर हिटलरला शस्त्रकपातीची सूचना करण्यापूर्वी त्याच्या शेजाऱ्यांनी अगोदर शस्त्रकपात केली पाहिजे असें मत प्रदर्शित केलें, आणि वैमानिक सामर्थ्यांत वाढ करण्यासंबंधीच्या चर्चिल यांच्या सूचनेची " कोणताहि जबाबदार मुत्सद्दी अशी भाषा वापरणार नाही, " या शब्दांत संभावना केली ! त्या वेळीं चर्चिल यांनी इषारा दिला, " असा एक प्रसंग येईल, असा एखादा मुद्दा निर्माण होईल, की त्या वेळीं आपल्याला लढावें लागेल असें भविष्य मी आजच वर्तवितों--आणि त्या वेळीं एकाकी लढायची पाळी आपल्यावर येऊं नये अशी परमेश्वराची प्रार्थना करतों ! "

हिटलरने ऱ्हाईन प्रदेशाचा कबजा घेतला त्या वेळीं फ्रान्समध्ये बरीच चलबिचल झाली. पण, " हिटलरने स्वतःच्याच प्रदेशाचा कबजा घेतला, यांत त्याने वावगें असें काय केलें ? " ही विचारसरणी फ्रान्स आणि इंग्लंडमध्ये अधिक प्रभावी ठरली. १९१४ सालच्या महायुद्धांत फ्रान्सचे पंधरा लक्ष सैनिक मारले गेल्यामुळे, फ्रेंचांना सुद्धा युद्ध शक्यतो टाळावें असें वाटत होतें. ऱ्हाईन नदीची मर्यादा ओलांडून हिटलर पश्चिमेकडे पुढे सरकल्यामुळे संभाव्य युद्धाच्या स्वरूपांत फरक पडणार आहे असें चर्चिल यांचें मत होतें. " आपल्या पश्चिम सरहद्दीवर हिटलरने अभेद्य अशी तटबंदी उभारली तर युद्धकाळांत फ्रेंच सैन्याच्या प्रगतीला पायबंद बसेल आणि

हिटलरचें फार मोठें सैन्य मोकळें होऊन, बेल्जम आणि हॉलंडच्या मार्गानें तें फ्रान्सवर हल्ला करूं शकेल. आपल्या पश्चिमेकडील भिंतीच्या आश्रयानें हिटलरला पोलंड, झेकोस्लाव्हिया, युगोस्लाव्हिया, ऑस्ट्रिया आणि रुमानिया या छोट्या राष्ट्रांत मनमानेल तसा धुमाकूळ घालतां येईल," असा अंदाज चार्चिल यांनी व्यक्त केला.

चार्चिल यांच्या अंदाजांकडे ब्रिटिश मुत्सद्द्यांनी दुर्लक्ष केलें, तरी हिटलरने ऱ्हाईन प्रदेशाचा ताबा घेतला या घटनेचा परिणाम मतदारांवर आणि पार्लमेंटमधील त्यांच्या प्रतिनिधींवर झाल्याशिवाय राहिला नाही. जर्मनीने तहाच्या अटी झुगारून दिल्या आहेत, जर्मनीची शस्त्रसिद्धता वाढते आहे आणि तिच्या आक्रमक धोरणाचा प्रतिकार करायला दोस्त राष्ट्रें कचरत आहेत ही परिस्थिति स्पष्ट झाली होती. त्याच वेळीं, "शस्त्रास्त्रांच्या वाढीचा मीं प्रचार केला असता तर आमचा पक्ष निवडणुकींत पराभूत झाला असता" अशी कबुली बाल्डविनने दिल्यामुळे, त्याच्या एकंदर धोरणासंबंधी मतदार नाखूष झाले होते. चार्चिल यांच्या भाषणांचें महत्त्व वाढत चाललें होतें आणि हिटलरच्या आक्रमक धोरणाचा प्रतिकार करण्याची कांहीतरी योजना सरकारला करावी लागणार असा रंग दिसूं लागला होता. इतक्यांत आठव्या एडवर्ड बादशहाच्या संकल्पित विवाहाचें प्रकरण निर्माण होऊन, ब्रिटिश मतदारांच्या आणि मुत्सद्द्यांच्या दृष्टीने बाकीच्या सर्व प्रश्नांना दुय्यम महत्त्व प्राप्त झालें! आठव्या एडवर्डच्या प्रकरणांतील वाद, त्याचा राज्यत्याग आणि सहाव्या जॉर्जचें राज्यारोहण अशा अंतर्गत घटनांत ब्रिटिश राष्ट्र गुंतल्यामुळे, १९३७ साल उजाडलें तरी त्याने आंतरराष्ट्रीय परिस्थितीची फारशी दखल घेतली नाही. सहाव्या जॉर्जच्या राज्यारोहणानंतर आपलें अवतारकार्यच, जणू काय, संपलें अशा श्रद्धेने बाल्डविन यांनी पंतप्रधानकीचा राजीनामा देऊन, त्या स्थानावर हुजूर पक्षीय मुत्सद्दी, नेव्हिल चेंबरलेन यांची, २८ मे १९३७ रोजीं, स्थापना केली!

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वामित.
अनुक्रम ३४८८० वि:
क्रमांक नों दि. २-१-६३

# १८

## हिटलरचीं उद्दिष्टें

" व्हाईन प्रदेशाचा ताबा घेतल्यानंतर पुढे काय ? "–या प्रश्नाचें उत्तर हिटलराशिवाय कोणालाहि माहीत नव्हतें. कांही महिने गेले, एक वर्ष लोटलें आणि दुसरें वर्षसुद्धा संपत आलें तरी तो स्वस्थच होता. पण बाह्यात्कारी स्वस्थ असला तरी अंतिम युद्धाच्या दृष्टीने–जर्मनीचें गतवैभव पुन्हा संपादन करणाऱ्या युद्धाच्या दृष्टीने–त्याची तयारी चालू होती.

महायुद्धांत जर्मनीने जो प्रदेश घालविला तो प्रदेश परत मिळवायचा आणि युरोपांतील सर्व जर्मनांचें एका छत्राखाली एकीकरण करावयाचें, हें धोरण हिटलरने जाहीर केलें होतें. ऑस्ट्रिया हा प्रदेश ऐतिहासिक दृष्ट्या सर्वस्वी जर्मनांचा असल्यामुळे, त्याचें आणि जर्मनीचें एकीकरण झालेंच पाहिजे ही त्याची प्रतिज्ञा होती. व्हर्सायच्या तहाने निर्माण केलेला निराळा आणि स्वतंत्र ऑस्ट्रिया त्याच्या डोळ्यांत एकसारखा खुपत होता ! झेकोस्लाव्हियांतील सुडेटन विभागांतसुद्धा बहुसंख्य जर्मनांचा भरणा असल्यामुळे, तो भाग जर्मनीला जोडला जावा अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. ऑस्ट्रिया आणि झेकोस्लाव्हियाचा सुडेटन विभाग जर्मनीशीं संलग्न झाला म्हणजे आपल्या सर्व महत्त्वाकांक्षा पूर्ण झाल्या असें तो सांगत असे. हिटलरचीं हीं उद्दिष्टें सकृद्दर्शनीं दिसतात तितकीं सोवळीं नव्हतीं !

फ्रेंचांच्या सैन्याला पूर्वेकडून जर्मनींत प्रवेश करतां येऊं नये म्हणून आपल्या पश्चिमेच्या सरहद्दीवर अभेद्य अशी तटबंदी तयार करावयाच्या योजनेची सुरुवात हिटलरने १९३६ सालीं केली होती. सर्व जर्मनांच्या एकीकरणाच्या मिषाने त्याने ऑस्ट्रिया गिळंकृत केला म्हणजे झेकोस्लाव्हिया-वर हल्ला करणें त्याला सोपें होणार होतें आणि झेकोस्लाव्हिया पचविला

म्हणजे पूर्व युरोपांतलीं सर्व छोटीं राष्ट्रें त्याच्या पकडींत सापडणार होतीं. पहिल्या महायुद्धानंतर दोस्त राष्ट्रांनी जर्मनीभोवती छोट्या राष्ट्रांचें जें कोंडाळें निर्माण केलें होतें त्याचा भेद करण्याची योजना हिटलरने निश्चित केली होती. परंतु, फ्रेंचांचें सैन्य थोपवून धरील अशी तटबंदी आपल्या पश्चिम सरहद्दीवर तयार होण्यापूर्वी छोट्या राष्ट्रांविरुद्ध हात उगारायचा उतावळेपणा त्याला करायचा नव्हता.

हिटलरशीं मुकाबला करूं शकेल असें फ्रान्सखेरीज युरोपखंडांत आणखी एकच बलाढ्य राष्ट्र होतें—सोव्हिएट रशिया! परंतु, बोल्शेव्हिक क्रान्तीच्या वेळीं आणि त्यानंतरहि रशियांत जे अत्याचार झाले आणि त्याचप्रमाणे रशियन हेरांच्या आणि बगलबच्चांच्या चिथावणीमुळे युरोपांतील लहानमोठ्या राष्ट्रांत समाजवादाच्या नांवाखाली ज्या कटकटी होत होत्या, त्यामुळे रशियाशीं सुखासुखी हातमिळवणी करायला युरोपांतलीं राष्ट्रें तयार नव्हतीं. अशा परिस्थितींत युरोपांतल्या सर्व स्वतंत्र छोट्या राष्ट्रांना फक्त फ्रेंचांचाच आधार वाटत होता आणि जर्मनीभोवती निर्माण केलेल्या छोट्या राष्ट्रांचा फ्रेंचांनासुद्धा आधार वाटत होता. पण १९२९ सालापासून, युद्धाच्या भीतीमुळे, शस्त्रकपातीचा जो दिव्य संदेश राष्ट्रसंघाच्या व्यास-पीठावरून दिला जात होता त्याचा फ्रेंचांनी सन्मान आणि जर्मनीने अवमान केल्यामुळे, फ्रेंचांच्या लष्करी सामर्थ्यापेक्षा जर्मनीचें सामर्थ्य वाढणार ही स्थिति स्पष्ट झाली होती.

१९१९ सालीं निःशस्त्र केलेलें पण आक्रमक वृत्तीचें लढाऊ जर्मन राष्ट्र लवकरच युरोपांतलें सर्वांत प्रबळ राष्ट्र होणार, ही संभवनीयता ब्रिटिशांच्या भविष्याच्या दृष्टीने चर्चिल यांना बेचैन करीत होती. ब्रिटिशांच्या परंपरागत परराष्ट्रीय राजकारणासंबंधी चर्चिल म्हणतात, "युरोपांतील सर्वांत बलाढ्य आणि आक्रमक राष्ट्राचा प्रतिकार करून, विशेषतः बेल्जम आणि हॉलंड हे देश त्याच्या कबजांत जाऊं नयेत हीच आमच्या परराष्ट्रीय राजकारणाची चारशे वर्षांची परंपरा होती. त्याच राजनीतीच्या सिद्धीसाठी आम्हीं स्पेनचा पहिला फिलीप, फ्रान्सचा नेपोलिअन आणि जर्मनीचा कैसर यांच्याशी युद्ध केलें होतें."—ब्रिटिशांच्या या परराष्ट्रीय धोरणाचें स्वरूप आक्रमक नसून संरक्षक होतें. कारण, युरोपांतल्या सर्वांत बलाढ्य राष्ट्राला जर बेल्जम

आणि हॉलंडचा कबजा मिळाला, तरच त्यानंतर त्याच्या सैन्याला इंग्लंडवर झडप घालणें शक्य झालें असतें. परंतु, लष्करीदृष्ट्या ब्रिटन जोपर्यंत कमकुवत आहे तोंपर्यंत त्याच्या परराष्ट्रीय राजकारणाचा कांही उपयोग नव्हता. कारण, चार्चिल म्हणतात, " ज्या परराष्ट्रीय धोरणाच्या पाठीशीं लष्करी सामर्थ्य नाही आणि तें सामर्थ्य संपादन करण्यासाठी अवश्य तो त्याग करण्याची राष्ट्राची तयारी नाही असें परराष्ट्रीय धोरण कुचकामाचेंच समजलें पाहिजे ! "

पण पंतप्रधान चेंबरलेनसाहेबांचा मात्र हिटलर आणि त्याचा साथी मुसलोनी यांच्या सद्बुद्धीवर संपूर्ण विश्वास होता––हिटलर आणि मुसलोनीशीं खुल्या दिलाने वाटाघाटी करून त्यांची मैत्री संपादन करतां येईल असें त्यांना प्रामाणिकपणाने वाटत होतें !

याच कालखंडांत इंग्लंडांतला जर्मनीचा वकील, रिबेन्ट्रॉफ, याची चार्चिल यांजबरोबर मुलाखत झाली. चर्चिल यांना मंत्रिमंडळांत स्थान नसलें आणि हुजूर पक्षाचे पुढारीसुद्धा त्यांना महत्त्व देत नसले, तरी इंग्लंडच्या प्रतिकारशक्तीचें ते प्रतीक आहेत याची रिबेन्ट्रॉफला जाणीव असावी. चर्चिल यांची एकदा समजूत घातली म्हणजे हिटलरच्या कार्यक्रमांत ब्रिटिशांकडून कोणताहि अडथळा येणार नाही ही त्याची खात्री होती. ' ब्रिटिश साम्राज्याच्या सुरक्षिततेची आम्ही हमी घेतों–त्याच्या मोबदल्यांत आम्हांला युरोपांत मुक्तहस्त लाभूं द्या " अशी सूचना रिबेन्ट्रॉफने केली. ती चर्चिलना मान्य नसल्याचें पाहून तो म्हणाला, " असें जर झालें नाही, तर युद्ध अटळ आहे ! " तेव्हा चर्चिल म्हणाले, " इंग्लंडला तुम्ही कमी लेखूं नका. इंग्लंड अत्यंत हुषार आहे––तुम्ही जर आमच्या विरुद्ध युद्ध सुरू केलें तर आम्ही सबंध जगाला तुमच्यासमोर उभें करूं हें लक्षांत ठेवा ! "

* * *

**ऑस्ट्रियाच्या बळी :**

हिटलरची तयारी आता पूर्ण होत आली होती. पश्चिम सरहद्दीवरील तटबंदीचें काम पूर्ण झालें नसलें तरी संपत आलें होतें. ऑस्ट्रियांतील

जर्मनांना चिथावणी देऊन ते प्रस्थापित सरकारविरुद्ध उठावणी करतील अशी व्यवस्था त्याने केली होती. एकेकाळीं ऑस्ट्रियन सरकारला मुसलोनीच्या मदतीचा फार आधार वाटत होता, पण आता तो आधार नाहीसा झाला होता. १९३८ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत ऑस्ट्रिया आणि झेकोस्लाव्हिया या छोट्या राष्ट्रांबद्दल वाटत असलेली चिंता चर्चिल यांनी पार्लमेंटांत व्यक्त करून कांही दिवस लोटतात न लोटतात, तोंच हिटलरने आपलें सैन्य ऑस्ट्रियांत घुसविलें आणि, रक्ताचा एक थेंबहि न सांडतां, तो देश तिसऱ्या जर्मन साम्राज्यांत सामील करून टाकला! १९३८ सालच्या मार्च महिन्याची ती १३ तारीख होती! सर्व कारभार एका दिवसांत आटोपला!

ऑस्ट्रियावरील त्या बलात्काराच्या दुसऱ्याच दिवशीं पार्लमेंटांत बोलतांना चर्चिल म्हणाले, " आणखी दोन वर्षांनी फ्रेंचांच्या सैन्यापेक्षा जर्मनांचें सैन्य संख्येने वाढलें आणि सर्व छोट्या राष्ट्रांनी नाझी सत्तेला अभिवादन करण्यासाठी राष्ट्रसंघांतून पळ काढला, म्हणजे आपण कोणत्या परिस्थितींत लोटले जाऊं त्याचा विचार करा. "

* * *

**शांततापूजक चेंबर्लेन :**

ऑस्ट्रियाचा आपण जबरदस्तीने कबजा घेतला तरी राष्ट्रसंघाने किंवा दोस्त राष्ट्रांनी यत्किंचितहि हालचाल केली नाही असें पाहून, हिटलरचा आत्मविश्वास अधिकच वाढून झेकोस्लाव्हियाचा सुडेटन विभाग बळजबरीने कब्जांत घ्यावयाला तो उतावीळ झाला. १९३८ सालच्या मे महिन्यांत सुडेटन विभागांत आपलें लष्कर घुसविण्याची त्याने योजना आखली, पण त्याच्याच सेनाधिकाऱ्यांच्या विरोधामुळे हिटलरने ती स्थगित केली. जर्मनांनी ऑस्ट्रिया पादाक्रान्त केल्यामुळे झेकोस्लाव्हियाची सरहद्द एका बाजूने उघडी पडली होती, पण त्या राष्ट्राची सेना सुसज्ज होती आणि त्याच्या इतर सरहद्दीवरच्या तटबंदीचा भेद करण्याकरिता हजारो जर्मन सैनिकांचा बळी द्यावा लागला असता. ऱ्हाईन प्रदेश आणि ऑस्ट्रिया जर्मनांनी पादाक्रांत केला त्या वेळीं इंग्लंड आणि फ्रान्स हीं राष्ट्रें स्वस्थ राहिलीं असलीं, तरी झेकोस्लाव्हियाच्या संरक्षणासाठी तीं युद्ध पुकारतील आणि झेकांच्या

संरक्षणासाठी रशियासुद्धा रणांगणावर उतरेल अशी हिटलरच्या सेनाधिकाऱ्यांची खात्री होती. फार तर वैमानिक वर्चस्व सोडून, इतर सर्व बाबतींत जर्मनीचें सामर्थ्य अपुरें पडेल असा त्यांचा अंदाज असल्यामुळे, हिटलरने युद्धाऐवजी मुत्सद्देगिरीच्या आघाडीवर जय मिळविण्याचा बेत निश्चित केला.

युरोपांतील परिस्थितीसंबंधांत ऑगस्ट १९३८ मध्ये आपल्या मतदारांसमोर भाषण करतांना चर्चिल म्हणाले, " हिटलरने आपले पंधरा लक्ष सैनिक युद्धाच्या उद्दिष्टाने गोळा केले आहेत. अत्यंत झपाट्याने एखादे उद्दिष्ट साधण्याचा त्याचा विचार असल्याखेरीज त्याने अशी तयारी केली नसती. युरोपांतली एकंदर परिस्थिति निर्णायक क्षणाकडे वेगाने लोटली जात असून, तो क्षण फार दूर आहे असेंसुद्धा मला वाटत नाही. "

झेकोस्लाव्हियाचा उघड्या डोळ्यांनी बळी दिला, तर युरोपांतल्या सर्व छोट्या राष्ट्रांचा आपल्यावरील विश्वास उडून हिटलरविरुद्ध एकजूट करण्याची शक्यता कायमची नाहीशी होईल, म्हणून झेकोस्लाव्हियाच्या रक्षणासाठी युद्ध करण्याची फ्रेंचांची तयारी होती—पण चेंबरलेनसाहेब मात्र अजूनहि शांततामय वाटाघाटींच्या नादीं लागले होते. चर्चिल म्हणतात, " त्या वेळीं आमचें परराष्ट्रीय धोरण सर्वस्वीं चेंबरलेन यांच्या हातांत होतें. एक मनुष्य–आणि तो एकच मनुष्य इंग्लंडचा कारभार चालवीत होता ! "

हिटलरची प्रत्यक्ष भेट घेऊन सर्व प्रश्न सामोपचाराने सोडवितां येतील म्हणून १७ सप्टेंबर १९३८ रोजीं चेंबरलेनसाहेबांनी हिटलरची मुलाखत घेतली, तेव्हा सुडेटन विभाग जर्मनांना दिला तर शांततेचें रक्षण होईल असें त्यांचें मत झालें. त्यासंबंधी पार्लमेंटांत बोलतांना चर्चिल म्हणाले, " एका छोट्या राष्ट्राचे लचके तोडून शांततेचें रक्षण होईल ही कल्पना आत्मघातकी आहे. " पण आक्रमकाला संतुष्ट करण्याच्या उद्दिष्टाने चेंबरलेनसाहेबांनी धावपळ सुरू केली. चर्चिल म्हणतात, " फ्रान्सने जर युद्ध पुकारलें तर झेकोस्लाव्हियाच्या रक्षणासाठी रणांगणांत उतरायला रशिया तयार होता. परंतु सोव्हिएट रशिया, जणू काय, अस्तित्वांतच नाही अशा दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. त्याकरिता आम्हाला पुढे जबरदस्त किंमत द्यावी लागली ! "

हिटलर आणि चेंबरलेन यांची दुसरी भेट झाली त्या वेळीं पहिल्या

भेटींत ज्या ज्या गोष्टी ठरल्या होत्या त्या आपल्याला आता मान्य नाहात असें हिटलरने सांगितलें. तरीसुद्धा, " त्याने माझी फसवणूक केली असें मला क्षणमात्र वाटत नाही " असें चेंबरलेनसाहेबांनी पार्लमेंटच्या सभासदांना सांगितलें ! सुडेटन विभागाचा कबजा आपल्याला २८ सप्टेंबर १९३८ च्या आंत, कोणतीहि अट घातल्याशिवाय, मिळालाच पाहिजे असें हिटलरने जाहीर केलें. तें पाहून झेकोस्लाव्हियांतील लष्कर युद्धाला सज्ज झालें, फ्रेंच लष्कर सिद्ध झालें आणि युद्धाच्या उद्दिष्टाने ब्रिटिशांच्या आरमाराची सुद्धा हालचाल सुरू झाली.

* * *

## हिटलरविरुद्ध जर्मन सेनाधिकारी :

१९३६ सालीं हिटलरने ऱ्हाईन प्रदेशांत आपलें लष्कर घुसविण्याचा निश्चय केला तेव्हा त्याच्या सेनाधिकाऱ्यांनी त्याला विरोध केला होता. दोस्तांचें लष्करी सामर्थ्य त्या वेळीं जर्मनीपेक्षा निर्विवाद किती तरी अधिक असलें, तरी आपल्या योजनेला दोस्त राष्ट्रांकडून यत्किंचितहि विरोध होणार नाही ही हिटलरची खात्री होती. युद्धाचें नांव काढलें म्हणजे दोस्त राष्ट्रांच्या अंगावर शहारे येतात हें त्याला माहीत होतें. आपल्या सेनाधिकाऱ्यांना हिटलरनें सांगितलें, " ऱ्हाईन प्रदेशांत शिरतांना तुम्हाला यत्किंचितहि प्रतिकार झाला तर ताबडतोब माघार घ्या—मी तत्क्षणीं आत्महत्या करीन !"— जर्मनांच्या सैन्याला दोस्तांकडून यत्किंचितहि प्रतिकार न झाल्यामुळे, जर्मन सेनाधिकाऱ्यांच्या लष्करी अंदाजापेक्षा हिटलरचा ' आंतला आवाज ' अधिक अचूक ठरला !

त्या गोष्टीला आता दोन वर्षें लोटलीं होतीं. जर्मनीचें सामर्थ्य किती तरी पटीने वाढलें होतें. तरी सुद्धा झेकोस्लाव्हिया, फ्रान्स आणि इंग्लंड युद्ध करणार अशी परिस्थिति निर्माण होतांच, जर्मन सेनाधिकारी पुन्हा सचिंत झाले. अजून त्यांना युद्ध नको होतें. युद्ध झालें तर आपला पराजय होऊन, १९१९ सालापासून आपल्या राष्ट्राची झालेली सर्व प्रगति अखेर माती-मोल होईल अशी त्यांना भीति वाटत होती. पण हिटलरच्या कार्यक्रमपत्रिकेंत आता ' दिरंगाई ' किंवा ' माघार ' या शब्दांना स्थानच नव्हतें. सेना-

धिकाऱ्यांच्या विरोधाला न जुमानतां त्याने आपली योजना पार पाडण्याचा निश्चय केला होता.

तें पाहून निवडक सेनाधिकाऱ्यांनी हिटलरविरुद्ध बंड करण्याचा कट केला. हिटलरला कल्पना येणार नाही इतक्या झपाट्याने बर्लिन शहर ताब्यांत घेऊन हिटलर आणि त्याच्या गोअरिंग आदिकरून साथीदारांना अटक करण्याचा कट त्यांनी रचिला. बर्लिन शहर एकदा कबजांत घेतलें म्हणजे बाकीचा देश आपोआप आपल्या ताब्यांत येईल याची त्यांना खात्री होती. हा कट यशस्वी होण्यासाठी नियोजित दिवशीं हिटलर बर्लिनमधे असणें अवश्य होतें आणि सप्टेंबरच्या १४ तारखेला तो बर्लिनमध्ये आलाहि होता ! पण--

त्याच वेळीं हिटलर याच्या भेटीची चेंबरलेन यांनी इच्छा प्रदर्शित केल्यामुळे व त्याने बर्लिनमधील आपला मुक्काम हालविल्यामुळे, लष्करी अधिकाऱ्यांच्या कटाची अंमलबजावणी पुढे ढकलावी लागली ! चर्चिल म्हणतात, " अत्यंत क्षुल्लक अशा अपघातांवर मानवतेचें भविष्य कसें अवलंबून असतें त्याचें हें आणखी एक उदाहरण आहे. "

* * *

**म्युनिक करार :**

हिटलरच्या भेटीसाठी म्युनिकला फार उत्सुकतेने प्रयाण करण्यापूर्वी पार्लमेंटांत भाषण करतांना चेंबरलेन म्हणाले, " ज्यांची आम्हाला माहिती-सुद्धा नाही, अशा आपल्या देशापासून फार दूर असलेल्या लोकांच्या भांडणासाठी आम्हीं येथे खंदक खणावे आणि विषारी धुरापासून स्वत:चें रक्षण करण्यासाठी मुखवटे शोधीत बसावें, हा प्रकार किती भयंकर आणि कल्पनातीत आहे याचा विचार करा ! मी शांततेचा पूजक आहें. युद्धाच्या नुसत्या कल्पनेनेसुद्धा माझ्या अंगावर शहारे येतात ! "

—या उद्गारांनंतर चेंबरलेनसाहेबांनी २९सप्टेंबर१९३८ रोजीं हिटलर-बरोबर तो कुप्रसिद्ध ' म्युनिक–करार ' केला नसता, तरच नवल ! रक्त-पाताच्या भीतीमुळे इंग्लंड आणि फ्रान्स यांनी हिटलरचें उद्दिष्ट युद्धाशिवाय

साध्य करून दिल्यामुळे, पुनः एकदा हिटलरच्या सेनाधिकाऱ्यांची भीति खोटी ठरून हिटलरलचा ' आंतला आवाज ' खरा ठरला !

* * *

## पोलंडला दिलेली हमी :

म्युनिक करारामुळे झेकोस्लाव्हियाची फाळणी होऊन त्याचा सुडेटन–विभाग, त्या विभागांतील तटबंदीसकट जर्मनांच्या ताब्यांत गेला. आश्चर्य असें की, ज्या बैठकींत जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड आणि इटालीचे पुढारी झेकोस्लाव्हियाचा विधिलेख लिहीत होते, त्या बैठकींत झेकोस्लाव्हियाच्या पुढाऱ्यांना आमंत्रण नसल्यामुळे ते गैरहजर होते ! पण प्राप्त परिस्थितींत बड्या राष्ट्रांनी लिहिलेला तो विधिलेख–नव्हे, मृत्युलेख मान्य करण्याखेरीज झेकोस्लाव्हियाच्या पुढाऱ्यांना गत्यंतर उरलें नाही ! म्युनिकच्या बैठकीनंतर, " इंग्लंड आणि जर्मनी यांच्यांतील कोणताहि वादग्रस्त प्रश्न सामोपचाराने सोडविला जाईल–युद्धाच्या मार्गाचा अवलंब कधीसुद्धा केला जाणार नाही, " अशा आशयाचा एक करार चेंबरलेनसाहेबांनी हिटलरसमोर ठेवला–त्याच्यावर हिटलरने डोळे झाकून सही केली ! चेंबरलेन म्युनिकहून परतले त्या वेळीं हिटलरने सही केलेला तो करार वार्ताहरांसमोर फडकावीत म्हणाले, " आपल्या हयातींत आता युद्ध होणार नाही ! "

शांततेचे प्रस्थापक म्हणून चेंबरलेन यांचा प्रत्येकजण गौरव करूं लागला. म्युनिक करारासंबंधी " युद्ध केल्याशिवाय आमचा संपूर्ण पराजय झाला आहे " असे चर्चिल यांनी पार्लमेंटांत भाषण करतांना उद्गार काढले, तेव्हा त्यांचा निषेध करण्याकरिता सभासदांनी इतका गोंगाट केला की, चर्चिल यांना भाषण बंद करावें लागलें ! इतकेंच नव्हे, तर ज्या मतदारसंघांतून चर्चिल निवडून आले होते त्या संघांतल्या मतदारांनी त्यांच्या विरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडण्याचा घाट घातला ! त्या वादळाला न जुमानतां चर्चिल म्हणाले, " आक्रमकांचा अनुनय करून ते संतुष्ट झाले आहेत किंवा त्यांची क्षुधा अधिक प्रज्वलित झाली आहे, हें आपल्याला एका वर्षाच्या आंत समजेल. "

झेकोस्लाव्हियाच्या सुडेटन विभागाचा तिसऱ्या जर्मन साम्राज्यांत समावेश

केल्यामुळे उघडा पडलेला उरलेला झेकोस्लाव्हिया १९३९ सालच्या मार्च महिन्यांत हिटलरने बळकावला ! त्यामुळे चेंबरलेनसाहेबांचा हिटलरवरील विश्वास समूळ नाहीसा होऊन त्याला धडा शिकवायला ते उद्युक्त झाले. इतकेंच नव्हे, तर हिटलरची वक्रदृष्टि पोलंडकडे वळलेली पाहतांच, पोलंडवर आक्रमण झालें तर त्याच्या संरक्षणासाठी हिटलरविरुद्ध रणांगणावर उतरण्याची पोलंडला चेंबरलेनसाहेबांनी घाईघाईने हमी देऊन टाकली ! युरोपच्या नकाशाकडे नजर टाकली तर असें दिसून येईल की, हिटलरच्या हल्ल्यापासून पोलंडचें रक्षण करणें इंग्लंडला भौगोलिक दृष्ट्या सर्वस्वीं अशक्य होतें.

चर्चिल म्हणतात,

" सुप्रवृत्त आणि सर्वस्वीं लायक अशा माणसांच्या चुकीच्या निर्णयांच्या' या कथेंतली अंतिम घटका आता भरत आली होती. या कथेचें सिंहावलोकन केलें असतां आम्हीं वीस वर्षांत काय कमाविलें आणि काय गमाविलें तें स्पष्ट होईल. ज्या तहाने जर्मनीला निःशस्त्र केलें होतें त्या तहाच्या अटी झुगारून देऊन तो पुन्हा सशस्त्र बनला होता. वैमानिक सामर्थ्यांतील आमची श्रेष्ठताच काय, पण तुल्यबलतासुद्धा आम्हीं गमाविली होती. ऱ्हाईन प्रदेशाचा बळजबरीने कबजा घेऊन जर्मनांनी पश्चिमेकडे अभेद्य अशी तटबंदी तयार केली होती. इटाली आणि जर्मनीची गट्टी जमली होती. जर्मन साम्राज्याने ऑस्ट्रिया गिळंकृत करून पचविला होता. म्युनिक करारामुळे आम्ही झेकोस्लाव्हियाचा विश्वासघात आणि नाश केला होता, त्याची तटबंदी जर्मनांच्या ताब्यांत गेली होती आणि त्याचे प्रचंड कारखाने जर्मनांसाठी शस्त्रास्त्रें तयार करीत होते. दोस्त राष्ट्रांशीं गट्टी करून झेको-स्लाव्हियाचें रक्षण करण्याची रशियाची इच्छा आम्हीं धुडकावून लाविली होती.

" अशा रीतीने हिताची प्रत्येक गोष्ट झुगारून दिल्यानंतर आता आमचें सरकार पोलंडला त्याच्या संरक्षणाची हमी देत होतें ! जर्मनीची लष्करी तयारी पूर्ण झाली नव्हती तेव्हा, १९३८ सालीं, झेकोस्लाव्हियाच्या संरक्षणासाठी युद्ध करण्यांत अर्थ तरी होता. पोलंडचें रक्षण आम्ही कसें करणार होतों ? आक्रमकांची समजूत घालण्याच्या सहा वर्षांच्या सुखासीन

धोरणाचा आम्हीं एका रात्रींत त्याग केला. मानवजातीचे अपराध, चुका आणि दुःखें यांची नोंद करणाऱ्या इतिहासाचीं पानें धुंडाळलीं, तरी त्यांत अशा प्रकारची कोलांटी उडी सापडणार नाही.

" कांही का असेना, ब्रिटन आणि फ्रान्सने अखेर शरणागतीच्या धोरणाचा त्याग केला होता. अत्यंत प्रतिकूल क्षणीं आणि अत्यंत असमाधान-कारक कारणासाठी युद्ध करण्याचा आम्हीं निर्णय घेतल्यामुळे, आता लक्षावधि जीवांची कत्तल उडणार हें निश्चितच होतें ! रक्तपाताशिवाय विजय मिळूं शकेल अशा वेळीं तुम्हीं जर आपल्या हक्कांसाठीं युद्ध केलें नाही, तुमचा विजय निश्चित आहे अशा वेळीं जर तुम्हीं युद्ध केलें नाही, तर अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत आणिं तुमचें अस्तित्वदेखील शाबूत राहण्याची अत्यंत कमी शक्यता आहे अशा वेळीं तुम्हाला युद्ध करावें लागतें. विजयाची यत्किंचित् आशा नसतांनासुद्धा तुम्हाला युद्ध करावें लागतें, कारण गुलाम म्हणून जगण्यापेक्षा धारातीर्थीं नाश पावणें श्रेयस्कर नाही का ? "

* * *

**चर्चिलना बोलवा :**

नियतीचीं चक्रें आता फार वेगाने फिरूं लागलीं होतीं. १९३९ सालच्या एप्रिल महिन्यांत दोस्त राष्ट्रांशीं संरक्षक गट्टी करण्याचा रशियाने प्रयत्न केला. चार्चिल यांनी अशा गट्टीचा आग्रह धरला, पण रशियन राज्यकर्त्यां-वरील अविश्वासामुळे तो योग जुळून आला नाही. पोलंडमधील डँझिग बंदराचा सामोपचाराने ताबा मिळून जर्मनीला समुद्राचा मार्ग मोकळा झाला नाही तर पोलंडवर हल्ला होईल हें निश्चित झाल्यामुळे, जुलै महिन्यांत युरोपांतील सर्व राष्ट्रें युद्धाची तयारी करूं लागलीं. युद्ध समीप आलें असून तें अटळ आहे असें दिसतांच, चार्चिल यांचा मंत्रिमंडळांत समावेश करण्याची चळवळ ब्रिटिश मतदारांनी सुरू केली. " चर्चिल परत आले पाहिजेत ", "चर्चिलना बोलवा "—अशीं भित्तिपत्रकें ठिकठिकाणीं दिसूं लागलीं.

* * *

**दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात :**

दोन आघाड्यांवर जर एकाच वेळीं युद्ध करावें लागलें तर त्यांत जर्मनांचा पराजय होतो असा इतिहासाचा दाखला होता. दोन आघाड्यांवरचें युद्ध टाळण्याचा निश्चय करूनच हिटलरने आपल्या रणयोजना आखल्या होत्या. १९३३ सालीं हिटलरचा उदय झाला तेव्हापासून त्याने कम्युनिस्टांविरुद्ध 'जेहाद' पुकारला होता. रशियाचा आणि कम्युनिझमचा नाश केल्याशिवाय आपलें अवतारकार्य पूर्ण होणार नाही अशी त्याची श्रद्धा होती. परंतु, दोस्तराष्ट्रें आणि रशिया यांजबरोबर एकाच वेळीं युद्ध म्हणजेच दोन आघाड्यांवरचें युद्ध ! तें हिटलरला नको असल्यामुळे, रशियाबरोबर अनाक्रमणाचा करार करण्याचें त्याने निश्चित केलें. रशियाच्या स्टालिनलासुद्धा आपली लष्करी तयारी पूर्ण करण्याकरिता कांही काळाची उसंत हवी होती. निरनिराळ्या कारणांसाठी स्टालिन आणि हिटलर यांना १९३९ सालीं आपसांत युद्ध नको होतें. अशा रीतीने त्यांचें एकमत झाल्यामुळे, अवघ्या एका दिवसाच्या वाटाघाटीनंतर, ऑगस्ट महिन्याच्या २३ तारखेला, जर्मनी आणि रशिया यांनी अनाक्रमणाचा करार केला ! तो करार जाहीर झाला तेव्हा अखिल भूतलाला आश्चर्याचा धक्का बसला !

पोलंडवर स्वारी करायला आता हिटलर मोकळा झाला होता. पश्चिमेकडच्या तटबंदीमुळे त्याला फ्रेंचांच्या सैन्याची भीति वाटत नव्हती. वैमानिक सामर्थ्यामुळे अंतराळांतल्या युद्धाविषयी तो निश्चित होता.

१९३९ सालच्या सप्टेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेला हिटलरने पोलंडवर हल्ला चढवितांच चेंबरलेनसाहेबांनी चर्चिल यांना भेटीला बोलावून आरमाराचें मंत्रिपद स्वीकारण्याची विनंती केली. ३ तारखेला इंग्लंड आणि फ्रान्स यांनी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें. त्याच दिवशीं चर्चिल यांनी आरमारमंत्र्याच्या कचेरींत प्रवेश केला, तेव्हा सबंध आरमारांत एकाच वाक्याचे पडसाद उमटले !—“ विन्स्टन परत आला आहे ! ”—

१९१४ सालीं आरमाराच्या हालचाली दाखविणारा एक नकाशा चर्चिलनी तयार केला होता— तो अजून त्यांच्या कचेरींत टांगलेला होता. कचेरींत कांही वेळ घालविल्यानंतर त्यांनी पार्लमेंटच्या सभागृहांत प्रवेश

केला, तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. चर्चिल म्हणतात,

" मंत्रिमंडळांतल्या माझ्या जागेवर मी जाऊन बसलों त्या वेळीं माझें मन शांत होतें—सर्व प्रकारच्या मानवी आणि वैयक्तिक बाबींपासून एक प्रकारची अलिप्तता माझ्या मनांत दाटली होती——कोणतेंहि कारण नसतांना ज्याच्यावर हल्ला झाला आहे, अशा एका कमजोर राष्ट्राच्या रक्षणासाठी आम्हीं पुन्हा एकदा आमची तलवार म्यानाबाहेर काढली होती. पराक्रमी, शिस्तबद्ध आणि निर्दय अशा जर्मनवंशाच्या सामर्थ्याशीं आमच्या स्वाभिमानासाठी आणि अस्तित्वासाठी टक्कर देण्याचा प्रसंग आमच्यावर ओढवला होता. आमचा पुरातन इंग्लंड देश शांतताप्रिय असला आणि युद्धासाठी असावा तितका सिद्ध नसला, तरी स्वाभिमानाच्या हाकेसरशी त्याने निर्भयपणाने रणांगणावर उडी टाकली आहे हें पाहून माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले ! ऐहिक वास्तवता आणि शारीरिक संवेदना यांच्या क्षेत्रापासून फार दूर आणि उच्च अशा वातावरणांत आमचा भविष्यकाळ तरंगतो आहे असा मला भास झाला ! "

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५८८५ वि......
क्रमांक ............ नों. दि. २-१-६०

१९

## तेव्हा आणि आता

" गेल्या सहासात वर्षांत आपण शांततेच्या प्रस्थापनेसाठी जे प्रयत्न केले ते सर्व प्रयत्न निष्फळ ठरले असले, तरी ते अत्यंत प्रामाणिकपणाने आणि निष्ठेने केले होते यांत संशय नाही. आम्ही शेवटपर्यंत तडजोडीचे प्रयत्न केले हें या गंभीर प्रसंगीं आमचें फार मोठें समाधान आहे. युद्धाची भीषणता सहन करून अखेर तिच्यावर मात करण्याच्या कामीं या समाधानाचा फार मोठा उपयोग होणार आहे. युरोपांत युद्धाचा वणवा पेटला असला तरी या रविवारीं--या प्रार्थनेच्या दिवशीं, आमच्या मनांत सपूर्ण शांतता नांदते आहे. "

ब्रिटिशांनी जर्मनांविरुद्ध युद्ध पुकारलें त्या दिवशीं पार्लमेंटांत चर्चिल भाषण करीत होते आणि त्यांचें भाषण सबंध सभागृह शांतचित्ताने ऐकत होतें. गेल्या दहा वर्षांत असे अनेक प्रसंग आले होते की, ज्या वेळीं पार्लमेंटच्या सभासदांनी त्यांचा धिक्कार केला होता, पण आज मात्र ते सर्व सभासदांच्या आणि अखिल राष्ट्राच्या भावना व्यक्त करीत होते.

१९१४ सालच्या महायुद्धांत ज्या राष्ट्रांनी भाग घेतला होता, त्या राष्ट्रांच्या नेत्यांपैकी १९३९ सालीं सुरू झालेल्या युद्धांत अधिकारपदावरून भाग घेणारी एकच व्यक्ति होती--विन्स्टन चर्चिल ! सप्टेंबरच्या सतरा तारखेला चर्चिलनी आरमाराची पाहणी केली, तेव्हा त्यांना आरमाराच्या अधिकारीवर्गांत सर्व नवे चेहरे दिसले. चर्चिल म्हणतात, "पंचवीस वर्षांपूर्वीच्या अधिकाऱ्यांपैकी कोणी दिसत नसल्यामुळे, एखाद्या दिवे नसलेल्या जुन्या वाड्यांत मी एकटाच फिरतों आहें असा भास मला झाला. सर्व चेहरे नवे असले, तरी जहाजें जुनीं होतीं आणि संकटसुद्धा जुनेंच होतें ! "

१९१४ सालची परिस्थिति आणि १९३९ सालची परिस्थिति यांत ब्रिटिशांच्या दृष्टीने जमीन-अस्मानाचा फरक होता. त्या वेळीं फ्रान्स बलाढ्य होता. जपान हा ब्रिटिशांचा दोस्त असल्यामुळे त्यांना त्यांच्या पूर्वेकडच्या साम्राज्याची चिंता करण्याचें कारण नव्हतें. दोस्त राष्ट्रांच्या ध्येयावर आणि धोरणावर युरोपांतल्या छोट्या राष्ट्रांची श्रद्धा होती. विमानांचा युद्धासाठी उपयोग करावयाची सुरुवात झाली नसल्यामुळे, ब्रिटिशांचें प्रबळ आरमार निर्धास्त होतें. युरोपच्या दक्षिणेंत इटाली आणि पूर्वेला रशिया हे दोन्ही देश दोस्तांच्या बाजूचे होते. उलटपक्षीं, १९३९ सालच्या सप्टेंबर महिन्यांतल्या परिस्थितीचा आढावा घेतांना चर्चिल म्हणतात, "त्यांच्या एके काळच्या लढाऊ वृत्तीचें फिकट प्रतिबिंब फ्रान्समध्ये दिसत होतें. रशिया आमचा मित्र नव्हता, तटस्थहि नव्हता, किंबहुना आमच्या विरुद्ध लढाईला उभा राहील अशी शक्यता होती. इटाली आणि जपान मित्र नव्हते. अमेरिका पुनः आमच्या मदतीला धावून येईल का ? समुद्रावर आमची सत्ता होती, पण आमच्याजवळ पुरेशीं विमानें नव्हतीं--"

* * *

## आधुनिक युद्धाचें पहिलें प्रात्यक्षिक :

युद्धाच्या घोषणा झाल्या तरी फ्रेंच सैन्याने कोणतीच हालचाल केली नाही. जर्मन विमानांनी फ्रान्सवर किंवा फ्रेंच विमानांनी जर्मनीवर हल्ला केला नाही. सप्टेंबरच्या १ ल्या तारखेलाच जर्मन सैनिकांनी आणि विमानांनी पोलंडवरील हल्ल्याची सुरुवात केली असल्यामुळे, पूर्वेकडच्या रणांगणावर मात्र एक अभूतपूर्व रणसंग्राम चालू होता.

पोलंडकडे एकंदर नऊशें विमानें आणि वीस लक्ष सैनिक होते. हिटलरचीं पंधराशें विमानें आणि जवळ जवळ चाळीस लक्ष सैनिक पोलंड-वर तुटून पडले होते ! पहिल्या दोन दिवसांत पोलंडचीं सर्व विमानें निकामी झालेलीं आणि अवघ्या दोन आठवड्यांत त्याच्या लष्कराची प्रतिकारशक्ति संपुष्टांत आल्याचें पाहून जग आश्चर्यचकित झालें ! जर्मनांची अशी एक-सारखी आगेकूच चालू असतां, सप्टेंबरच्या १७ तारखेला पूर्वेकडून

रशियन फौजा पोलंडमध्ये शिरल्या आणि त्यांनी पोलंडच्या पूर्वभागाचा कबजा घेतला ! २९ तारखेला पोलंडच्या फाळणीचा रूसो–जर्मन करार प्रसिद्ध झाला—अवघ्या एका महिन्यांत सर्व कारभार आटोपला ! चर्चिल म्हणतात, " आधुनिक युद्धाचें निर्दोष प्रात्याक्षिक आम्हीं पाहिलें—लष्कर आणि विमानदलाचें संपूर्ण सहकार्य, मोठमोठ्या शहरांवर आणि दळण-वळणाच्या सर्व मार्गांवर ' बॉम्ब्स्चा ' केलेला भयंकर भडिमार, हेरांचा आणि छत्रीधारी सैनिकांचा उपयोग आणि सर्वांत विशेष म्हणजे ज्यांचा प्रतिकार करतां येणें अशक्य अशा तोफांची आणि रणगाड्यांची आगेकूच ! "—

ज्या पोलंडच्या स्वातंत्र्यासाठी इंग्लंड आणि फ्रान्सनें युद्ध पुकारलें होतें, त्याचीच जर्मनी आणि रशिया यांनी फाळणी केल्यामुळे ' पोलंड ' नांवाचें राष्ट्रच नकाशावरून नाहीसें झालें ! या परिस्थितीला अनुलक्षून हिटलरने विचारलें, " पोलंड नाहीसें झाल्यावर युद्ध सुरू ठेवण्यांत अर्थ काय ? "— अनेक तटस्थ राष्ट्रांना तसेंच वाटलें, पण " हिटलरशाहीचा नाश केल्याशिवाय पुन्हा तलवार म्यान करावयाची नाही " असा फ्रान्स आणि इंग्लंडचा निर्धार होता.

* * *

## " हिटलरची गाडी चुकली " :

पोलंडचें युद्ध संपून कित्येक महिने झाले तरी हिटलरने कोणतीच हालचाल केली नाही ! ब्रिटिशांना फारशी हालचाल करतां येणें शक्य नव्हतें, कारण त्यांच्याजवळ हालचालीला पुरेसें सैन्यच नव्हतें. युद्ध सुरू झाल्यानंतर चाळीस लक्ष सैन्य तयार करण्याच्या योजना इंग्लंडच्या युद्ध-मंडळाने प्रथमच आखल्या. ब्रिटन हें नेहमी " गेल्या युद्धासाठी " सज्ज असतें, असें टीकाकार म्हणत असत तें खरें ठरलें होतें. चर्चिल मंत्रिमंडळांत होते तसेच युद्धमंडळाचेहि सदस्य होते. फ्रान्सजवळ विपुल सैन्य असलें तरी जर्मनीवर प्रहार करण्याची कोणतीच योजना नव्हती. तटस्थ छोट्या राष्ट्रांच्या सहकार्याने एखादी आघाडी उघडावी म्हटलें, तर पोलंडची राखरांगोळी झालेली पाहून कोणतेंहि तटस्थ राष्ट्र ' युद्ध ' हा शब्दसुद्ध

उच्चारायला तयार नव्हतें ! पोलंडची राजधानी, वॉरसा, हिच्यावर जर्मनांनी इतके जबरदस्त बॉंबहल्ले केले की ती बेचिराख झाली होती ! ठिकठिकाणीं लागलेल्या आगीव्यतिरिक्त दुसरा प्रकाश पोलंडमध्ये दिसत नव्हता. अशा स्थितींत पुन्हा हिटलर मनांत आणील त्या वेळींच युद्धाचा दुसरा अंक सुरू व्हावयाचा अशी परिस्थिति निर्माण झाली होती.

अमेरिका युद्धांत पडेल हें मुळींच संभवनीय दिसत नव्हतें. युरोपच्या भानगडींत निष्कारण पडून पुन्हा अमेरिकन तरुणांचा बळी द्यावयाचा नाही, हें केवळ अमेरिकन पुढाऱ्यांचेंच नव्हे तर अमेरिकन जनतेचें मत असल्या-मुळे, ' तटस्थतेचा कायदा ' अमेरिकेंत जारी होता. नाही म्हणायला, अमेरिकेचे अध्यक्ष प्रेसिडेंट रूझवेल्ट यांनी चर्चिल यांना ११सप्टेंबर १९३९ रोजीं लिहिलेल्या पत्रांत, " कांही कळविण्यासारखें असल्यास मला कळवीत जा " असें लिहिलें होतें. " बुडत्याला काडीचा आधार " या नियमाप्रमाणे चर्चिल ते पत्र वारंवार वाचीत होते !

सबंध राष्ट्राला युद्धासाठी सिद्ध आणि सज्ज करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे अशीच चर्चिल यांची, जणू काय, कल्पना होती. आधुनिक युद्धाला अवश्य अशा रीतीने ब्रिटिश आरमाराचा कायापालट करण्याचा त्यांनी चंग बांधला होता. स्वतःचें खातें संभाळून ते युद्धाच्या योजनां-विषयी पंतप्रधानांकडे खलिते पाठवीत होते. अन्नाचें वाटप आणि दिवेबंदी-सारख्या विषयांवर गृहमंत्र्यांना सूचना करीत होते, खर्चासंबंधी अर्थमंत्र्यांचें ' मार्गदर्शन ' करीत होते आणि फ्रान्सची सफर करून फ्रान्सच्या आरमारी अधिकाऱ्यांच्या भेटी घेत होते. युद्ध सुरू होऊन दोन महिने झाले तरी इंग्लंडच्या आरमाराने सामान्य नागरिकाला दिलासा देईल अशी कोणतीच कामगिरी बजावली नव्हती. जर्मन पाणबुडया ब्रिटिशांचीं व्यापारी जहाजें आणि लढाऊ जहाजें बुडवीत होत्या. युद्ध सुरू झाल्यापासून कांही दिवसांतच एका जर्मन पाणबुडीने इंग्लंडच्या किनाऱ्यावरील प्रमुख आरमारी तळांत शिरून त्यांचें एक प्रचंड जहाज बुडविलें. पाणबुडीच्या कप्तानाचें तें बेदरकार धारिष्ट आणि कौशल्य पाहून स्वतः चर्चिल थक्क झाले !

फ्रेंचांची सेना मॅजिनो तटबंदीचा आश्रय घेऊन स्वस्थ बसली होती.

त्यांच्या समोरच्या जर्मन छावण्यांतून प्रचार करण्यांत येत होता, " शेवटचा फ्रेंच सैनिक जिवंत असेपर्यंत ब्रिटन युद्ध चालू ठेवील ! " फ्रान्समधील कम्युनिस्ट मतदार त्या " साम्राज्यशाही आणि भांडवलशाही " युद्धाचा निषेध करीत होते. " आमचें आरमार काय करतें आहे ? " असा प्रश्न इंग्लंडमध्ये विचारला जात होता–चर्चिल गप्प होते–पण कांही तरी अचाट घडावें म्हणून उत्सुक होते !

रशिया आणि जर्मनीचा अनाक्रमणाचा तह झाला असला तरी त्यांचा एकमेकावर विश्वास नव्हता. भावी रुसो-जर्मन युद्धाच्या दृष्टीने स्टालिन आणि हिटलर पवित्रे टाकीत होते. आपली सरहद्द जास्त सुरक्षित राहावी, सरहद्दीजवळच्या देशांतून हिटलरला आपल्या छातीवर पिस्तुल रोखतां येऊं नये म्हणून, पोलंडचें युद्ध संपतांच, स्टालिनने इस्थोनिया, लटाव्हिया आणि रुथेनिया हे बाल्टिक देश ताब्यांत घेतले आणि, ३० नोव्हेंबर १९३९ रोजीं, फिनलंडवर हल्ला केला. रशियाच्या संरक्षणासाठी फिनलंडचा विवक्षित भूभाग स्टालिनला पाहिजे होता, तो सामोपचाराने न मिळाल्यामुळे त्याने त्या चिमुकल्या राष्ट्रावर हल्ला केला आहे असें पाहून इंग्लंडमध्ये खळबळ उडाली. पण, फिनलंडला प्रत्यक्ष मदत करतां येईल अशी भूगोलाची परिस्थिति नव्हती.

अशा स्थितींत, नॉर्वेच्या किनाऱ्यावर आपलें सैन्य उतरवून तेथून तें फिनलंडकडे पोहोचवावें अशी योजना चर्चिल यांनी आखली. या कृतीने नॉर्वेच्या तटस्थतेचा भंग होणार असला तरी त्याला नाइलाज आहे असें चर्चिल यांचें मत होतें. दोस्तांच्या युद्धमंडळाच्या अनेक बैठकींत या योजनेवर वाटाघाटी झाल्या, तेव्हा अशा कृत्यामुळे " शत्रु निष्कारण चिडेल " असें मत व्यक्त करण्यांत आलें ! १२मार्च१९४० पर्यंत फिनलंडचें युद्ध चालू राहून अखेर रशियाच्या मागण्या त्या चिमुकल्या देशाला मान्य कराव्या लागल्यामुळे, त्यानंतर फिनलंडला मदत करण्याचा प्रश्नच शिल्लक उरला नाही !

पोलंडच्या पाडावानंतरच्या सहा महिन्यांत हिटलर स्वस्थ बसल्यासारखा दिसत होता, पण त्याच काळांत तो आपल्या शस्त्रास्त्रांत, विमानांत आणि

लष्करांत वाढ करीत होता. त्या सहा महिन्यांच्या काळांत दोस्तांची शक्ति वाढल्यामुळे आता हिटलरला विजय मिळणें शक्य नाही अशी खात्री पटून, " हिटलरची गाडी चुकली " असे उद्गार चेंबरलेनसाहेबांनी एप्रिलच्या ४ तारखेला केलेल्या एका भाषणांत काढले होते! त्यानंतर चारच दिवसांनंतर हिटलरने डेन्मार्क आणि नॉर्वेवर एकसमयावच्छेदेकरून हला चढविला!

* *

" चालते व्हा ":

युरोपच्या पश्चिमेकडील तटस्थ देशांतून इंग्लंडला युरोपांत प्रवेश मिळूं नये, म्हणून इंग्लंडचा युरोपशीं संबंध तोडून टाकणें हिटलरला अवश्य वाटत होतें. कोणत्याहि राष्ट्राच्या तटस्थतेचा त्याला विधिनिषेध वाटत नव्हता. नॉर्वेच्या किनाऱ्यालगतच्या समुद्रांत चर्चिल महाशयांनी पाणसुरुंग पेरले याचें निमित्त करून हिटलरने या मोहिमेची सुरुवात केली, त्या वेळीं " चर्चिलनी शत्रूला निष्कारण चिडविलें " अशी टीका झाली. फक्त कांही तासांच्या लढाईनंतर डेन्मार्क पहिल्या दिवशींच शरण गेलें आणि दोन दिवसांच्या युद्धानंतर नॉर्वेच्या पश्चिमेकडील सर्व बंदरें जर्मनांच्या ताब्यांत गेलीं. नॉर्वेच्या राजधानीचा जर्मन सैन्याने डोळ्याचें पातें लवतें न लवतें तो ताबा घेतला. आपला देश पोलंडप्रमाणे बेचिराख होईल या धास्तीमुळे, " जर्मन सैन्याला प्रतिकार करूं नका " असे हुकूम नॉर्वेच्या सैनिकांच्या हातीं पडले!

पण कांही सैन्य डोंगराळ मुलुखांत लढत होतें. सागरी युद्धाचें आव्हान स्वीकारून नॉर्वेच्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरें ताब्यांत घ्यावीं, त्या बंदरांत इंग्लंड आणि फ्रान्सचें सैन्य उतरवावें आणि हिटलरशीं युद्ध खेळावें अशी चर्चिल यांची योजना होती. ब्रिटिश आणि जर्मन आरमाराची फार मोठी लढाई झाली, पण जर्मनांच्या वैमानिक वर्चस्वामुळे ब्रिटिश आरमाराची हानि होऊन त्याला परतावें लागलें. ब्रिटिशांच्या दृष्टीने सुपरिणाम इतकाच की, जर्मन आरमाराची फार मोठी हानि होऊन त्याची लढाऊ शक्ति नाहीशी झाली.

नॉर्वेच्या लढ्यांतल्या अपयशामुळे ब्रिटिश जनता आरमारी यंत्रणेवर नाखुष झाली. पण १९१४ सालच्या युद्धांत डार्डानेल्सच्या लढाईनंतर चर्चिलना राजीनामा द्यावा लागला तशी पाळी त्यांचेवर या खेपेला आली नाही. ब्रिटिश आरमारांतल्या तीन छोट्या विनाशिकांनी जर्मनांच्या ' ग्राफ स्पी ' या प्रचंड लढाऊ जहाजाला डिसेंबर महिन्यांत जलसमाधि दिली होती त्याची आठवण जनता अजून विसरली नव्हती. सतत सात वर्षे चर्चिलनी निरनिराळे इषारे दिले असतां, त्या वेळचे राज्यकर्ते गाफील राहिले होते याची जाणीव प्रत्येकाला होती. त्यामुळे नार्वेतील अपयशामुळे निर्माण झालेला पार्लमेंटच्या सभासदांचा क्रोध, चर्चिल यांना वळसा घालून चेंबरलेन-साहेबांकडे वळला.

" हिटलरची गाडी चुकली आहे–" या चेंबरलेनसाहेबांच्या उद्गारांचा जो तो उपहास करूं लागला–मे महिन्याच्या ७ तारखेला भरलेल्या पार्लमेंटच्या सभेंत हुजूरपक्षीयांनीसुद्धा चेंबरलेनसाहेबांवर तीव्र वाक्प्रहार केले ! इंग्लंडच्या इतिहासांतील एका संस्मरणीय प्रसंगीं क्रॉम्वेलनें काढलेल्या उद्गारांचा उपयोग करून मंत्रिमंडळाकडे पाहात अमेरीसाहेब म्हणाले, " कोणतीहि चांगली गोष्ट न करतां तुम्ही तुमच्या आसनांवर फार दिवस चिकटून बसला आहांत. तुमची आता गरज उरलेली नाही–कृपा करा आणि चालते व्हा ! " पहिल्या महायुद्धांतले विजयी पंतप्रधान लॉईड जॉर्ज, यांनी त्याच दिवशी आपल्या कारकीर्दींतलें शेवटचें संस्मरणीय भाषण केलें. ते म्हणाले, " सर्वांनी स्वार्थत्याग केला पाहिजे असें पंतप्रधान सांगतात. मी त्यांना सांगतों, की सर्व प्रकारच्या स्वार्थत्यागाला आपलें राष्ट्र तयार आहे. परंतु, राष्ट्राला चांगल्या नेतृत्वाची गरज आहे. सरकारचें निश्चित धोरण कोणतें तें राष्ट्राला समजलें पाहिजे आणि आपले नेते शक्य ते सर्व उपाय योजीत आहेत असा राष्ट्राला विश्वास वाटला पाहिजे. पंतप्रधानांना मी विनंती करतों, की स्वार्थत्याचा धडा राष्ट्राला त्यांनीच घालून दिला पाहिजे ! या युद्धांत आम्हाला जय मिळवायचा असेल तर आमच्या पंतप्रधानांनी आपल्या अधिकाराचा त्याग करणें अवश्य झालें आहे ! "

एप्रिल अखेर दोस्तांच्या सैन्यांत एकंदर शंभर सेनाविभाग ( डिव्हिजन )

असले, तर जर्मनीजवळ एकशे नव्वद सेनाविभाग होते हें चेंबरलेनसाहेबांना माहीत होतें. जर्मनीचें वैमानिक वर्चस्व तर जगजाहीरच होतें. हिटलर फ्रान्सवर केव्हा हल्ला करील त्याचा नियम नव्हता. फ्रान्सवर हल्ला होतांच ब्रिटिश सैनिकांना फ्रेंचांच्या बरोबरीने लढावें लागलें असतें. युद्धाची शून्य घडी भरत आली होती. अशा वेळीं कोणत्याहि एका पक्षाला युद्धकार्याची जबाबदारी पेलता येणार नाही हें पटून, ८ तारखेच्या दिवशीं चेंबरलेनसाहेबांनी उदार आणि मजूर पक्षांच्या सहकार्याने राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याचा बेत केला. पण विरोधी पक्षांच्या नेत्यांनी साफ नकार दिला ! पंतप्रधान म्हणून इतःपर आपल्याला कोणी मान्य करणार नाही म्हणून राजीनामा द्यावयाचा बेत निश्चित करून, नवा पंतप्रधान म्हणून चेंबरलेननी चर्चिल यांचें नांव राजाला सुचविलें !

* * *

**पंतप्रधान चर्चिल :**

उदार आणि मजूर पक्षांच्या नेत्यांच्या मतांचा चर्चिल यांनी कानोसा घेतला. चर्चिल यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय मंत्रिमंळांत सामील व्हायला ते तयार होते. पुढे काय होतें इकडे सर्वांचे डोळे लागले होते. सबंध देशांत अत्यंत तंग वातावरण निर्माण झालें होतें.

इतक्यांत मे महिन्याच्या दहा तारखेला हिटलरने बेल्जम आणि हॉलंड या तटस्थ राष्ट्रांवर हल्ला चढविला !

त्याच दिवशीं संध्याकाळीं चर्चिल यांना राजाने भेटीस बोलावलें आणि नवें मंत्रिमंडळ स्थापन करण्याचा त्यांना आदेश दिला. चर्चिल यांनी राष्ट्रीय मंत्रिमंडळ स्थापन करण्याच कबूल केलें. चर्चिल म्हणतात,

" राष्ट्रीय आणीबाणीच्या त्या दिवसांत मी अगदी शांत राहून, जें घडेल तें स्वस्थ चित्ताने पाहात होतों. परंतु, त्या दिवशीं पहाटे तीन वाजतां मी बिछान्यावर पडलों त्या वेळीं मला एका प्रकारच्या मुक्ततेचें सुख वाटत होतें, हें मी दडवून ठेवूं इच्छित नाहीं. युद्धाचीं सर्व क्षेत्रें आता माझ्या हुकमतीखाली आलीं होतीं. मी, जणू काय, प्राक्तनाचा हात धरूनच

वाटचाल करीत होतों ! माझें सबंध आयुष्य म्हणजे या क्षणासाठी आणि या दिव्यासाठी केलेली पूर्वतयारीच होती असं मला वाटलं ! गेल्या सहा वर्षांत मीं दिलेल्या धोक्याच्या सूचना जितक्या विविध तितक्याच तपशीलवार होत्या. त्या अखेर खऱ्या ठरल्यामुळे मला कोणीहि विरोध करूं शकत नव्हता. मला त्या दिवशीं गाढ झोप लागल्यामुळे रंजक स्वप्नांची गरज वाटली नाही—सत्यसृष्टि ही स्वप्नसृष्टीपेक्षा खरोखरच चांगली असते ! ”

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि .........
क्रमांक ........ नों दि 2.5.67

## २०

### पांच वर्षांत

कोणत्याहि राष्ट्राचा इतिहास त्या राष्ट्रांतील थोर पुरुषांच्या चरित्रांमुळे तयार होत असतो असें म्हणतात. १० मे १९४० रोजीं चर्चिल यांनी ब्रिटिशांच्या पंतप्रधानकीचें महावस्त्र परिधान केलें आणि, २सप्टेंबर१९४५ रोजीं, शेवटचें अक्षराष्ट्र शरण आल्यामुळे, दोस्तांचा संपूर्ण विजय होऊन जागतिक युद्ध संपलें. ब्रिटिशांचे चर्चिल, अमेरिकेचे रूझवेल्ट आणि रशियाचे स्टालिन या महापुरुषांनी युद्ध जिंकलें. त्यांपैकी चर्चिल हेच युद्धाशीं सुरुवातीपासून शेवटपर्यंत निगडित होते. आणि म्हणूनच, १९३९-१९४५ या सहा वर्षांतल्या महायुद्धाच्या इतिहासाशीं चर्चिल यांचें चरित्र जवळ जवळ एकरूप झालें आहे असें म्हणतां येईल.

चर्चिल पंतप्रधान झाले त्यापूर्वी हिटलरने पोलंड, नॉर्वे आणि डेन्मार्क या छोट्या राष्ट्रांविरुद्ध अत्यंत नेत्रदीपक विजय मिळविले असले, तरी फ्रान्स आणि जर्मनी यांच्यांतील समर दीर्घ काळपर्यंत चालेल असा अनेकांचा समज होता आणि चर्चिलनासुद्धा तसा विश्वास वाटत होता! किंबहुना, फ्रेंचांच्या पराक्रमावर, सामर्थ्यावर आणि रणकौशल्यावर ते सर्वस्वी अवलंबून होते असें म्हटलें तरी चालेल! त्या विश्वासावर अवलंबून राहून, युद्ध सुरु झाल्यानंतर, चाळीस लक्षांचें लष्कर आणि दरमहा दोन हजार विमानें तयार करण्याचा संकल्प ब्रिटिशांच्या युद्धमंडळाने केला होता! फ्रान्सची पूर्वेकडची सरहद्द मॅजिनो तटबंदीने आणि जर्मनीची पश्चिमेकडची सरहद्द सीगफ्रीड तटबंदीने सुरक्षित केली असल्यामुळे, फ्रँको-जर्मन युद्ध दीर्घकाळ चालून, त्या अवकाशांत लक्षावधि ब्रिटिश सैनिकांची सुसज्ज फौज रणांगणावर उतरविता येईल असा चर्चिल यांचा अंदाज होता. परंतु, चर्चिल

यांची पंतप्रधानकीची कारकीर्द सुरू होऊन सव्वा महिना लोटला नाही तोच—

" डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तोच फ्रेंचांची विख्यात आणि बलाढ्य समजली गेलेली सेना पराभूत झाली आणि फ्रान्समध्ये उतरलेली आमची सेना समुद्रांत लोटली गेली ! हिटरलशीं मुकाबला करायला रणांगणावर आम्ही एकटे सापडलों आणि, त्या वेळच्या आमच्या निःशस्त्र परिस्थितींत, हिटलर आणि मुसलोनीच्या विजयी सेनांनी आमचा गळा दाबला असून, सबंध युरोपखंड हिटलरच्या पंजाखालीं सापडला आहे असें दृश्य दिसूं लागलें ! "——

——आणि त्यानंतरच्या पांच वर्षांनंतर, जवळ जवळ त्याच दिवशीं, कोणतें दृश्य दिसत होतें ?

" जर्मनीच्या बलाढ्य फौजांनी संपूर्ण शरणागति पत्करिली होती—इटाली पराभूत झाला होता—मुसलोनीचा वध त्याच्याच देशबांधवांनी केला, तर हिटलरनें आत्महत्या केली होती ! या काळांत आम्हीं जो प्रवास केला तो अत्यंत प्रदीर्घ, अत्यंत कठीण आणि धोक्याचा होता. या युद्धांत आमचे चार लक्ष सैनिक, साठ हजार नागरिक आणि तीन हजार नाविक मारले जाऊन, जवळ जवळ सव्वा कोटी टनांचीं जहाजें समुद्राच्या तळाशीं गेलीं होतीं ! "

* * *

## १९४० सालांतल्या घटना :

चार्चिल पंतप्रधान झाल्यापासून अवघ्या पांच दिवसांत हिटलरने हॉलंडचा धुव्वा उडविला आणि त्यानंतर तेरा दिवसांनी बेल्जम शरण गेला. बेल्जम आणि हॉलंड हीं दोन राष्ट्रें युरोपांतल्या प्रबळ राष्ट्राच्या ताब्यांत जाणार नाहीत अशी खबरदारी घेणें, हें ब्रिटिशांच्या परराष्ट्रीय राजकारणाचें सतत गेलीं चारशे वर्षें संभाळलेलें सूत्र होतें. बेल्जम आणि हॉलंड हिटलरच्या ताब्यांत गेल्यामुळे, इंग्लंडच्या किनाऱ्यासमोर आपली सेना उभी करून इंग्लंडवर स्वारी करण्याची संधि हिटलरला प्राप्त झाली. तसा प्रयत्न नेपोलियनने केला होता, पण ब्रिटिशांच्या आरमारामुळे तो फसला. नेपोलियनच्या काळांत विमानें नव्हतीं. वैमानिक सामर्थ्यामुळे ब्रिटिशांच्या

आरमाराचा नाश करून आपल्याला आपले सैनिक ब्रिटनमध्ये उतरवितां येतील असा हिटलरला विश्वास वाटत होता. ‘ ब्रिटिशांच्या आरमाराची जुन्या बाजारांतल्या लोखंडापेक्षा जास्त किंमत नाही’ असें त्याचें मत होतें !

हॉलंड आणि बेल्जम यांच्या शरणागतीमुळे, फ्रेंचांच्या मॅजिनो तट-बंदीला वळसा घालून आपल्या सेना फ्रान्समध्ये घुसविणें हिटलरला शक्य झालें. जर्मन लष्कराच्या आणि विमानदलाच्या प्रचंड सामर्थ्यामुळे फ्रेंचांची फळी दुभंगून ती सर्वस्वीं विस्कळित झाली आहे असें पाहून, चर्चिल यांच्या पंतप्रधानकीचा मासिक वाढदिवस साधून, १० जून १९४० रोजीं, मुसलोनीने दोस्तांविरुद्ध युद्ध पुकारलें आणि फ्रान्सवर हल्ला केला ! बेल्जमच्या अचानक शरणागतीमुळे कोंडींत सापडलेली ब्रिटिशांची सेना पीछेहाट पत्करीत, अखेरीं स्वदेशीं परतली ! पराभूत झालेली फ्रेंच सेना आणि पराभूत वृत्तीचे फ्रेंच मुत्सद्दी यांनी युद्धविरामाची केलेली याचना हिटलरने अत्यंत नाट्यपूर्ण पद्धतीने स्वीकारिली ! १९१८ सालच्या जर्मनांच्या पराभवानंतर ज्या कॅंपीनच्या जंगलांत, ज्या आगगाडीच्या डब्यांत दोस्तांचा सरसेनापति मार्शल फॉश याने जर्मनांची शरणागति स्वीकारली होती, त्याच अरण्यांत आणि त्याच डब्यांत बसून हिटलरने फ्रेंचांची शरणा-गति स्वीकारली !

“ असा एखादा प्रसंग येईल, असा एखादा मुद्दा निर्माण होईल, की त्या वेळीं आपल्याला लढावें लागेल असें भविष्य मी आजच वर्तवितों आणि त्या वेळीं एकाकी स्थितींत लढायची पाळी आमच्यावर येऊं नये अशी परमेश्वराची प्रार्थना करतों ”–असा चर्चिल यांनी पार्लमेंटला १९३६ सालींच दिलेला इषारा खरा झाला ! विजयी जर्मन सेना फ्रान्सच्या उत्तर किनाऱ्यावर पोहोचली आणि तेथून ती ब्रिटनवर झडप घालणार असा रंग दिसूं लागला. अमेरिका दूर होती. युरोपांतल्या कोणत्याहि राष्ट्राची मदत ब्रिटिशांना मिळणें शक्य नव्हतें. हिटलरने युरोपांत जितका दरारा १९४० सालीं निर्माण केला होता तितका त्यापूर्वी कोणींहि केला नसेल ! शस्त्रें नाहीत, मित्र नाहीत, उद्या काय होईल याची शाश्वती नाही, असा प्रसंग जवळ जवळ आठशे वर्षांत ब्रिटनवर कधी ओढवला नव्हता ! असें असूनहि ब्रिटन तहाची याचना करीत नाही, म्हणून सर्व महत्त्वाचीं ब्रिटिश शहरें

नकाशावरून पुसून काढण्याकरिता हिटलरने भयानक बॉंबहल्ले सुरू केले, ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत चालू होते.

ब्रिटिशांची बरीचशी मदार त्यांच्या आरमारावर होती. फ्रान्स शरण गेलें तरी फ्रेंच आरमार जर्मनांच्या ताब्यांत गेलें नव्हतें. पराभूत फ्रान्स शक्यांत शक्य तितक्या लवकर युद्धांतून बाहेर पडावा म्हणून फ्रेंचांच्या शरणागतीच्या दोन महत्त्वाच्या अटी हिटलरने मान्य केल्या होत्या. त्या अटींप्रमाणे फ्रान्सचा अंतर्गत कारभार फ्रेंचांच्या हातांत राहिला आणि फ्रेंच आरमार हिटलरच्या ताब्यांत गेलें नाही. फ्रान्सने शस्त्र खाली ठेवतांच ब्रिटन तह करील अशी हिटलरची अपेक्षा होती, त्याचप्रमाणे आपल्याला अवश्य वाटेल तेव्हा फ्रान्सचा आणि त्याच्या आरमाराचाहि ताबा घेता येईल अशी त्याची खात्री होती!

पहिल्या महायुद्धापासून ब्रिटिश-द्वेष्टा म्हणून प्रसिद्ध असलेला मार्शल पेतॉं हा शरणागतीच्या वेळच्या फ्रान्सचा अध्यक्ष होता. युरोपांत फ्रान्सचा पराभव झाला असला, तरी शरण न जातां, आपल्या साम्राज्यांतून लढा चालू ठेवावा असा आग्रह धरणारा जनरल डी गॉल आणि त्याच्या विचारसरणीचे कांही फ्रेंच आपल्या मातृभूमीचा त्याग करून लंडन येथे आले—त्यांचा 'स्वतंत्र फ्रेंच' म्हणून चर्चिल उल्लेख करूं लागले. फ्रान्सच्या टूलॉं बंदरांतलें फ्रेंच आरमार स्वतंत्र राहिलें असलें तरी त्याच्या स्वातंत्र्याची शाश्वती नव्हती. फ्रेंच साम्राज्यांतल्या अल्जीरियाच्या ओरॅन बंदरांतसुद्धा फ्रेंचांचीं अनेक लढाऊ जहाजें होतीं. मार्शल पेतॉंच्या आज्ञेवरून तीं फ्रान्स-कडे जावयास निघालीं असून, तीं फ्रान्सच्या किनाऱ्याजवळ गेलीं तर हिटलरच्या पंजांत सापडतील या भीतीने तीं ताब्यांत घ्यावीं असें डी गॉल आणि चर्चिल यांनी ठरविलें. ही कारवाई करतांना ओरॅन येथील आरमाराने प्रतिकार केला. फ्रेंच आरमाराबरोबर सागरी युद्ध करावें लागेल आणि त्यामुळे, क्षणापूर्वींचे दोस्त एकमेकांचे शत्रु होऊन, मार्शल पेतॉं ब्रिटनविरुद्ध युद्ध पुकारील असाहि संभव होता! तो अभूतपूर्व बनाव घडून येण्याकरिता हिटलरसुद्धा आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करीत होता! चर्चिल म्हणतात, "इतका बिकट आणि कठोर निर्णय माझ्या आयुष्यांत मला कधीच घ्यावा लागला नाही!"

सबंध फ्रेंच आरमार जर हिटलरच्या ताब्यांत गेलें तर इटालियन आरमाराच्या सहकार्याने त्याला ब्रिटिशांच्या सागरी वर्चस्वाला शह देता आला असता. ' स्वतंत्र फ्रेंचांच्या ' नेतृत्वाखाली ब्रिटिशांचीं लढाऊ जहाजें ओरॅनला गेलीं असतां तेथील फ्रेंच आरमाराने प्रतिकार केल्यामुळे, ४ जुलै १९४० रोजीं मोठें सागरी युद्ध झालें ! त्या युद्धांत फ्रेंचांच्या कांही बोटी जायबंदी होऊन निकामी झाल्या आणि बाकीच्या बुडविल्या. इतकें झालें तरी मार्शल पेतॉने ब्रिटिशांविरुद्ध युद्ध पुकारलें नाही ही घटना चर्चिलना फार सूचक आणि आशादायक वाटली. फ्रेंच जनतेला उद्देशून त्या वेळीं नभोवाणीवरून केलेल्या भाषणांत चर्चिल म्हणाले, "फ्रान्सच्या एका सुतळीच्या तोड्याचासुद्धा आम्हांला लोभ नाही. फ्रान्स स्वतंत्र होऊन त्याला पूर्वीचें वैभव प्राप्त व्हावें अशी आमची इच्छा आहे आणि म्हणूनच माझी तुम्हाला अशी विनंती आहे की, हिटलरशाहीचा नाश करण्याच्या कार्यांत तुम्हीं आम्हांला मदत करूं शकत नसला, तरी आमच्या मार्गात अडथळे तरी निर्माण करूं नका ! "

हिटलरबरोबर हातमिळवणी करून मुसलोनीने फ्रान्सच्या पाठींत खंजीर खुपसला होता. युरोपवर आपल्याला तूर्त हल्ला करतां येत नसला, तरी इटालीच्या आफ्रिकेंतल्या साम्राज्यावर करतां येण्यासारखा आहे याची ब्रिटिशांना खात्री होती. १९४० सालच्या डिसेंबर महिन्यांत जनरल वेव्हल यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश साम्राज्याच्या फौजांनी, इटालीच्या आफ्रिकन साम्राज्यावर हल्ला चढविला !

* * *

**रक्त, अश्रु आणि कष्ट :**

१९३३ सालपासून केलेल्या तयारीमुळे हिटलरजवळ लक्षावधि सैनिक आणि हजारो रणगाडे होते, तर १९४० सालच्या मे महिन्यांत ब्रिटिशांकडे चार लक्ष सैन्य आणि फक्त ३२८ रणगाडे होते. चर्चिल पंतप्रधान झाले म्हणून या परिस्थितींत तत्काळ कोणताच बदल होणार नव्हता. सबब, आपल्या देशबांधवांची दिशाभूल होऊं नये म्हणून, १३ मे १९४० रोजीं, केलेल्या इतिहासप्रसिद्ध आणि संस्मरणीय भाषणांत चर्चिल यांनी सांगितलें.

" रक्त, कष्ट आणि अश्रु यांखेरीज तुम्हाला देण्यासारखें मजजवळ कांहीहि नाही. या युद्धांत आमचें धोरण काय असें तुम्ही विचाराल—भूमि, जल आणि आकाश या तीनहि आघाड्यांवरून सतत युद्ध करणें हें एकच आमचें धोरण राहील. या युद्धांत आमचें उद्दिष्ट कोणतें असें तुम्ही विचाराल, तर त्याचें उत्तर मी एका शब्दांत देईन ! विजय !—कोणतीहि किंमत द्यावी लागली तरी विजय, कितीहि संकटें सोसावीं लागलीं तरी विजय आणि कितीहि लांबचा पल्ला गाठावा लागला तरी विजयच ! कारण, आम्हाला नामशेष व्हावयाचें नसलें तर विजय हा मिळविलाच पाहिजे ! "

ब्रिटिशांचा इतिहास हाच एकजुटीचा इतिहास असल्यामुळे, सर्वपक्षीय मंत्रिमंडळाचें नेतृत्व चर्चिलनी स्वीकारिलें होतें. त्या मंत्रिमंडळांत मजूर आणि उदार पक्षाचे पुढारी तर होतेच, पण हुजूर पक्षाचा क्षणापूर्वीचा नेता, चेंबरलेन, हासुद्धा चर्चिल यांच्या नेतृत्वाखाली कार्य करीत होता. आपल्या पूर्वींच्या पंतप्रधानांच्या कारकीर्दींत त्यांच्या निष्क्रिय धोरणावर चर्चिल यांनी सतत सहा वर्षें कठोर टीका केली असली तरी आता ते म्हणाले, " भूतकालीन चुकांचा पाढा वर्तमानकाळांत वाचीत बसलों, तर आपण आपलें भविष्य गमावून बसूं हें लक्षांत ठेवा ! "

फ्रान्सच्या पाडावामुळे बसलेला धक्का पचवून आपल्या राष्ट्राची प्रतिकारशक्ति आणि मनोधैर्य कायम राखावयाचें, हिटलरला शरण गेलेल्या राष्ट्रांतील स्वातंत्र्यप्रेमी जनतेची प्रतिकारशक्ति प्रज्वलित करून हिटलरविरोधी कृति करण्यासाठीं तिला शक्य ती सर्व मदत करायची, ' हिटलर अजिंक्य नाही ' असा घोष करीत राहून युरोपांतल्या स्वतंत्र म्हणून उरलेल्या छोट्या राष्ट्रांना हिटलरविरुद्ध मुकाबला करायला उद्युक्त करावयाचें आणि, लोकशाहीच्या रक्षणासाठी, अमेरिका पुन्हा एकदा रणांगणावर उतरेल असा प्रयत्न करावयाचा हीं प्रमुख धोरणें संभाळून चर्चिल वागत होते.

फ्रान्सच्या शरणागतीपूर्वीच फ्रेंच नेत्यांत पराभवी मनोवृत्ति निर्माण झाली आहे हें चर्चिल यांच्या ध्यानांत आलें होतें. ती वृत्ति नाहीशी होऊन अंतिम विजयावर त्यांचा विश्वास बसावा, म्हणून चर्चिल यांनी एका महिन्यांत फ्रान्सच्या एकंदर पांच वाऱ्या केल्या होत्या. फ्रेंचांनी शस्त्र खाली ठेवलें तर निःशस्त्र अशा ब्रिटिशांवर अभूतपूर्व असें जें संकट कोसळेल, त्याची

कल्पना चर्चिलना एका बैठकींत इतकी असह्य झाली, की 'एखाद्या लहान मुलाप्रमाणे ते ओक्साबोक्शी रडले !'

* * *

**डंकर्कचा संग्राम :**

जर्मन लष्कराच्या असह्य प्रहारांमुळे बेल्जमच्या आघाडीवरील ब्रिटिश आणि फ्रेंच लष्कराची फळी दुभंगून त्यांची ताटातूट झाली, तेव्हा प्रथम ब्रिटिश सेनेचा संहार करण्याकरिता जर्मनांनी तिचा पाठलाग सुरू केला. फ्रान्सच्या उत्तर किनाऱ्याच्या रोखाने पीछेहाट करणारी ती सेना सर्वस्वी ब्रिटिशांची नसून, त्यांत कांही फ्रेंच पलटणीसुद्धा होत्या. संख्येने किती तरी अधिक आणि शस्त्रदृष्ट्या अधिक सुसज्ज अशा जर्मन लष्कराशीं मुकाबला करणें तिला अशक्य झालें होतें ! अशा स्थितींत, प्रत्येक पावला-गणीक पुढे सरसावणाऱ्या जर्मनांची प्रगति शक्य तितकी थोपवून, शक्य तितके अधिक सैनिक इंग्लंडांत नेण्याकरिता उपयुक्त असें फ्रान्सच्या उत्तर किनाऱ्यावरचें डंकर्क हें एकच बंदर उपलब्ध होतें. डंकर्कच्या रोखाने पीछेहाट करणाऱ्या ब्रिटिश सेनेवर आणि डंकर्क बंदरांत गोळा होत असलेल्या त्यांच्या जहाजांवर जर्मन वैमानिकांनी अहोरात्र बॉंबस्चा वर्षाव सुरू केला ! ब्रिटिश सेना जर त्या प्रसंगीं मायदेशीं पोहोचूं शकली नसती, तर ब्रिटिशांची सर्व प्रतिकारशक्तीच नष्ट झाली असती ! आणि म्हणूनच, "ब्रिटिशांचा एकसुद्धा सैनिक तुमच्या तावडींतून निसटतां कामा नये" असा आदेश हिटलरने त्याच्या सैनिकांना दिला होता !

अशा आणीबाणीच्या प्रसंगीं ब्रिटिश वैमानिकांनी जर्मनीच्या विमान-दलाचें मोठ्या हिमतीने आव्हान स्वीकारलें. चेंबरलेनसाहेबांच्या वेळीं जे वैमानिक होते त्यांनीच हें आव्हान स्वीकारलें होतें, कारण चर्चिल यांची निर्भय आणि बेदरकार प्रतिभा त्यांना आता प्रोत्साहन देत होती ! "गुलाम होण्या-पेक्षा देशासाठी धारातीर्थीं देह ठेवणें श्रेयस्कर" हा चर्चिल यांचा संदेश प्रत्येकाला निर्भय बनवीत होता. अंतराळांतल्या लढाईत जर ब्रिटिश वैमानिक पराभूत झाले असते, तर ब्रिटिशांच्या सेनेचा आणि आरमाराचा-सुद्धा नाश झाला असता !

" आपली सेना संकटांत आहे—विन्स्टनला आपल्या मदतीची गरज आहे " असें समजतांच, कोणाच्या आदेशाची वाट न पाहतां, जें जें वाहन पाण्यावर तरंगू शकत होतें असें प्रत्येक वाहन डंकर्ककडे जावयास निघालें ! लढाऊ जहाजें तर गेलींच, पण मालाची वाहतूक करणारीं गलबतें, मच्छीमारी करणाऱ्या बोटी आणि चिमुकल्या होड्यासुद्धा डंकर्ककडे धावल्या ! ब्रिटिशांच्या प्रदीर्घ इतिहासांत ब्रिटिश खाडींत असें दृश्य पूर्वी कधींच दिसलें नव्हतें. एका कोळ्याचा चवदा वर्षांचा एक मुलगा डंकर्ककडे आपली होडी वल्हवतांना म्हणाला, " माझं वय लहान म्हणून माझी सैन्यांत भरती करीत नाहीत—पण आमचा एक सैनिक जरी मीं मायदेशीं परत आणला, तर स्वतः लढाईत भाग घेण्याइतकीच महत्त्वाची कामगिरी मीं केलीं असें होईल ! "

डंकर्ककडे धावणाऱ्या त्या तरत्या काफिल्याचा समुद्रांतच नाश करण्याचा जर्मन वैमानिकांनी चंग बांधला होता. पण संख्येने कमी असले तरी ब्रिटिश वैमानिकांनी त्यांचा यशस्वी प्रतिकार केल्यामुळे, आकाशाचें निर्विवाद प्रभुत्व जर्मनांना मिळूं शकलें नाही. ब्रिटिशांची एकंदर दोनशे सव्वीस जहाजें बुडालीं, तरी फ्रान्सच्या किनाऱ्यावर पोहोचलेल्या साडेतीन लक्ष सैनिकांपैकी तीन लक्ष अडतीस हजार सैनिक इंग्लंडला सुखरूप पोहोचले. इंग्लंडच्या इतिहासांतला तो एक अत्यंत उज्ज्वल असा क्षण ठरला. " जर्मन विमानदलाशीं आम्ही मुकाबला करूं शकतो ", असा एक नवीनच आत्म-विश्वास त्यामुळे ब्रिटिशांच्या विमानदलांत निर्माण झाला !

ब्रिटिशांचा तो उज्ज्वल क्षण असला, तरी तो त्यांचा विजय नव्हता. आपलें सर्व युद्धसाहित्य मागे टाकूनच त्यांचें लष्कर स्वदेशीं परत आलें असल्यामुळे प्रत्यक्ष इंग्लंडमध्ये शस्त्रें अशीं फारशीं उरलींच नव्हतीं ! चर्चिल म्हणतात, " आपल्या शत्रूसमोर कोणतेंहि राष्ट्र इतक्या कमालीच्या निःशस्त्र नग्नावस्थेंत कधीच सापडलें नसेल ! "—नव्वद हजार बंदुका, सात हजार टन दारूगोळा, आठ हजार तोफा आणि सव्वा लक्ष वाहनें इतकी लूट जर्मनांच्या हातीं सापडली ! डंकर्कच्या संग्रामासंबंधी, १८ जून १९४० रोजीं, पार्लमेंटांत निवेदन करतांना चर्चिल म्हणाले, " आपल्या सेनच्या सुटकेला विजयाच्या बैठकीवर बसविण्याची गल्लत करूं नका ! पीछेहाट किती

जरी यशस्वी ठरली, तरी पीछेहाट पत्करून युद्धें जिंकता येत नसतात ! पण इतकें मात्र निश्चित, की काय वाटेल तें झालें तरी आम्ही शेवटपर्यंत लढणार आहोंत. आम्ही जमिनीवर, समुद्रावर आणि अंतरिक्षांत लढूं–कोणतीहि जबर किंमत द्यावी लागली तरी आम्ही आमच्या मातृभूमीचें रक्षण करूं ! आम्ही शेतांत लढूं, रस्त्यांत लढूं, दऱ्याखोऱ्यांत लढूं आणि वाळवंटांत लढूं—पण कदापि शरण जाणार नाहीं ! ” एकजूट, स्वातंत्र्यलालसा आणि आत्मविश्वास या गुणांनी मंडित असलेली ब्रिटिशांची प्रतिकारशक्तीच ती गर्जना करीत होती—त्या गर्जनेचे पडसाद ब्रिटनच्या कानाकोपऱ्यांत उमटल्यामुळे हिटलरशाहीचा नाश करण्याचा ब्रिटिश जनतेचा निर्धार अधिकच बळकट झाला !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. ग्रंथालय.
अनुक्रम ३४८८१ ...... दि. ......
क्रमांक ...... नों. दि. २-५-८३

# २१

## तो उज्ज्वल क्षण—

चर्चिल पार्लमेंटांत भाषणें करीत होते—नभोवाणीवरून भाषणें करीत होते—त्यांच्या भाषणांमुळे स्वातंत्र्यरक्षणासाठी शेवटपर्यंत झगडण्याची स्फूर्ति त्यांच्या देशबांधवांना मिळत होती आणि त्यांच्या भाषणामुळेच ब्रिटनवर स्वारी करणें धोक्याचें आहे अशी हिटलरची समजूत होत चालली होती! फ्रान्सच्या पतनानंतर रणांगणांत एकाकी राहिलेलें ब्रिटन तत्काळ तह करील अशी हिटलरची खात्री होती—पण ब्रिटन तहाचा विचारसुद्धा करीत नाही असें पाहून तो म्हणाला, "निर्बुद्ध लोक आहेत हे!—आपण युद्ध हरलों आहोंत हेंसुद्धा त्यांच्या ध्यानांत येत नाही!"—शस्त्रास्त्रांच्या बाबतींत नखशिखान्त सुसज्ज आणि अद्याप पराभव हा शब्दसुद्धा माहीत नसलेला हिटलर आणि भूतलाचें स्वामित्व, यांच्यामध्ये एकच अडथळा उरला होता—तो म्हणजे चर्चिल यांच्या असामान्य धैर्यावर आणि आशावादावर जगणारें ब्रिटन!—फ्रान्सच्या पतनानंतर कांही तासांतच पार्लमेंटांत चर्चिल गरजले,

"फ्रान्सची लढाई संपली असून ब्रिटनची लढाई सुरू होण्याचा समय समीप आला आहे. या लढाईवरच आमचें जीवन आणि आमच्या पुरातन संस्थांचें आणि साम्राज्याचें अस्तित्व अवलंबून आहे. आमचा पराभव केल्याशिवाय युद्ध जिंकता येणार नाही, हें हिटलर जाणून असल्यामुळे आपण आता अशा रीतीने वागलें पाहिजे की, ब्रिटिश साम्राज्य आणि ब्रिटिश राष्ट्रकुलसंघ आणखी एक हजार वर्षें टिकला, तरी इतिहास असेंच सांगेल, की त्यांच्या जीवनांतला तो अत्युत्कृष्ट क्षण होता!"—हिटलरने तहाचा हात पुढे केला असतां ब्रिटिशांनी तो झिडकारला यासंबंधांत

चर्चिल विचारतात, " एकाकी सापडलेल्या आणि दोस्त राष्ट्रांनी, जणू काय, दूर लोटून दिलेल्या किती राष्ट्रांनी, अशा प्रसंगीं, तहाचें अमिष नाकारून युद्धाचा भीषण मार्ग पत्करिला असता ? "–रणांगणावर ब्रिटन एकटें उरलें तेव्हा आपल्या सहकारी मंत्र्यांना चर्चिलनी सांगितलें, " आपण एकटे आहोंत, यांतच मला फार मौज वाटते ! " सन्माननीय तहाचें विलोभन वाटावें अशी त्या वेळीं ब्रिटिशांची खरोखरच परिस्थिति होती. चार्चिल म्हणतात,

" ब्रिटिश बेटावर उडी मारण्याकरिता विजयी जर्मन सेना फ्रान्सच्या किनाऱ्यावर ठाकल्या होत्या. भूमध्यसमुद्रामधील आमच्या आरमारावर हल्ला करण्याचे मनसुबे मुसलोनी रचीत होता. पूर्वेकडे जपान कोणता पवित्रा घेईल तें सांगतां येत नव्हतें. स्पेनचा जनरल फ्रँको जिब्राल्टरवर नजर ठेवून होता आणि फ्रान्सने आमच्याविरुद्ध युद्ध पुकारावें म्हणून मार्शल पेताँवर हिटलर दडपण आणीत होता. इंग्लंडांतली आमची सेना इतकी निःशस्त्र होती की, तिच्याकडे त्या वेळीं फार तर पांचशे तोफा आणि दोनशे रणगाडे असतील. "

ब्रिटिश आरमाराचा आपल्याला नाश करतां येत नसला तर ब्रिटनवर अभूतपूर्व असे बॉंब-हल्ले करून ब्रिटिशांना जेरीस आणावयाची योजना आखून, जर्मन विमानदलाने जुलै ते ऑक्टोबर १९४० पर्यंत ब्रिटनचे अनेक विभाग उद्ध्वस्त केले ! परंतु जगाच्या इतिहासांतल्या त्या प्रदीर्घ अशा पहिल्या अंतरिक्ष-संग्रामांत ब्रिटिश वैमानिकांनी जर्मन विमानदलाचा पराभव केला. त्या कालखंडांत ब्रिटिशांच्या ९१५ विमानांचा नाश झाला असला, तर जर्मनांचीं १७३३ विमानें कामाला आल्यामुळे ब्रिटनवरील स्वारीचा बेत हिटलरने तहकूब केला ! ब्रिटनच्या सभोवती पसरलेलें आरमार ब्रिटनचें रक्षण करीत होतें, पण ब्रिटिश वैमानिकांचा पराभव झाला असता तर आरमारासकट सबंध देश हिटलरच्या पकडींत लोटला गेला असता. आपल्या वैमानिकांचें अभिनंदन करतांना, " मानवी झगड्याच्या इतिहासांत इतके कमी लोक इतक्या लोकांच्या इतके उपयोगी कधीच पडले नसतील !" असे उद्गार चर्चिल यांनी त्या वेळीं काढले !

* * *

**ब्रिटिशांचें अग्निदिव्य :**

सप्टेंबर अखेरपर्यंत एकंदर सत्तावन रात्रींत शेकडो जर्मन विमानें ब्रिटनवर दररोज अग्निवर्षाव करीत होतीं ! त्या काळाचें वर्णन करतांना चर्चिल म्हणतात, " हे हल्ले सुरू झाले तरी प्रत्येकजण आपला रोजचा व्यवसाय नेहमीप्रमाणे करीत असे, जेवत असे आणि झोपतहि असे. माझ्या आवारांत बॉंब पडूं लागले तरी माझा स्वयंपाकी आणि मोलकरीण आपापलीं कामें करीत होतीं. एके दिवशीं मींच त्यांना तळघरांत लोटलें आणि त्यानंतर कांही क्षणांतच आमच्या स्वयंपाकघरावर बॉंब पडून त्याचा चुराडा उडाला ! लंडनच्या दक्षिण विभागांत एकदा बॉंबहल्ला झाला तेव्हा तेथील परिस्थिति पाहण्याकरिता मी गेलों. तीस घरांचा चुराडा उडाला होता ! मला पाहतांच जवळजवळ एक हजार लोकांनी माझ्याभोवती गराडा घातला. त्यांच्याकडे पाहून माझ्या डोळ्यांत अश्रु आले. ते अश्रु दुःखाचे नव्हते—त्या गरीब बापड्यांचें विलक्षण मनोधैर्य पाहून माझ्या मनांत दाटलेल्या आश्चर्याचे आणि कौतुकाचे होते ! मला एकसारखी एकच चिंता छळत होती— ' हा विध्वंस आणखी किती दिवस चालू राहणार ? या लोकांच्या सहनशक्तीला कांही मर्यादा आहेच ना ? ' युद्धांत ज्यांचीं घरेंदारें उद्ध्वस्त झालीं होतीं, त्यांना संपूर्ण आणि तत्काळ नुकसानभरपाई द्यावी असें मीं अर्थमंत्र्यांना कळविलें. कारण, युद्धजन्य नुकसानीचा भार व्यक्तीऐवजी राष्ट्राने उचलणें अवश्य होतें. युद्ध संपेपर्यंत अशा रीतीने ८३ कोटी पौंडांची रक्कम नुकसानभरपाई दाखल वाटण्यांत आली. "

१९४० सालांतील ऑक्टोबरच्या १५ तारखेला ४८० जर्मन विमानांनी आगलाव्या बॉंबस्चा वर्षाव केल्यामुळे असंख्य आगी लागल्या, त्या विझविण्यासाठी पुरुषांप्रमाणे स्त्रियासुद्धा धावून गेल्या ! नागरिक-संरक्षण-दल उभारून त्यांत काम करण्याची प्रत्येकावर सक्ती करण्यांत आली. लष्कर, आरमार आणि विमानदलाप्रमाणे राष्ट्राचें रक्षण करणारे आपण चवथे हात आहोंत, अशा अभिमामाने त्या दलांतले लोक अहोरात्र खपत होते. " पूर्वी कधी नसेल इतकी एकजूट ब्रिटनमध्ये निर्माण झाली होती— प्रत्येक नागरीक आपल्या कुवतीबाहेर असे असह्य कष्ट करीत होता. अति-

कष्टांमुळे अखेर घेरी येऊन जमिनीवर पडेपर्यंत कारखान्यांतले स्त्री-पुरुष मजूर कामें करीत होते—त्यांची जागा घेण्यासाठी त्यांच्यानंतरच्या पाळींतले मजूर ठरलेल्या वेळेपूर्वी कारखान्यांत येत असत—' जिंकूं किंवा मरूं ' असा निर्धार असंख्य नागरिकांच्या मनांत निर्माण झाला होता, कारण सव्वाशे वर्षांनंतर एक जबरदस्त शत्रु प्रथमच आमच्या खाडीच्या समोर उभा राहिला होता–" ' आपल्या आयुष्यांत युद्ध नाही ' असा पुकारा चेंबरलेनने करतांच त्याचा जयजयकार करणारी ब्रिटिश जनता आता अंतर्धान पावली होती !

त्या विमानहल्लयांच्या वेळीं चर्चिल यांना सुरक्षित ठेवणें ही बाब, त्यांचा शरीरसंरक्षक थॉमसन याच्या अटोक्याबाहेर जात चालली होती ! बॉंबवर्षाव होऊं लागला म्हणजे ते गच्चीवर जाऊन आकाशांतली ' मौज ' पाहायचे, बॉंबहल्लयाच्या वेळीं सुरक्षितता प्राप्त व्हावी म्हणून बांधलेल्या तळघरांत शिरायला ते नाखुष असत आणि हल्ला संपल्याची सूचना मिळण्यापूर्वी तळघरांतून बाहेर पडत असत ! ब्रिटनवरील बॉंबहल्ले सुरू झाले त्या वेळीं राष्ट्रकुलसंघांतील कॅनडा वगैरे राष्ट्रांकडून, " राजकुटुंबाने–निदान युवराज्ञीने तरी ब्रिटनबाहेरच्या एखाद्या सुरक्षित स्थळीं काही काळ जाऊन राहावें " अशी विनंती करण्यांत आली—पण ब्रिटिशांचा राजा हा त्यांच्या लोकशाहीचाच एक आवश्यक भाग बनला होता ! त्या विनंतीला अनुलक्षून राणीने उत्तर दिलें, " मला इथे ठेवून युवराज्ञी जाणार नाही, माझ्या पतींना इथे ठेवून मी जाणे शक्य नाही आणि आपल्या प्रजाजनांना सोडून माझे पति तर कधीच लंडनबाहेर जाणार नाहीत ! "

—हिटलरने वैमानिक मोहीम थांबविली त्याच सुमारास भूमध्यसमुद्रांतील आरमारी युद्धांत ब्रिटिशांच्या आरमाराने मुसलोनीचें निम्म्यापेक्षा अधिक आरमार समुद्राच्या तळाशीं पाठविलें होतें !

* * *

**स्टालिनला दिलेला इषारा :**

जर्मनीबरोबर केलेल्या अनाक्रमणाच्या कराराची सबब पुढें करून डेन्मार्क, नॉर्वे, हॉलंड आणि बेल्जम या चिमुकल्या राष्ट्रांचा आणि, पश्चिमेकडील आघाडीचें चैतन्य कायम ठेवूं शकेल अशा, फ्रान्ससारख्या एका मोठ्या राष्ट्राचा चुराडा होत असतां रशियाचा हुकुमशाहा स्टालिन स्वस्थ होता ! परंतु, रशियाला नेस्तनाबूत केल्याशिवाय अखिल भूतलावर स्वामित्व प्रस्थापित करण्याचा हिटलरचा कार्यक्रम पूर्ण होणार नाही हें स्टालिनच्या ध्यानांत आणून देऊन, दोस्तराष्ट्रांच्या बाजूने रणांगणावर उतरणारा एक बलाढ्य सोबती मिळावा म्हणून चर्चिलनी खटपट केली, पण तिला फळ आलें नाही. हुजूर पक्षापेक्षा मजूर पक्ष स्टालिनला जवळचा वाटेल म्हणून मजूर पक्षाचे एक प्रमुख पुढारी, सर स्ट्राफोर्ड क्रिप्स, यांची रशियांतील ब्रिटिशांचे वकील म्हणून चार्चिलनी नेमणूक केली. युरोपमधील हिटलरच्या वाढत्या वर्चस्वाला शह देण्यासंबंधी चार्चिल यांनी स्टालिनला लिहिलेलें पत्र क्रिप्स यांनी स्टालिनला दिलें, पण स्टालिनने त्याची साधी पोचसुद्धा दिली नाही ! २७जून १९४० रोजीं दक्षिण आफ्रिकेचे पुढारी, जनरल स्मटस्, यांना चर्चिलनी लिहिलेल्या पत्रांत, " आमच्यावर स्वारी करून आमचा नाश करण्याचें हिटलरचें उद्दिष्ट सफल झालें नाही, तर तो पूर्वेकडे पाय पसरावयाचा प्रयत्न करील. किंबहुना, आमच्यावर स्वारी करण्याचा प्रयत्नसुद्धा न करतां, हिटलर पूर्वेचाच मार्ग पत्करील असा संभव आहे, " असें लिहिलें होतें—रूसो–जर्मनयुद्धाचें हें भविष्य त्या वेळीं कोणाला खरें वाटलें असतें ?

* * *

**चार्चिल आणि रूझवेल्ट :**

चार्चिल यांची खरी आणि सर्व मदार अमेरिकन मदतीवर होती. आपल्या लोकशाहीची इंग्रजी हाक, इंग्रजी भाषा बोलणाऱ्या उत्तर अमेरिकेच्या लोकशाहीला सत्वर ऐकूं जाईल असा त्यांचा विश्वास होता. हिटलरच्या जागतिक वर्चस्वाच्या महत्त्वाकांक्षेची अमेरिकेचे अध्यक्ष, फ्रँकलीन रूझवेल्ट, यांना पूर्ण कल्पना असल्यामुळे, स्वतःच्याच संरक्षणासाठी अमेरिकेने फ्रान्स

आणि इंग्लंड यांना या युद्धांत मदत केली पाहिजे अशी त्यांची भावना होती. " आमचें राष्ट्र तटस्थ राहिलें तरी आमचीं मतें तटस्थ नाहीत— लोकशाही राष्ट्रांचा विजय आम्ही इच्छिणारच, " असे उद्गार युद्ध सुरू होतांच त्यांनी काढले होते ! तटस्थतेच्या कायद्याच्या भिंतीआड राहून, युरोपांतील युद्धाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अमेरिकन जनतेच्या मनांत, त्या युद्धासंबंधी आस्तेआस्ते आत्मीयता निर्माण करण्याच्या प्रयत्नांचे हे उद्गार म्हणजे एक मंगलाचरण होतें. युद्धाच्या सुरुवातीनंतर, दोन महिन्यांच्या आंत, 'कॅश अँड कॅरी' (म्हणजे "रोख पैसे द्या आणि स्वतःच्या जहाजांतून न्या ") या पद्धतीने युध्यमान राष्ट्रांपैकी कोणालाहि शस्त्रास्त्रें विकत देण्याची रूझवेल्ट यांनी घोषणा केली. समुद्रावर ज्यांची सत्ता होती अशा दोस्त राष्ट्रांनाच त्या पद्धतीने अमेरिकेकडून शस्त्रास्त्रें विकत घेणें शक्य झालें. अमेरिकेची तटस्थता कायम ठेवून दोस्त राष्ट्रांना मदत करण्यासाठी रूझवेल्ट यांनी टाकलेलें तें पहिलें पाऊल होतें. अमेरिकेला दोस्तांच्या बाजूने युद्धांत भाग घेणें शक्य होईपर्यंत, प्रत्यक्ष युद्धाखेरीज बाकीची सर्व मदत तिने दोस्त राष्ट्रांना करावी यासाठी, युद्धाच्या सुरुवातीपासून, चर्चिल आणि रूझवेल्ट यांनी जीं धोरणें आखून अंमलांत आणलीं—तीं दोघांच्या असामान्य मुत्सद्देगिरीची साक्ष देतात. तत्संबंधीचीं खलबतें करण्याचे दोन मार्ग होते. एक पत्रव्यवहाराचा आणि दुसरा प्रत्यक्ष मुलाखतीचा ! १९४० सालच्या मे महिन्यापासून रूझवेल्ट यांच्या मृत्यूपर्यंत, म्हणजे १९४५ सालच्या एप्रिल महिन्यापर्यंत, चर्चिलनी रूझवेल्टना एकंदर साडेनऊशे आणि रूझवेल्टनी चर्चिलना आठशे पत्रें लिहिलीं. आपल्या देशबांधवांना चर्चिलनी " रक्त, कष्ट आणि अश्रु " यांचें आश्वासन देऊन दोन दिवस लोटतात, तोच हॉलंड शरण गेलें आणि " आम्ही पराभूत झालों आहोंत " असा संदेश फ्रान्सच्या पंतप्रधानांनी चर्चिलना पाठविला ! त्याच दिवशीं चर्चिलनी रूझवेल्टना लिहिलें, " आमच्या बेटांवर हिटलर स्वारी करील असा संभव आता निर्माण झाला आहे. जरूर तर हें युद्ध आम्ही एकटे चालवूं, परंतु त्यासाठी सुद्धा चाळीस किंवा पन्नास विनाशिकांची आणि लढाऊ विमानांची आम्हाला अत्यंत गरज आहे. अमेरिकेची मदत आम्हाला ताबडतोब मिळाली पाहिजे. कारण, उशीरा मिळालेल्या मदतीचा आम्हाला कदाचित् उपयोगसुद्धा करतां

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 3८८८ वि: ...
क्रमांक ... नों. दि. 2.2.73



फ्रँकलीन रुझवेल्ट



अडॉल्फ हिटलर

येणार नाही. " रूझवेल्ट आणि चर्चिल यांच्या प्रदीर्घ पत्रव्यवहारांतलें तें पहिलें पत्र होतें. परंतु, अमेरिकेचा तटस्थतेचा कायदा इतका कडक होता आणि लोकमत इतकें एकजात युद्धविरोधी होतें, की रूझवेल्ट यांची इच्छा असूनसुद्धा त्यांना चर्चिल यांची मागणी पुरविता आली नाही! मात्र, फ्रेंच राष्ट्र संकटांत सापडलें असतांना ज्या वेळीं त्याच्यावर मुसलोनीने प्रहार केला त्या वेळीं, "एका राष्ट्राने आपल्या हातांतला खंजीर आज त्याच्या शेजाऱ्याच्या पाठींत खुपसला आहे–दोस्त राष्ट्रांना अमेरिकेची शक्य ती सर्व मदत मिळेल " असे जाहीर उद्गार काढून, रूझवेल्ट यांनी त्यांच्या भावना दोस्तराष्ट्रांना आणि अक्षराष्ट्रांनाच नव्हे, तर अमेरिकेंतील जनतेलासुद्धा असंदिग्ध शब्दांत कळविल्या!

अमेरिकेंतील अध्यक्षीय निवडणूक त्याच वेळीं जवळ आल्यामुळे रूझवेल्ट यांना आपल्या देशबांधवांच्या युद्धविरोधी भावना दुखावणें अशक्य झालें होतें. फ्रान्सचें पतन नजीक येऊन ठेपलें असतां, "तसाच प्रसंग आला तर लोकशाहीच्या रक्षणासाठी अमेरिका रणांगणांत उतरेल" इतकें तरी जाहीर करा अशी विनंती चर्चिलनी रूझवेल्टना केली–कारण त्या घोषणेमुळेसुद्धा हिटलरवर दडपण पडून फ्रेंचांचें रक्षण होईल असा चर्चिल यांचा अंदाज होता—पण रूझवेल्टना तशी घोषणा करणें शक्य झालें नाही. फ्रान्सच्या पतनानंतर युरोपांतील रणांगणावर हिटलरसमोर एकटें ब्रिटन उभें आहे हें चित्र पाहून रूझवेल्ट अतिशय अस्वस्थ झाले! "आमचा पराभव होऊन आमचें आरमार जर हिटलरच्या ताब्यांत गेलें तर, जपानशीं हातमिळवणी करून, त्याला समुद्रावर वर्चस्व प्रस्थापित करतां येईल आणि अमेरिका संकटांत सापडेल" असा इषारा चर्चिल यांनी दिला, पण अध्यक्षीय निवडणूक त्या वेळीं अधिकच जवळ आली असल्यामुळे रूझवेल्टना स्वस्थ बसणें भाग होतें!

पण १९४० साल संपण्यापूर्वी पांच लक्ष पिस्तुलें, आठ हजार यंत्रसिद्ध बंदुका, दहा लक्ष गोळे–अशी कितीतरी युद्धसामग्री ब्रिटिशांना अमेरिकेकडून रोख किंमत देऊन मिळाली. अमेरिका ही लोकशाहीच्या शस्त्रास्त्रांचें कोठार बनत चालली होती. ब्रिटिशांचा पराभव अपरिहार्य असल्यामुळे त्यांना दिलेली सामग्री अखेर हिटलरच्या हातांत सापडून, तो तिचा

अमेरिकेविरुद्ध उपयोग करील अशी भीति अनेक अमेरिकन पुढाऱ्यांना वाटत होती. "अमेरिकन तरुणांना तुम्ही युद्धाच्या खाईत लोटणार का?" –असे प्रश्न रुझवेल्टना अमेरिकेंत वारंवार विचारले जात होते. त्या प्रश्नाचें उत्तर म्हणूनच कीं काय, "नाझींच्या राजवटीशीं सलोखा होऊंच शकत नाही–त्यांचा जर युरोपांत विजय झाला, तर त्यांचें विजयी पिस्तुल त्यानंतर अमेरिकेच्या छातीवर रोखलें जाईल" असें रुझवेल्टनी जाहीरपणें सांगितलें होतें !

* * *

**लोकशाहीचा त्राता :**

रोख किंमत मोजून अमेरिकन युद्धसाहित्य विकत घेतां घेतां ब्रिटिशांची गंगाजळी संपुष्टांत येत चालली तेव्हा चर्चिलनी 'उधारीची बात' सुरू केली ! जर्मन पाणबुड्यांनी ब्रिटिश जहाजांचा बेसुमार संहार करून, १९४० सालच्या शेवटच्या सात महिन्यांत एकंदर एकवीस लक्ष टनांचीं जहाजें आणि सप्टेंबर महिन्यांतल्या एका आठड्यांत एक लक्ष साठ हजार टनांचीं सत्तावीस जहाजें बुडविलीं होतीं ! ब्रिटिश बेटांच्या आणि साम्राज्याच्या रक्षणासाठी, सागरी युद्धासाठी आणि व्यापारी जहाजांना संरक्षण देण्यासाठी लढाऊ जहाजांची गरज एकसारखी वाढत होती. "तटस्थतेच्या कायद्याचीं" बंधनें स्वीकारून आणि युद्धविरोधी अमेरिकन लोकमताला संभाळून चर्चिल यांची पन्नास विनाशिकांची मागणी रुझवेल्टना पुरवितां येणें शक्य नव्हतें, परंतु प्राप्त परिस्थितींतून रुझवेल्ट यांनी अखेर एक मार्ग काढला ! अमेरिकेच्या संरक्षण योजनेसाठी अटलांटिक महासागरांतलीं ब्रिटिश साम्राज्यांतलीं कांही बेटें अमेरिकेला दीर्घमुदतीसाठी भाड्यानें द्यावीं आणि त्यांच्या मोबदल्यांत अमेरिकेने ब्रिटिशांना पन्नास विनाशिका द्याव्या, असा सौदा ठरून ब्रिटिशांना अत्यंत अवश्य अशा विनाशिका मिळाल्या.

युद्ध सुरू झाल्यापासून चर्चिल आणि रुझवेल्ट यांची प्रत्यक्ष भेट झाली नव्हती. परंतु रुझवेल्ट यांचा खाजगी सल्लागार, हॅरी हॉपकिन्स, हा इंग्लंडच्या सफरी करून चर्चिल यांच्या गरजांची तपशीलवार माहिती

मिळवीत होता. तो आपल्या रोजनिशींत लिहितो, " या काळांत चर्चिल दररोज पंधरा तास काम करीत होते–युद्धाशिवाय दुसरा विषयच ते बोलत नव्हते ! त्यांच्या कामाचा वेग रात्रीं दहानंतर वाढतो आणि पहाटे तीन वाजेपर्यंत ते काम करीत असतात ! ते एकसारखे मद्यपान करतात पण त्याचा त्यांच्या शरीरावर किंवा बुद्धीवर कोणताच परिणाम झालेला दिसत नाही ! लेखनिकाकडून आपलीं भाषणें लिहून घेतांना ते येरझारा घालीत असतात आणि आपले श्रोते, जणू काय, आपल्या समोर आहेत अशा भावनेनें निरनिराळे आविर्भाव करीत असतात." रूझवेल्ट यांना लिहिलेल्या पत्रांत हॉपकिन्स लिहितो, " चर्चिल म्हणजेच ब्रिटिश सरकार, हें प्रत्येक बाबतींत खरें आहे––त्यांच्याबद्दल ब्रिटिश जनतेच्या मनांत नितांत आदर आहे. स्वतंत्र राष्ट्र म्हणून जिवंत राहण्याच्या ब्रिटिशांच्या इच्छाशक्तीचें चर्चिल हे, जणू काय, प्रतीकच आहेत ! "

अमेरिकेच्या मदतीवर ब्रिटिशांचें युद्धकार्य चालू होतें. ती मदत चालू राहावयाची असेल तर अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकींत पुन्हा रूझवेल्ट यशस्वी होणें अवश्य होतें. ती निवडणूक ३ नोव्हेंबर १९४० रोजीं रूझवेल्ट जिंकले तेव्हा त्यांना आनंद झाला नसेल, इतका आनंद चर्चिलना झाला ! फ्रान्सच्या पतनानंतर हिटलरविरोधी झगडा ब्रिटिशांनी चालू ठेविलेला पाहून अमेरिकेंतलें लोकमतसुद्धा त्यांच्या बाजूला झुकूं लागलें होतें. निवडणुकींत विजय प्राप्त होतांच रूझवेल्ट यांनीं अमेरिकन जनतेला सांगितलें, " ब्रिटिशांनी स्वतःचें रक्षण करणें म्हणजे अमेरिकेचेंसुद्धा रक्षण करण्यासारखें आहे." ब्रिटन स्वतःसाठी लढत होतें, स्वतःच्या साम्राज्यासाठी लढत होतें–पण लोकशाहीसाठीसुद्धा लढत होतें !

* * *

## आफ्रिकेंतला विजय :

दोस्तराष्ट्रांच्या प्रचंड पराभवानंतरसुद्धा ब्रिटिशांचें धैर्य खचलें नसलें, तरी एखाद्या विजयाशिवाय त्यांच्या अंगीं नवा उत्साह निर्माण होणें शक्य नव्हतें. जर्मनांचें एखादें लढाऊ जहाज किंवा मुसलोनीचें अर्धें अधिक आरमार बुडविलें हे विजय तर खरेच, पण राष्ट्राला दीर्घकाळ आनंदित

किंवा उन्नत करण्यासारखे ते विजय नव्हते ! हिटलरसारखा एखादा नेत्र-दीपक विजय आपणहि मिळवावा म्हणून, १९४० सालच्या ऑक्टोबर महिन्यांत, मुसलोनींनें निरुपद्रवी आणि तटस्थ अशा ग्रीस देशावर हल्ला केला, तेव्हा ग्रीकांना मदत करणें अशक्य झाल्यामुळे ब्रिटिश जनतेंत नाउमेदीचें वातावरण पसरलें होतें—परंतु, त्याच वेळीं मध्यपूर्वेतील इटालियन साम्राज्यावर हल्ला करण्याच्या योजना चर्चिल आखीत होते. त्या पूर्ण होतांच, ६ डिसेंबर १९४० रोजीं, ब्रिटिश आणि हिंदी फौजांनी इटालीच्या आफ्रिकेंतील सिरेनिका प्रांतावर हल्ला केला ! त्या मोहिमेचें नेतृत्व जनरल वेव्हल यांचेकडे होतें. मोहिमेच्या सुरुवातीपासून इटालियन फौजांच्या पीछेहाटीला सुरुवात झाली. ती संधि साधून चर्चिल यांनी, तेवीस तारखेला, इटालियन जनतेला उद्देशून नभोवाणीवरून भाषण केलें त्या वेळीं ते म्हणाले, "आमच्या सेना तुमच्या साम्राज्याच्या चिंधड्या उडवीत असून लवकरच त्याचा नाश करणार आहेत. ब्रिटन आणि इटाली यांची मैत्री एका माणसाने झिडकारली म्हणून हा बनाव घडून आला आहे. त्या एकाच माणसाने ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध तुम्हाला युद्धांत खेचलें असून, अमेरिकेच्या सहानुभूतीलासुद्धा तुम्ही पारखे झालां आहांत—त्या माणसाचें नांव बेनिटो मुसलोनी !"

* * *

## १९४० सालच्या शेवटीं :

१९४० सालच्या अखेरीबद्दल चर्चिल लिहितात, " ब्रिटिशांचे छत्तीस सेनासमूह सशस्त्र आणि सुसज्ज करण्यांत येऊन, एक लाख माणसें नागरिक दलांत काम करीत होतीं—आम्ही रोमरोमांत जिवंत असून, हिटलरच्या वैमानिकांचा आम्हीं आकाशांत पराभव केला होता—ब्रिटिश बेटांवरील ज्या स्वारीची आमच्याप्रमाणे आमच्या समुद्रांतले मासेसुद्धा वाट पाहात होते, ती स्वारी हिटलरने बेमुदत तहकूब केली होती ! आमच्या इतिहासांतल्या अत्यंत कसोटीच्या समयीं लंडन शहर वर मान करून ताठ उभें होतें, आमचे कारखाने रात्रंदिवस चालू होते आणि सबंध राष्ट्र असामान्य कष्ट करीत होतें—अटलांटिक महासागरांत आणि मध्यपूर्वेत आम्हाला विजयश्रीचें

मंगल दर्शन घडत होतें.

" आमच्या राष्ट्राच्या इतिहासांत १९४० साल हें वर्ष जितकें प्राणघातक अरिष्टांचें तितकेंच असामान्य समजलें पाहिजे—या वर्षींच्या हकीकतीवर मात करील असें ब्रिटिशांच्या इतिहासांत पूर्वी कधीहि कांहीहि घडलें नव्हतें ! अखिल भूतलाच्या भविष्यावर केला जाणारा प्रहार सहन करण्याची ताकद आमच्या चिमुकल्या पण पुरातन बेटांत आहे हें सिद्ध झालें होतें ! आम्हीं कच खाल्ली नव्हती किंवा कर्तव्यापासून यत्किंचितहि ढळलों नव्हतों. ब्रिटिश वंशाचा आणि राष्ट्राचा आत्मा अजिंक्य ठरला होता ! आपल्या पराक्रमाच्या आणि विजयाच्या अत्युच्च शिखरावर उभा असलेल्या हिटलरसारख्या अरेरावाविरुद्ध आम्हीं एकाकी परिस्थितींतसुद्धा लढा दिला होता ! "

* * *

## २२

### १९४१ सालची पहिली सहामाही

१९४१ सालच्या पहिल्या सहा महिन्यांत चर्चिल आणि ब्रिटिश जनता यांना दिलासा देण्यासारख्या फक्त दोनच घटना घडल्या. अध्यक्षीय निवडणुकीनंतर रूझवेल्ट अधिक धीट बनले असल्यामुळे, ब्रिटिशांना मदत करण्यासंबंधांत त्यांनी आणखी एक पाऊल पुढे टाकण्याचा मार्ग शोधून काढून तो अमेरिकन जनतेच्या गळीं उतरविला. रूझवेल्ट अतिशय चाणाक्षपणाने एक एक पाऊल पुढे टाकीत होते आणि आपल्याबरोबर अमेरिकन जनतेलासुद्धा पुढे नेत होते. युद्धांत प्रत्यक्ष भाग घ्यावा लागला नाही तर ब्रिटिशांना लागेल ती मदत करायला हरकत नाही, येथपर्यंत अमेरिकन लोकमताची तयारी झाल्यामुळे, सुप्रसिद्ध 'लेंड अँड लीज' (म्हणजेच 'उधार-उसनवार') कायद्याला अमेरिकेच्या कायदेमंडळाने मार्च १९४१ मध्ये संमति दिली. या कायद्यामुळे अमेरिकेकडून युद्धकार्यासाठी शस्त्रास्त्रें आणि दुसरी कोणतीहि मदत उधारीने विकत घेण्याची सवलत ब्रिटिशांना मिळाली. उधारीने विकत घेतलेल्या मालाची किंमत किती मुदतींत दिली पाहिजे याचीसुद्धा कायद्याने अट घातली नव्हती! "भूतलाच्या इतिहासांतली अत्यंत महान् आणि निःस्वार्थी योजना" असें 'उधार-उसनवार' कायद्याचें वर्णन चर्चिल यांनी केलें! मुसलोनीच्या आफ्रिकन साम्राज्याचें विसर्जन ही दुसरी घटना. मे महिन्याच्या १७ तारखेपर्यंत मुसलोनीचें साम्राज्य हिंदी आणि ब्रिटिश फौजांनीं जिंकलें आणि सव्वादोन लाख युद्धकैदी, चारशे रणगाडे आणि १२९० तोफा—इतकी लूट मिळविली! चर्चिलनी पार्लमेंटांत निवेदन करतांना "या मोहिमेंत हिंदुस्थानच्या लष्कराने फार प्रशंसनीय बहादुरी गाजविली" असें मुक्तकंठाने सांगितलें.

या दोन घटना वगळल्या, तर परिस्थिति अत्यंत निराशाजनक होती ! ब्रिटनवरच्या बॉंबहल्ल्यांना हिटलरने पुन्हा सुरुवात केली होती आणि १९४० सालच्या हल्ल्यांपेक्षा ते अधिक संहारक आणि प्रचंड प्रमाणावर होते. सागरी युद्धांतसुद्धा पाणबुड्यांमुळे ब्रिटिशांची बेसुमार हानि झाली व त्यामुळे आयातीचा व्यापार निम्म्याने घटला होता. एकट्या मार्च महिन्यांत एकंदर सव्वीस लक्ष टनी वजनाच्या बोटी जर्मन पाणबुड्यांनी आणि वैमानिकांनी बुडविल्या होत्या. मे महिन्यांत सुप्रसिद्ध लिव्हरपूल शहरावर बॉंबहल्ला झाला, तेव्हा हजारो घरें उद्ध्वस्त होऊन शहात्तर हजार नागरिक गृहहीन झाले ! १० तारखेला पार्लमेंटची पुरातन इमारत उद्ध्वस्त झाली. आपल्या देशबांधवांतसुद्धा पराभूत वृत्ति निर्माण होते की काय अशी भीति चर्चिलना वाटूं लागली होती, कारण "अमेरिका युद्धांत पडली तरच आपली धडगत आहे" असे उद्गार ऐकूं येऊं लागले होते ! आश्चर्य मात्र असें की, लंडन-मधील ब्रिटिशांचें देऊळ, वेस्टमिन्स्टर अबे, याच्या आसमंतांत अनेक बॉंब पडून अनेक घरें उद्ध्वस्त झालीं, तरी तें पुरातन आणि इतिहासप्रसिद्ध देऊळ मात्र सर्वस्वीं शाबूत राहिलें होतें आणि त्याच्या शिखरावरचें सोनेरी चिन्ह पूर्वीप्रमाणेच चमकत होतें !

अशा परिस्थितींत आपण शरण गेलों नाहीं तोपर्यंत युद्ध लांबेल, लांबलेल्या युद्धांत हिटलर एखादी आत्मघातकी चूक करील, आपल्या बाजूने लढायला एखादें राष्ट्र सिद्ध होईल या आशेवर चर्चिल दिवस कंठीत होते—पण ती आशासुद्धा नष्ट होत चालली होती ! बाल्कन राष्ट्रांची एकजूट होऊन तीं हिटलरविरुद्ध उभीं राहिलीं, तर त्यांना मदत करून आपण युरोपांतच एक आघाडी उघडूं शकूं असें चर्चिलना वाटत होतें. परंतु हिटलरला विरोध करणें म्हणजे स्वतःच्या नाशालाच आमंत्रण देण्या-सारखें आहे अशी सर्व छोट्या राष्ट्रांची खात्री झाली होती. मुसलोनीविरुद्ध सुद्धा ग्रीसला ब्रिटिशांना मदत करतां आली नाही हें स्पष्ट झालें असतांना, ब्रिटिशांच्या आधारावर हिटलरशीं वैर पत्करायला कोणतेंच राष्ट्र तयार नव्हतें. इतकेंच नव्हे, तर हिटलरच्या दडपणाला बळी पडून बल्गेरिया आणि रुमानिया या राष्ट्रांनी अक्षराष्ट्रांच्या गट्टींत प्रवेश केला !

युगोस्लाव्हियाच्या पुढाऱ्यांनासुद्धा हिटलरचें दडपण असह्य होऊन,

मार्च महिन्याच्या २५ तारखेला, त्यांनी हिटलरबरोबर परस्पर-सहकार्याचा करार केला–हा करार होऊं नये म्हणून चार्चिलनी आटोकाट प्रयत्न केले पण ते व्यर्थ गेले ! जुन्या ऑस्ट्रो–हंगेरियन साम्राज्याचे १९१४ सालच्या युद्धानंतर तुकडे करून जीं नवीं राष्ट्रें दोस्तराष्ट्रांनी स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला अनुसरून निर्माण केलीं, त्यांपैकी झेकोस्लाव्हिया आणि युगोस्लाव्हिया हीं राष्ट्रें होतीं. परंतु फ्रान्स आणि इंग्लंडने झेकोस्लाव्हियाच्या वेळीं जें वर्तन केलें, आणि फ्रान्सच्या पतनानंतर जी परिस्थिति निर्माण झाली, ती लक्षांत घेतां युगोस्लाव्हियाच्या नेत्यांना हिटलरच्या इच्छेला मान देणें अधिक सुरक्षित वाटलें.

परंतु जनतेची इच्छा तशी नव्हती ! आपल्या नेत्यांनी केलेल्या कराराची बातमी समजतांच जनता खवळली आणि तिने आपल्या राज्यकर्त्यांविरुद्ध बंड पुकारून त्यांनी हिटलरबरोबर केलेला करार धुडकावून लाविला ! आपल्या कृत्यामुळे आपण साक्षात् संहाराला आमंत्रण देतों आहें याची जाणीव असूनसुद्धा, स्वातंत्र्यासाठी आणि स्वाभिमानासाठी, युगोस्लाव्हियन जनतेने बंडाचा मार्ग पत्करला !–अखेर व्हायचें तेंच झालें.

एप्रिलच्या ६ तारखेला हिटलरने युगोस्लाव्हियावर हल्ला करून दोन दिवसांत तो देश पादाक्रांत केला. तेथील बंडखोर जनतेला धडा शिकविण्याकरिताच नव्हे, तर हिटलरच्या मर्जीविरुद्ध वागण्याचें ज्या राष्ट्रांच्या मनांत असेल त्या सर्वांना इषारा मिळावा म्हणून राजधानींतल्या सतरा हजार नागरिकांची जर्मन सैनिकांनी कत्तल केली ! बेचिराख होत चाललेल्या राजधानींत भडकलेल्या आगीच्या ज्वाला आणि दृष्टीला अंध करणारा धूर चौफेर पसरला असतां, प्राणिसंग्रहालयांतून मुक्त झालेलीं क्रूर श्वापदें नगरांत शिरलीं ! चार्चिल लिहितात, “त्या भयानक वातावरणांत आस्ते आस्ते पावलें टाकीत एक अस्वल चाललें होतें. काय होणार आहे तेंच त्याला समजत नव्हतें–पण ज्याला समजत नव्हतें असें तें एकटेंच ‘अस्वल’ नव्हतें !”—ब्रिटिशांच्या ‘सिंहा’ प्रमाणे रशियनांचा ‘अस्वल’ म्हणून उल्लेख करण्याचा प्रघात आहे.

उत्तर आफ्रिका जर ब्रिटिशांच्या ताब्यांत राहिली तर युरोपच्या दक्षिणेकडून त्यांना दुसरी आघाडी उघडणें शक्य होईल, ती शक्यता नष्ट

करण्यासाठी जनरल रोमेल याच्या आधिपत्याखाली हिटलरने उत्तर आफ्रिकेंत जर्मन सेना पाठविली. इटालियन साम्राज्य मुसलोनीला पुन्हा जिंकून देण्याची कामगिरी रोमेलने पत्करिली होती. ब्रिटिशांचें जागरूक आणि बलाढ्य आरमार भूमध्यसमुद्रांत संचार करीत असूनहि, रोमेलचें सैन्य उत्तर आफ्रिकेंत केव्हा आणि कसें गेलें तें ब्रिटिशांना समजलेंसुद्धा नाही !

मुसलोनीने ग्रीसवर हल्ला चढवून कित्येक महिने लोटले तरी ग्रीकांच्या बहादूर सैनिकांनी इटालियन सेनेचेच पराभव केले होते. तें पाहून एप्रिलच्या ६ तारखेला हिटलरनें ग्रीसविरुद्ध युद्ध पुकारलें आणि दुर्लंघ्य समजल्या गेलेल्या डोंगराळ प्रदेशांतली ती मोहीम २४ तारखेला संपविली ! अशा-रीतीने बाल्कन राष्ट्रांतून ब्रिटिशांची उचलबांगडी होऊन, पूर्वेकडून आघाडी उघडण्याची चर्चिल यांची इच्छा विफल झाली. युरोपच्या किनाऱ्यावर पहारा करणाऱ्या जर्मन सैन्याने युरोपांत एकाहि ब्रिटिश माणसाला प्रवेश करतां येणार नाही अशी व्यवस्था करून टाकली !

* * *

**हिटलरचे छत्रीधारी सैनिक :**

युरोपच्या आग्नेय कोपऱ्यांतलें क्रीट नांवाचें बेट समुद्राने आणि ब्रिटि-शांच्या आरमाराने वेढलेलें होतें. " आरमाराची अडकाठी मी मानीत नाहीं —माझ्या वैमानिकांच्या जोरावर मी वाटेल तें बेट ताब्यांत घेऊं शकेन, " हें सिद्ध करण्याकरिता हिटलरने एप्रिलच्या २० तारखेला क्रीट बेटावर वैमानिक हल्ला चढविला. ब्रिटिशांचें आरमार आकाशाकडे आ वासून पाहात होतें आणि हिटलरचीं विमानें, अंतराळांत भ्रमण करीत, छत्रीधारी सैनिकांना त्या बेटावर उतरवीत होतीं. त्या भागांत ब्रिटिशांचीं विमानें नसल्यामुळे, हिटलरच्या विमानांना कोणाचाच विरोध नव्हता. त्याच्या विमानांतून क्रीट बेटावर उतरलेल्या हजारो छत्रीधारी सैनिकांपैकी पांच हजार सैनिक मारले गेल्यावर, बेटावरील सैनिकांचा दारूगोळा संपल्यामुळे, तें आपोआप जर्मनांच्या ताब्यांत गेलें. त्यासंबंधी चर्चिल लिहितात, " हे छत्रीधारी सैनिक म्हणजे हिटलरच्या युवक–चळवळीची तेजस्वी ज्योतच समजली पाहिजे–१९१८ सालच्या पराभवाचा सूड उगवण्याच्या निर्धाराचें तें प्रतीक होतें.

अतिशय शूर, अतिशय निष्णात आणि सर्वस्वीं एकनिष्ठ अशा छत्रीधारी सैनिकांचें तें पथक म्हणजे जर्मन पुरुषार्थांचा आणि पराक्रमाचा अर्कच समजला पाहिजे–जर्मन राष्ट्राची कीर्ति आणि भूतलाचें अधिराज्य, यांच्यासाठी स्वतःचें सर्वस्व समर्पण करणें हा त्यांचा निर्धार होता आणि तोच त्यांचा धर्म होता ! ”

* * *

**रशियावर हल्ला :**

क्रीटच्या मोहिमेचें तंत्र वापरून हिटलर आता ब्रिटिश बेटांवर झडप घालणार अशी अनेकांची खात्री होती. ब्रिटिश बेटांवरील स्वारीचें प्रात्यक्षिकच क्रीट बेटांवर हल्ला करून हिटलरनें दाखविलें असा सर्वांचा समज झाला, पण झालें काय ?–तर ज्याच्याबरोबर हिटलरने अनाक्रमणाचा करार केला होता, ज्या राष्ट्राने त्याला युद्ध सुरू झाल्यापासून युद्धाला उपयोगी पडेल असा माल पुरविला होता, त्या राष्ट्रावर–त्या सोव्हिएट रशियावर, कोणतीहि पूर्वसूचना न देतां हिटलरने हल्ला चढविला ! त्या हल्ल्याचा दिवस हिटलरने अगोदरच निश्चित केला होता—जून महिन्याची २२ तारीख ! कारण, त्याच तारखेला नेपोलियनने रशियावरील हल्ल्याची सुरुवात केली होती ! रशियांतील हिंवाळ्यांत नेपोलियनची विजयी सेना गारठली–रशियाला तिने घेरण्याऐवजी रशियाच्या अफाट भूविस्ताराने नेपोलियनच्या सेनेला घेरल्यामुळे अखेर तिचा नाश झाला ! नेपोलियनने केलेल्या सर्व चुकांचा अभ्यास करून, त्या चुका आपल्या हातून होणार नाहीत अशी खबरदारी हिटलरने घेतली होती ! हवामानशास्त्राच्या तज्ज्ञांचा आणि ज्योतिषांचासुद्धा सल्ला त्याने घेतला होता. रशियन मोहिमेची सुरुवात होतांच, “ भूतलाच्या इतिहासांतली सर्वांत प्रचंड आगेकूच सुरू झाली आहे–” असें हिटलरने नभोवाणीवरून जाहीर केलें. त्या हल्ल्यांत फिनलंड, रुमानिया आणि बल्गेरिया या देशांच्या सेना जर्मन सेनेशीं सहकार्य करीत होत्या, कारण रशियाने बळकाविलेले त्यांचे भूविभाग त्यांना परत मिळवायचे होते ! हिटलर आणि त्याच्या दोस्तराष्ट्रांच्या सेनांनी रशियाच्या दीर्घ सरहद्दीवर एकसमयावच्छेदेंकरून हल्ला केला–त्या वेळीं

जर्मनीचीं सत्तावीसशें विमानें रशियन आकाशांत संचार करीत होतीं !

कम्युनिस्टांचा द्वेष हा हिटलरच्या तत्त्वज्ञानाचा गाभा होता आणि कम्युनिस्टांचा नाश ही त्याची केवळ महत्त्वाकांक्षा नसून, तो त्याचा धर्म होता. स्टालिनच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठी, पश्चिमेकडील युद्ध चालू असतां पूर्वेकडे दुसरी आघाडी निर्माण होऊं नये म्हणून, त्याने रशियाबरोबर अनाक्रमणाचा करार केला होता. परंतु, पश्चिमेचा बंदोबस्त केल्यानंतर प्रथम रशियावर हल्ला करावयाचा हें त्याने अगोदरच निश्चित केलें होतें. रशियाचा आपण सहा आठवड्यांत निःपात करूं असा त्याचा विश्वास होता. हिटलरचा व्यूह आता स्पष्ट झाला होता. रशियावर आपण हल्ला चढवूं तेव्हा त्याला कोणत्याहि राष्ट्राची मदत मिळूं नये—आपल्या आरमाराच्या जोरावर ब्रिटिशांना युरोपांत सैन्य उतरवितां येऊं नये म्हणून त्याने डेन्मार्क, नॉर्वे, युगोस्लाव्हिया आणि ग्रीस हे देश पादाक्रांत करुन रशियन सरहद्दीला, जणू काय, विळखा घातला होता ! रशियाबरोबरच्या युद्धांत फिनलंड, बल्गेरिया आणि रुमानिया या देशांचीं सैन्यें जर्मन सैन्याबरोबर लढावींत म्हणून रशिया त्यांचे लचके तोडीत होता त्या वेळीं हिटलर, जाणूनबुजून, स्वस्थ बसला होता !

१९४१ सालचे पहिले सहा महिने ब्रिटिशांना अत्यंत वाईट गेले होते. त्या सालच्या सहाव्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत हा बनाव घडून आला. युद्ध लांबलें म्हणजे आपल्याला एखादा प्रबळ सोबती मिळेल, ही चर्चिल यांची अपेक्षा पूर्ण व्हावयाच्या मार्गाला लागली होती.

कम्युनिस्टांची राजवट रशियामध्यें प्रथम प्रस्थापित होत असतांना तिचा बीमोड करण्याचा ज्यांनी प्रयत्न केला, त्यांत चर्चिल प्रमुख होते. चर्चिल यांच्यासारख्या लोकशाहीच्या पूजकाला बोल्शेव्हिकांचा रक्तपाताचा आणि हुकूमशाहीचा मार्ग पसंत नव्हता. हिटलरने रशियावर हल्ला केल्यामुळे कम्युनिस्टांचा परस्पर नाश होईल म्हणून अमेरिकेंतच नव्हे, तर इंग्लंडमध्येसुद्धा समाधानाची लाट पसरेल हें चर्चिल जाणून होते. परंतु, रशियाचा पराभव झाला तर हिटलरचें बळ शतपटीनें वाढून तो खरोखरच अजिंक्य ठरेल हेंहि चर्चिल जाणून होते. आणि म्हणूनच, कम्युनिस्ट रशियावर हिटलरने हल्ला केला आहे यांतच समाधान मानणाऱ्या राष्ट्रांचें—

आणि विशेषतः अमेरिकेचें---मार्गदर्शन व्हावें, म्हणून जून महिन्याच्या २२ तारखेला नभोवाणीवरून भाषण करतांना ते म्हणाले,

"गेल्या पंचवीस वर्षांत कम्युनिझमविरुद्ध मीं जितकी टीका केली तितकी कदाचित् कोणींहि केली नसेल. कम्युनिस्टांबद्दल मी यापूर्वीं जें बोललों आहे, त्यांपैकी एक अक्षरसुद्धा मागे घेण्याची मला गरज वाटत नाही ! कारण आता ज्या घटना घडत आहेत त्या रशियन सैनिकांचा नाश करीत नसून, रशियन शेतकऱ्यांचासुद्धा नाश करताहेत ! या घटकेला जर्मन सैनिक हे रशियन शेतकऱ्यांचीं घरेंदारें अत्यंत क्रूरपणानें उद्‌ध्वस्त करीत आहेत. जो देश हिटलरबरोबर लढेल त्याला मदत करण्याचा आम्हीं विडा उचलला असल्याकारणाने, या लढतींत आम्ही रशिया आणि रशियन जनतेला शक्य ती सर्व मदत करूं हें उघडच आहे. रशियावरील हिटलरचा हल्ला म्हणजे ब्रिटिश बेटांवरील त्याच्या संकल्पित स्वारीची पूर्वतयारीच समजली पाहिजे. प्रथम रशियाचा आणि त्यानंतर इंग्लंडचा आपण नाश करूं अशी हिटलरची खात्री असून, या दोन देशांना पादाक्रांत केल्यानंतरच तो त्याच्या कार्यक्रमांतल्या शेवटच्या मोहिमेची सुरुवात करील ! कारण ती मोहीम जर यशस्वी झाली नाही तर त्याचे सर्व विजय फुकट जातील. ती मोहीम म्हणजे अमेरिकेला पादाक्रान्त करण्याची मोहीम ! आणि म्हणूनच, रशियावरचें संकट हें ज्याप्रमाणे ब्रिटिश बेटांवरचें संकट आहे, तसेंच तें अमेरिकेवरचेंहि संकटच आहे !"

१९४१ सालच्या पूर्वार्धाच्या शेवटच्या आठवडयांत प्रत्यक्ष युरोपच्या भूमीवर हिटलरबरोबर झुंज देणारा एक 'दोस्त' ब्रिटिशांना लाभला. रूसो-जर्मन युद्धाकडे आपल्या देशबांधवांनी किंवा अमेरिकन जनतेने तटस्थ वृत्तीने पाहूं नये, आणि रशियाचा नाश चिंतून, युद्धकार्याकडे दुर्लक्ष करूं नये हाच चर्चिल यांच्या भाषणाचा उद्देश होता, आणि म्हणूनच कम्युनिस्टांच्या नेत्यांऐवजी रशियांतल्या शेतकऱ्यांकडे त्यांनी सर्वांचें लक्ष वेधलें होतें ! रशियावरील स्वारी ही हिटलरची इंग्लंड आणि अमेरिकेला पादाक्रान्त करण्याची पूर्वतयारी आहे असें सांगून, चर्चिल यांनी त्या वारीचें स्वरूपच बदलून टाकलें ! चर्चिल यांच्या त्या एकाच भाषणामुळे

रूसो-जर्मन युद्धाकडे तटस्थतेने पाहणें चुकीचें ठरेल अशी जाणीव अमेरिकेंत उत्पन्न झाली !

रशियन मोहिमेच्या पहिल्या चार आठवड्यांत जर्मन सेनेने पूर्वेकडे तीनशे मैलांची धडक मारल्यामुळे रशियाचा सहा आठवड्यांत खरोखरच निःपात होतो की काय अशी परिस्थिति निर्माण झाली ! रूसो–जर्मन युद्ध सुरू होण्यापूर्वी स्टालिनने हिटलरशीं हातमिळवणी करून ब्रिटिश साम्राज्याची आपसांत विभागणी करण्याची योजना आखली होती. फ्रान्सचा पराभव होऊन पश्चिमेकडची आघाडी उद्ध्वस्त झालेली पाहण्यांत आनंद मानला होता. आता मात्र स्टालिनला ब्रिटिशांच्या मदतीची आणि दुसऱ्या आघाडीची अत्यंत निकडीची गरज वाटूं लागली ! रशियाला मदत करावी अशी ब्रिटिशांची परिस्थिति नसतांना चर्चिल यांनी दोनशे विमानें, दहा हजार टन रबर, लोकर, लोकरी कपडे, ताग आणि इतर कितीतरी माल ताबडतोब पाठविला. इतकेंच नव्हे, तर रशियाजवळ पुरेशीं जहाजें नसल्यामुळे, जर्मन पाणबुड्यांच्या आणि विमानांच्या माऱ्यांतून, ब्रिटिश जहाजांनाच तो माल रशियन बंदरांत पोहोचवावा लागला–कारण ब्रिटन जिवंत राहण्यासाठी रशिया जिवंत राहणें अवश्य होतें !

* * *

**अटलांटिक सनद :**

१९४१ सालच्या एप्रिल महिन्यांत ब्रिटिशांची परिस्थिति अतिशय बिकट झाली असली आणि, त्यांच्या संरक्षणासाठी, अमेरिकेनें युद्धांत पडावें असें रुझवेल्ट यांना वाटत असलें तरी अमेरिकेंतील लोकमत अजूनहि युद्ध-विरोधी होतें. परंतु त्या वेळीं ब्रिटन एकाकी अवस्थेंत हिटलरशीं जो झगडा करीत होतें त्याची किंमत रुझवेल्ट ओळखून होते. रुझवेल्ट यांचे निवडणुकींतले पराभूत प्रतिस्पर्धी, वेंडेल विल्की, हे निवडणुकीनंतर रुझवेल्ट यांचे खास प्रतिनिधि म्हणून लंडनला गेले, त्या वेळीं चर्चिलना देण्यासाठी रुझवेल्टनी त्यांच्याजवळ सुप्रसिद्ध इंग्रज कवि, लॉंगफेलो, याच्या कवनांतला एक उतारा दिला होता, त्याच्या शेवटच्या तीन ओळींचा मथितार्थ पुढील-प्रमाणे होता :—

भयभीत झालेली मानवतेची–
तिच्या भविष्यासंबंधीची सर्व आशा–
तुमच्या भवितव्यावर अवलंबून आहे !
[ Humanity with all its fears
With all hopes of future years
Is hanging breathless on thy fate ! ]

रूसो-जर्मन युद्धाची सुरुवात होतांच, अमेरिकेने रशियाला मदत केली पाहिजे अशी चर्चिल यांनी रूझवेल्टना विनंती केली ! रूझवेल्ट यांचा खाजगी सल्लागार, हॅरी हॉपकिन्स, हा जुलै महिन्यांत चर्चिल यांची भेट घेऊन मॉस्कोला गेला. त्याची आणि स्टालिनची मुलाखत झाली त्या वेळीं स्टालिन म्हणाला, " जर्मन लष्करी यंत्राचा नाश करणें रशिया आणि इंग्लंड यांच्या संयुक्त शक्तीलासुद्धा जड जाईल. परंतु, जर्मनीविरुद्ध अमेरिकेने युद्ध पुकारलें तर, कदाचित् एक बारसुद्धा उडवावा लागण्यापूर्वी, जर्मनी शरण येईल ! "

युद्धाच्या परिस्थितीसंबंधी, रशियाला करावयाच्या मदतीसंबंधी आणि भूतलाच्या युद्धोत्तर रचनेविषयी चर्चिल आणि रूझवेल्ट यांच्या प्रत्यक्ष भेटीची आवश्यकता निर्माण झाली होती. रूझवेल्ट इंग्लंडांत येतील अशी शक्यता न दिसल्यामुळे चर्चिल अमेरिकेच्या सफरीला निघाले. सागरांतल्या त्या सफरीसंबंधी चर्चिल लिहितात, " सर्वस्वीं अपरिमित अशी विश्रांति युद्ध सुरू झाल्यापासून त्या चारपांच दिवसांत मीं प्रथमच अनुभविली ! " १० ऑगस्ट १९४१ रोजीं अर्जेंटिना येथे झालेल्या त्यांच्या भेटींत, उधार-उसनवारीच्या तत्त्वावर अमेरिकेने रशियाला मदत करण्याचें निश्चित झालें. त्या निर्णयानुसार अमेरिकेने रशियाला हजारो रणगाडे आणि विमानें पुरविलीं. भूतलाच्या युद्धोत्तर रचनेचीं मूलतत्त्वें घोषित करणारा 'अटलांटिक चार्टर' याच भेटींत, १२ऑगस्ट १९४१ रोजीं, जाहीर झाला–त्या जाहिर-नाम्यापैकी पांच परिच्छेद चर्चिल यांनी, दोन रूझवेल्ट यांनी आणि एक मेजर ॲटली यांनी तयार केला होता.

एका अमेरिकन विनाशिकेवर जर्मन पाणबुडीनें निष्कारण हल्ला केल्या-मुळे, अटलांटिक महासागरांत दिसेल त्या जर्मन जहाजावर हल्ला करण्याचा

आदेश रूझवेल्टनी अमेरिकन आरमाराला दिला. २७ आक्टोबर १९४१ रोजीं केलेल्या भाषणांत ते म्हणाले, "गोळीबाराला आता सुरुवात झाली असून, पहिली गोळी कोणीं झाडली त्याची नोंद इतिहासानें केली आहे–शेवटची गोळी कोण झाडतो तेंच आता पाहायचें आहे!" या भाषणामुळे अमेरिका युद्धांत पडणार असा रंग दिसूं लागला–पण त्यानंतर तीनच दिवसांत जर्मन पाणबुड्यांनी एक अमेरिकन विनाशिका बुडविली तरी रूझवेल्ट स्वस्थ होते! हिटलर अमेरिकेचा अंदाजच घेत होता आणि दोस्तराष्ट्रांना लागेल ती मदत करावयाची पण प्रत्यक्ष युद्धांत पडायचें नाही असाच, जणू काय, रूझवेल्टनी निर्धार केला होता. दिवसामागून दिवस जात होते. रशियांत हिवाळा सुरू झाल्यामुळे जर्मनांची मोहीम थंडावली होती–अजूनहि अमेरिका युद्धांत पडत नाही म्हणून चर्चिल नाराज होत चालले होते!

* * *

**जपानी साहस :**

—इतक्यांत १९४१ सालच्या डिसेंबरची ७ तारीख उजाडली आणि कोणतीहि पूर्वसूचना न देतां जपानने अतिपूर्वेकडील अमेरिकेच्या आरमारी तळावर वैमानिका हल्ला केला–त्या तळाचें नांव पर्लहार्बर! तो हल्ला जितका अकस्मात् तितकाच तीव्र होता–अवघ्या दोन तासांत जपानी वैमानिकांनी अमेरिकेचीं ९४ जहाजें बुडविलीं! ती बातमी ऐकून अखिल भूतल तर थक्क झालेंच, पण हिटलरसुद्धा थक्क झाला! जपान असें कांही करील अशी त्याला कल्पना नव्हती–पीतवर्णीय वंशांचें हेंच वैशिष्ट्य असावें!

चर्चिल यांना ती बातमी समजतांच त्यांनी रूझवेल्टना टेलिफोन केला आणि विचारलें, "ही काय भानगड आहे?"–त्यांना उत्तर मिळालें,

"जपानने आमच्यावर हल्ला केला आहे–आपण आता सहप्रवासी झालों आहोंत."—

चर्चिल लिहितात, "आम्ही सर्वजण त्या घटनेमुळे आश्चर्यचकित झालों–जागतिक घटनांच्या मध्यभागीं वावरणाऱ्यांनासुद्धा कांही काळ दिङ्मूढ करील अशी ती घटना होती!"

८ तारखेला इंग्लंडनें जपानविरुद्ध युद्ध पुकारलें आणि १० तारखेला जर्मनी आणि इटालीने अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारलें—१९१४ सालचें युद्ध हें 'महायुद्ध' म्हणून ओळखलें जातें—१९३९ सालीं सुरू झालेल्या युद्धाला १९४१ सालीं 'जागतिक युद्धाचें' स्वरूप प्राप्त झालें.

अक्षराष्ट्रांच्या इच्छामात्रें करून एकाकी सापडलेल्या ब्रिटिशांना आता दोन प्रबल सोबती लाभले होते. अमेरिकेच्या युद्धप्रवेशामुळे चर्चिलना किती आनंद झाला असेल त्याची कल्पनाच करावी! ते लिहितात,

"आम्ही हें युद्ध खरोखरच जिकलों म्हणायचें! डंकर्कनंतर, फ्रान्सच्या पतनानंतर, आमच्या बेटांवरील स्वारीच्या भीतीनंतर, अटलांटिक महासागरांतील समरानंतर, सतत सतरा महिने एकाकी स्थितींत लढा दिल्यानंतर आमचा विजय निश्चित झाला होता! आता इंग्लंड जिवंत राहील आणि राष्ट्रकुलसंघसुद्धा जिवंत राहील. युद्ध किती काळ चालू राहील आणि कोणत्या रीतीने संपेल हें अजून कोणालाच सांगतां आलें नसतें—आणि मला त्याची फिकीरहि नव्हती! आम्हाला भयानक जखमा झाल्या असल्या आणि आमचे कांही अवयव छिन्नभिन्न झाले असले, तरी आमच्या बेटाच्या प्रदीर्घ इतिहासांत आम्ही पुनः यशस्वी आणि सुरक्षित होणार होतों. त्या दिवशीं मी भावनातिशयाने बिछान्यावर पडलों आणि एखाद्या मुक्त आणि कृतज्ञ माणसाप्रमाणे निद्रेच्या अधीन झालों!"

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३४८४१ वि: .....
क्रमांक ......... नों. दि. .....

२३

## संयुक्त राष्ट्रसंघ

पर्लहार्बरवर जपानने हल्ला केल्यानंतर एका पंधरवड्यांत अटलांटिक महासागर ओलांडून चर्चिल अमेरिकेला गेले. चर्चिल आणि रूझवेल्ट यांची ही युद्धकालीन दुसरी भेट २२ डिसेंबर १९४१ पासून १४ जानेवारी १९४२ पर्यंत चालू होती. जर्मनी आणि जपान यांचा पराभव करण्याकरिता युद्धसाहित्याच्या निर्मितीचा जो प्रचंड कार्यक्रम हातीं घ्यावयाचा त्याचीं उद्दिष्टें याच भेटींत निश्चित झालीं तीं अशीं :

| | १९४२ | १९४३ |
|---|---|---|
| विमानें | ४५,००० | १००,००० |
| रणगाडे | ४५,००० | ७५,००० |
| जहाजें | ८०,००,००० (टन) | १,००,००,००० (टन) |

याच भेटींत संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेचा पहिला मसुदा १ जानेवारी १९४२ रोजीं चर्चिल आणि रूझवेल्ट यांनी तयार केला.

* * *

## सिंगापूर आणि ब्रह्मदेश :

वॉशिंग्टन येथे झालेल्या या भेटीनंतर संतुष्ट मनाने चर्चिल इंग्लंडला परतले. “आम्ही आता हें युद्ध खरोखरच जिंकलों” अशी त्यांची त्यापूर्वीच खात्री झाली होती. परंतु हा विश्वास फोल वाटावा अशा घटना १९४२ सालच्या पहिल्या सहामाहींत घडून आल्या! पर्लहार्बर येथील अमेरिकन आरमाराचा नाश झाल्यामुळे, केवळ दोन तासांत, जपानची

प्रशांत महासागरावर निरंकुश सत्ता प्रस्थापित झाली होती. परंतु सिंगापूर येथील अभेद्य समजल्या गेलेल्या ब्रिटिशांच्या तळावरील आरमार जपानची प्रगति थोपवूं शकेल असा चर्चिल यांना विश्वास वाटत होता. परंतु कांही काळ लोटतो न लोटतो तोच सिंगापूरच्या तळावरचीं ' प्रिन्स ऑफ वेल्स ' आणि ' रिपल्स ' हीं ब्रिटिशांचीं दोन बलाढ्य आणि अद्ययावत् लढाऊ जहाजें, जपानी वैमानिकांनी अत्यंत कुशलतेने आणि चापल्याने बुडविलीं ! त्यामुळे सागरी युद्धाची ती आघाडी उघडी पडून प्रथम डचांचीं जावा आणि सुमात्रा हीं बेटें, नंतर सयाम आणि शेवटीं, १५ फेब्रुवारी १९४२ रोजीं, सिंगापूरसुद्धा जपान्यांनी हस्तगत केलें. " सिंगापूरचा पाडाव हा ब्रिटिश सत्तेचा तिच्या इतिहासांतला सर्वांत मोठा पराजय आहे " असें निवेदन चर्चिलनी पार्लमेंटांत केलें, त्या वेळीं त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. त्या एका वाक्यापलीकडे त्यांच्या जिभेवर नाचणाऱ्या रसवंतीची झेप जाऊं शकली नाही ! डोळ्यांत दाटलेले अश्रु पुशीत ते कसे-बसे आपल्या जागेवर जाऊन बसले !

त्यानंतर ब्रह्मदेश पादाक्रांत करून जपानी फौजा एप्रिल महिन्यांत हिंदुस्थानच्या सरहद्दीवर येऊन ठेपल्या, सिलोनवर बॉंब पडूं लागले आणि हिंदी महासागरांतल्या ब्रिटिशांच्या तुटपुंज्या आरमाराने पळ काढला, त्या वेळीं जपानचीं सहा लढाऊ आणि पांच विमानवाहू जहाजें हिंदी महा-सागरांत संचार करीत होतीं. त्याच वेळीं हिंदुस्थानांत महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली कायदेभंगाची चळवळ सुरू असल्यामुळे, एखाद्या पिकलेल्या फळाप्रमाणे हिंदुस्थान आपल्या हातांत पडणार अशी जपानी पुढाऱ्यांना आशा वाटूं लागली.

—पण त्याच वेळीं निसर्ग त्यांच्या विरुद्ध गेला——पावसाळा सुरू झाल्यामुळे हिंदुस्थानवरील स्वारीचा बेत जपानने तहकूब केला !

१९४२ सालच्या पहिल्या सहामाहींत जर्मन आणि जपानी पाण-बुड्यांनी दोस्तराष्ट्रांचीं एकंदर तीस लक्ष टनांचीं जहाजें बुडविलीं. त्यांत ब्रिटिशांचा वाटा अकरा लक्ष टनांचा होता. उत्तर आफ्रिकेंतलें ब्रिटिशांचें टोब्रुक हें महत्त्वाचें ठाणें जनरल रोमेलने जिंकून तो ईजिप्तच्या दारावर धक्के मारूं लागला ! सुवेझचा कालवा जर त्याने हस्तगत केला असता तर

अँग्लो-अमेरिकनांच्या युद्धकार्याच्या नाड्याच आखडल्या गेल्या असत्या. टोब्रुकचा पाडाव इतका अकस्मात् झाला की, तेथील लष्कराने रोमेलचा प्रतिकार केला किंवा नाही हेंसुद्धा समजेना! आणि म्हणूनच, "पराभव मी समजूं शकतों—परंतु ही तर शुद्ध नाचक्की आहे," हे त्या घटनेसंबंधीचे चर्चिल यांचे उद्गार आहेत!

* * *

**मॉस्कोची सफर :**

जपानबरोबरच्या आरमारी युद्धांत झालेला इंग्लंड आणि अमेरिकेचा पराभव, मुसलोनीच्या पादाक्रान्त केलेल्या आफ्रिकन साम्राज्यांत रोमेलने केलेला इंग्लंडचा पराभव— हीं शल्यें चर्चिल यांना डाचत असतां, रशियन आघाडीवरील हकीकत त्यांना दिलासा देणारी नव्हती. जर्मन युद्धयंत्राचा प्रचंड मारा आपल्याला सहन करावा लागून आपली भूमि उद्ध्वस्त होत असूनहि, इंग्लंड आणि अमेरिका पश्चिमेकडे दुसरी आघाडी उघडत नाहीत म्हणून स्टालिन नाराज आणि आपल्या दोस्तांच्या हेतूंबद्दल साशंक होत चालला होता. "पूर्ण तयारी झाल्याशिवाय दुसरी आघाडी उघडणें आणि त्यांत अपयश येणें हा युद्ध हरण्याचा सोपा मार्ग आहे" असें चर्चिल यांचें ठाम मत होतें. स्टालिनच्या मनांतल्या शंकाकुशंका त्याच्या प्रत्यक्ष भेटीशिवाय नाहीशा होणार नाहीत, म्हणून चर्चिलनी स्टालिनच्या भेटीसाठी मॉस्कोची वारी करावयाचें ठरविलें. स्टालिनसमोर निश्चित अशा कोणत्या योजना मांडायच्या तें ठरविण्यासाठी, १८ जून १९४२ रोजीं, ते विमानाने वॉशिंग्टनला रूझवेल्ट यांना भेटायला गेले आणि, त्यानंतर कांही दिवसांनी, त्यांनी मॉस्कोचा मार्ग पत्करला. मॉस्कोच्या प्रवासांत त्यांच्या मनांत जे विचार येत होते त्यासंबंधी ते लिहितात,

"बोल्शेव्हिकांच्या ज्या राजवटीच्या गळ्याला ती जन्मतांच मीं नख लावायचा प्रयत्न केला होता आणि जिला मी स्वातंत्र्याची आणि संस्कृतीची शत्रु समजत होतों, तिच्या नेत्यांशीं वाटाघाटी करायला मी आता निघालों होतों. त्यांच्या दुष्ट राजवटीचा आम्हीं नेहमी तिरस्कारच केला होता. हिटलरने जर त्यांच्यावर हल्ला चढविला नसता तर आमच्या विनाशांत

आनंद मानून त्यांनीसुद्धा, हिटलरच्या हातांत हात घालून, आमचें साम्राज्य गिळंकृत केलें असतें. ”

मॉस्कोच्या मुक्कामांत चर्चिलना साजेल असा स्टालिनने त्यांचा उत्कृष्ट पाहुणचार केला. रशियाचा परराष्ट्रमंत्री, मॉलोटोव्ह, मे महिन्यांत लंडनला आला होता तेव्हा, त्याची व्यवस्था केली होती त्या ठिकाणचे बिछाने आणि स्नानगृहेंसुद्धा त्याच्या शरीरसंरक्षकांनी तपासलीं होतीं—न जाणो कोठेतरी एखादा बॉंब दडवला असेल, एखादा मारेकरी लपविला असेल! चर्चिल म्हणतात, “ आपला खून करून आपल्या यजमानाचा कांही फायदा होणार आहे का, याचा प्रत्येकाने विचार करावा—मॉस्कोंतील माझ्या मुक्कामांत सुरक्षिततेबद्दल मला क्षणमात्रसुद्धा काळजी वाटली नाही ! ”

मॉस्कोच्या मुक्कामांत स्टालिन आणि चर्चिल यांनी एकमेकांच्या अडचणींचा विचार करून, जर्मनीविरुद्ध करावयाच्या युद्धाच्या योजना आखल्या. १९४२ सालीं दुसरी आघाडी उघडणें सर्वस्वीं अशक्य आहे हें चर्चिलनी स्पष्ट केलें. रूझवेल्ट यांची भेट घेऊन चर्चिल आपल्या भेटीला आले आहेत हें स्टालिनला माहीत असल्यामुळे, त्यांचीं मतें हीं रूझवेल्टचींहि मतें आहेत याची त्याला जाणीव होती. हॉपकिन्स लिहितो, “ अँग्लो-अमेरिकनांनी आखलेल्या योजनांसंबंधी चर्चिल एकदा इतक्या तद्रूपतेने आणि प्रभावाने बोलूं लागले, की त्यांच्या भाषणाची नोंद करणारा इंग्रज लेखनिक, जणू काय, मंत्रमुग्ध झाला आणि, नोंद करण्याची कामगिरी विसरून, चर्चिल यांचें वक्तव्य नुसता ऐकतच राहिला ! ” चर्चिल यांच्या भेटीला हॉपकिन्स एकदा सकाळीं गेला तेव्हा मद्याच्या घोटाबरोबर न्याहरीचा आस्वाद घेत असलेले चर्चिल त्याला दिसले. चर्चिल म्हणाले, “ मी आता अडुसष्ट वर्षांचा असलों तरी माझी प्रकृति उत्तम आहे—डॉक्टरांचा सल्ला नेहमी चुकीचा असतो असा माझा अनुभव आहे--मद्यप्राशन सोडण्याचा माझा बिलकुल विचार नाही ! ”

चर्चिल यांच्या भेटीमुळे स्टालिनचें बरेंचसें समाधान होऊन साशंकतेचें वातावरण दूर झाल्यासारखें दिसलें. आपल्या मुक्कामाच्या शेवटच्या दिवशीं स्टालिनचा निरोप घेण्याकरता चर्चिल त्याच्या निवासस्थानीं संध्याकाळीं सात वाजतां गेले, तेव्हापासून पहाटे साडेतीन वाजेपर्यंत, ते दोघे बहादूर

गडी उत्कृष्ट मद्यांची लज्जत चाखीत बसले होते ! खाण्याच्या बाबतींत मात्र स्टालिन ' सवाई ' होता. त्याचा जबरदस्त आहार पाहून " मला हें जमायचें नाही " अशी चर्चिलनी कबुली दिली.

१९४३ च्या जानेवारी महिन्यांत चर्चिल आणि रूझवेल्ट यांचीं कासाब्लान्का येथे खलबतें झालीं त्या वेळीं जर्मनी, जपान आणि इटाली यांच्या बिनशर्त शरणागतीशिवाय युद्ध थांबवायचें नाही असा निर्णय घेण्यांत आला. चर्चिल आणि रूझवेल्ट यांची आणखी एक भेट ऑगस्ट महिन्यांत अमेरिकेंत क्युबेक मुक्कामीं झाली—त्या वेळच्या वाटाघाटी १४ सप्टेंबर १९४३ पर्यंत चालू होत्या. त्यानंतर दोन महिन्यांनी ते दोघे ईजिप्तची राजधानी कायरो येथे भेटले, त्या वेळीं चीनचे चांग-काय-शेकहि हजर होते ! चांग पतिपत्नींना चीनच्या युद्धाचें महत्त्व अधिक वाटत असल्यामुळे, जागतिक युद्धाच्या व्यापक वाटाघाटींत त्यांच्यामुळे वारंवार व्यत्यय येतो आहे असें पाहून, " इथले मनोरे फार पाहण्यासारखे आहेत. तुम्ही दोघे एक चक्कर मारून या की—" अशी सूचना चर्चिलना करावी लागली !

* * *

**रशियाला मदत :**

फ्रान्सच्या पतनानंतर ब्रिटिशांनी शरणागति पत्करिली असती तर त्या-नंतर हिटलरच्या तावडींत रशिया एकाकी सापडला असता, आणि जर्मनी आणि जपान यांच्या संयुक्त शक्तीला अमेरिकेवर चढाई करतां आली असती. " अमेरिकेच्या मदतीशिवाय आमचा निभाव लागला नसता " हें स्टालिनने कबूल केलें होतें. रशियाला द्यावयाची सर्व युद्धसामग्री रशियन बंदरांत वाहून नेण्याची कामगिरी ब्रिटिशांच्या आरमाराला पत्करावी लागली होती. जर्मन पाणबुड्या आणि विमानें संचार करीत असलेला तो मार्ग अत्यंत धोक्याचा होता. सहा विनाशिका, दोन विमानवाहू जहाजें आणि दोन पाणबुड्या यांच्या संरक्षणांत, जून १९४२ मध्ये रशियासाठी माल नेणाऱ्या ३४ जहाजांपैकी २३ जहाजें जर्मनांनी बुडविलीं. १९४२ व १९४३ सालीं ब्रिटन आणि अमेरिकेने पाठविलेला एकंदर माल आणि

शत्रूच्या कारवाईमुळे त्यांपैकी नष्ट झालेला माल यांचे आकडे पुढीलप्रमाणे आहेत—

२१९ जहाजें पाठविलीं, त्यांपैकी ६४ बुडालीं.

२४,४०० वाहनें पाठविलीं, त्यांपैकी ८४२२ बुडालीं.

३२७६ रणगाडे पाठविले, त्यांपैकी १२२६ बुडाले.

२६६५ विमानें पाठविलीं, त्यांपैकी ६५६ बुडालीं.

६१४६६४ टन दारूगोळा पाठविला, त्यापैकी २३२४८३ टन बुडाला.

६९४८३ टन तेल व पेट्रोल पाठविलें, त्यापैकी ७३७३ टन बुडालें.

युद्धाची समाप्ति होईपर्यंत ब्रिटिशांनी त्रेचाळीस कोटी पौंड किंमतीचीं ७००० विमानें आणि ५००० रणगाडे रशियाला दिले !

* * *

**एक संस्मरणीय प्रसंग :**

टोब्रुकच्या पराभवानंतर कांही महिन्यांतच युद्धाचें पारडें फिरून ब्रिटिशांनी नोव्हेंबर महिन्यांत अलामीन येथे रोमेलचा प्रचंड पराभव केला. चर्चिल म्हणतात, " अलामीनपूर्वी आम्हाला एकसुद्धा विजय मिळाला नव्हता. आलामीननंतर आमचा एकदासुद्धा पराभव झाला नाही. " जर्मन सैन्याचा तितकाच प्रचंड पराभव रशियनांनी स्टालिनग्राड येथे फेब्रुवारी १९४३ मध्ये केला आणि, प्रशांत महासागरांत, गोडाकनाल येथे अमेरिकन आरमाराने जपानी आरमाराचा फार मोठा पराभव केला. त्या घटनांना अनुलक्षून चर्चिलनी पार्लमेंटांत सांगितलें, " हा युद्धाचा शेवट नव्हे— शेवटाची सुरुवातहि नव्हे; फार तर हा सुरुवातीचा शेवट समजता येईल ! "

अलामीनच्या विजयानंतर अँग्लो–अमेरिकन सेना प्रचंड प्रमाणांत आफ्रिकेंत उतरल्या आणि त्यांनी जर्मन सेनांचा प्रचंड प्रमाणांत पराभव केल्यामुळे, युरोपच्या दक्षिणेकडून दुसरी आघाडी उघडणें त्यांच्या आटोक्यांत आलें.

तिघा ' दोस्तांच्या ' युद्धकार्यांत सुसूत्रता निर्माण व्हावी, भूतलाच्या युद्धोत्तर पुनर्रचनेसंबंधांत तिघांची एकवाक्यता असावी आणि पुन्हा युद्ध होणार नाही अशी अमेरिका, ब्रिटन आणि रशिया या राष्ट्रांनी खबरदारी

घेतली, तर खरोखरच पुन्हा युद्ध होणार नाही अशी चर्चिल यांची विचारसरणी होती. त्यासाठी वयाच्या अडुसष्टाव्या वर्षींसुद्धा त्यांनी अमेरिकेच्या आणि रशियाच्या वाऱ्या केल्या होत्या. रूझवेल्ट आणि चर्चिल यांच्या मनांत आणि धोरणांत फारसा फरक नव्हता. परंतु, रूझवेल्ट आणि स्टालिन यांचीसुद्धा भेट झाली पाहिजे, त्यांची भेट झाली नाही तर ( कदाचित् ) त्यांचे एकमेकांबद्दल गैरसमज होतील अशी भीति चर्चिलना वाटत होती. आणि म्हणूनच, स्टालिन आणि रूझवेल्ट यांच्या भेटीचा त्यांनी आग्रह धरला होता.

चर्चिल यांच्या आग्रहाला अखेर यश येऊन, तेहेरान येथे २७ नोव्हेंबर १९४३ ते १ डिसेंबर १९४३ पर्यंत बड्या तिघांची भेट झाली. " अमेरिकेच्या मदतीशिवाय आमचा निभाव लागला नसता " हें स्टालिनने याच बैठकींत मान्य केलें—फ्रान्सच्या उत्तर किनाऱ्यावर उघडावयाच्या दुसऱ्या आघाडीची तारीख निश्चित करण्यांत आली.

युद्धोत्तर रचनेच्या वाटाघाटी चालू असतां स्टालिन म्हणाला, " कमींत कमी पन्नास हजार जर्मन गुन्हेगारांना गोळ्या घालून ठार केलें पाहिजे ! " तें ऐकून, " अशा पाशवी कृत्याला आमची लोकसभा आणि जनता कधीहि संमति देणार नाही " असें चर्चिल यांनी सांगितलें. त्यानंतर सुद्धा, " पन्नास हजारांना फाशीं दिलेंच पाहिजे " हा स्टालिनचा आग्रह आणि त्यासंबंधांत रूझवेल्ट मुग्ध आहेत हें पाहून चर्चिल रागावले, बैठकींतून बाहेर पडले आणि शेजारच्या एका खोलींत निघून गेले !

त्या खोलींत अंधार होता. एका खिडकीजवळ चर्चिल स्तब्ध उभे होते. थोड्या वेळानंतर आपल्या खांद्यावर कोणी तरी हात ठेवला आहे असा त्यांना भास झाला, पाहतात तो " स्टालिन काका " ! चर्चिल आणि रूझवेल्ट हे त्यांच्या पत्रव्यवहारांत स्टालिनचा 'स्टालिन काका' असा उल्लेख करीत असत. " तुम्हाला चिडविण्यासाठी मीं थोडा विनोद केला " असा 'काकांनी' खुलासा केल्यावर चर्चिल यांचा राग मावळला !

३० नोव्हेंबर १९४३ रोजीं चर्चिल यांचा एकोणसत्तरावा वाढदिवस होता. त्या दिवशीं स्टालिन आणि रूझवेल्टनी त्यांना मेजवानी दिली, त्या प्रसंगासंबंधी चर्चिल लिहितात,

" माझ्या आयुष्यांतला तो अत्यंत संस्मरणीय प्रसंग होता. माझ्या उजव्या बाजूला अमेरिकेचे अध्यक्ष तर डाव्या बाजूला रशियाचा भाग्यविधाता बसला होता. आम्ही तिघे मिळून जगांतल्या अत्यंत प्रबळ आरमारावर आणि विमानदलावर अंमल चालवीत होतों आणि जवळजवळ दोन कोटी सैनिकांना हुकूम देऊं शकत होतों ! १९४० सालानंतर जर्मनांच्या विजयी, यशस्वी आणि यत्किंचितहि तडा न गेलेल्या सामर्थ्यासमोर ब्रिटन एकटें आणि जवळ जवळ निःशस्त्र स्थितींत उभें होतें. त्यानंतर विजयाच्या मार्गावर आम्हीं जी प्रदीर्घ वाटचाल केली होती तिजबद्दल मला आनंद वाटत होता. "

* * *

**दुसरी आघाडी :**

उत्तर आफ्रिकेंतल्या विजयानंतर अँग्लो-अमेरिकन फौजांनी इटालीवर चढाई सुरू करतांच मुसलोनीची राजवट पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. इटालीच्या बादशहाने त्याला बडतर्फ करून संपूर्ण शरणागति पत्करली. तें पाहून जर्मन फौजा इटालींत शिरल्या आणि दोस्तांच्या मोहिमेचा प्रतिकार करायला त्यांनी सुरुवात केली.

फ्रान्सच्या उत्तरेकडून युरोपवर स्वारी करण्याची तयारी पूर्ण होत आली होती. त्याकरिता इंग्लंडांत अकरा हजार विमानें आणि ब्रिटिश खाडींत चार हजार जहाजें सज्ज होऊन हुकुमाच्या शब्दाची वाट पाहात होतीं. हिटलरने ज्या लढाया केल्या त्यांत शत्रुपक्षाच्या तिप्पट शस्त्रबळ आणि मनुष्यबळ वापरलें होतें. त्याच तंत्राचा अवलंब करून, फ्रान्सच्या आघाडीवर हिटलर जितकें सैन्य आणि शस्त्रबळ वापरूं शकेल त्याच्या तिप्पट बळ अँग्लो-अमेरिकनांनी आता जमविलें होतें. स्वारीची सुरुवात होण्यापूर्वी फ्रान्सच्या किनाऱ्यावरच्या बंदरांचा हिटलरने नाश करून टाकला तर आपल्या जहाजांना वापरतां येईल असें एक कृत्रिम बंदर तयार केलें होतें, तेंसुद्धा आरमाराबरोबर वाटचाल करीत होतें ! दोस्तांच्या संयुक्त सेनेचे सरसेनापति जनरल आयसेनहोअर होते.

४ जून १९४४ रोजीं दोस्तांनी फ्रान्सच्या उत्तर किनाऱ्यावरील हल्ल्याला

सुरुवात केली आणि पहिल्याच तडाख्याला त्यांना अपेक्षेबाहेर यश मिळालें. ज्या दिवसाची स्टालिन तीन वर्षें वाट पाहात होता, तो दिवस अखेर उगवलेला पाहून त्याने आपल्या दोस्तांना संदेश पाठविला, " खाडी ओलांडण्याच्या प्रयत्नांत नेपोलियन आणि हिटलर फसले, पण तुम्हीं यश मिळविलें ! तुम्हीं आता जी मोहीम सुरू केली आहे तिला विस्तार, योजना आणि अंमलबजावणी या बाबतींत जगाच्या इतिहासांत तोड नाही ! "

अँग्लो-अमेरिकनांच्या प्रचंड माऱ्यापुढे जर्मन सेनेचा टिकाव लागणें अशक्य होत असतांना रशियन फौजांनी पूर्वेकडून आगेकूच सुरू केली. जर्मनीच्या युरोपांतल्या एकेका सोबत्यांनी शस्त्रत्याग करून शरणागति पत्करली. बेल्जम, हॉलंड आणि फ्रान्स हे देश प्रथम मुक्त झाले. पूर्वी कोणत्याहि शहरावर पडले नसतील इतके बॉंब जर्मनींतील महत्त्वाच्या अशा सर्व शहरांवर पडूं लागले !

हा संग्राम चालू असतां चर्चिल हे तीनदा रणभूमीवर हजेरी लावून आले. १९४५ सालच्या मार्च महिन्यांत अँग्लो-अमेरिकन सैन्याने ऱ्हाईन नदी ओलांडली, त्या वेळीं ब्रिटिशांचे सेनापति, फील्ड मार्शल मॉंटगॉमरी, यांचेबरोबर चर्चिलहि होते.

एप्रिल महिन्याच्या पंचवीस तारखेला खवळलेल्या इटालियन जनतेने मुसलोनीचा वध केला. पश्चिमेकडून अँग्लो-अमेरिकनांच्या आणि पूर्वेकडून रशियाच्या फौजा जर्मनीची राजधानी बर्लिनच्या वेशीनजीक येऊन ठेपल्या ! बर्लिन शेवटपर्यंत लढवून धारातीर्थीं देह ठेवण्याचा निश्चय करून हिटलर राजधानींत दाखल झाला होता. जर्मन राष्ट्रासाठी लढतां लढतां आपण धारातीर्थीं पडलों, म्हणजे आपल्या मृत्यूंतून नवा जर्मनी निर्माण होईल असा त्याचा विश्वास होता. परंतु अखेर परिस्थिति आटोक्याबाहेर गेली आहे असें पाहून, २९ एप्रिल १९४५ रोजीं, त्याने आत्महत्या केली. त्यानंतर त्याच्या निवासस्थानाला लागलेल्या आगीमुळे त्याच्या देहाची आणि त्याच्या सर्व महत्त्वाकांक्षांची राखरांगोळी झाली. जगाच्या इतिहासांतल्या एका असामान्य आणि कर्तबगार वीराचा अत्यंत विपरीत शेवट झाला !

—हिटलरच्या मागे राहिलेल्या जर्मनीच्या नेत्यांनी, ७ मे १९४५

रोजीं, बिनशर्त शरणागति पत्करून शस्त्रें खाली ठेवलीं—युरोपांतल्या युद्धाचा शेवट झाला !

* * *

**विजयाचा क्षण :**

या युद्धाचें ‘ निष्कारण झालेलें युद्ध ’ असें चर्चिल वर्णन करतात. १९२९ ते १९३९ पर्यंत त्यांनी वारंवार दिलेल्या इषाऱ्यांचें चीज झालें असतें, इंग्लंडच्या नेत्यांनी आणि जनतेने त्या इषाऱ्यांकडे दुर्लक्ष केलें नसतें, तर दुसरें महायुद्ध झालें नसतें.

महायुद्ध सुरू होऊन त्याला जागतिक युद्धाचें स्वरूप प्राप्त होईपर्यंत, त्याच्या संभाव्य विस्ताराचा अचूक अंदाज बांधून, या युद्धांत अखेर रशिया आणि अमेरिकेला पडावें लागणार आहे हें भविष्य चर्चिल यांनी वर्तविलें होतें. १९४० सालच्या जुलै महिन्यांत, आता ब्रिटन शरण जाणार असें बाकीच्या सर्व राष्ट्रांना वाटत होतें, त्या वेळीं १९४१ आणि १९४२ च्या मोहिमांच्या योजना चर्चिल तयार करीत होते. एकाकी स्थितींत आपल्या देशबांधवांना स्वातंत्र्यासाठी, संस्कृतीसाठी आणि लोकशाहीसाठी तळहातावर प्राण घेऊन लढायची स्फूर्ति चर्चिल यांच्या झुंजार वृत्तीने दिली होती. रशिया आणि अमेरिकेसारखे प्रबळ सोबती लाभण्यापूर्वी आणि लाभल्या-नंतरसुद्धा, मानापमानाच्या प्रश्नांचा विचार न करतां, युद्धकार्यांत एक-सूत्रीपणा निर्माण व्हावा आणि भूतलाची युद्धोत्तर पुनर्रचना शक्य तितकी सुव्यवस्थित व्हावी म्हणून त्यांनी, वाढत्या वयाची आणि प्रकृतीची तमा न बाळगतां, त्रिखंडांत संचार केला होता. त्यांच्या झुंजार वृत्तीला आणि व्यापक दृष्टिकोणाला अखेर विजयाचें बक्षीस मिळालें होतें. “ माझें पूर्वा-युष्य म्हणजे या क्षणासाठीं केलेली पूर्वतयारीच होती ”, असें चर्चिल यांना त्यांनी पंतप्रधानकीचीं वस्त्रें परिधान केलीं त्या दिवशीं वाटलें होतें—त्यांची ती भावना खरी ठरली होती !

चर्चिल यांच्या देशबांधवांना या सर्व गोष्टींची जाणीव होती. जर्मनीच्या शरणागतीच्या दिवशीं चर्चिल आपल्या निवासस्थानांतून पार्लमेंटांत जाण्या-साठी निघाले तेव्हा हजारो माणसांची गर्दी त्यांच्या मोटारीभोवती जमली.

त्या गर्दीतून वाट काढीत त्यांनी पार्लमेंटच्या इमारतींत प्रवेश केला आणि ज्या जागीं उभे राहून त्यांनी जर्मनीच्या वाढत्या, आक्रमक आणि सूडासाठी तळमळणाऱ्या सामर्थ्याबद्दल युद्धपूर्व काळांत इषारे दिले होते, त्या जागीं जाऊन ते उभे राहिले !

त्या वेळीं शिष्टाचाराचे सर्व नियम झुगारून देऊन, टाळयांचा कडकडाट करीत, सर्व सभासद आपल्या बाकावर उभे राहिले आणि युद्धकाळांत बंद झालेल्या घंटा देवळांत वाजूं लागल्या !

——चर्चिल यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वहात होते !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३४५२० वि: चरित्र
क्रमांक नों. दि: २.५.६३

२४

## चर्चिल यांच्या चिठ्ठ्या

१९४० ते १९४५ या युद्धकाळांत चर्चिल हे ब्रिटिशांचे पंतप्रधान होते. त्या अवधींत त्यांना युद्धकालीन आपत्तींना तोंड द्यावें लागलें. आपल्या देशबांधवांचें धैर्य आणि हिंमत शाबूत ठेवण्यासाठी आणि रणांगणावरील सामर्थ्य वाढविण्यासाठी अनेक उपाय योजावे लागले. बॉंब-हल्ल्यापासून स्वदेशाचें संरक्षण, जर्मन पाणबुड्यांच्या तापापासून आरमाराचा आणि व्यापारी जहाजांचा बचाव आणि अक्षराष्ट्रांविरुद्ध लढायला अनेक राष्ट्रांना उद्युक्त करणें या गोष्टींत मन गुंतवावें लागलें. दोस्तराष्ट्रांतील मत-भेदांचें निराकरण करून त्यांच्या आघाडींत एकी आणि एकसूत्रता निर्माण करण्याची जबाबदारी त्यांनी आपण होऊन पत्करिली होती. ब्रिटिशांच्या लोकशाही कारभारांत पार्लमेंटमध्ये त्यांना वारंवार महत्त्वाचीं भाषणें करावीं लागलीं होतीं. युद्धविषयक महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागले, हुकूम द्यावे लागले, महत्त्वाच्या युद्धयोजना आखाव्या लागल्या, दोस्तराष्ट्रांतील प्रमुखांच्या भेटी घ्याव्या लागल्या आणि अत्यंत महत्त्वाचे खलितेहि लिहावे लागले, अशा अजस्र उद्योगांत गुंतले असतां न्युमोनियाच्या विकाराने त्यांच्यावर दोनदा झडप घातली आणि पार्लमेंटमधील अविश्वासाच्या ठरावांनाहि त्यांना दोनदा तोंड द्यावें लागलें ! अशा स्थितींतसुद्धा आपल्या देशांतल्या बारीकसारीक गोष्टींवरहि बारीक नजर ठेवून त्यांनी या कालखंडांत निरनिराळ्या खात्यांच्या प्रमुखांना शेकडो चिठ्या लिहिल्या. त्या सर्व बोधप्रद असून त्यांत त्यांची विनोदी वृत्तीसुद्धा प्रकट झाली आहे.

कोणताहि महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला म्हणजे अगोदर एक समिति नेमण्याचा लोकशाहींत प्रघात असल्यामुळे अशा समित्यांचें पीक मर्यादे-

बाहेर जातें. त्यासंबंधांत चर्चिल यांनी २४ मे १९४० रोजीं वैमानिक खात्याच्या प्रमुखाला लिहिलें,—

" ज्यांच्या सभांसाठी सभ्यांना वारंवार हजर राहावें लागतें, पण ज्यांच्यांतून कांही निष्पन्न होत नाही अशा समित्या फारच वाढल्या आहेत—त्यांची संख्या कमी केली पाहिजे ! "

चर्चिल हे इंग्रजी भाषेचे ' सरदार ' असून, त्यांचा इंग्रजी भाषेचे ' कारागीर ' असा गौरव करणेंसुद्धा अतिशयोक्तीचें होणार नाही. मग राज्यकारभारांत चुकीची इंग्रजी भाषा वापरली जावी हें त्यांना कसें खपावें ? २७ मे १९४० रोजीं त्यांनी वैमानिक खात्याच्या प्रमुखाला लिहिलें—

" आजच्या इतिवृत्तांत शत्रूचीं ' निकामी केलेलीं ' ( put out of action ) आणि ' नष्ट केलेलीं ' ( destroyed ) विमानें असे निरनिराळे आकडे दिलेले आहेत. या दोन्ही गोष्टी खरोखर निराळ्या आहेत का ? शब्दयोजनेंत वैचित्र्य दिसावें म्हणून तर हा भेद केलेला नाही ना ? केवळ शब्दवैचित्र्यासाठी अर्थाचा बळी घेऊं नये. "

१९ मार्च १९४४ रोजीं त्यांनी युद्धविषयक माहिती पुरविणाऱ्या खात्याला विचारलें,—

" तुम्ही Intensive ( इंटेन्सिव्ह ) हा शब्द कां वापरला आहे ? Intense ( इंटेन्स ) हा शब्द वापरणें अवश्य होतें. या दोन शब्दांचा अचूक उपयोग कसा करावा तें ' Fowler 's Modern English Usage ' या पुस्तकांत पाहा."

४ एप्रिल १९४५ रोजीं परराष्ट्रखात्याला त्यांनी लिहिलें,—

" परराष्ट्र कचेरींतून येणाऱ्या तारेंत ' Inadmissable ' असा चुकीचा शब्द वापरला जातो, तिकडे लक्ष द्या ! "

युरोपांतलें एकेक राष्ट्र हिटलरच्या पायदळीं पडत असतां किंवा त्याच्या बाजूला जात असतां स्पेनला तटस्थ ठेवणें अत्यंत अवश्य होतें. स्पेनचा ब्रिटिशांच्या जिब्राल्टरवर डोळा होता. त्यासंबंधांत चर्चिलनी जून १९४० मध्ये परराष्ट्रखात्याला लिहिलें,—

" लढाई संपल्यावर जिब्राल्टरसंबंधी ' विचारविनिमय ' करण्याचें आश्वासन स्पेनच्या राज्यकर्त्यांना विलोभनीय वाटणार नाही, ही माझी

खात्री आहे. आपण युद्ध जिंकलों तर ' विचारविनिमय ' निष्फळ ठरेल आणि हरलों तर त्याची गरजच उरणार नाही हें स्पॅनिश पुढाऱ्यांना समजण्यासारखें आहे. अशा प्रकारच्या शुष्क आश्वासनांचा उपयोग काय?"

युद्धकाळांत कित्येकांच्या हालचालींवर निर्बंध घालणें अवश्य व्हावें हें चर्चिल यांच्या लोकशाही पद्धतींत रुळलेल्या वृत्तीला खटकत होतें. कायदेशीर चौकशीशिवाय एखाद्याच्या हालचालींवर निर्बंध घालणें किंवा त्याला अटकेंत ठेवणें या गोष्टी गृहमंत्र्याच्या अधिकारांतल्या होत्या. त्याच्या कार्यावर आपली नजर असावी म्हणून जून १९४० मध्यें चर्चिलनी त्याला लिहिलें,—

"ज्या महत्त्वाच्या व्यक्तींना तुम्हीं अटकेंत ठेवलें आहे त्यांची यादी मला पाठवा."

२३ डिसेंबर १९४० रोजीं त्यांनी पुन्हा लिहिलें,—

"युद्धजन्य परिस्थितीमुळे ज्या राजबंद्यांना स्थानबद्ध केलें आहे, त्यांच्यावर कायद्याला माहीत असलेला कोणताहि गुन्हा केल्याचा आरोप नाही. व्यक्तिस्वातंत्र्याबद्दल ब्रिटिशांच्या ज्या कल्पना आहेत, त्यांच्याशीं सर्वस्वीं विसंगत अशी उपाययोजना करायला मीं जबाबदार असावें याचें मला अत्यंत वाईट वाटतें. **पंडित नेहरू यांच्या कारावासांतला तापदायक भाग काढून टाकला पाहिजे.** ज्या वेळीं जग खरोखर सुसंस्कृत होतें, त्या वेळीं अशा व्यक्तींना एखाद्या किल्ल्यांत ठेवण्याचा प्रघात होता, तुरुंगांत नव्हे!"

युद्धकाळांत हिटलरचीं शेकडो विमानें इंग्लंडवर अग्निवर्षाव करीत होतीं. परंतु त्या अग्निवर्षावांतसुद्धा दैनंदिन कामें सुरळीत चालू राहिलीं पाहिजेत असा चर्चिल यांचा आग्रह होता. १९ नोव्हेंबर १९४० रोजीं त्यांनी पोस्टखात्याच्या प्रमुखाला लिहिलें,—

"हवाई हल्ल्याच्या वेळीं पोस्टाचीं कामें बरोबर होत नाहीत अशी तक्रार आहे—त्यासंबंधांत तुमची काय योजना आहे तें कळवा."

युद्धकाळ हा आणीबाणीचा काळ असतो. युद्धकाळाचा गैरवाजवी फायदा घेणाऱ्यांना किंवा युद्धप्रयत्नांत अडथळा आणणाऱ्यांना कडक शासन करावें लागतें. परंतु ज्यामुळे न्यायदानावरील विश्वास उडेल अशा शिक्षा

करूं नयेत असा चर्चिल यांचा कटाक्ष होता. २३ नोव्हेंबर १९४० रोजीं त्यांनी गृहमंत्र्यांना लिहिलें,—

" हवाई हल्ल्याच्या वेळीं लोकांची धावपळ होते. तिचा फायदा घेऊन लुटालूट करणाऱ्यांना जबर शिक्षा दिली पाहिजे; पण तींतसुद्धा प्रमाणबद्धता असावी. बहुमोल वस्तु चोरण्यासाठी तीन किंवा सहा महिन्यांच्या शिक्षेच्या मानाने, व्हिस्कीच्या चोरीसाठी पांच वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा भरमसाट नव्हे का? लुटालुटीबद्दल देण्यांत येणाऱ्या शिक्षांवर नजर ठेवून त्यांत जरूर ती दुरुस्ती करणें अवश्य आहे."

१९ जुलै १९४१ रोजीं त्यांनी लिहिलें,—

" हिटलर हा चांगला राज्यकर्ता असून चर्चिलपेक्षा तो चांगला आहे असें दोघां सैनिकांना सांगितल्याबद्दल, मिस् एल्सी ओरिन हिला दिलेली पांच वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा मला फारच भरमसाट वाटते– अशा अतिरेकी शिक्षा दंडनाच्या हेतूलाच विघातक ठरत असतात."

२७ मे १९४४ रोजीं त्यांनी पुन्हा लिहिलें,—

" आपल्या शेजाऱ्याकडून कोळसा उसनवार घेऊन रेशनिंगच्या नियमाचा भंग केला म्हणून एका इसमाला एक पौंड दंड झाल्याचें वृत्त वर्तमानपत्रांत वाचलें, या प्रकाराला तुम्हीं पायबंद घातला पाहिजे! कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या अशा उपद्व्यापामुळे सरकार जितकें अप्रिय होतें तितकें दुसऱ्या कोणत्याच गोष्टीने होत नसेल!"

हाताखालच्या अधिकाऱ्यांशीं चर्चिल किती सहानुभूतीने वागत असत तें खालील चिठ्ठीवरून दिसतें.—

" तुम्हीं कांही दिवस रजा घ्यावी आणि दररोज लौकर झोपावें अशी मी शिफारस करतों. हें युद्ध दीर्घकाळ चालणार असल्यामुळे तुमची प्रकृति शेवटपर्यंत चांगली राहणें अवश्य आहे. तुम्ही फार काम करतां असें दिसतें, म्हणून ही सूचना केली आहे."

रेशनिंगमुळे नवीन नियम आणि त्या नियमांचा भंग झाला म्हणजे नवीन गुन्हे अस्तित्वांत येत असतात. ९ ऑगस्ट १९४१ रोजीं गृहखात्याला लिहिलेल्या चिठ्ठींत चर्चिलनी लिहिलें,—

" ज्या मोटारवाल्यांना पेट्रोलचें जादा रेशन देण्यांत येतें त्यांनी

आपण दररोज किती मैल फिरलों त्याची नोंद ठेवली नाही, तर तो गुन्हा ठरविण्याचा विचार आहे असें समजतें. ज्या गुन्ह्यांना जनता निषिद्ध मानीत नाही आणि जे गुन्हे पकडणें कठीण असतें, असे गुन्हे निर्माण करून त्यांची संख्या वाढविणें शहाणपणाचें नाही. ”

--९ डिसेंबर १९४१ रोजीं अन्नखात्याला त्यांनी लिहिले-

“ मिठाई आणि चाकोलेट यांचेंहि रेशनिंग करण्याचा विचार आहे असें ऐकतों. रेशनिंगच्या नियमांबद्दल अनादर उत्पन्न होईल अशी कोणतीहि योजना गैरच समजली पाहिजे. ज्यांची अंमलबजावणी करणें कठीण असतें, असे कृत्रिम नियम किंवा कायदे केल्यामुळे नियमांना किंवा कायद्याला चुकविण्याची घातकी सवय समाजांत पसरते. ”

धान्याच्या उत्पादनासंबंधीचे अंदाज इंग्लंडमध्येसुद्धा चुकत होते !

२६ ऑगस्ट १९४१ रोजीं चर्चिल यांनी शेतकी मंत्र्याला लिहिलें--

“ पीकपाण्यासंबंधी विपरीत बातम्या ऐकूं येत आहेत. आज परिस्थिति काय आहे तें कळवा. अरेरे, धान्याच्या उत्पादनासंबंधी आपण फार घाईने भडक चित्रें रंगविलीं ! ”

एखाद्या देशाने आपलें नांव बदललें तर त्याला कांहीतरी मूलगामी कारण आहे किंवा काय याची चौकशी करणें अगत्याचें असतें. २७ ऑगस्ट १९४१ रोजीं चर्चिल यांनी परराष्ट्र कचेरीला लिहिलें--

“ सयामने आपलें नांव ‘ थायलंड ’ असें कां बदललें त्याचीं कारणें मला मोजक्या शब्दांत कळवा. या दोन्ही नांवांचें ऐतिहासिक महत्त्व काय आहे ? ”

( ऐतिहासिक महत्त्वाची चौकशी केल्यानंतर आपल्याला एखादा प्रदीर्घ निबंध वाचावा लागेल म्हणून ‘ मोजक्या शब्दां ’ चें बंधन घालावें लागलें ? जो मुद्दयाचा प्रश्न असेल त्यासंबंधी अगदी थोडक्यांत माहिती मिळाली पाहिजे, नाही तर निष्कारण कालापव्यय होतो असा चर्चिल यांचा दृष्टि-कोण आहे. अशा प्रकारच्या अनेक ‘ चिठ्ठयां ’त त्यांनी ‘ चतकोर कागदावर कळवा ’, ‘ वीसपंचवीस ओळींत कळवा ’ असे आदेश दिलेले आहेत. ३१ ऑगस्ट १९४१ रोजीं नभोवाणी मंत्र्याला लिहिलेल्या चिठ्ठींत ते

म्हणतात,—"आपल्या नभोवाणीचें नवें केंद्र कसें चाललें आहे तें थोडक्यांत कळवा—अर्ध्या कागदापेक्षा जास्त विस्तृत नको !")

युद्धकाळांत कोणत्याहि राष्ट्राच्या ताब्यांतल्या सुवर्णाच्या साठ्याला अतिशय महत्त्व प्राप्त होत असतें. २८ ऑगस्ट १९४१ रोजीं चर्चिलनी अर्थखात्याला लिहिलें,—

"आपल्या देशांत किंवा दक्षिण आफ्रिकेंत आपल्या सत्तेचें असें किती सोनें आहे ? मी तें मागणार आहें अशी कल्पना करून घाबरूं नका, बरं का !"...

पैशांचा आणि श्रमांचा अपव्यय चर्चिलना बिलकूल खपत नाही. १५ ऑक्टोबर १९४१ रोजीं त्यांनी सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांना लिहिलें,—

"अफगाणिस्थानांतल्या जर्मन रहिवाश्यांना हद्दपार केलें पाहिजे अशी सूचना आपण आपल्या काबूल येथील प्रतिनिधीला केली, तेव्हापासून नुसत्या तारा करण्यांत त्याने किती शब्द खर्चिले तें कळवा."

आणि १९ ऑक्टोबर१९४१ रोजीं काबूल येथील प्रतिनिधीलाच त्यांनी लिहिलें,—

"तुमच्या कामगिरीबद्दल अभिनंदन ! परंतु ११ सप्टेंबरपासून १७ ऑक्टोबरपर्यंत तारा करण्यांत तुम्हीं ६६३९ शब्द वापरले ! अशा विस्तृत तारा करण्यांत किती श्रम आणि पैसा यांचा अपव्यय होतो याची तुम्हाला कल्पना दिसत नाही."

एखाद्या शहराचें नांव विनाकारण बदलणें चर्चिलना पसंत नाही. २३ एप्रिल १९४५ रोजीं त्यांनी परराष्ट्र कचेरीला लिहिलें,—

"जीं नांवें पिढ्यानपिढ्या आपल्या परिचयाचीं आहेत, तीं बदलण्याच्या मी विरुद्ध आहें. जे लोक गावांचीं नांवें बदलतात त्यांना दुर्दैव पछाडीत असतें. भूतकाळाच्या परंपरेचा आणि रीतीभातींचा जे द्रोह करतात, त्यांच्यावर सुदैवाची अवकृपा झाली तर तें योग्यच समजलें पाहिजे !"

करमणुकीवरील कराच्यासंबंधांत लॉर्ड चारवेल यांना त्यांनी १० मार्च १९४२ रोजीं लिहिलें,—

"करमणुकीवर जबर कर बसवायच्या मी अगदी विरुद्ध आहें. 'दुःखी व्हा' हा आदेश मला पसंत नाही."

बसमधील गर्दीसुद्धा चर्चिल यांच्या नजरेंतून निसटली नाही! ११ ऑक्टोबर १९४३ रोजीं वाहतूक-मंत्र्याला त्यांनी लिहिलें,—

"लंडन आणि इतर शहरांत बससाठी ज्या रांगा लागतात त्यासंबंधी आणि त्या कमी करण्यासाठी, तुम्ही कोणती उपाययोजना करणार आहांत तें मला कळवा....

"केवळ लंडन विभागांतील प्रवाश्यांच्या दररोज पंचावन्न लक्ष फेऱ्या होत असतात. एका माणसाचें एका फेरींत एक मिनिट वांया जाणें, म्हणजे नऊ तासांच्या दिवसाप्रमाणे दहा हजार लोकांचें एक वर्ष वाया जाण्यासारखें आहे."

भाषणें करणें आणि मुलाखती देणें या गोष्टींना मर्यादा राहिलेली नाही असें पाहून जनरल इस्मे यांना १९ जानेवारी १९४४ रोजीं चर्चिलनी लिहिलें,—

"भाषणें करण्यासंबंधांत वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपण मागे सूचना केल्या होत्या, त्या पत्रकाचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे. हल्ली भाषणांना आणि मुलाखतींना फारच ऊत आल्यासारखा दिसतो."

जे सैनिक आघाडीवर लढत आहेत त्यांच्या सुखसोयींना सर्वांत अधिक जपलें पाहिजे या भावनेने त्यांनी युद्धमंत्र्याला २० नोव्हेंबर १९४४ रोजीं लिहिलें,—

"जोपर्यंत आघाडीवरील प्रत्येक सैनिकाला प्रत्येक आठवड्याला चार बाटल्या बीअर मिळाली नाही, तोवर पिछाडीवरील कोणालाहि एक थेंबसुद्धा मिळतां कामा नये."

जर्मनीचा पराजय झाला, चर्चिलनी युद्ध जिंकलें आणि इंग्लंडमध्ये पार्लमेंटची निवडणूक जवळ आली. चर्चिल हे ज्या कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे पुढारी होते त्या पक्षाने आपल्या उमेदवारांच्या वयावर मर्यादा घातली.

त्यासंबंधांत आपल्या पक्षाच्या चिटणिसाला चर्चिलनी १९ मार्च १९४५ रोजीं लिहिलें,--

" येत्या निवडणुकींत ज्याचें सत्तरापेक्षा जास्त वय असेल त्याला उभें राहतां येणार नाही असा निर्बंध आपल्या मध्यवर्ती कचेरीने घातला आहे असें वृत्तपत्रांत वाचलें--हा प्रतिबंध मलासुद्धा लागू आहे काय तें कळवा ! "

* * *

## जपानची शरणागति :

जर्मनीचा पराभव होऊन युरोपांतलें युद्ध संपलें म्हणजे इंग्लंडांत सार्वत्रिक निवडणुका कराव्या असें चार्चिल यांनी पूर्वींच जाहीर केलें असल्यामुळे, जपानचा पराभव होईपर्यंत राष्ट्रीय सरकार कायम राहावें ही त्यांची सूचना मजूर पक्षाच्या पुढाऱ्यांना मान्य झाली नाही. सार्वत्रिक निवडणुका करावयाच्या तर त्या शक्यांत शक्य तितक्या लवकर कराव्या म्हणून राष्ट्रीय सरकार बरखास्त करण्याकरिता चर्चिल यांनी, २३ मे १९४५ रोजीं, राजीनामा दिला. नव्या निवडणुका होईपर्यंतचें काळजीवाहू सरकार स्थापन करण्याचा आदेश राजानें त्यांना दिल्यामुळे, चर्चिल यांनी आपल्या पक्षाचें मांत्रिमंडळ स्थापन केलें.

अक्षराष्ट्रांपैकी जपानचा पराभव अजून करावयाचा असला तरी तो केवळ कांही महिन्यांचाच प्रश्न होता. अमेरिकेची बलाढ्य सेना, बलाढ्य आरमार आणि बलाढ्य विमानदळ यांनी जपानचें सामर्थ्य खच्ची करून, प्रशांत महासागर पुनः ताब्यांत घेतला होता. इतक्यांत अमेरिकेंतील मेक्सिको देशांतील वाळवंटांत सुरू असलेला अणुबॉंबचा शोध यशस्वी होऊन, १७ जुलै १९४५ रोजीं, भूतलाच्या इतिहासांतलें तें भयानक अस्त्र जन्मलें ! जपानच्या हीरोशिमा शहरावर, ऑगस्टच्या ६ तारखेला, आणि नागासाकी शहरावर ९ तारखेला, अणुबॉंबचा प्रहार होऊन, जो कल्पनातीत गहजब उडाला, त्यामुळे जपानच्या लष्करी नेत्यांनी १४ ऑगस्ट १९४५ रोजीं संपूर्ण शरणागति पत्करली आणि जागतिक युद्धाचा शेवट झाला ! जपानच्या शरणागतीच्या कागदपत्रांवर सप्टेंबरच्या २ तारखेला सह्या होऊन, १९३९

सालच्या सप्टेंबर महिन्याच्या १ तारखेला सुरू झालेल्या रणकंदनावर पडदा पडला !

* * *

**कम्युनिस्टांचीं नखें :**

या 'निष्कारण उद्भवलेल्या युद्धांत' जो मनुष्यसंहार आणि मालमत्तेची हानि झाली ती सर्वस्वीं कल्पनातीत होती ! ब्रिटनसारख्या एके काळच्या धनको राष्ट्राला साठ अब्ज रुपये कर्ज झालें होतें ! अशा प्रकारच्या युद्धाचा पुन्हा संभव नसावा म्हणून भूतलाच्या युद्धोत्तर रचनेला चर्चिल यांच्या दृष्टीने फार महत्त्व होतें. युद्धोत्तर काळांत जेत्यांनी कोणत्याहि राष्ट्रावर त्याला नको असलेली राजवट लादूं नये, बहुमताच्या स्वयंनिर्णयाने प्रत्येक राष्ट्र जी घटना आणि शासनव्यवस्था पसंत करील ती त्याने स्वीकारावी आणि युद्धकाळांत झालेली 'बड्या तिघांची' एकी युद्धोत्तर काळांतसुद्धा कायम राहावी अशी चर्चिल यांची इच्छा होती. त्याकरिताच त्यांनी रूझवेल्ट आणि स्टालिन यांच्या भेटी घेतल्या होत्या. जर्मनांच्या शरणागतीच्या दिवशीं केलेल्या भाषणांत ते म्हणाले होते, "ज्या सरळ आणि सन्माननीय उद्देशाने आपण या युद्धांत पडलों त्याच्याकडे दुर्लक्ष होणार नाही किंवा तो झुगारून दिला जाणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. स्वातंत्र्य, लोकशाही आणि मुक्तता या शब्दांचा विपरीत अर्थ लावला जाणार नाही अशी सुद्धा खबरदारी घेतली पाहिजे. हिटलरी आक्रमकांची जागा जर एकतंत्री राजवटी किंवा पोलिस राज्यें घेणार असतील आणि कायदा व न्याय यांचें राज्य जर भूतलावर प्रस्थापित होणार नसेल, तर हिटलरी युद्धपिपासूंना त्यांच्या अपराधांबद्दल शासन करणें व्यर्थ ठरेल !"

——पण अंतिम विजय जसा जवळ येत चालला तसा चर्चिलना एक नवीनच अनुभव येऊं लागला. युद्ध संपण्यापूर्वी शेजारचीं राष्ट्रें आपल्या पंजाखाली दडपण्याचा उद्योग स्टालिनने सुरू केला आहे असें त्यांना दिसून आलें !

ज्या पोलंडच्या स्वातंत्र्यासाठी युद्धाची सुरुवात झाली होती, त्याची फाळणी स्टालिन आणि हिटलर यांनी १९३९ सालीं केली तेव्हापासून

पोलंडच्या पुनरुत्थानासाठी प्राण पणाला लावून झगडणारे नेते भूमिगत झाले होते. ते सर्व रशियाचे आणि कम्युनिस्ट विचारसरणीचे पक्के विरोधक असल्यामुळे, युद्ध संपण्यापूर्वी त्यांचा नाश करण्याचा एक भीषण डाव स्टालिनने रचिला. जर्मन सेनेचा पराभव करीत, ३१ जुलै १९४४ च्या सुमारास, रशियन सेना पोलंडच्या सरहद्दीनजीक येऊन ठेपली तेव्हा भूमिगतांनी उठाव करण्याचा आदेश मॉस्कोच्या नभोवाणीवरून देण्यांत आला. त्या आदेशानुसार भूमिगत प्रकट होऊन जर्मन सेनेवर प्रहार करायला त्यांनी सुरुवात केली, त्या वेळीं रशियन सेनेने सरहद्द ओलांडून आगे कूच केली असती तर जर्मन सैनिक कोंडींत सापडून शरण आले असते किंवा मारले गेले असते. परंतु, भूमिगतांनी उठाव केला तरी रशियन सेना सरहद्दीच्या पुढे सरकत नाही ही खात्री पटल्यामुळे, शस्त्रदृष्टया सुसज्ज अशा जर्मनांना भूमिगतांचा समाचार घ्यायला संपूर्ण मोकळीक मिळाली. पोलिश भूमिगत आणि जर्मन सैन्य यांचा तो लढा सतत चोवीस दिवस चालू असतांना, रशियन सेना सरहद्दीवर स्वस्थ उभी होती ! भूमिगतांचा नाश करण्याचें तिचें कार्य परस्पर सिद्धीस जात होतें. हजारो भूमिगत आणि त्यांचे नेते मारले गेले—शेकडो घरांची राखरांगोळी झाली ! पोलंडच्या असाहाय्य आणि अभागी जनतेला त्या वेळी शस्त्रांची आणि अन्नाची गरज होती. नजीकच्या रशियन विमानतळांचा उपयोग करून, ब्रिटिश आणि अमेरिकन वैमानिकांना तिला भरपूर मदत करतां आली असती, परंतु त्या विमानतळांचा उपयोग करायला स्टालिनने नकार दिला ! चर्चिल म्हणतात, " पोलंडच्या आत्म्याचें पुनरुत्थान स्टालिनला नको होतें ! "

अशा रीतीनें पोलंड आणि सबंध पूर्व युरोप आपल्या पंजाखाली घेण्याचा स्टालिनचा बेत स्पष्ट झाल्यामुळे, पूर्व युरोपांत अँग्लो-अमेरिकनांची सेना उतरविण्याचा चर्चिल यांनी बेत केला. त्या संकल्पाचें स्वागत करतांना जनरल स्मटस् यांनी चर्चिलना लिहिलें, " युरोपच्या युद्धोत्तर रचनेबद्दल आतापासूनच जागरूक राहिलें पाहिजे, कारण त्यावर अनेक पिढ्यांचें भवितव्य अवलंबून आहे. " पण चर्चिल यांच्या योजनेला रूझवेल्ट यांचा पाठिंबा न मिळाल्यामुळे, ती अमलांत येऊं शकली नाही !

रशियावर जर्मनीने हल्ला केला त्या वेळीं कम्युनिस्टांचा परस्पर नाय-

नाट होतो आहे यासाठी अमेरिकेने आनंद मानू नये म्हणून चर्चिल यांनी नभोवाणीवरून भाषण केलें होतें. हिटलरचा रशियावरील हल्ला म्हणजे इंग्लंड आणि अमेरिकेवरील हल्ल्याची पूर्वतयारी आहे अशी धोक्याची सूचना त्यांनी त्या भाषणांत दिली होती. त्यानंतरच्या तीन वर्षांत रशियन सैनिकांनी केलेल्या पराक्रमामुळे मोहित होऊन, स्टालिनच्या सद्धेतूबद्दल शंका घ्यायला रूझवेल्ट तयार नव्हते. परंतु, " हिटलरचा अवतार संपला—पुढे काय? कम्युनिझम?"—ही भीति चर्चिलना व्यथित करीत होती. तिचें निराकरण व्हावें या उद्देशाने १९४४ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत त्यांनी पुन्हा स्टालिनची भेट घेतली. ती भेट स्नेहाच्या वातावरणांत चालू असतां, जर्मनांच्या तावडींतून मुक्त झालेल्या ग्रीकांच्या राजधानींत कम्युनिस्टांच्या प्रेरणेने यादवीयुद्ध सुरू झालें. त्या वेळीं ग्रीसमधील ब्रिटिश सेनापति, जनरल अलेक्झांडर, याला चर्चिलनी संदेश पाठविला, " अथेन्सवरील आपली पकड सैल करू नका—रक्तपाताशिवाय कार्यभाग साधला तर उत्तमच—नाहीपेक्षा रक्तपात करावा लागला तरी हरकत नाही!"

ग्रीसच्या राजाला पुन्हा गादीवर बसविण्याकरिता चर्चिल जनतेला दडपताहेत असा आक्रोश त्या वेळीं इंग्लंड आणि अमेरिकेंतल्या कम्युनिस्टांनी आणि डाव्या गटांनी सुरू केला. त्यासंबंधी पार्लमेंटांत बोलतांना चर्चिल म्हणाले, " जमावाचें राज्य म्हणजे लोकशाही नव्हे! धाकदपटशा आणि अत्याचारांवर लोकशाही आधारलेली नसून विचार-स्वातंत्र्य, प्रत्येकाच्या हक्कांची जाणीव आणि खिलाडूपणा हे तिचे आधारस्तंभ आहेत. ज्याच्या हातांत बंदुक असेल त्याने कबजा घ्यावा अशी वेश्या म्हणजे लोकशाही नव्हे! जर्मनांच्या तावडींतून सुटलेल्या प्रत्येक राष्ट्राने शांततामय वातावरणांत मतदान करून आपली राज्यपद्धति निश्चित करावी हें आमचें धोरण आहे आणि तेंच आमचें ध्येय आहे"—या खुलाशानंतरसुद्धा अमेरिकन लोकमत अस्वस्थ होतें आणि रूझवेल्ट तटस्थ होते!

अशा वातावरणांत बड्या तिघांची परिषद पुनः याल्टा येथे भरून अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यांत आले. युद्धोत्तर काळांत नव्या राजवटी प्रस्थापित होईपर्यंत शत्रुराष्ट्रांचे कोणकोणते भूविभाग बड्या तिघांपैकी कोणीं ताब्यांत ठेवावे तें निश्चित झालें. स्वतंत्र मतदानाच्या मार्गाने प्रत्येक

राष्ट्रांतली जनता ज्या प्रकारची आणि ज्या पक्षाची राजवट मान्य करील तीच जेत्यांनीसुद्धा मान्य करावी असा करार झाला--पण त्या कराराची शाई वाळते न वाळते तोच त्याचा भंग झाला ! रशियन रणगाडे रुमानियाच्या राजधानींत शिरले आणि त्यांनी मायकेल राजाचें सर्वपक्षीय मंत्रिमंडळ बरखास्त करून चार प्रशासकांची नेमणूक केली ! पोलंडमध्ये रशियाला अंकित असें सरकार स्थापन करण्याच्या कारवाया चालूच होत्या !

* * *

**रूझवेल्ट यांचा मृत्यु :**

पोलंड, ग्रीस आणि रुमानिया या राष्ट्रांतील घटना म्हणजे आगामी काळाचीं प्रसादचिन्हेंच आहेत असें वाटून, १८ मार्च १९४५ रोजीं, चर्चिलनी प्रेसिडेंट रूझवेल्टना लिहिलें, " याल्टा परिषदेंतल्या करारांचा भंग आणि एक महान् अपयश पाहण्याचें आपल्या नशिबीं आलें आहे. राक्षसांची लढाई संपल्यानंतर आता खुज्यांची लढाई सुरु होणार आहे. मी जिवंत असेपर्यंत तुमच्या आणि माझ्या मैत्रीच्या खडकावर भूतलाच्या भविष्याचें मंदिर उभारण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे. छिन्नविच्छिन्न आणि भेसूर अशा भूतलाला त्याच्या पायांवर उभें करण्याचें बिकट कार्य आपल्याला करावें लागणार आहे ! "

हें पत्र लिहून कांही दिवस लोटतात न लोटतात तोच रूझवेल्ट यांची प्रकृति ढासळून, १२ एप्रिल १९४५ रोजीं, ते मरण पावले ! भूतलाच्या युद्धोत्तर पुनर्रचनेचा आणि लोकशाहीचा एक आधारस्तंभ कोसळला ! कधीहि भरून काढतां येणार नाही अशा त्या हानीच्या दुःखामुळे विव्हल होऊन चर्चिल यांनी त्या वेळीं उद्गार काढले, " युद्ध सुरू झाल्यापासून आम्ही एकमेकांना सतराशे संदेश पाठविले आणि एकशेवीस दिवस एकमेकांच्या सहवासांत काढले. शारीरिक व्याधींनी गांजले असतां रूझवेल्ट यांनी शारीरिक आणि मानसिक कष्टांचा आणि राजकारणांतल्या धकाधकीचा मार्ग पत्करला, तसा एक कोटी माणसांत एकानेसुद्धा पत्करिला नसता ! आमच्या इतिहासांतला आमचा सर्वांत मोठा अमेरिकन मित्र आज नाहीसा झाला ! "

**रशियन संकट :**

पूर्व युरोपांतल्या परिस्थितीसंबंधी बोलतांना चर्चिल यांनी पार्लमेंटला सांगितलें, " पोलंड, बाल्कन राष्ट्रें आणि ऑस्ट्रिया यांचे प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविले नाहीत, तर तिसऱ्या महायुद्धाची शक्यता निर्माण होईल. अँग्लो–अमेरिकन सेनांनी युरोपचा निरोप घेतला म्हणजे शेकडो सेना-विभागांनी सुसज्ज असा रशिया हा युरोपांतील सर्वांत बलाढ्य देश ठरेल. जर्मन शत्रु नाहींसा झाला पण त्याची जागा रशियन संकटाने भरून काढली आहे ! "

इंग्लंडमधील राष्ट्रीय सरकार बरखास्त झालें त्या वेळच्या स्वतःच्या परिस्थितीबद्दल चर्चिल लिहितात, " मी इतका अशक्त झालों होतों कीं, खुर्चीवर बसवून मला एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर न्यावें लागत होतें. राष्ट्रीय सरकार बरखास्त झाल्यामुळे मी सबंध राष्ट्राचा नव्हे, तर एका पक्षाचा नेता बनलों होतों. " ब्रिटिश आणि अमेरिकन फौजा युरोपमधून काढण्यापूर्वी बड्या तिघांची एक शिखर परिषद भरली पाहिजे असें चर्चिलना वाटत होतें. पण, " रूझवेल्ट यांचा मृत्यु आणि, त्यांच्या नंतर, अमेरिकेचे अध्यक्ष झालेले प्रेसिडेंट ट्रूमन यांची जागतिक प्रश्नावर पकड बसवण्याच्या संधिकाळांत जी पोकळी निर्माण झाली होती, तिचा परिणाम फार वाईट झाला. कोणताहि निर्णय घेणें आम्हाला अशक्य झालें होतें. निस्सीम यशाच्या काळांत मी अत्यंत दुःखी होतों. माझा जयजयकार करणाऱ्या जमावांत मी व्यथित अन्तःकरणाने आणि भविष्याविषयीच्या भीतीने ग्रस्त होऊन हिंडत होतों." त्यावेळीं शिखर परिषद भरूं शकली नाही याचा परिणाम काय झाला ? त्याबाबत चर्चिल म्हणतात, " झेकोस्लाव्हिया व्यापिला गेला आहे. पोलंड, रुमानिया, बल्गेरिया आणि सर्व बाल्टिक राष्ट्रें हीं एकतंत्री अंमलाखाली जाऊन रशियाचीं अंकित बनलीं आहेत. एकटा ग्रीस काय तो या पकडींतून निसटला आहे. आमचे सैनिक स्वदेशीं परतले असून, संख्येने आणि शस्त्रबलाने बलाढ्य अशी रशियन सेना युरोपांत ठाण मांडून बसली आहे. तिसऱ्या महायुद्धाची छाया भूतलावर पसरली असून, असामान्य आणि संपूर्ण अशा विजयाच्या क्षणीं, चिरकालीन शांततेची शक्यता—कदाचित् शेवटचीच शक्यता नाहीशी झाली

आहे !–१९४५ सालच्या जुलै महिन्यांत युरोपांत उरलेले शेवटचे ब्रिटिश आणि अमेरिकन सैनिक आपापल्या विभागाकडे परतूं लागल्यामुळे युरोपचा मध्यभाग रशियन सैनिकांनी व्यापिला. मानवतेच्या इतिहासांतली ही एक निर्णायक घटना समजली पाहिजे ! ”

१६ जुलै १९४५ ते २५ जुलै १९४५ पर्यंत जर्मनींतील सुप्रसिद्ध पोटस्डॅम शहरांत स्टालिन, चर्चिल आणि ट्रूमन या बड्या तिघांची युद्धकाळांतली शेवटची परिषद भरली. या परिषदेंत विशेष असें कांहींच घडलें नाहीं. स्टालिनने त्याला पाहिजे होतें तें सर्व अगोदरच मिळविलें होतें. ट्रूमन नवीन होते आणि, इंग्लंडमधील आगामी निवडणुकींत कोणता पक्ष विजयी होईल याचा भरंवसा नसल्यामुळे चर्चिल, यांना अधिकारवाणीने बोलतां येत नव्हतें. “ निवडणुकीच्या निकालाची चर्चिलना भीति वाटते आहे ” असें स्टालिन विनोदाने म्हणाला त्या वेळीं एका क्षणाचाहि विलंब न लावतां चर्चिल यांनी उत्तर दिलें, “ निवडणुकीच्या निकालाची मला मुळीच भीति वाटत नाही. आपलें सरकार बदलण्याचा आमच्या मतदारांना जो हक्क आहे, त्याचा मला अभिमान वाटतो ! ”–नजीकच्या बर्लिन शहरांत जाण्याचें धाडस स्टालिन किंवा ट्रूमन यांना झालें नाही. न जाणो, एखाद्या माथेफिरू जर्मनाने गोळी झाडली तर ! पण चर्चिल यांनी मात्र बर्लिन शहराच्या हमरस्त्यावर उभें राहून ब्रिटिश सैनिकांची मानवंदना स्वीकारली. त्या वेळच्या बर्लिन शहरासंबंधी चर्चिल लिहितात, “ जिकडं पाहावं तिकडं मूर्तिमंत वाताहत दिसत होती. नागरिकांचे भेसूर चेहरे आणि त्यांच्या अंगावरचे फाटके कपडे पाहून मला वाईट वाटलें. जर्मनांनी बिनशर्त शरणागति पत्करिली तेव्हापासून माझ्या मनांतला त्यांच्याबद्दलचा द्वेष आणि तिरस्कार मावळला होता–”

* * *

### हुजूर पक्षाचा पराभव :

चर्चिल यांच्या युद्धकाळांतील असामान्य कामगिरीचे गोडवे सर्वत्र गायिले जात होते. “ राष्ट्राचा नेता, जनतेचा त्राता आणि स्वतंत्र जगाच्या प्रतिकारशक्तीचा स्फूर्तिदाता ” असें त्यांचें वर्णन लॉर्ड बीव्हरब्रूक यांनी

केलें होतें. "एका माणसाच्या धैर्यावर अखिल भूतलाने अवलंबून राहावें असें दुसरें उदाहरण जगाच्या इतिहासांत सापडणार नाही" असें वर्णन स्टालिनने केलें होतें.

लहानपणीं गाढवावर बसून सहल करीत असतां, समोरून येणाऱ्या आयरिश चळवळ्यांच्या मोर्चामुळे बिचकून गाढवाने लाथा झाडल्या आणि चर्चिल स्थानभ्रष्ट झाले. त्या प्रसंगाला उद्देशून, "आयरिश राजकारणाशीं माझा पहिला परिचय झाला तो असा" अशी मल्लिनाथी त्यांनी केली आहे. ब्रिटिशांच्या लोकशाहीचा तसाच कांहीसा अनुभव १९४५ च्या जुलै महिन्यांत हुजूर पक्षाला आला !

इंग्लंडमधील नव्या निवडणुकीचा निकाल २६ तारखेला लागणार म्हणून पोटस्डॅम परिषद संपवून चर्चिल २५ तारखेला स्वदेशीं परत आले. चर्चिल यांनी युद्ध जिंकलें असलें, तरी चर्चिल आणि हुजूर पक्ष यांच्यांत भेद करून, ब्रिटिशांच्या लोकशाहीने चर्चिल यांना निवडलें, पण हुजूर पक्षाचा पराभव करून मजूर पक्षाला बहुमत मिळवून दिलें ! हुजूरपक्षाच्या पराभवामुळे चर्चिल यांच्या हातची सर्व सत्ता नाहीशी झाली. युद्धकाळाइतक्याच आणी-बाणीच्या अशा युद्धोत्तर काळांत आपल्या राष्ट्राचें भवितव्य घडविण्याची सत्ता आपल्या हातांत राहिली नाही म्हणून व्यथित झालेले चर्चिल लिहितात,

"एखाद्या असह्य शारीरिक वेदनेने मनुष्य जागा व्हावा तसा मी त्या दिवशीं पहाटे अचानक जागा झालों. आमचा पराजय झाला आहे या कल्पनेने माझ्या मनाचा ताबा घेतला. भविष्याला आकार देण्याची सत्ता इतःपर माझ्या हातांत राहणार नाही या विचाराने दुःखी होऊन, मी कुशीवर वळलों आणि पुनः झोपलों तो सकाळीं नऊ वाजतां जागा झालों. मजूर पक्षाचें बहुमत दुपारपर्यंत निश्चित झालें. संध्याकाळीं सात वाजतां मी बकिंगहॅम राजवाड्यांत गेलों आणि माझा राजीनामा राजाला सादर केला !"

त्यानंतर मेजर ॲटली यांच्या नेतृत्वाखालीं मजूर पक्षाचें सरकार स्थापन झालें. जपानच्या शरणागतीची वार्ता पार्लमेंटांत सांगतांना ॲटलीसाहेब म्हणाले, "या महायुद्धांतील आमच्या विजयाचे चर्चिल हे प्रमुख कारागीर आहेत !"

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ...

अनुक्रम ... वि. ...

अंक ... नों. दि. ...

२५

## चित्रकार चर्चिल

रणांगण आणि राजकारण हे चर्चिल यांचे आवडते विषय असले तरी ते इंग्रजी भाषेचे शिल्पकार आणि हौशी चित्रकारहि आहेत. पहिल्या महायुद्धांतील डार्डानेल्सच्या अयशस्वी मोहिमेमुळे, १९१५ सालीं, चर्चिलना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला तेव्हा, वयाच्या चाळिसाव्या वर्षीं, वेळ कसा घालवावा हें त्यांना कळेना. ज्या बेडर आणि बेदरकार वृत्तीने त्यांनी आपल्या तरुणपणीं रणांगणावर संचार केला होता, तितक्याच बेडर आणि बेदरकार वृत्तीने त्यांनी रंग आणि कुंचले हातांत घेऊन चित्रकलेवर हल्ला चढविला! चित्रकलेच्या कोणत्याहि विद्यालयाची पायरी न चढतां चर्चिलनी तैलचित्रें काढायला सुरुवात केली आणि, ‘ चार्लस् मोरिन ’ हें टोपण नांव धारण करून, १९२०–२१ सालीं पॅरिसमध्ये आपल्या तैलचित्रांचें एक प्रदर्शन भरविलें. त्यांपैकी चार चित्रें विकून त्यांना जवळ जवळ पंचाहत्तर रुपये मिळाले. लंडनमधील रॉयल अकादमीच्या प्रदर्शनासाठी एखाद्या चित्रकाराचें चित्र स्वीकारलें जाणें हा जागतिक महत्त्वाचा मान समजला जातो. चार्चिल यांचीं तैलचित्रें चोवीस वेळा स्वीकारलीं गेलीं असून, त्यांपैकी १९४७ सालीं दोन आणि १९४९ सालीं सहा चित्रें स्वीकारिलीं होतीं. आतापर्यंत त्यांनी शंभर उत्कृष्ट तैलचित्रें काढलीं आहेत. निसर्गाचीं चित्रें रंगविणें हा त्यांचा आवडता छंद आहे. माणसाला एखादा तरी छंद असावा असें त्यांचें मत असून, सर्व छंदांत चित्रकलेचा छंद हा अत्यंत आनंददायी आहे हें स्वानुभवाने सांगतांना ते म्हणतात,

“ तुम्हाला रिकामा वेळ मजेंत घालवायचा असेल, रोजचीं सुखदुःखें विसरण्यासाठी एका निराळ्या जगांत मन गुंतवायचें असेल किंवा सुटीच्या

दिवशीं रोषणाई करायची असेल तर तें अशक्य आहे असें समजूं नका. चित्रकला म्हणजे अत्यंत स्वतंत्र आणि स्वस्त अशी करमणूक आहे. तिच्यामुळे कोणत्याहि दृश्याच्या सौंदर्याची वाढ होते, निरुद्योगाच्या प्रत्येक क्षणीं उद्योग करतां येतो आणि मनाला सतत नवें खाद्य आणि चालना मिळते. मनोवेधक प्रदेशांचें दर्शन घडविणारा, पण कधीहि न संपणारा असा प्रवास आहे तो! आपण यशस्वी होणार नाही असा मनाचा घडा करूनच या छंदाची सुरुवात करा. प्रयत्न करून अयशस्वी झालांत तरी त्यांत कोणताच तोटा नाही. कारण, त्यानंतरसुद्धा तुम्ही शिकार करून जनावरें मारूं शकाल, मैदानी खेळांत आपल्या प्रतिस्पर्ध्याला चीत करूं शकाल किंवा पत्त्याच्या डावांत आपल्या मित्राला लुबाडूं शकाल!

"उतारवयांतसुद्धा तुम्हाला चित्रकलेच्या अज्ञात आणि अमर्याद फंदांत पडायचें असेल, तर तुम्ही धीट बनलें पाहिजे. विचारपूर्वक करावयाची ती गोष्टच नव्हे! चित्रकलेचें सांप्रदायिक शिक्षण तरुणांनी घ्यावें—त्यांना किती तरी गोष्टी सहन कराव्याच लागतात! ज्यांना चित्रकलेचा व्यवसाय करायचा असेल त्यांनी चित्रकलेचें शिक्षण घ्यावें. तुमच्या—माझ्या-सारख्यांनी फार मोठी महत्त्वाकांक्षा कशाला बाळगावी? एखादी महान् कलाकृति निर्माण करण्याची लालसा आपण धरूं नये. रंगाच्या पेटीच्या संगतींत एक मजेदार प्रवास करण्यांतच आपण समाधान मानलें पाहिजे. मात्र, धिटाई आणि बेछूटपणाचें तिकीट जवळ असल्याखेरीज तो प्रवास करतां येणार नाही हें लक्षांत ठेवा!

"१९१५ सालीं मी आरमाराच्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला त्या वेळीं मला जें अवगत होतें त्याचा उपयोग करतां येत नव्हता. मला प्रत्येक गोष्टीची चिंता वाटत असली तरी चिंता निवारण करण्याचीं साधनें माझ्या हातांत नव्हतीं. अनेक विषयांसंबंधांत माझीं निश्चित मतें होतीं, पण तीं कृतींत उतरविण्याचा अधिकार मी गमावून बसलों होतों. माझ्या शरीराचा प्रत्येक कण कृतीसाठी तळमळत असतांना, एखादी शोकांतिका पाहायला अत्यंत निर्दयतेने पहिल्या रांगेंत बसविलेल्या प्रेक्षकासारखी माझी स्थिति झाली होती! त्या वेळीं देवी चित्रकला माझ्या मदतीला धावली

आणि म्हणाली, ' हीं खेळणीं अनेकांचं मनोरंजन करतात—पाहाना, तुला-सुद्धा त्यांचा उपयोग होईल.'

" मुलांच्या रंगाच्या पेटीच्या साहाय्याने एका रविवारीं मीं सुरुवातीचे प्रयोग केले आणि दुसरे दिवशीं सकाळीं तैलचित्रें रंगविण्याचीं सर्व साधनें विकत आणलीं. आता सुरुवात करायची ! माझ्या हातांतला कुंचला हा, जणू काय, भवितव्यतेने भारलेला आहे असें मला वाटलें ! मला सुचेल तसें चित्र रंगवायला मीं सुरुवात केली. एखादें चित्र रंगविणें ही फार मोठी मौज आहे. रंग हे मुळांतच मोहक असतात. आपल्यासमोरचा देखावा चितारण्याचा प्रयत्न करतांना मनुष्य तन्मय होतो. असा प्रयत्न तुम्हीं कधी केला नसेल तर मरण्यापूर्वी अवश्य करा !

" निसर्गाचें चित्र काढायचें असेल तर शेतें, नद्या, पूल, वृक्ष आणि फुलें या सर्वांचें सूक्ष्म निरीक्षण केलें पाहिजे. प्रत्येक देखाव्यांत आणि वस्तूंत आपल्याला कितीतरी नव्या गोष्टी दिसतात आणि इतके दिवस त्या आपल्याला कशा दिसल्या नाहीत याचें आश्चर्य वाटतें ! ही जाणीवच इतकी महान् आहे, की त्यामुळे आपल्याला प्रत्येक गोष्टींत नावीन्य दिसूं लागतें. सूर्यप्रकाशांत आणि छायेंत गिरिशिखरावर पसरणारे निरनिराळे रंग, पाण्यांत दिसणारीं मोहक प्रतिबिंबें, प्रत्येक पानाचा निराळा रंग, डोंगरावर पसरणाऱ्या स्वप्नमय छाया आणि क्षितिजावर पसरणारा मंद प्रकाश पाहून मी बेभान होऊं लागलों. एखाद्या जमावाकडे पाहून, ' किती माणसं हीं !' —असं म्हणावं, त्याप्रमाणे चाळीस वर्षांच्या जीवनांत या गोष्टींची मला अगदी सामान्य जाणीव होती.

" सबंध विश्वाचा खजिना तुमच्या हातांत येतो. अत्यंत साध्या गोष्टींत-सुद्धा सौंदर्य दिसूं लागतं. जगांत सौंदर्य किती तरी आहे पण तें पाहायला वेळ मात्र अगदी अपुरा आहे. चित्रकलेंतली अमर्याद शक्यता आपल्या जीविताच्या क्षणभंगुरतेमुळे मर्यादित होत असते. तुम्हाला दिसतें तसें चितारतां आलें नाही तरी जें पाहिलें तें तुमच्या चिरकाल लक्षांत राहतें. आपण किती सुंदर गोष्टींना मुकलों आहों आणि अमोल गोष्टी किती स्वस्त असतात, हें आगगाड्यांतून इतस्ततः भटकणाऱ्या आणि बादशाही हॉटेलांत राहून पैशाची उधळपट्टी करणाऱ्यांच्या लक्षांत कधीच येत नाही.

" मी स्वर्गांत गेलों म्हणजे पहिलीं दशलक्ष वर्षें सर्वस्वीं चित्रकलेची सेवा करून तिचें संपूर्ण आकलन करण्याचा प्रयत्न करणार आहें ! "

* * *

**साहित्यसेवा :**

रणांगणावर कोणत्या तरी निमित्ताने संचार करायला मिळावा म्हणून चर्चिल यांनी वृत्तवार्ताहराचा पेशा पत्करला आणि, युद्धाच्या बातम्या लिहीत, त्यांनी आपल्या 'साहित्यसेवेची' सुरुवात केली. त्या बातमीपत्रांच्या पाठोपाठ त्यांनी मलकंद आणि सुदान वगैरे मोहिमांसंबंधी ग्रन्थ लिहिले. आपले वडील लॉर्ड रॅन्डॉल्फ चर्चिल यांच्या चारित्राचे दोन खंड, मार्लब्ररोच्या चारित्राचे चार खंड, पहिल्या महायुद्धाच्या इतिहासाचे पांच खंड, १९०० सालापर्यंतचें आत्मचरित्र, दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासाचे सुमारे चार हजार पृष्ठांचे सहा खंड, 'महान् समकालीन' नांवाचा ग्रन्थ आणि स्फुट लेखांचा एक संग्रह ही त्यांची महत्त्वाची ग्रन्थसंपत्ति आहे. इंग्रजी भाषा बोलणारांच्या इतिहासाचे पांच खंड लिहिण्याचा त्यांचा विचार असून त्याचीं टाचणें चर्चिलनी दुसरें महायुद्ध सुरू होण्यापूर्वीं केलीं होतीं. या इतिहासाचे तीन खंड गेल्या कांही वर्षांत प्रसिद्धहि झाले आहेत. पहिल्या महायुद्धाच्या इतिहासापासून त्यांना तीन लक्ष रुपयांची प्राप्ति झाली. दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास तीन वृत्तपत्रांत खंडशः प्रसिद्ध करण्यासाठी पन्नास लक्ष रुपये आणि तोच इतिहास पुढे ग्रन्थरूपाने अमेरिकेंत प्रसिद्ध करण्याच्या हक्कासाठी त्यांना पंचाहत्तर लक्ष रुपये मोबदला मिळाला ! जागतिक स्वरूपाच्या घटना, मनुष्यस्वभाव आणि मानवी भावना यांचें आकलन करण्याची आणि इंग्रजी वाङ्मयांत खरोखरच तोड नाही अशा शब्दांत व्यक्त करण्याची शक्ति हें चर्चिल यांच्या वाङ्मयाचें वैशिष्ट्य आहे. इंग्रजी भाषेंत व्यक्त केलेल्या त्यांच्या विचारांचा मराठींत तंतोतंत अनुवाद करणें शक्य नसलें, तरी त्यांचें धावतें दर्शन घडविण्याचा मोह टाळतां येण्यासारखा नाही.

* * *

**युद्धाचें भीषण स्वरूप :**

चर्चिल हे युद्धपिपासू आहेत असा प्रचार मधूनमधून करण्यांत आला होता. स्वातंत्र्यासाठी आणि स्वाभिमानासाठी अवश्य तेव्हा युद्ध केलेंच पाहिजे असा त्यांचा बाणा असला, तरी युद्धाच्या बदललेल्या स्वरूपामुळे युद्धाच्या ज्वाला कधीच भडकूं नयेत असेंच त्यांना नेहमी वाटत आलें आहे. आक्रमक वृत्तीचें कोणतेंहि राष्ट्र युद्ध सुरु करायला धजणार नाही, इतकें सामर्थ्य आणि सुसज्जता शांततावादी राष्ट्रांनी संपादन केली पाहिजे असाच प्रचार ते नेहमी करीत आले आहेत. १९०१ सालीं पार्लमेंटांतलें पहिलें महत्त्वाचें भाषण करतांना ते म्हणाले होते, " जुन्या जमान्यांत ज्या वेळीं एखाद्या मंत्र्याच्या धोरणामुळे किंवा राजाच्या इच्छेमुळे युद्धें उद्‌भवत होतीं, ज्या वेळीं धंदेवाईक सैनिकांच्या छोट्या सैन्यांची प्रगति वाहतुकीच्या आणि पुरवठ्याच्या अडचणीमुळे कुंठित होत असे, त्या वेळीं त्या युद्धापासून होणारी हानि आणि संहार मर्यादित असे. परंतु, आता एका राष्ट्राचे नागरिक दुसऱ्या राष्ट्राच्या नागरिकांविरुद्ध लढायला सिद्ध झाले असल्यामुळे आणि शास्त्राच्या मदतीने युद्धाची संहारक शक्ति अधिकच वाढली असल्याकारणानें, कोणत्याहि युरोपियन युद्धाच्या शेवटीं पराजितांचा नायनाट आणि तितकाच घातक असा जेत्यांचा ऱ्हास झालेला आढळून येईल—लोकांचीं युद्धें हीं राजांच्या युद्धांपेक्षा अधिक भयानक होतील—"

" आम्ही आत्महत्या करणार आहोंत का ? "—या १९२५ सालीं लिहिलेल्या लेखांत चर्चिल लिहितात,

" मनुष्यजातीचा इतिहास हा युद्धांचा इतिहास आहे. कांही अपवादात्मक छोटे कालखंड सोडले, तर भूतलावर शांतता अशी कधीच नांदलेली नाही. परंतु, आतापर्यंत माणसाच्या हातीं असलेलीं हिंसक शस्त्रें त्याच्या हिंसक वृत्तीला पुरेशीं नव्हतीं ! युद्धामुळे मानवजातीचा संहार होईल अशी भीति विसाव्या शतकापूर्वी कधीच उत्पन्न झाली नव्हती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून मानवाचे सर्व सद्‌गुण आणि दुर्गुण संहाराच्या कार्यासाठी राबविले जाऊं लागले. शास्त्रांनी आपले सर्व खजिने आणि गुपितें त्या संहारकार्यासाठी युद्धाच्या हातीं सोपविलीं ! पहिलें महायुद्ध जितक्या

आकस्मिकपणाने उद्‌भवलें तितक्याच आकस्मिकपणाने विराम पावल्यामुळे, युद्धकाळांत प्रगत झालेल्या कित्येक नव्या आणि भयंकर संहारक शस्त्रांचा उपयोग करावा लागला नसला, तरी त्यांचें ज्ञान शिल्लकच आहे. जिला आपण शांतता समजतों पण जो खरोखरीचा थकवा आहे, अशा परिस्थितींत आपण सध्या मार्गक्रमणा करीत आहोंत.

" या वेळींच आपण एकंदर परिस्थितीचा विचार केला पाहिजे. पुढील युद्धांत केवळ सैनिकांनाच नव्हे, तर सर्व नागरिकांना शत्रूचे प्रहार सोसावे लागतील. ज्या राष्ट्रांना आपलें जीवित धोक्यांत आहे असें वाटेल, तीं राष्ट्रें आपल्या अस्तित्वासाठी वाटेल ती उपाययोजना करतील. यापुढील युद्धांत संहाराच्या ज्या शक्ति वापरल्या जातील त्या अत्यंत भीषण, अमर्याद आणि एकदा उपयोगांत आणल्यानंतर ज्यांच्यावर माणसाचा ताबा राहणार नाही, अशाहि असतील.

" मानवजात अशा परिस्थितींत कधी सापडली नव्हती. स्वतःचा नाश करण्याचीं हत्यारें तिच्या हातांत प्रथमच आलीं आहेत. माणसाचे सर्व पराक्रम, वैभव आणि उद्योग यांनी त्याला या टप्प्यापर्यंत आणून सोडलें आहे! मानवांची सार्वत्रिक कत्तल करायला आणि पुन्हा दुरुस्त करतां येणार नाही अशा रीतीने शिल्लक उरलेल्या संस्कृतीवर प्रहार करायला सज्ज, आज्ञाधारक आणि सेवेला सिद्ध अशा थाटांत मृत्यु उभा आहे. तो केवळ हुकुमाच्या शब्दांची वाट पाहतो आहे. आजपर्यंत जो मृत्यूचा बळी होता आणि आता फक्त एकदाच जो मृत्यूला आज्ञा करणार आहे, अशा कमकुवत आणि भांबा-वलेल्या प्राण्याच्या हुकमाची वाट मृत्यु पाहतो आहे!

" शास्त्रीय शोधांचें शेवटचें पान लिहिलें गेलें आहे हा विश्वास काय कामाचा? एखाद्या संत्र्याएवढ्या छोट्या बॉंबच्या अंगीं एका घावांत एखादें अफाट शहर उद्‌ध्वस्त करण्याची शक्ति निर्माण करतां येणार नाहीं का? एखाद्या किरणाच्या साहाय्याने भूतलाला उद्‌ध्वस्त करणारीं अस्त्रें वैमानिकांच्या मदतीशिवाय एखाद्या शहरावर, दारूगोळ्याच्या कोठारावर, सैनिकांच्या छावणीवर किंवा गोदीवर हल्ला करूं शकणार नाहीत, हें तरी कशावरून? विषारी वायु आणि रासायनिक लढायांसंबंधीचें अद्याप फक्त पहिलेंच प्रकरण लिहिलें गेलें आहे. युद्धांतील दोन्ही पक्षांकडे जर सारख्याच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३४८२८ वि: चरित्र
क्रमांक ........ नों. दि: २.८.८३



जोसेफ स्टालीन



बेनिटो मुसलोनी

प्रभावाचीं शस्त्रें असतील तर विश्वाचा नाश होईल; एकाच पक्षाकडे असलीं तर बाकीचें विश्व त्याचें गुलाम होईल !

" पूर्वीच्या युद्धांत जय मिळविण्यासाठी शरीरसामर्थ्य, धैर्य, कौशल्य आणि शिस्त यांची गरज होती आणि, उत्क्रान्तीच्या वाटचालींत, जे सर्वांत श्रेष्ठ आणि गुणवान् तेच आघाडीवर येत असत. परंतु, आता तशी खात्री देतां येणार नाही. एखाद्या राष्ट्राकडे विवक्षित प्रसंगीं अधिक संहारक शस्त्र असून त्याचा निर्दयपणाने उपयोग करण्याची तयारी असेल, तर असें असंस्कृत, नीच आणि अधम राष्ट्रसुद्धा त्याच्यापेक्षा श्रेष्ठ गुणांच्या राष्ट्राला तुडवूं शकेल. स्वतःचें संरक्षण करण्याची इच्छा मानवजातींत वास करीत असेल, जिवंत राहण्याची इच्छाशक्ति ही केवळ कांही व्यक्तींत आणि राष्ट्रांतच नव्हे तर सबंध मानवतेंत शिल्लक असेल, तर या महान् संकटापासून भूतलाचा बचाव करण्याकरिता प्रत्येकाने झटलें पाहिजे. "

नवशस्त्रास्त्र-निर्मितीसंबंधांत तीस वर्षांपूर्वीं केलेलें हें भाकित खरें ठरल्यावर चर्चिलनी एकदा सांगितलें,

" युद्धाचा भडका उडाला तरी अण्वस्त्रांचा उपयोग केला जाणार नाही हा समज चुकीचा आहे. परंतु, दोन्ही पक्ष इतके तुल्यबल असतील की, सर्वनाशाच्या भीतीमुळेच शांतता प्रस्थापित होईल. सुरक्षितता हें भीतीचें मृत अपत्य आणि जिवंत राहणें हें सर्वनाशाचें जुळें भावंड ठरावें, असा टप्पा या कथेंत कदाचित् गाठला जाईल ! "

' पन्नास वर्षांनंतर ' या तीस वर्षांपूर्वीं लिहिलेल्या लेखांत ते म्हणतात,

" आणखी पन्नास वर्षांनंतर अशीं शस्त्रें निर्माण होतील की, तीं सबंध भूतलाचा नाश करूं शकतील. इतिहासाच्या सुरुवातीपासून कधी शक्य झालें नाही अशा रीतीने जनतेच्या जीवनाचेंच नव्हे, तर तिच्या विचारांचें आणि इच्छांचें नियमन करणारे हुकुमशहा निर्माण होतील. अशा भयप्रद आणि अमर्याद सत्तेंत जर क्रूरतेची भर पडली, तर अखिल विश्वाचा नाश होईल किंवा नाश झाला तर बरें असें म्हणण्याची पाळी येईल ! भविष्यासंबंधीच्या या दुष्ट स्वप्नांपेक्षा, एखाद्या भटक्या ग्रहावर आपटून पृथ्वीचा चुराडा उडाला तर ती एक प्रकारची सदय सुटकाच होईल असें वाटतें !

" अशा या असामान्य स्थित्यंतराच्या काळांत अचूक मार्ग कोणता तें

निवडणुकींतल्या मतदानाच्या साहाय्याने कसें ठरवितां येईल? प्रत्येक राष्ट्राच्या जीवनांत जे आर्थिक प्रश्न निर्माण झाले आहेत, ते सोडवायला प्रौढांच्या मतदानाने निर्माण केलेल्या लोकसभा असमर्थ आहेत हा अनुभव आजसुद्धा येतो आहे. मोठमोठ्या राष्ट्रांचें नेतृत्व हें आपल्या राष्ट्राच्या गरजा माहीत असलेल्या कर्तृत्ववान् माणसांच्या हातीं आता राहिलेलें नाही. लोक-शाहीच्या राजवटी या शक्यात शक्य तितका कमी प्रतिकार करण्याच्या वृत्तीनं फक्त नजीकच्या स्वार्थाकडे दृष्टि ठेवून, प्रत्येकाच्या तोंडावर चार तुकडे फेकीत आणि गोडगोड घोषवाक्यांचा उच्चार करीत कशीतरी वाट-चाल करीत असतात. शास्त्रीय संशोधनाचा झंझावात भोवताली सुरू असतां माणसांचीं आणि राष्ट्रांचीं नैतिक मूल्यें आणि अध्यात्मिक श्रद्धा शाबूत राहणें अवश्य आहे. जो समाज सर्व तारकांत सिने-तारका उज्ज्वल आहेत असें मानतो, त्याची प्रकृति निरोगी कशी राहील?

"आपण जन्म कां घेतला, जीविताचा हेतु काय आणि मृत्यूनंतर पुढे काय?– हे प्रश्न जगाच्या सुरुवातीपासून विचारले गेले आहेत. भौतिक बाबतींत किती जरी प्रगति झाली तरी ती माणसाच्या आत्म्याला शांति देऊं शकत नाही. पूर्वींच्या पिढ्यांच्या स्वप्नांतहि आल्या नसतील अशा योजना यशस्वी करण्यांत आमचीं मुलेंबाळें गर्क होतील, अत्यंत भयानक आणि संहारक अशा शक्ति त्यांच्या हातीं असतील, अनेक सुखसाधनांची गर्दी होईल. परंतु, केवळ भौतिक गोष्टींपलीकडे त्यांच्या दृष्टीची झेप गेली नाही तर त्यांच्या अन्तःकरणाला वेदना होत राहतील आणि त्यांचें जीवन शुष्क ठरेल. नव्या आशा आणि नवें सामर्थ्य यांजबरोबरच माणसाच्या बुद्धिमत्तेवर, त्याच्या चारित्र्यावर आणि त्याने निर्माण केलेल्या संस्थांच्या कार्यक्षमतेवर मात करणारीं संकटेंहि गोळा होतील!"

* * *

**आर्थिक समस्या :**

पहिल्या महायुद्धानंतर उद्भवलेल्या आर्थिक समस्यांसंबंधी चर्चिल लिहितात, "पहिल्या महायुद्धापूर्वीं लोकशाहींतले निरनिराळे पक्ष राजकीय आणि सामाजिक प्रश्नांसंबंधी वाद करीत असत. परंतु, महायुद्धानंतर उत्पन्न

झालेले वाद हे राजकीय किंवा सामाजिक नसून आर्थिक आहेत. एका पक्षाने प्रतिपक्षाशीं वाद करावा किंवा एका मुत्सद्द्याच्या गटाने दुसऱ्या मुत्सद्द्याच्या गटावर मात करावी, अशी स्थिति आता राहिली नाही. कोणताहि पक्ष अधिकारावर असो, त्याला आता आर्थिक प्रश्नांशीं झुंज द्यावी लागत असून, त्या झुंजींत तो किती यशस्वी झाला आहे या गोष्टीवरच त्याचें यशापयश अवलंबून असतें. जनतेचें लक्ष आतां राजकारणाकडे नसून अर्थकारणावर खिळलें आहे. अधिक पैसा, वाढत्या सुखसोयी आणि सुबत्ता या ध्येयांकडे प्रत्येकाची नजर वळली आहे.

आगामी निवडणुकीकडे लक्ष ठेवून पक्षनिष्ठ राजकारणाच्या घोषणा करणारे मुत्सद्दी, आपल्या देशाचे आर्थिक प्रश्न सोडवूं शकतील असें मला वाटत नाही. सबंध समाज संपन्न आणि सुखी होईल असें धोरण अत्यंत त्वरेनें आपण निश्चित केलें पाहिजे. कदाचित् असेंहि असेल की, ज्या योजना अमलांत आणल्या असतां सबंध राष्ट्र सुखी होईल अशा योजना अमलांत आणण्याची आज कोणत्याहि एका पक्षाची कुवत नाही. किंबहुना, सवंग लोकप्रियता आणि जास्तींत जास्त मतें मिळविणारी कोणतीहि क्लृप्ति राष्ट्राचें हित साधूं शकणार नाही असें म्हणणें प्राप्त आहे. लोकशाही, लोकसभा आणि प्रौढांच्या मतदानावर आधारलेल्या निवडणुका या गोष्टी आर्थिक समस्या सोडवायला असमर्थ ठरल्या आहेत.

आपल्यासमोर उभ्या असलेल्या प्रश्नांना पक्षनिष्ठेपेक्षा राष्ट्रनिष्ठेची बैठक प्राप्त करून देता येणार नाही का ? एखादा कार्यक्रम आखल्यावर त्याला पक्षोपपक्षांच्या भांडणांच्या पंजांतून सोडवून, राष्ट्राच्या प्रचंड सम्मतीने तो अमलांत आणणें शक्य होणार नाही का ? राजकीय प्रश्न बहुमताने सुटतात पण आर्थिक प्रश्न सोडविण्याकरिता कृतीची आवश्यकता असते. कॅन्सरसारखा रोग बहुमताने बरा करता येत नाही. जनतेला काय पाहिजे तें सर्वांना माहीत असतें, तें तिला मिळवून देणें हेंच महत्त्वाचें असतें. लोकशाहींतले मतदार किंवा त्यांचे प्रतिनिधि प्रत्यक्ष कृति करायला असमर्थ असतात. सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनी एकत्र येऊन एखादा सर्वसंमत कार्यक्रम आखावा असें म्हणतात. परंतु पक्षनिष्ठ राजकीय पुढाऱ्यांच्या मजलशींत, त्यांच्या मतभेदांना वाचा फुटण्यापेक्षा अधिक किंवा उपयुक्त असें कांहीं

घडूं शकत नाही—सबब आर्थिक प्रश्नांचा ज्यांनी अभ्यास केला आहे आणि राजकारणातीत दृष्टीने जे त्या प्रश्नांचा विचार करूं शकतात अशा तज्ज्ञांची समिति स्थापन केली पाहिजे. आपल्याला मदत करणारी आणि आपल्याला जबाबदार असलेली अशी अर्थ—समिति पार्लमेंटने नेमली पाहिजे. सार्वत्रिक निवडणुकींत कोणता पक्ष विजयी झाला, बेकारीच्या निवारणाचा सर्वोत्कृष्ट तोडगा कोणत्या पक्षाच्या पोतडींत आहे याचा यत्किंचित्‌हि विचार न करतां, त्या समितीने आर्थिक प्रश्नांचा विचार केला पाहिजे. ती समिति जे निर्णय घेईल ते अमलांत आणण्याचे मार्ग पार्लमेंटने हुडकून काढले पाहिजेत."

या दृष्टीने व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दींतला काळ किती सुखाचा होता !

"राष्ट्राच्या विनाशाच्या शक्यतेशीं आम्हाला जसा सामना द्यावा लागला, तसा त्या जमान्यांतल्या पुढाऱ्यांना कधीच द्यावा लागला नाही. त्यांच्या जीवनाचा पाया कधीच संकटांत सापडला नव्हता. ज्याला कोणी आव्हान देऊं शकत नव्हते अशा ब्रिटिशांच्या वैभवाच्या काळांत ते नांदत होते. शासनाची सत्ता अत्यंत मर्यादित क्षेत्रांत वापरावी लागत होती. जागतिक क्रान्ति, प्राणघातक पराजय, गुलामगिरी किंवा राष्ट्रीय नादारी यांपैकी कोणत्याहि पोलादी पकडींत त्यांच्या सुखी जीवनाचा गळा सापडला नव्हता. मोठीं माणसें आणि छोट्या घटना यांनी समृद्ध असलेल्या काळांत लॉर्ड रोजबरी जीवन कंठीत होता."

सर जॉन मोर्ले या सुप्रसिद्ध इंग्रज मुत्सद्द्यासंबंधी चर्चिल लिहितात,

"अशीं माणसें आता दिसत नाहीत. प्रौढांच्या मतदानावर आधारलेल्या लोकशाहीच्या लाटेने आणि महायुद्धाच्या ज्वालामुखीमुळे तीं कोठल्याकोठे वाहून गेलीं आहेत. आता वाटेल तो माणूस चालतो ! श्रीमंतांचें आणि सुशिक्षितांचें नेतृत्व नाहीसें झालें, पण त्यांची जागा असामान्यांनी भरून काढलेली नाही. जगाचे व्यवहार इतक्या वेगाने चालू आहेत की, 'असें कां ?'—असा प्रश्न विचारायलासुद्धा कोणाला फुरसद उरलेली नाही !"

* * *

## व्यंगचित्रें :

चर्चिल यांचीं आतापर्यंत किती तरी व्यंगचित्रें वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालीं असतील. एखाद्याच्या पोषाखाचें, विशिष्ट अवयवांचें, मतांचें किंवा कृतींचें विडंबन करण्यांत खरा व्यंगचित्रकार पटाईत असतो. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार लो याने चर्चिल यांची वेळप्रसंगीं पुष्कळ कुचेष्टा केली आहे, पण त्याचा त्यांना राग नाही. " लो हा व्यंगचित्रकारांतला चार्ली चॅप्लीन आहे " असें प्रशस्तिपत्र ते त्याला देतात. व्यंगचित्रांसबंधी ते म्हणतात,

" माझ्या प्रिय वाचकांनो, तुमचं कोणीं व्यंगचित्र काढलं तर तुम्हाला काय वाटेल ? तुमचं नाक सुंदर असूनहि तें एखाद्या आवळ्यासारखं आहे, अत्यंत हास्यास्पद अशा प्रसंगांत तुम्ही सतत सापडले आहांत किंवा तुम्ही एखाद्या क्षुद्र जनावरासारखे आहांत असं जर लक्षावधि लोकांना सतत दाखविलं गेलं तर तुम्हांला काय वाटेल ? तुम्ही त्या चित्रांत दिसतां तसेंच आहांत असा जर असंख्य लोकांचा समज झाला तर तुम्हाला काय वाटेल? हा प्रकार तुमच्या आयुष्यभर, प्रत्येक आठवड्यांत—कधीकधी दररोज चालू राहिला तर कसें ?

" तीं चित्रें आवडीनं पाहणाऱ्या लोकांना भेटून, ' हें चित्र चुकीचं आहे. माझं नाक आवळ्यासारखं नाही. माझी टोपी इतकी बेढब नाही. या चित्रांत दाखविली आहे तशी माझी फजिती झाली नव्हती. पाहिजे तर तीन वर्षांपूर्वी जानेवारीच्या दहा तारखेला मीं केलेलं भाषण वाचा, ' असं सांगणं तुम्हांला शक्य होईल का ? व्यंगचित्रें पाहणाऱ्यांच्या मनावर जो पहिला परिणाम झालेला असतो तो कायम राहतो. तुमचं नाक आवळ्यासारखं आहे असंच ते समजणार ?

" परंतु, हा प्रकार तुम्हाला वाटतो जितका वाईट नाही. आपलीं व्यंगचित्रें पाहण्याची राजकारणी लोकांना सवय झालेली असते. इतकेंच नव्हे, तर तीं त्यांना आवडतातसुद्धा ! त्यांचीं व्यंगचित्रं प्रसिद्ध होईनाशीं झालीं म्हणजे आपला अपमान झाला असं वाटून ते नाउमेद होतात. आपलं कांही तरी चुकतं आहे अशी शंका आणि म्हातारपणाच्या छाया आपल्यावर पसरूं लागल्या आहेत अशी भीति त्यांना वाटूं लागते ! "

**लोकशाहींतल्या निवडणुका :**

आपल्या राजकीय कारकीर्दीच्या पहिल्या पस्तीस वर्षांत चार्चिल यांनी पंधरा निवडणुका लढविल्या होत्या. निवडणुकीचा निकाल कसाहि लागला तरी तो एक मजेचा कार्यक्रम असतो.

" तुमच्या पक्षातर्फे तुमची एखाद्या मतदार विभागासाठीं निवड होते—निवडणूक कोणत्या मुद्द्यावर लढवायची तें निश्चित होतें. निवडणुकीचा जाहीरनामा तयार होतो. निवडणुकींतला पहिला बार भरला जातो आणि त्यानंतर तुमचें नांव रीतसर सुचविलें जातें. त्या वेळीं तुमचा प्रतिस्पर्धी उमेदवार तुम्हाला भेटतो. मनांत नसलें तरी स्मित करीत तुम्ही त्याला नमस्कार करतां आणि ' आपली भेट झाली फार आनंद झाला ' किंवा ' आज थंडी ( किंवा उष्माहि असेल ! ) फार आहे नाही ? ' असें कांही तरी बोलतां ! त्यानंतर हस्तपत्रकें, भित्तिपत्रकें, वृत्तपत्रांतल्या जाहिराती, स्वयंसेवकांचीं पथकें, मोटारी, सभा, तुमच्या सभांच्या वेळीं होणाऱ्या दंगलींचा बंदोबस्त करण्याची व्यवस्था, आपल्या मतदार विभागांत संचार करून दिवसाकाठी तीन चार सभा घेणें—अशा गोष्टींत तुम्ही एकसारखे मग्न असतां. सहासातशे लोक जमूं शकतील अशा सभेच्या ठिकाणीं फक्त पन्नास-साठ श्रोते जमलेले पाहून वक्ता नाउमेद होतो. पण त्याची बायको, मुलगी किंवा मित्र यांना सतत त्याची सोबत करून दररोज तींच तीं भाषणें ऐकावीं लागतात—तीच कोटी तेहतिसाव्या वेळीं केलेली ऐकूनसुद्धा त्यांना हसावें लागतें !

" ज्या सभेंत दंगा होतो त्या अधिक फायदेशीर समजल्या पाहिजेत. कारण, अशा वेळीं तुम्हाला तुमच्या भाषणांत बदल करतां येतो. श्रोते भडकलेले असतात. हिरव्या डोळ्यांचे प्रतिस्पर्धी तुमच्या भाषणांत व्यत्यय आणतात, आरडाओरड करतात, तुमच्या चरित्रावर आणि चारित्र्यावर हल्ला चढवतात ! परंतु, तुमचे पाठिराखे मजेंत असतात. तुमच्या युक्तिवादापेक्षा विरोधकांच्या आरडाओरडीमुळे त्यांना चेव येतो. ज्या सभेंत दंगल होणार असें तुम्हाला वाटत असेल त्या सभेची सुरुवात स्मितवदनाने करा. तुमच्याभोवती चाललेल्या दंग्याकडे अलिप्त दृष्टीने पाह.

आणि आपण, जणू काय, आपल्या मित्रांशीं बोलतों आहों अशा थाटांत भाषणाची सुरुवात करा.

" प्रत्यक्ष निवडणुकीच्या दिवशीं सकाळपासून संध्याकाळपर्यंतचा सर्व वेळ मोटारींतून हिंडण्यांत जातो. मतदार येतात, मतपत्रिका घेतात, मतदानाच्या खोलींत जातात आणि मतपत्रिकेवर फुली करून ती पेटींत टाकून बाहेर येतात. त्यांनी तुम्हाला मत दिलें आहे की नाही हें समजायला मनकवडेपणाची गरज नसते. तुमच्याकडे पाहून तो हसतो आहे कीं तोंड चुकवतो आहे, यावरून त्याने कोणाला मत दिलें असेल तें सहज समजूं शकतें.

" माझ्या प्रतिस्पर्धी उमेदवारांबरोबर माझे संबंध नेहमी सलोख्याचे असतात. परवा एका विजयी स्त्री-उमेदवाराचें तिच्या प्रतिस्पर्ध्याने चुंबन घेतलें, तसा प्रकार मीं कधी केला नसला तरी हस्तांदोलन नेहमीच करतों. पराभवामुळे दुःख हें होणारच, पण तें चेहऱ्यावर दाखवूं नका. निवडणुकीच्या निकालाला तुमच्या दृष्टीने फारसें महत्त्व नाही असा देखावा करा— आपल्या पराभवाने आपले सहाय्यक मात्र अतिशय दुःखी झालेले असतात. आपल्या अपयशामुळे त्यांच्या डोळ्यांना पाणी आलें म्हणजे तें दृश्य पाहवत नाही !

" १९२२ सालीं लॉईड जॉर्ज यांच्या संमिश्र मंत्रिमंडळांतला मी एक मंत्री होतों. तें मंत्रिमंडळ बरखास्त झालें आणि निवडणुकीचा नारळ फुटण्यापूर्वी मी अपेंडिसायटिसच्या विकाराने आजारी पडलों. त्या वेळीं माझ्यावर शस्त्रक्रिया केली, तिची जखम सात इंच लांब होती. मी इस्पितळांत असें पावेतो माझी बायको आणि कांही मित्र माझ्या निवडणुकीची मोहीम चालवीत होते. बहुसंख्य मतदार आमच्या उदार पक्षाच्या विरुद्ध होते. प्रत्यक्ष निवडणुकीला दोन दिवस उरले असतांना मला इस्पितळांतून समरांगणावर दाखल होण्याची परवानगी मिळाली ! पोटाच्या जखमेमुळे उभें राहतां येत नसल्यामुळे, खुर्चीवर बसवून मला व्यासपीठावर न्यावें लागत होतें. मी अत्यंत अशक्त झालों होतों. आमच्या पक्षाविरुद्ध निर्माण झालेल्या असंतोषामुळे श्रोते माझ्याकडे तिरस्काराने पाहात असत. माझ्या प्रकृतीमुळे माझ्याविषयी त्यांच्या मनांत अनुकंपा जागृत झाली नसती तर त्यांनी मला खात्रीने चोप दिला असता. पहिल्या महायुद्धानंतरच्या निवड-

णुकींत मला माझ्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा पंधरा हजार मतें जास्त मिळालीं होतीं. या खेपेला त्याला माझ्यापेक्षा दहा हजार मतें जास्त मिळालीं.

" संमिश्र मंत्रिमंडळांत मीं फार उत्तम काम केलें होतें, परंतु एकाएकी होल्याचें नव्हतें झालें. मला इस्पितळांत जावें लागलें आणि मी शुद्धीवर येण्यापूर्वी आमच्या पक्षाचा पाडाव झाला. हुजूर पक्षांतले आमचे मित्र एका रात्रींत आमचे शत्रु बनले. इतःपर मी मंत्री नव्हतों. ज्या मतदार विभागाने मला इतकीं वर्षें उचलून धरलें होतें त्याने मला अत्यंत निश्चयात्मक रीतीने दूर फेकून दिलें. आयुष्यांत पूर्वी कधी नाही अशी मोलाची कामगिरी मीं ज्या वर्षांत केली होती, त्या वर्षाच्या शेवटीं ही घटना घडून आली ! डोळ्यांची एक उघडझाप होण्यापूर्वी मी माझें मंत्रिपद, माझें सभासदत्व, माझा पक्ष आणि माझें अपेंडिक्स गमावून बसलों होतों ! "

* * *

**कैसर बादशहा :**

' महान् समकालीन ', या लेखसंग्रहांत चर्चिल यांनी त्यांच्या अनेक समकालीनांचीं व्यक्तिचित्रें रेखाटलीं आहेत. जर्मनीचा इतिहासप्रसिद्ध बादशहा, फ्रेड्रिक द ग्रेट, याच्यासारखी महात्मता संपादन करण्याच्या महत्त्वाकांक्षेने कैसर बादशहाने पहिल्या महायुद्धाची सुरुवात केली होती. सुरुवातीला त्याच्या लष्कराने नेत्रदीपक विजय मिळविले तरी अखेर त्याचा आणि जर्मन लष्कराचा पराभव झाला, त्याचें कारण काय ?

" खरें सांगावयाचें म्हणजे कैसर ज्या परिस्थितींत सापडला होता त्या परिस्थितींत कोणताहि मनुष्य सापडूं नये. एकतंत्री सत्तेच्या असंस्कृत कल्पनेला शरण जाणें हा ज़र्मन लोकांचा फार मोठा दुर्गुण आहे. कितीहि बुद्धिमान् आणि शूर असले, तरी ते सत्ताधीशाची पूजा करतात आणि सत्ताधीश दाखवील त्या मार्गाने नाक मुठींत धरून जातात, हा इतिहासाचा आरोप आहे. राज्यकारभाराची कोणतीहि जबाबदारी नसलेली वंश-परंपरागत राजसत्ता ही अनेक देशांना उपयुक्त ठरली आहे. वंशपरंपरागत राजसत्तेच्या ठायीं सर्व वैभव केंद्रित व्हावें आणि सहज बदलल्या जाणाऱ्या मंत्रिमंडळाने सर्व सत्ता आणि राज्यकारभाराची जबाबदारी स्वीकारावी,

ही व्यवस्था ब्रिटिश बेटांत निर्दोष ठरली आहे. वैभव आणि सत्ता एका हातीं केंद्रित व्हावी ही परिस्थिति अत्यंत सत्प्रवृत्त आणि कर्तृत्ववान् माणसाच्या स्वभावाच्या आणि शक्तीच्या पलीकडची समजली पाहिजे. संक्रमणावस्थेंतील वादळी परिस्थितींत हुकुमशाहीचासुद्धा स्वीकार करतां येईल. हुकुमशहा हा त्या वादळाचाच भाग असल्यामुळे वादळावर स्वार झालेला असतो. आणीबाणीच्या काळाने त्याला निर्माण केलेलें असतें. लक्षावधि माणसांवर हुकमत गाजविण्याची आणि इतिहासाचा ओघ बदलण्याची शक्ति त्याच्या अंगीं असूं शकते, पण आणीबाणीचा काळ संपला म्हणजे त्याची कारकीर्द सुद्धा संपुष्टांत आली पाहिजे. वंशपरंपरागत असो अगर नसो, हुकुमशाहीची चिरंतन स्थापना करू पाहणें म्हणजे सर्वनाशाला आमंत्रण करण्यासारखें आहे.

" आधुनिक हुकुमशहांच्या आविर्भावांव्यतिरिक्त त्यांचा कोणताच गुण कैसर बादशहाजवळ नव्हता. आपल्या मगदुराला झेपणार नाहीं अशी कठीण भूमिका वठविण्याचा प्रसंग ज्याच्यावर ओढवला आहे, असें जगाच्या रंगभूमीवरचें तें एक सुंदर बाहुलें होतें. बादशाही दिमाखाने तो निरनिराळे आविर्भाव करीत होता, पण त्यांच्या आवरणाखाली एक अत्यंत सामान्य आणि गर्विष्ठ, पण बहुतांशीं सत्प्रवृत्त असा माणूस वावरत होता. ज्या मोकळ्या सोडल्या.असतां सबंध विश्वाचा संहार करूं शकतील अशा शक्तींनी त्या माणसावर सतत तीस वर्षें आपलें लक्ष केंद्रित केलें होतें. या परिस्थितीचा विचार केला म्हणजे मनाला धक्का बसतो ! "

कैसर बादशहाच्या भोवती जो तोंडपुजेपणा चालू असे त्याचें अत्यंत प्रभावी वर्णन चर्चिल यांनी केलें आहे.

" आपण सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहांत. आपण असामान्य सेनापति आहां. जेव्हा युद्ध सुरू होईल त्या वेळीं सबंध जर्मन राष्ट्र तुमच्या नेतृत्वाखाली रणांगणावर प्रवेश करील आणि इतिहासांतल्या सर्वांत सुसज्ज आणि पराक्रमी सेनेच्या अग्रभागीं राहून, पूर्वी कधी मिळविले गेले नसतील असे विजय तुम्ही मिळवाल ! मंत्र्यांची आणि महामंत्र्यांची निवड करण्याचा अधिकार आपला आहे. या साम्राज्यांत असा एकसुद्धा अधिकारी नाही, की ज्याला तुम्ही बडतर्फ करूं शकणार नाही. तुम्हीं उच्चारलेल्या प्रत्येक

शब्दाचें अत्यंत उत्साहाने आणि आदराने स्वागत केलें जातें—तुम्हीं तुमची इच्छा व्यक्त करावयाचा अवकाश, ती ताबडतोब पूर्ण केली जाते ! अमर्याद सत्ता आणि अमर्याद वैभव तुमच्या प्रत्येक पावलाभोवती नाचत असते—साठ राजवाडे आणि किल्ले तुमचें स्वागत करायला सतत सिद्ध असतात. सेनापति, आरमाराचे अधिपति, न्यायमूर्ति, क्रोडोपति, वेदान्ती, मुत्सद्दी आणि शास्त्रज्ञ हे तुम्हाला त्यांच्या ज्ञानाचा लाभ व्हावा म्हणून आणि त्यांच्याबद्दल तुम्ही अभिनंदनाचा जो शब्द उच्चाराल तो उत्सुकतेने ऐकायला सिद्ध असतात. कोणत्याहि कठीण विषयाचें आकलन तुम्हाला किती सत्वर होतें तें पाहून, थक्क झालेल्या तज्ज्ञांच्या तोंडून बाहेर पडणारे तुमच्या स्तुतीचे शब्द तुम्हाला ऐकविण्याकरिता तुमचे स्नेही तुमच्याभोवती वावरत असतात. तुमच्या संयमामुळे मुत्सद्दी आणि युद्धकलेंतलें तुमचें ज्ञान पाहून तुमचे सेनाधिकारी थक्क होतात ! तुमचा सन्मान करायला तुमच्या प्रजाजनांप्रमाणे परकीय राष्ट्रेंसुद्धा नेहमी उत्सुक असतात—"

कैसर बादशहाभोवतीच्या वातावरणाचा समारोप करतांना चर्चिल म्हणतात,

" प्रिय वाचकांनो, हा प्रकार दिवसामागून दिवस आणि वर्षांमागून वर्षें गेलीं तरी चालू होता. अशा वातावरणांत तुम्ही सापडला असतां तर काय झालें असतें ? स्वतःच्या महत्त्वासंबंधी कोणताहि अभिमान न बाळगतां, स्वतःच्या मतांचा बडेजाव न मिरवितां, सदैव शांततेचा शोध करीत आणि सुविनीत वृत्तीने तुम्ही वागला असतां का ? "

* * *

**हिटलर :**

जर्मनीच्या पराभवाचा सूड घेण्याकरिता कैसर बादशहाच्या पदच्युतीनंतर कांही वर्षांनी हिटलर सिद्ध झाला आणि त्याच्या कारकीर्दींत दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला. त्याच्या कारकीर्दीची सुरुवात १९३३ सालीं झाली. १९३५ सालीं हिटलरसंबंधी लिहिलेल्या लेखांत चर्चिल यांनी लिहिलें,

" हिटलरसारख्या असामान्य माणसासंबंधी त्याच्या संपूर्ण कारकीर्दीचा

आढावा घेतल्याशिवाय निश्चित मत देतां येणें सर्वस्वीं अशक्य आहे. एखाद्याने अत्यंत भयानक मार्गाचा अवलंब करून सत्ता काबीज केली असली तरी त्याच्या संपूर्ण जीवितकार्याचा विचार केला असतां त्याने मानवजातीच्या इतिहासाचें वैभव वाढविलें असें कबूल करावें लागेल, अशा अनेक थोर पुरुषांचे दाखले इतिहासांत सापडतात. त्या थोर पुरुषांच्या मालिकेंत हिटलरला स्थान मिळावें अशी माझी इच्छा आहे. परंतु, ज्या युद्धांत पुनः कधीहि भरून न काढतां येण्यासारखी संस्कृतीची हानि होईल अशा युद्धाच्या खाईत हिटलर सबंध भूतलाला लोटील, किंवा युरोपियन राष्ट्रकुलाचा एक समर्थ आणि उपयुक्त घटक अशा जर्मन राष्ट्राचा उद्धार करणारा महापुरुष म्हणून इतिहासांत त्याची नोंद होईल, हें आज सांगता येणार नाही! हिटलरच्या आयुष्याची कथा अजून अपूर्ण असल्यामुळे आणि त्या कथेंतलीं अत्यंत महत्त्वाचीं प्रकरणें अजून लिहिलीं जावयाचीं असल्यामुळे, आपण त्याच्या कार्याच्या आणि तत्त्वाच्या काळ्या बाजूचाच अधिक विचार करीत असलों तरी अत्यंत उज्ज्वल अशा शक्यतेची आशा आपण सोडता कामा नये!

"युद्धांतील अमर्याद पराभवामुळे एका बलाढ्य साम्राज्याच्या आणि मानवी वंशाच्या मनांत निर्माण झालेल्या क्रोधाच्या आणि दुःखाच्या पोटीं हिटलरचा जन्म झाला आहे. जिने अर्धा युरोपखंड आपल्या पोलादी मुठींत दाबला होता अशा भयावह जर्मन सेनेने ज्या वेळीं प्रत्येक आघाडीवर माघार घेतली आणि ज्यांच्या भूमीवर ती त्या क्षणींसुद्धा आक्रमक म्हणून उभी होती त्यांच्याकडेच ज्या वेळीं तिला युद्धविरामाची याचना करावी लागली, रणांगणावरील आघाडीच्या पाठीशीं असलेल्या प्रशियन वंशाच्या स्वाभिमानाचें आणि इच्छाशक्तीचें शरणागतींत ज्या वेळीं पर्यवसान झालें, जिने पन्नास महिने इतर सर्व राष्ट्रांना भयभीत केलें होतें ती साम्राज्यशाही राजवट आपल्या प्रजाजनांना दुखावलेल्या शत्रुराष्ट्रांसमोर असहाय आणि निःशस्त्र स्थितींत टाकून ज्या वेळीं कोलमडली, त्याच वेळीं जें गमावलें तें पुन्हा कमावण्यासाठीं एक साधा शिपाईगडी–एके काळचा ऑस्ट्रियन रंगारी सिद्ध झाला!

"त्या पराभवानंतरच्या अवघ्या पंधरा वर्षांच्या कालखंडांत त्याने

युरोपांतलें सर्वांत बलाढ्य राष्ट्र म्हणून जर्मनीची प्रतिष्ठापना केली असून, युद्धांत ज्यांचा पराजय झाला ते जेते आणि ज्यांचा विजय झाला ते पराजित असें दृश्य दिसूं लागलें आहे ! हिटलरने आपल्या कारकीर्दीची सुरुवात केली त्या वेळीं जर्मन राष्ट्र दोस्तराष्ट्रांच्या पायदळीं पडलें होतें. युरोपांत आता जे स्वतंत्र देश आहेत ते जर्मनीच्या पायदळीं पडेपर्यंत हिटलर कदाचित् जिवंत राहील. त्याच्या कार्यक्रमाबद्दल काय वाटेल तें म्हणा, पण जगाच्या इतिहासांतले ते अत्यंत असामान्य पराक्रम आहेत यांत शंका नाही.

" ज्या कालखंडांत आमचे मुत्सद्दी सुप्रवृत्त पण अज्ञ मतदारांना झुलविणारीं आणि शांततेचे गोडवे गाणारीं लांबलचक भाषणें करण्यांत मग्न होते, त्याच कालखंडांत हिटलरने जो महान् उद्योग आरंभिला आणि आपल्या मार्गांतल्या अडचणींचें उल्लंघन करतांना जें धैर्य आणि चिकाटी दाखविली, त्याची कथा वाचतांना अचंबा वाटतो. ' अशी कोणतीहि गोष्ट किंवा असा कोणताच स्वार्थत्याग नाही की जो आम्ही करणार नाहीं, ' हेंच देशभक्तीच्या भावनेनें भारलेल्या हिटलरने आणि त्याच्या सतत वाढत्या अनुयायांनी सिद्ध केलें आहे. १९३३ सालापासून जर्मन राष्ट्राची सर्व शक्ति युद्धाची तयारी करण्यासाठी अहोरात्र राबते आहे. केवळ कारखान्यांत, सैनिकांच्या शिबिरांत किंवा विमानतळांतच नव्हे, तर विद्यालयांत आणि महाविद्यालयांतसुद्धा ! जर्मनीच्या शस्त्रसिद्धतेचें खरें आणि भयानक स्वरूप निष्काळजी आणि अविचारी जगाला प्रथम १९३५ सालीं दिसलें, त्या वेळीं सर्व प्रकारची गुप्तता झुगारून संपूर्णतया शस्त्रसिद्ध असा हिटलर जगासमोर उभा राहिला !

" आतापर्यंतच्या हिटलरच्या अनेक कृति भयानक आणि रक्तलांछित आहेत. परंतु, हिटलरला जे जे भेटले ते त्याच्या वागणुकीने, मोहक हास्याने आणि वैयक्तिक आकर्षणाने प्रभावित झाले आहेत. आणि म्हणूनच, त्याच्या कारकीर्दींतलीं भयानक प्रकरणें इतिहासजमा झालीं असून, एका सुखी कालखंडांतली सत्प्रवृत्त व्यक्ति या नात्याने हिटलर दिसावा या आशेवर अखिल भूतल अवलंबून आहे ! "

ती आशा नाहीशी झाली त्या वेळच्या युरोपखंडाचें वर्णन करतांना चार्चिल म्हणतात,

" सबंध युरोपखंडांत एक प्रकारची भयानक स्तब्धता निर्माण झाली आहे. अनिश्चितता आणि भीति यामुळे ती स्तब्धता निर्माण झाली आहे-- पण नाही ! त्या भीषण स्तब्धतेचा भंग करणारा एक आवाज मला ऐकूं येतो आहे. कवाईत करणाऱ्या वीस लक्ष जर्मन आणि दहा लक्ष इटालियन सैनिकांच्या पावलांचा तो आवाज आहे. भूतलाला मुक्त करावयाचें कार्य त्यांनीं अंगीकारिलें आहे. गेल्या वर्षीच त्यांनी स्वातंत्र्याच्या तापापासून ऑस्ट्रियाला मुक्त केलें आहे. कांही महिन्यांपूर्वी झेकोस्लाव्हियाच्या प्रजासत्ताकाची स्वतंत्र जीवनाच्या गर्तेतून मुक्तता केली आहे. अबिसीनियाच्या पुरातन राजवटीला दोन वर्षांपूर्वी मुसलोनीने स्वातंत्र्याचा ताम्रपट दिला. मुक्ततेचें कार्य करावयाचें असल्यामुळे त्यांच्या सेना कवाईती करीत आहेत आणि ' मुक्त होण्याची आता आपल्यापैकी कोणाची पाळी आहे ' त्याचा विचार करीत असलेल्या जर्मनी आणि इटालीच्या शेजाऱ्यांत स्तब्धता पसरली आहे ! "

* * *

**कम्युनिस्टांबद्दल :**

कम्युनिस्टांच्या रक्तलांछित कार्यक्रमाचा चर्चिल यांनी सतत तिरस्कार केला आहे. ट्राटस्कीचें शब्दचित्र रंगवितांना कम्युनिस्टांबद्दल ते लिहितात,

" कम्युनिझम हें केवळ एक तत्त्व नसून, ती एक मोहीम आहे. एखाद्या कम्युनिस्टाचीं कांही मतें असतात असें नसून, त्या मतांची इतरांवर जबरदस्ती करण्याचे मार्ग त्याने विचारपूर्वक निश्चित केलेले असतात. असंतोष आणि क्रान्ति यांचा तपशीलवार विचार करून, स्थायी स्वरूपाच्या सर्व विद्यमान संस्था उलथून टाकण्याचें एक शास्त्रच कम्युनिस्टांनी तयार केलें आहे.

" लोकशाहीचीं तत्त्वें आणि उदारमतवाद यांचा स्वतःच्या चळवळीचें पोषण करण्याकरता प्रथम उदोउदो करण्यांत येतो. भाषणस्वातंत्र्य आणि सनदशीर चळवळ अशा गोष्टींचे गोडवे गाऊन त्यासंबंधीचे हक्क प्रस्थापित करून, डाव्या बाजूच्या प्रत्येक चळवळीशीं हातमिळवणी केली जाते. एखादी

उदारमतवादी किंवा समाजवादी राजवट अस्तित्वांत आणणें हा कम्युनिस्टांच्या वाटचालींतला पहिला टप्पा असला, तरी अशी राजवट प्रस्थापित होतांच ती उलथून पाडण्याच्या क्रियेची सुरुवात होते. सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध कामगारांना चिथावल्यामुळे रक्तपाताचे प्रसंग उद्भवतात. राज्यकर्त्यांनी किंचितहि पड खाल्ली तर तिचा बेसुमार गाजावाजा करण्यांत येतो. प्रस्थापित राजवटीच्या सहानुभूतीचा, दयेचा, औदार्याचा किंवा तडजोडवृत्तीचा उपयोग तिचा नाश करण्याकरिताच केला जातो. होता होता ज्या वेळीं परिपक्व काल आणि अनुकूल संधि यांची सांगड जुळून येते, त्या वेळीं सामुदायिक बंडापासून खाजगी खुनापर्यंतच्या प्रत्येक हिंसात्मक मार्गाचा निर्दयपणाने अवलंब करण्यांत येतो. स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचा झेंडा फडकावीत प्रस्थापित राजवटीवर प्राणघातक प्रहार करून कम्युनिस्टांच्या हातांत सत्ता आली, म्हणजे सर्व विरोधी पक्ष आणि विरोधी मतांचा बीमोड केला जातो. लोकशाही म्हणजे कांही काळ वापरल्यावर मोडून फेकून द्यावयाचें एक खेळणें, स्वातंत्र्य म्हणजे केवळ एक भावनात्मक भूल ! अनेक पाठ्यपुस्तकांत निवेदिलेलें आणि अनेक राष्ट्रांच्या इतिहासांत रक्ताच्या अक्षरांनी लिहिलेलें कम्युनिस्टांच्या निष्ठेचें आणि उद्देशांचें स्वरूप हें असें आहे. ”

रशियांतील स्टालिनच्या राजवटीसंबंधी सध्याचे रशियन राज्यकर्ते जें बोलतात तेंच चर्चिल यांनी अठ्ठावीस वर्षांपूर्वी सांगितलें होतें.

“ युद्धकालांत सक्तीने भरती केलेल्या एखाद्या सैन्याच्या शिस्तीने रशियांतील असंख्य आणि मूक जनता जखडलेली आहे. अतिशय भीषण अशा काळांतलीं दुःखें तिला शांततेच्या काळांत सहन करावीं लागत आहेत. गुप्तपोलीस आणि असामान्य धाक यांच्या कचाट्यांत ती सापडली आहे. या देशाचे नागरिक इतके सुखी आहेत की, कडक शिक्षेचा धाक दाखवून, देशाची सरहद्द ओलांडण्याची त्यांना बंदी करण्यांत आली आहे ! परदेशांत पाठविलेले मुत्सद्दी आणि दूत परत स्वदेशांत येतील अशी हमी देण्यासाठी त्यांना आपलीं बायकामुलें रशियांतच ठेवावीं लागतात. असुरक्षित जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अभाव हें या देशाचें वैशिष्ट्य असून, येथे परमेश्वराचीसुद्धा बदनामी करण्यांत येते. पुरातन संस्कृतीचा प्रचाराने, भूमिगत मार्गांनी आणि अवश्य तर शस्त्रबळाने नाश करण्यासाठी येथे सत्ता स्थापन

झाली आहे. या देशांतल्या तीस लक्ष नागरिकांना हद्दपार करण्यांत आलें आहे. विवक्षित राजकीय मतें धारण करण्याच्या अपराधासाठी पांच लक्ष नागरिकांच्या माथीं गुलामगिरी मारण्यांत आली असून, त्यांना जंगलांत आणि खाणींत कष्ट करावे लागत आहेत."

* * *

**बर्नार्ड शॉ :**

राष्ट्राच्या विनाशाची वेळ आली तरी युद्धाविरुद्ध प्रचार करणारे आणि समाजवादाचा प्रचार करूं इच्छिणारे सुप्रसिद्ध नाटककार, जॉर्ज बर्नार्ड शॉ, यांचें आणि चर्चिलसाहेबांचें मत कसें जमावें ? बर्नार्ड शॉ यांनी आपल्या एका नव्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाचीं दोन तिकिटें चर्चिल यांच्याकडे पाठविलीं आणि त्यासोबतच्या पत्रांत लिहिलें, "दोन तिकिटें पाठविलीं आहेत. आपण नाटक पाहायला या आणि आपल्याला कोणी मित्र असलाच तर त्यालाहि बरोबर घेऊन या !" तेव्हा चर्चिल यांनी उत्तर पाठविलें, "आज मी कामांत असल्यामुळे नाटक पाहायला येऊ शकत नाहीं—मात्र या नाटकाचा दुसरा प्रयोग झालाच तर अवश्य हजर राहीन." बर्नार्ड शॉच्या स्वभावचित्रांत चर्चिल लिहितात,

"ओस्कर वाईल्डनंतर जी पोकळी निर्माण झाली होती त्या पोकळींत वाईल्डपेक्षा तीव्र बुद्धिमत्ता, अधिक चतुर संवाद, अधिक आव्हान देणारे विषय आणि अधिक चिरेबंदी रचना इत्यादि आयुधांनी सज्ज अशा बर्नार्ड शॉने प्रवेश केला. परस्परविरुद्ध स्वभावांच्या किंवा स्वभाव आणि घटना यांच्या समरावर नाट्यनिर्मितीसाठी अवलंबून न राहतां, निरनिराळ्या वादांच्या समरांतून नाट्य निर्माण करायचें हें शॉच्या नाटकांचें वैशिष्ट्य आहे. त्याच्या नाटकांतले वाद हींच, जणू काय, त्याचीं पात्रें बनतात आणि कधीकधी अतिशय नाट्यपूर्णतेने एकमेकांशीं भांडत असतात. कांही अपवाद सोडल्यास, त्याच्या नाटकांतलीं पात्रें काय करतात हें महत्त्वाचें नसून काय बोलतात हें महत्त्वाचें असतें.

"बोले तैसा चाले ही परिस्थिति क्वचितच पाहायला सापडते. बर्नार्ड शॉच्या बाबतींत तर ती अपवादात्मकच समजली पाहिजे. आयर्लंड ही

त्याची जन्मभूमि आणि रशिया ही त्याची आराध्यभूमि असली, तरी सर्व सुखसोयींनी समृद्ध अशा इंग्लंडमध्ये तो राहतो. समाज आणि जीवन याजबद्दलचीं स्वतःचीं सर्व मतें त्याने आपल्या घरांतून आणि आचरणांतून हद्दपार केलीं आहेत. प्रेमभावनेची आणि विवाहाच्या वेळीं द्यावयाच्या वचनांची तो थट्टा करतो, पण त्याच्याइतका सुखी विवाहित मनुष्य सापडणार नाही. सकाळपासून संध्याकाळपर्यंत अत्यंत प्रभावी अशी बडबड तो करीत असतो, पण पार्लमेंटसारख्या लोकशाही संस्थांच्या विसर्जनाचा आणि, जिचा तो स्वतःच कदाचित् पहिला बळी ठरेल अशी, हुकुमशाही प्रस्थापित करण्याचा तो प्रचार करीत असतो. सर्व प्रकारच्या संपत्तीचें राष्ट्रीयीकरण झालें पाहिजे, असा आग्रह धरणाऱ्या या धनाढ्य माणसाने प्राप्ति--कराच्या वाढीविरुद्ध जितकें आकांडतांडव केलें तितकें कोणींच केलें नसेल ! पैसा गोळा करणारा धनिक आणि प्रामाणिक कम्युनिस्ट अशा दोन्ही भूमिका तो एकाच वेळीं वठवीत असतो. त्याच्या नाटकांतलीं पात्रें एकमेकांचा खून करण्याची भाषा बोलत असलीं तरी मुंगीसुद्धा दुखावली जाऊं नये अशी खबरदारी तो घेत असतो. हसतखेळत, कोणत्याहि बाबतींत केलेला युक्तिवाद स्वतःच्या आचरणानेच नेस्तनाबूत करीत, बहुजनसमाजाच्या खोड्या काढीत आणि त्याला चकित करीत, ज्या ज्या कार्यांचा स्वतः प्रचार केला त्यांचेंसुद्धा विडंबन करीत हा मनुष्य जीवनांत संचार करतो आहे ! समाजाने आपल्याकडे गंभीरपणाने पाहावें, अशी इच्छा धरणाऱ्या या दोन डोक्याच्या सरड्याच्या विदूषकी चाळ्यांकडे आम्हीं फार दिवस संयमाने आणि करमणुकीच्या दृष्टीने पाहिलें आहे !

" प्रत्येकावर निःपक्षपातीपणाने प्रहार करण्याच्या कसबामुळेच मध्ययुगांतल्या विदूषकांनी आपली कातडी शाबूत ठेविली असावी असें मला वाटतें. आपल्यावर केलेल्या प्रहारामुळे चिडून एखादा सरदार आपली तलवार म्यानाबाहेर काढण्याचा विचार करतो न करतो, तोच त्याच्या प्रतिस्पर्ध्याची विदूषकाने केलेला फजिती पाहून त्याची हसतां हसतां पुरेवाट होत असावी. आपापल्या जखमा दुरुस्त करण्याच्या उद्योगांत प्रत्येक जण गुंतल्यामुळे, विदूषकावर लत्ताप्रहार करायला कोणाला फुरसदच सापडत नव्हती ! विदूषकाचें रक्षण अशा रीतीने होत होतें आणि त्याच कारणांसाठ

दावा लाविल्यामुळे, पारनेलचें राजकीय आणि सामाजिक जीवन उद्ध्वस्त झालें. त्यासंबंधांत चर्चिल लिहितात,

" पारनेल आणि किटी यांच्या प्रेमाची कहाणी सर्वश्रुत आहे. किटी ही सुंदर आणि साहसी असल्यामुळे आपल्या पतीवर नाखूष असली तर आश्चर्य नाही. पारनेलची कीर्ति आणि लोकप्रियता एकसारखी वाढत होती, त्या काळांत तिने त्याला एकदा जेवायला बोलाविलें आणि, तो आला त्या वेळीं, तिने आपल्या वेणींतलें एक गुलाबाचें फूल खाली टाकलें—पारनेलने तें उचललें ! —पारनेलच्या शवपेटींत त्याच्या कलेवराबरोबर त्या फुलाच्या कोमेजलेल्या पाकळ्याहि होत्या !

" किटी म्हणजे पारनेलचें सर्वस्व होतें. ती त्याची प्रियकरीण आणि दाई, राणी आणि सहचरी होती. प्रकृतीच्या अस्वास्थ्याने पीडित झालेला तो एकाकी वीरपुरुष, ब्रिटिश सत्तेशीं झगडतांना, तिच्या सहवासाच्या आणि स्मिताच्या आधारावर जगत होता.

" किटीचा हा संबंध त्याचा नाश करील असें त्याच्या मित्रांनी बजाविलें तरी पारनेलने त्याची पर्वा केली नाहीं. त्याचें प्रेम हें त्याच्या दृष्टीने मृत्यूपेक्षा अधिक प्रबळ, सामाजिक प्रतिष्ठेविषयी बेदरकार आणि केवळ ऐहिक महत्त्वाकांक्षेपेक्षाच नव्हे, तर जें कार्य त्याने हातीं घेतलें होतें त्याच्यापेक्षाहि श्रेष्ठ होतें !

" जगाच्या रंगभूमीवर गाजलेल्या अत्यंत तऱ्हेवाईक आणि थक्क करणाऱ्या व्यक्तींपैकी पारनेल ही एक असामान्य व्यक्ति होती. तो कधी बिचकत नसे, कधी क्षमा करीत नसे आणि कोणतीहि गोष्ट कधी विसरत नसे ! त्याच्या मार्गांत फेकलेल्या एका गुलाबाच्या फुलामुळे त्याच्या समोर एक नवें विश्व—-प्रेमाचें विश्व—-उभें रोहीपर्यंत, तो एकाच ध्येयासाठी एकनिष्ठपणाने तळमळत होता—आयर्लंडचें स्वातंत्र्य हेंच तें ध्येय होतें ! एके काळीं त्याने स्वदेशासाठी सर्वस्वाचा त्याग केला होता—-नंतर त्याने प्रेमासाठी सर्वस्वाचा—स्वदेशाचासुद्धा—त्याग केला ! त्याच्यापेक्षा कमी निष्ठेच्या माणसाने हात राखूनच दिलें असतें आणि कितीतरी अधिक संभाळलें असतें ! "

* * *

**युद्धकालीन भाषणें :**

चर्चिल यांच्या युद्धकालीन भाषणांमुळे त्यांच्या देशबांधवांचें धैर्य शाबूत राहून अंतिम विजयासंबंधीचा आत्मविश्वास त्यांच्या मनांत निर्माण झाला. अपरिमित कष्ट आणि स्वार्थत्याग करण्यासाठी त्यांनी जनतेला एकदिलाने उद्युक्त केलें. चर्चिल यांच्या भाषणांत जें शौर्य आणि जो आत्मविश्वास प्रकट होत होता, त्यामुळे प्रत्यक्ष ब्रिटिश बेटांत ब्रिटिशांचें सामर्थ्य किती आहे त्याचा हिटलरला अंदाज करता आला नाही ! वास्तविक असा एक काळ होता की, त्या वेळीं ब्रिटन निःशस्त्र होतें. परंतु, आपल्या भाषेचें शस्त्र चार्चिल अशा चातुर्याने वापरीत होते की, तें ब्रिटिशांच्या हातीं असलेलें एक अमोघ शस्त्र ठरलें. चर्चिल यांच्या आत्मविश्वासाने ओथंबलेल्या भाषणांमुळे ब्रिटनवर स्वारी करण्याचा बेत हिटलरला कांही काळ लांबणीवर टाकावा लागला आणि त्यानंतरच्या वैमानिक युद्धांतील पराभवामुळे त्याला तो बेमुदत स्थगित करावा लागला !

चर्चिल यांच्या युद्धकालीन भाषणांचा संग्रह प्रसिद्ध झाला त्या वेळीं इंग्रज टीकाकारांनी त्या संग्रहाची एक उत्कृष्ट ग्रंथ म्हणून प्रशंसा केली. एका टीकाकाराने लिहिलें, " हीं नुसतीं युद्धविषयक भाषणें नसून, यांत साहित्याचीं अनेक मौक्तिकें ठिकठिकाणीं विखुरलेलीं आहेत. "

पंतप्रधानकीचीं वस्त्रें धारण केल्यानंतर, १३ मे १९४० रोजीं, केलेल्या भाषणांत चर्चिल यांनी सांगितलें, " रक्त, कष्ट आणि अश्रु यांशिवाय तुम्हाला देण्यासारखें मजजवळ कांही नाही. " त्यानंतर फ्रान्सच्या पराभवाची सुरुवात होऊन युरोपांतील युद्धाने भीषणतेचा उच्चांक गाठला असतां, १९ मे १९४० रोजीं केलेल्या भाषणांत चर्चिल म्हणाले,

" ज्या शक्तीने हॉलंडचा नाश केला आहे ती शक्ति आणखी कांही दिवसांत आमच्याकडे नजर वळवील. माझी खात्री आहे की, आम्हीं त्या प्रहाराला तोंड देऊं, तो सहन करूं आणि आम्हाला शक्य त्या पद्धतीने त्याचा बदला घेऊं. जेव्हा ती कसोटीची वेळ येईल—आणि ती येणारच आहे—तेव्हा आघाडीवरील आमच्या जवानांच्या संकटांत आपण सहभागी झालों, या कल्पनेने या बेटांतील असंख्य स्त्रीपुरुषांना नुसतें समाधानच नाही

तर अभिमान वाटेल ही माझी खात्री आहे. आपण शक्य ते सर्व कष्ट करावे म्हणून नियतीने निश्चित केलेला हा क्षण आहे. आपण यापूर्वी आपसांत भाडलों आहों, पण एकाच बंधनामुळे आता एक झालों आहोंत. विजय मिळेपर्यंत युद्ध करावयाचें आणि, वाटेल ती जबर किंमत द्यावी लागली तरी, गुलामगिरीचें लज्जास्पद जीवन स्वीकारायचें नाही हेंच तें बंधन आहे. या युद्धांत विजय हा मिळविलाच पाहिजे आणि तो आपल्याला मिळणारच! आपण जर पराभूत झालों तर आशेचासुद्धा तारा लुकलुकत नाही अशी रानटी रात्र भूतलावर पसरेल."

बेल्जमने शरणागति पत्करल्यामुळे ब्रिटिशांची परिस्थिति अधिकच बिकट झाली तेव्हा, २८ मे १९४० रोजीं, ते म्हणाले,

"मला शेवटीं इतकंच सांगायचं आहे की, फ्रान्सच्या रणभूमीवर चालू असलेल्या लढाईचा शेवट कसाहि लागला, तरी आपण जी प्रतिज्ञा केली आहे तिच्यापासून आपली सुटका होणार नाही. आपल्या इतिहासांत यापूर्वी अनेकदा घडलें आहे, त्याप्रमाणे संकटें आणि दुःखें यांच्यावर मात करून विजयाचा पल्ला गाठण्याच्या आपल्या सामर्थ्यावरचा आपला विश्वास डळमळता कामा नये!"

जूनच्या ४ तारखेला ते पुन्हा म्हणाले,

"प्रत्येकाने आपलें कर्तव्य बजावलें तर आमच्या बेटांचें रक्षण करायला आम्ही समर्थ आहोंत हें पुन्हा एकदा सिद्ध होईल. त्यासाठी आम्ही अवश्य तर वर्षांनुवर्षे लढत राहूं–तसाच प्रसंग आला तर एकटे लढत राहूं! आम्ही शेवटपर्यंत लढणार आहोंत–आमच्यापैकी प्रत्येकाचा हा निर्धार आहे––पार्लमेंटची आणि राष्ट्राचीसुद्धा तीच इच्छा आहे."

ब्रिटिश बेटांवर हिटलर स्वारी करणार असा रंग दिसूं लागला तेव्हा जूनच्या १८ तारखेला चर्चिल म्हणाले,

"शत्रूचा त्वेष आणि सारें सामर्थ्य आता आमच्याकडे वळेल. आमचा पराभव केला नाही तर आपल्याला हें युद्ध हरावें लागेल हें हिटलरला माहीत आहे. आम्ही जर त्याच्याबरोबर सामना दिला तर सबंध युरोप पुन्हा स्वतंत्र होईल आणि भूतलाचें जीवन पठारावरच्या सूर्यप्रकाशाने न्हाऊन निघेल! पण आमचा जर पराभव झाला, तर शास्त्राच्या दुरुपयोगा-

मुळे भीषण बनलेल्या एका प्रदीर्घ अंधारयुगांत अमेरिकेसकट सबंध जग लोटलें जाईल !"

फ्रान्सच्या पराभवानंतर रणांगणावर ब्रिटन एकटें उरलें, त्या वेळीं तें तहाची याचना करील असा अनेक राष्ट्रांचा समज झाला असतां, १४ जुलै १९४० रोजीं, केलेल्या भाषणांत चर्चिल म्हणाले,

"हें युद्ध अतिशय भयानक असून तें दीर्घकाळ चालणार आहे. त्याचा विस्तार किती वाढेल त्याचा अंदाज करणें अशक्य आहे. पण एक गोष्ट मात्र निश्चित आहे. युरोपांतील राष्ट्रांवर जर्मन गुप्तपोलिसांचा अंमल चालणार नाही आणि हिटलरच्या हुकुमशाहीच्या आणि द्वेषाच्या मंत्राला जग शरण जाणार नाही.

"हिटलरचें सामर्थ्य आणि शत्रुत्व जें करूं शकेल त्याचा एकाकी स्थितींत प्रतिकार करण्याचा प्रसंग आता आमच्यावर ओढवला आहे. परमेश्वरासमोर विनम्रभावाने उभे राहून, ज्या स्वारीची आम्हाला भीति घालण्यांत आली आहे त्या स्वारीपासून आमच्या बेटाचें संरक्षण करायला आम्ही सिद्ध झालों आहोंत. आम्ही आता एकटे असलों तरी केवळ आमच्यासाठीच लढत आहोंत असें नाही. ज्या या नगरींत मानवी स्वातंत्र्याचे आणि सुधारणेचे दस्तऐवज जपून ठेविले असून ख्रिश्चन संस्कृतीच्या दृष्टीने जिला अनन्य साधारण महत्त्व आहे, आमच्या बलाढ्य आरमाराचा अंमल चालतो अशा सागरांनी जी नगरी वेढिली आहे, आमच्या वैमानिकांचा निर्धार आणि निष्ठा जिचें आकाशांतून रक्षण करीत आहेत, त्या या नगरींत जवळ येऊन ठेपलेल्या हल्ल्याची आम्ही निर्भय मनाने वाट पाहात आहोंत! तो हल्ला कदाचित् आज रात्रीं होईल, कदाचित् पुढील आठवड्यांत होईल, कदाचित् कधीच होणार नाही. परंतु, आमच्या कसोटीचा काळ किती जरी तापदायक आणि प्रदीर्घ असला तरी आम्ही कोणत्याहि वाटाघाटीला तयार होणार नाहीं, तहाची भाषा बोलणार नाहीं ! आम्ही दया दाखविणार नाहीं आणि मागणारहि नाहीं ! स्वतःच्या इच्छाशक्तिइतक्याच समर्थ इच्छाशक्तीच्या मोठ्या राष्ट्राशीं हिटलरला अद्याप पावेतो सामना द्यावा लागला नव्हता. ज्या राष्ट्रांचा त्याने पराभव केला त्यांच्यावर प्रहार करण्यापूर्वी तीं आंतून पोखरलीं गेलीं होतीं. परंतु आमची प्रकृति निरोगी आहे आणि हिंमत शाबूत आहे."

२० ऑगस्ट १९४० रोजीं केलेल्या भाषणांत चर्चिल म्हणाले,

" हिटलर आता सबंध युरोपांत पसरला असला तरी आपण १९४१ आणि १९४२ च्या मोहिमांची तयारी केली पाहिजे. दोन किंवा तीन वर्षांचा काळ हा माणसाच्या क्षणभंगुर जीवनांतसुद्धा मोठा मानीत नाहीत, तर राष्ट्राच्या जीवनांत तो लहानच समजला पाहिजे. अखिल युरोपखंडाच्या स्वातंत्र्यासाठी आपण शस्त्र उचललें असतांना, आपण या काळाबद्दल तक्रार करणें किंवा अवश्य त्या कष्टांपासून माघार घेणें शोभून दिसणार नाही.

" आपण आता एकटे आहोंत ही जाणीव होतांच सबंध ब्रिटिश राष्ट्र संकटाशीं झुंज देण्याकरिता अविचालित मनाने सिद्ध झालें आहे. कोणीहि घोटाळला नाही, की कचरला नाही. इतकेंच नव्हे, पूर्वी जे तहाचा विचार करीत असतील तेसुद्धा आता फक्त युद्धाचाच विचार करीत आहेत. इतिहासांत कधी नव्हती इतकी एकजूट आणि निर्धार आमच्या लोकांत निर्माण झाला आहे. कर्तव्यच्युति किंवा लाजिरवाणा पराभव यांच्या तुलनेंत मृत्यु आणि विनाश या गोष्टीसुद्धा क्षुल्लक वाटूं लागतात ! "

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रमांक ........ दि: ........
विभाग ........ नों दि. ........

२६

## दिनचर्या

मध्यपूर्वेच्या मोहिमेंत जनरल रोमेलचें मध्यपूर्वेच्या रणांगणावरून उच्चाटन करण्याचें श्रेय ब्रिटिशांचा सेनापति, जनरल मॉंटगॉमरी, याने मिळविलें होतें– त्याची मुलाखत घेण्याकरिता देशोदेशींच्या वृत्तपत्रांचे प्रतिनिधि जमले होते. मॉंटगॉमरीच्या शेजारीं चिरूट फुंकीत चर्चिल बसले होते. जनरल रोमेलचें युद्धकौशल्य, वाळवंटांतल्या युद्धांतले डावपेच, ब्रिटिशांच्या युद्धसाहित्यांतले नवे रणगाडे अशा अनेक गोष्टींसंबंधी प्रश्नोत्तरें चालू असतां चर्चिल स्वस्थ होते. मुलाखतीची वेळ संपत आली तेव्हा एका वृत्तपत्रप्रतिनिधीने मॉंटगॉमरीला विचारलें, " तुमची प्रकृति या वयांत इतकी चांगली आहे, याचें कारण सांगूं शकाल का ?– "

" मी जाग्रणें करीत नाहीं, तंबाखू ओढत नाहीं आणि मद्य प्राशन करीत नाहीं म्हणून माझी प्रकृति शंभर टक्के सुदृढ आहे– " ' मॉन्टीने ' कांहीशा अभिमानाने उत्तर दिलें ! जनरल रोमेलचा पराभव केल्यामुळे शेफारून गेलेल्या सेनापतीची मिजास उतरविलीच पाहिजे असें वाटूनच की काय, चर्चिल यांनी कांही काळ आपल्या तोंडांतला चिरूट हातांत घेतला आणि ते म्हणाले,

" मी जाग्रणें करतों, चिरूट ओढतों आणि मद्य प्राशन करतों–माझी प्रकृति दोनशे टक्के सुदृढ आहे ! "

चर्चिल जागे होतात त्या वेळीं सूर्योदय होऊन तास दोन तास झालेले असले तरी ते पथारीची संगत सोडत नाहीत ! सकाळचे साडेदहा वाजले तरी त्यांचे सर्व व्यवहार बिछान्यावरच चालू असतात ! सकाळीं उठल्या-नंतर प्रथम ते संत्र्याचा रस घेतात. वर्तमानपत्रांवरून नजर फिरते आहे,

पहिल्या चिरुटाचा परिमल खोलींत पसरला आहे आणि सकाळचे नऊ वाजताहेत अशा वेळीं त्यांच्या न्याहारीची वेळ होते. कांहीं खाद्यपदार्थ, चहा आणि सौम्य जातीचें मद्य अशा वस्तु त्यांच्या बिछान्याशेजारी मांडल्या जातात आणि बिछान्यांत बसल्या बसल्याच चर्चिल आपली न्याहारी उरकतात. न्याहारीच्या वेळीं चहा घेतला म्हणजे सबंध दिवसांत पुन्हा चहाच्या ‘ वाटेला ’ ते जात नाहीत !

न्याहारी संपल्यानंतर मात्र लगेच ते उद्योगाला लागतात. ज्या ग्रंथाचें लेखन चालू असेल त्याचीं टाचणें तयार करणें, एखादें महत्त्वाचें भाषण करायचें असलें तर त्याची रूपरेखा आखणें, टंकलिखित झालेला मजकूर तपासणें आणि ज्या ग्रंथाचें मुद्रण चालू असेल त्याचीं स्थूल मुद्रितें तपासणें वगैरे कार्यक्रम बिछान्यांतच चालू असतात. हे कार्यक्रम चालू असतां व्हिस्कीचा पहिला प्याला शेजारच्या तिपाईवर असतो ! मधून मधून त्याचा एखादा घोट चर्चिल घेत असतात. सकाळीं त्यांच्या भेटीला कोणी आलें तरी चर्चिल दिवाणखान्यांत जाणार नाहीत--सर्व गाठीभेटी बिछान्यावर बसूनच !

टाचणांचें, टिपणांचें आणि मजकूर तपासण्याचें काम संपलें, की शेजारच्या स्नानगृहाकडे त्यांचा मोर्चा वळतो ! त्यांच्या खोलीचें उष्णतामान नेहमी ७४ डिग्री फॅरनहीट राहील अशी व्यवस्था केलेली असते–अंघोळीच्या पाण्याचें उष्णतामानसुद्धा ठराविकच असतें. पाण्याने भरलेल्या प्रशस्त ‘ टब ’मध्ये चर्चिल एकदा शिरले म्हणजे त्यांत किती वेळ वास्तव्य करतील त्याचा नियम नाही ! कोणत्याहि भाषणाची तालीम टबमध्ये पडल्या पडल्याच होत असते ! एखादा महत्त्वाच्या मजकूर सुचला तर ते चिटणिसाला हाक मारतात, चिटणीस कागद आणि पेन्सिल घेऊन धावतो आणि स्नानगृहाच्या बाहेर बसतो—चर्चिल त्याला टबमधून मजकूर सांगत असतात, आणि तो लिहून घेत असतो ! असें कांही महत्त्वाचें सुचलें नाही म्हणजे टबमध्ये पडल्या पडल्या चर्चिल गुणगुणूं लागतात--त्यांच्या गुणगुणण्याला कालांतराने गाण्याचें स्वरूप प्राप्त होतें ! चर्चिल यांचें गणगणणें सुरांत आहे असा सुरुवातीला ‘ भास ’ झाला, तरी तो नुसता भासच असतो ! गुणगुणणें आणि गाणें जितकें लांबेल तितकें तें सुरापासून

दूर जात असतें आणि शेवटीं तर एखादा नवा 'राग' निर्माण झाला आहे असें वाटतें ! प्रत्येक गोष्टीला अंत असतो म्हणूनच चर्चिल यांचें स्नान-गृहांतलें संगीत कांही काळानंतर बंद पडून, ते स्नान-गृहाच्या बाहेर आले म्हणजेच त्यांच्या संगताचे श्रोते सुटकेचा सुस्कारा सोडतात !

स्नानाच्या कार्यक्रमानंतर संतुष्ट झालेल्या मनाला उत्फुल्ल करण्याकरिता, व्हिस्कीच्या दुसऱ्या प्याल्याची गरज वाटल्यास नवल नाहीं ! तो हातांत घेऊन चर्चिल आपल्या विस्तीर्ण बागेंत प्रवेश करतात. बागेची पाहणी आणि तपासणी दररोज झालीच पाहिजे. मालकाला पाहून त्याचा माळी धावून येतो. फुलांच्या आणि फळांच्या लागवडीसंबंधी मालकाच्या सूचना त्याला पटत नसल्या तरी ऐकून घ्याव्या लागतात ! चर्चिल यांच्या सूचनेप्रमाणे झाडांचीं कलमें केलीं, तर कदाचित् माणसेंसुद्धा पैदा होऊन विश्वामित्राच्या आत्म्याला चिरकालीन समाधान लाभेल—पण माळ्याला तें पटत नाहीं ! माळ्याचा उद्धार करण्याच्या भानगडींत न पडतां त्याच्या बरोबर अंग-मेहनतीचीं कामें करतांना चर्चिल वारंवार दृष्टीला पडतात !

फुलांचा आणि फळांचा समाचार घेतल्यानंतर चर्चिल 'शिकारखान्यांत' शिरतात. घोडे, बकरी, कुत्रे, काळीं बदकें आणि मासे असे किती तरी प्राणी त्यांच्या शिकारखान्यांत आहेत. जिवलग जनावरांशीं हितगुज करण्यापूर्वी व्हिस्कीचा तिसरा प्याला येऊन थडकतो ! पाळीव जनावरांच्या पाठीवरून हात फिरवणें, त्यांना कुरवाळणें, माशांबरोबर बोलणें—असा कार्यक्रम बराच वेळ चालू असतो. प्रत्येक प्राण्याला नांव दिलेलें असतें आणि चर्चिलना तें माहीत असतें. एखादें जनावर आजारी पडलें किंवा मेलें म्हणजे त्यांना अतिशय दुःख होतें.

आता दुपारच्या जेवणाची वेळ झालेली असते. दोन्ही वेळच्या जेवणाच्या वेळीं दररोज कांही आमंत्रित हे असायचेच ! बायको, मुलें आणि आमंत्रित जेवणासाठी जमलेले असले तरी चर्चिल बागेंतच असतात ! चर्चिल यांच्या अंगीं अनेक गुण असले, तरी त्या गुणांत वक्तशीरपणाची कधीहि नोंद झालेली नाही ! आगाऊ ठरलेल्या महत्त्वाच्या कार्यक्रमासाठीसुद्धा चर्चिल घरांतून उशीरा बाहेर पडतात आणि मग वेळ संभाळण्यासाठी त्यांच्या ड्रायव्हरला ताशी ऐंशी मैल वेगाने मोटार हाकावी लागली, तरी त्याला

" आणखी वेगाने–आणखी वेगाने "–असे आदेश ऐकावेच लागतात! चर्चिल यांच्या दिमतीला कोणताहि नवा नोकर नेमावयाचा असला म्हणजे 'बाईसाहेब' त्याला एकच कानमंत्र देत असतात––" प्रत्येक कार्यक्रमाला स्वारी वेळेवर हजर राहील ही खबरदारी घेत जा ! "

भोजनाची सुरुवात होण्यापूर्वी चर्चिल यांच्या पायांजवळ त्यांच्या लाडक्या रूफस कुत्र्याची थाळी अगोदर आणून ठेवावी लागते. रूफसची थाळी रिकामी होईपर्यंत चर्चिल अन्नाचा एक घाससुद्धा घेत नाहीत आणि, चर्चिल यांनी जेवायला सुरुवात केली नाही तोपर्यंत, बाकीच्या मंडळींना ताटकळत बसावें लागतें. जेवणाचा कार्यक्रम तब्बल दोन तास चालू असे-पर्यंत चर्चिल शँपेनची एक बाटली रिकामी करतात––जेवतां जेवतां राज-कारणाचीं खलबतें चालू असतात.

जेवण संपल्यावर कमीत कमी एक तास वामकुक्षी! काय वाटेल तें झालें तरी वामकुक्षी ही झालीच पाहिजे––काळ युद्धाचा असो किंवा शांततेचा! वामकुक्षीच्या कार्यक्रमांत खंड पडूं नये म्हणून पार्लमेंटमधील त्यांच्या कचेरींत-सुद्धा एक पलंग नेहमी सज्ज असतो. वामकुक्षीसंबंधी चर्चिल म्हणतात, " सकाळीं आठ वाजेपासून मध्यरात्रीपर्यंत माणसाने एकसारखें काम करावें अशी निसर्गाची योजना नाही. दुपारच्या वेळचा वीस मिनिटांचा विस्मृतीचा काळसुद्धा माणसाच्या शरीरांत आणि मनांत नवा जोम उत्पन्न करतो. हा कार्यक्रम मीं युद्धकाळांतसुद्धा पाळला. इतरांनीसुद्धा तो पाळावा अशी माझी शिफारस आहे. "

वामकुक्षी संपल्यानंतर एक तास चित्रकलेची आराधना आणि त्यानंतर, सकाळीं केलेल्या टाचणांच्या आधारावर, चालू असलेल्या ग्रंथाचा किंवा संकल्पित भाषणाचा मजकूर टंकलेखकाला सांगणें! हातीं असलेल्या ग्रंथाचा पांच ते आठ हजार शब्दांचा मजकूर दररोज टंकलिखित होत असतो. त्यानंतर पुन्हा स्नान आणि अर्थातच स्नानगृहांतली गायनाची मैफल !

रात्रीच्या जेवणाची सुरुवात आठ वाजतां होते. जेवणापूर्वी व्हिस्कीचा आणि जेवण करतांना व्हिस्की आणि शँपेनचा खुराक चालूच असतो;

गप्पा, गोष्टी आणि विनोद यांना बहर येतो. चर्चिल यांना स्त्रियांपेक्षा पुरुषांचा सहवास आवडतो. रात्रीच्या जेवणानंतर, इंग्रजांच्या पद्धतीप्रमाणे बायका उठून गेल्या म्हणजे, चर्चिल यांच्या संभाषणाला खरा बहर येतो. ब्रँडीचें सेवन चालूच असतें.

मध्यरात्र झाली म्हणजे पुन्हा ग्रंथलेखनाचा, पत्रलेखनाचा आणि कचेरींतील कामाचा उद्योग सुरू होतो. चर्चिल यांना दर सप्ताहांत जवळ जवळ तीनचारशें पत्रें देतात. त्यांच्यापैकी महत्त्वाच्या पत्रांना उत्तरें द्यावयाचीं असतात. चिटणीस आणि टंकलेखक मेटाकुटीला येतात पण चर्चिल थकलेले नसतात. दिवसांतला शेवटचा—म्हणजे नववा—चिरूट आणि मद्याचा प्याला संपतो, त्या वेळीं कधीकधी पहाटेपूर्वीचे तीन वाजलेले असतात !

* * *

## चार्टवेल आणि हाईडपार्क :

पहिल्या महायुद्धाच्या इतिहासापासून चर्चिलना तीन लक्ष रुपयांची किफायत झाली तेव्हा त्यांनी केंट विभागांतील चार्टवेल येथे एक प्रशस्त मिळकत खरेदी केली. त्यांत दोनशे एकर शेती, ऐंशी एकरांचा बगीचा, चोवीस प्रशस्त खोल्यांची इमारत यांचा समावेश होतो. १९३१ते१९३५ या काळांतील निरुद्योगाच्या काळांत, गवंड्याची भूमिका पत्करून, चर्चिल यांनी त्या आवारांत दोन छोट्या बंगल्या, बागेभोवतालची भिंत आणि पोहण्याचा तलाव स्वतः बांधून काढला ! चर्चिल यांचा दुसरा एक बंगला लंडनमधील हाईड पार्क विभागांत असून त्यांत पंचवीस प्रशस्त खोल्या आहेत. चर्चिल यांच्या संरक्षणासाठी एक गुप्तपोलीस संरक्षक सतत त्यांच्या बरोबर असतो, परंतु 'जगां'तील अत्यंत वाईट रोगी असें प्रशस्तिपत्र चर्चिल यांनी ज्याप्रमाणे त्यांच्या डॉक्टरांकडून मिळविलें आहे, त्याचप्रमाणे संरक्षणाच्या बाबतींत 'अत्यंत अशक्य माणूस' असें प्रशस्तिपत्र त्यांच्या संरक्षकांनी त्यांना दिलें आहे ! चर्चिल हे इतरांमुळे असुरक्षित नसून स्वतः-मुळेच असुरक्षित होत असतात. युद्धकाळांत लंडनवर बॉंबहल्ले सुरू झाले त्या वेळीं त्यांना संभाळणें ही अत्यंत जिकिरीची गोष्ट झाली होती. तळघरांतली सुरक्षितता झुगारून आकाशांतून आग ओकणाऱ्या शत्रूच्या

विमानांशीं आपलीं विमानें कशी झुंज देत आहेत तें पाहायला, आपल्या संरक्षकाची नजर चुकवून, ते गच्चीवर कधी जातील याचा नियम नव्हता !

* * *

**पोषाखाबद्दलची बेफिकिरी :**

इंग्रजी भाषेंतला प्रत्येक शब्द तोलून वापरणारा आणि तिला नवा शृंगार-साज चढविणारा हा माणूस स्वतःच्या पोषाखाच्या बाबतींत अत्यंत उदासीन आणि निष्काळजी आहे ! ते ' फॅशन ' बदलली म्हणून पोषाख बदलणार नाहीत—स्वतःला सोईस्कर वाटेल असा पोषाख ते वापरतात. कपडे जपून वापरण्याची आणि जुने कपडे संभाळण्याची विलक्षण हौस ! स्वतःच्या लग्नाच्या वेळीं त्यांनी जो पोषाख अंगावर चढविला होता त्यासंबंधी एका वृत्तपत्राने लिहिलें होतें, " चर्चिल यांनी जो पोषाख केला होता त्याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करूं शकत नाहीं—तो त्यांना शोभत नव्हता आणि त्यांच्या शरीरा-वर नीट बसतहि नव्हता ! " राजाच्या भेटीला जातांनासुद्धा चर्चिल अद्य-यावत् पोषाख करतील असा भरवसा देतां येत नाही.

* * *

**मनोरंजन :**

संगीत, रेडिओ किंवा मैदानी खेळांचा चर्चिलना षोक नाही—पत्ते खेळणें म्हणजे काळाचा अपव्यय करण्यासारखें आहे असें त्यांचें मत आहे. चित्रपट त्यांना आवडतात, पण ते सुखान्त आणि मनोरंजक किंवा ऐतिहासिक असले तरच ! चित्रपट पाहायला ते चित्रपटगृहांत कधी जाणार नाहीत. चार्टवेल येथील त्यांच्या आवारांत एक छोटेसें चित्रपटगृह आहे. चित्रपटांचे निर्माते, आपले नवे चित्रपट प्रकाशित होण्यापूर्वी, चर्चिलसाहेबांकडे पाठवतात. चित्रपटांच्या दुनियेंतील प्रसिद्ध पुरुष, अलेक्झांडर कोर्डा, हे चर्चिल यांचे पाहुणे म्हणून चार्टवेल येथे वारंवार मुक्काम करीत असत. चार्टवेल येथील चर्चिल यांच्या खाजगी चित्रपटगृहांत चाळीस प्रेक्षक बसण्याची सोय असून त्याचा उपयोग दर रविवारीं केला जातो. चर्चिल यांची कुटुंबीय मंडळी, पाहुणे, चिटणीस, टंकलेखक आणि इतर नोकरचाकर चित्रपटगृहांत

जमल्यानंतर कांहीं वेळानें चर्चिल प्रवेश करतात. त्या वेळीं त्याच्या तोंडांत चिरूट आणि एका हातांत मद्याचा प्याला असतो. चित्रपट आवडला म्हणजे चर्चिल एखाद्या लहान मुलासारखे आनंदित होऊन, "शाबास !–भले बहाद्दर–" असे उद्गार मधून मधून काढीत असतात !

घोड्यांच्या शर्यतीचा चर्चिलना षोक आहे. शर्यतींत स्वतःचे घोडे पळवायला त्यांनी १९४९ सालीं सुरुवात केली. शर्यतीची सुरुवात होण्यापूर्वी ते घोड्याजवळ जाऊन त्याला कुरवाळतील–उत्तेजनाचे चार शब्द त्याच्या बरोबर बोलतील ! पण शर्यतीचा षोक असला तरी चर्चिल जुगारी नाहीत. उत्तम 'खबर' मिळाली तरी तीनचारशे रुपयांपेक्षा जास्त पैसे लावणार नाहीत. सर्व सुखांची लज्जत चाखावी, पण अतिरेक करूं नये असें त्यांचें तत्त्व आहे. त्यांच्या प्रकृतीला मानवतें म्हणूनच ते मद्यपान करतात–ते बेताल झाले आहेत असें कधी दिसणार नाही.

पार्लमेंटच्या सभासदांसाठी तपकिरीची व्यवस्था सरकारने करावी असा इंग्लंडांत पुरातन प्रघात आहे. पार्लमेंटच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ एक शिपाई भली मोठी तपकिरीची पेटी घेऊन बसलेला असतो. त्या दरवाजांतून प्रवेश करतांना चर्चिल यांचे हात नकळत त्या पेटींत जातात आणि चिमूटभर तपकीर घेतल्यानंतरच ते पुढे पाऊल टाकतात ! चर्चिल येण्यापूर्वी पार्लमेंटची बैठक सुरू झालेली असते. प्रथम ते धूम्रपानासाठी राखून ठेवलेल्या खोलींत जातात, कांही काळ स्वस्थ बसतात आणि नंतर सभागृहांत प्रवेश करतात. चालू असलेल्या कामकाजांत 'रस' नसला म्हणजे मंत्र्यांची किंवा विरोधी पक्षाच्या पुढाऱ्यांचीं व्यंगचित्रें काढीत बसतात.

महत्त्वाची गोष्ट अशी कीं, पार्लमेंटच्या सभासदांना आणि माजी पंतप्रधानांना वर्षाकाठी तीस हजार रुपये तनखा घेण्याचा हक्क असला तरी चर्चिल यांनी तो कधी घेतला नाही !

* * *

**वैवाहिक जीवन :**

चर्चिल यांच्या कामाचा व्याप इतका अफाट आहे, की तो संभाळण्यासाठी त्यांचे सहा चिटणीस एकसारखे झटत असतात. आपल्या भाषणांची

जुळणी आणि मांडणी करण्याकरिता चर्चिल अतोनात परिश्रम करतात. ज्या माहितीचा भाषणांत समावेश करावयाचा असेल ती अचूक आहे याची ते खात्री करून घेतात. ‘ स ’ हें अक्षर त्यांना सफाईने उच्चारतां येत नाही, म्हणून त्या अक्षराने सुरुवात किंवा शेवट होणारे शब्द ते शक्य तो टाळतात ! भाषणाची जुळणी मनपसंत होईपर्यंत त्याच्यावर सफाईचा हात फिरवायचो त्यांना सवय असल्यामुळे, साधारण महत्त्वाचें भाषण तयार व्हायलासुद्धा कधी कधी दोन किंवा तीन दिवस लागतात. साधे, सोपे आणि बोली भाषेंतले शब्द वापरण्यावर त्यांचा विशेष कटाक्ष असतो. मनासारखें भाषण तयार झाल्यावर त्याची एक प्रत ‘ बाईसाहेबांकडे ’ रवाना होते आणि त्यांनी एखादी महत्त्वाची सूचना केली तर तिचा स्वीकार केला जातो. त्यानंतर आरशासमोर उभे राहून भाषण हावभावां-सकट म्हणायचें आणि चुकीचे किंवा अस्पष्ट शब्दोच्चार होत नाहीत याची खात्री करून घेण्यासाठी तें ध्वनिमुद्रित करून ऐकावयाचें ! इतक्या खटा-टोपानंतर समग्र भाषण तोंडपाठ झालें असल्यास नवल नाही.

चर्चिल यांच्या जीवनांत त्यांच्या पत्नीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. चर्चिल यांना सुखी करण्याकरिता झटणें हें एकच ध्येय तिने आपल्या नजरेसमोर ठेविलें आहे. चर्चिल हे अत्यंत निष्ठावंत पति आहेत. त्यांच्या चारित्र्यासंबंधी त्यांच्या शत्रूंनीसुद्धा कधी शंका घेतली नाही किंवा वावगा शब्द उच्चारलेला नाही. चर्चिल हे अतिशय खर्चिक असल्यामुळे पैसा येतो तसा खर्चसुद्धा होतो. श्रीमती चर्चिल यांना त्यामुळे खर्चावर बारीक नजर ठेवावी लागते. वैयक्तिक, कौटुंबिक किंवा राष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगीं श्रीमती चर्चिल हजर नसल्या तर चर्चिल यांना चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. कोणत्याहि महत्त्वाच्या भाषणाची शेवटची तालीम ते श्रीमती चर्चिल यांना करून दाखवितात आणि प्रत्यक्ष भाषणाच्या वेळीं त्या हटकून हजर असतात. भाषण सुरू करण्यापूर्वी श्रीमती चर्चिल यांच्याकडे पाहावयाचें आणि नंतर भाषण सुरू करावयाचें हा चर्चिल यांचा नेहमीचा प्रघात आहे. ‘ माझें सुरुवातीचें जीवन ’ या आत्मचारित्रात्मक ग्रंथांत चर्चिल यांनी म्हटलें आहे, “ माझें लग्न झाल्या दिवसापासून मी अत्यंत सुखांत आणि समाधानांत दिवस घालवितों आहें. ”

* * *

२७

## अवतारकार्य

१९४५ सालच्या सार्वत्रिक निवडणुकींत पराभूत झालेला हुजूर पक्ष १९५१ सालच्या निवडणुकींत विजयी झाल्यामुळे चर्चिल पुन्हा पंतप्रधान झाले. रूझवेल्ट यांच्या मृत्यूमुळे आणि १९४५ सालच्या पदच्युतीमुळे, भूतलाच्या युद्धोत्तर पुनर्रचनेच्या त्यांच्या कल्पना अमलांत आणणें चर्चिल यांना अशक्य झालें होतें. " माझ्या कांही कल्पना आहेत आणि त्या अमलांत याव्या अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे, म्हणूनच मी पक्षीय राजकारणाच्या धकाधकीच्या मामल्यांत पुन्हा पडलों आहें. तसें नसतें, तर मानसन्मानाचें सुख अनुभवीत मी आरामांत राहिलों असतों " असे उद्गार त्यांनी १९५१ सालच्या निवडणुकीपूर्वी काढले होते. अमेरिका आणि इंग्लंड यांची युद्धकाळांतली युति युद्धोत्तरकाळांत अधिक प्रभावी बनली पाहिजे आणि संयुक्त युरोपखंडाची स्थापना झाली पाहिजे असें त्यांना वाटत होतें, पण वयाच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी काळाच्या ओघाला कलाटणी देण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठायीं उरलें नव्हतें !

कोणत्याहि थोर पुरुषाच्या जीवनाचें एखादें प्रमुख कार्य असतें—त्यालाच त्याचें ' अवतारकार्य ' समजतात. राजकारणी चर्चिल–मुत्सद्दी चर्चिल–युद्धकाळाचे नेते चर्चिल, यांचें अवतारकार्य आणि दुसरें महायुद्ध एकाच दिवशीं संपलें होतें ! १९४० च्या मे महिन्यांत चर्चिल पंतप्रधान झाले त्या दिवशीं, " मी नियतीचा हात धरून वाटचाल करतों आहे—माझें पूर्वायुष्य म्हणजे या क्षणासाठी केलेली तयारी होती " असें त्यांना वाटलें होतें आणि तेंच खरें होतें ! ज्या भूमीवर तत्पूर्वीच्या शेकडो वर्षांत आक्रमकांचें पाऊल पडलें नव्हतें, त्या त्यांच्या मातृभूमीचें रक्षण चर्चिल यांच्या बहाद्दर आणि

३४८२४

व्यवहारचतुर बाण्याने केलें आणि तिच्या शत्रूंनी अखेर बिनशर्त शरणागति पत्करिली, त्याच दिवशीं त्यांचें अवतारकार्य संपलें! परंतु, चर्चिल यांचें अवतारकार्य संपलें असलें, तरी मानवतेला त्याचा कधीहि विसर पडणार नाही. लष्करी सामर्थ्यानें नखशिखांत सज्ज असलेल्या निर्दय आणि कावेबाज आक्रमकाचा प्रतिकार करण्याचा ज्या ज्या वेळीं एखाद्या राष्ट्रावर प्रसंग येईल, त्या त्या वेळीं चर्चिल यांच्या कृति आणि उक्ति त्या राष्ट्राला मार्गदर्शक ठरतील!

* * *

## साहित्याचें नोबेल पारितोषिक :

एक महान् साहित्यिक म्हणून चर्चिल इंग्रजी भाषेच्या इतिहासांतच नव्हे, तर साहित्याच्या जागतिक इतिहासांतसुद्धा अजरामर ठरतील. युद्धोत्तर काळांतील व्याधींनी आणि उपाधींनी व्याकुळ झालेल्या जगाला दुसरें महायुद्ध आणि त्या युद्धांतील लोकशाही राष्ट्रांचा विजय या गोष्टी, जणू काय, दूरच्या भूतकाळांत घडल्या आहेत असें वाटूं लागलें असतां, साहित्यिक चर्चिल यांचा गौरव होत होता. १९५३ सालचें साहित्याचें नोबेल पारितोषक चर्चिल यांना मिळालें, पण तें स्वीकारण्यासाठी जातीनें हजर राहणें त्यांना अशक्य झालें. त्या वेळीं जागतिक प्रश्नासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता ते अमारकचे अध्यक्ष, जनरल आयसेनहोअर, यांच्या भेटीला गेले असल्यामुळे, तें पारितोषक स्वीकारायला त्यांच्यातर्फे श्रीमती चर्चिल हजर राहिल्या. त्या वेळीं स्वीडनचे प्रख्यात लेखक सिगफ्रीड सीवेर्ट म्हणाले, " महान् मुत्सद्दी किंवा महान् योद्धा हा महान् साहित्यिकहि असावा असें क्वचितच घडतें. दशदिशांत झंजावाताचें तांडव नृत्य चालू असतां निश्चल राहण्याचा गुण चर्चिल यांच्या अंगीं असून, त्यांच्या शब्दांत आणि कृतींत नेहमी निर्धार आणि आत्मविश्वास दिसून येतो. इतिहासांत ज्याला तोड सापडणार नाही असें राजकीय आणि साहित्यिक यश चर्चिल यांनी मिळविलें आहे. आपल्या महान् भाषणांमुळे त्यांचें चिरकालीन स्मारक चर्चिल यांनी स्वतःच निर्माण केलें आहे. "

* * *

**अविस्मरणीय वाढदिवस :**

३० नोव्हेंबर १९५४ रोजी चर्चिल यांच्या वयाचीं ऐंशी वर्षें पूर्ण झालीं त्या दिवशीं त्यांचा सन्मान करायला लंडन शहरांत हजारों लोक एकत्र जमले होते. वेस्टमिन्स्टर अॅबेच्या पुरातन इमारतींत जमलेल्या पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांच्या चोवीसशे सभासदांच्या डोळ्यांत आनंदाचे आणि कृतज्ञतेचे अश्रु चमकत होते. चर्चिल यांच्यासाठी उभारलेल्या निधीचा पंधरा लक्ष रुपयांचा पहिला हप्ता त्या दिवशीं त्यांच्या स्वाधीन केला, त्याचा विनियोग ते सार्वजनिक हितासाठी करणार आहेत. त्यांच्या कांहीं मित्रांनी चार्टवेल येथील चर्चिल यांची मिळकत विकत घेतली असून, चर्चिल यांच्या हयातीत त्यांनी ती विनामूल्य वापरावी आणि त्यानंतर त्यांचें राष्ट्रीय स्मारक म्हणून ती विश्वस्तांच्या ताब्यांत द्यावी अशी योजना आहे. त्या अविस्मरणीय वाढदिवसाच्या समारंभासाठी प्रत्येकी शंभर पौंड वजनाच्या ' केक्स् ' तयार केल्या होत्या, त्या चर्चिल यांना शंभर वर्षांचें आयुर्मान लाभावें असेंच सुचवीत होत्या. त्यांपैकी एका केकवर ऐंशी मेणबत्त्यांच्या ऐंशी ज्योति दिसत होत्या तर दुसरीवर, ' असा मनुष्य आम्हाला पुन्हा दिसणार नाहीं ' हीं अक्षरें कोरलीं होतीं. अभिनंदनाच्या भाषणांना सद्गदित अन्तःकरणाने उत्तर देतांना चर्चिल म्हणाले,

" मी माझ्या प्रवासाच्या शेवटच्या पल्ल्याजवळ येऊन ठेपलों आहें. हा दिवस म्हणजे माझ्या आयुष्यांतला सर्वांत संस्मरणीय दिवस समजला पाहिजे. कारण, आपणा सर्वांचें मजवरील प्रेम आज व्यक्त झालें आहे— आज व्यक्त झालेल्या भावना मी कधींहि विसरणार नाहीं. "

* * *

**राजकारणाला रामराम :**

त्यानंतर, ५ एप्रिल १९५५ रोजीं, चर्चिल यांनी पंतप्रधानकीचा राजीनामा देऊन आपल्या जागीं अँथनी एडन यांची योजना करण्याचा सल्ला राणीला दिला. चर्चिल यांच्या जीवनाच्या सुरुवातीला इंग्लंडमध्ये व्हिक्टोरिया राणीचें राज्य होतें, त्यांच्या राजकीय जीवनाच्या समारोपाच्या वेळीं एलिझाबेथ राणीचें राज्य चालू होतें. या दोन राण्यांच्या राजवटींच्या

दरम्यानच्या कालखंडांत भूतलाच्या स्वरूपांत कल्पनातीत बदल झाला होता. राणीच्या हातीं आपला राजीनामा सादर करण्याच्या भावनात्मक दिव्याचा चर्चिल यांच्या मनावर अतिशय परिणाम झाल्यामुळे, पार्लमेंटांत जाऊन सभासदांचा निरोप घेण्याचा कार्यक्रम त्यांनी ऐनवेळीं रद्द केला ! चर्चिल यांच्या भाषणामुळे राजकारण गाजलें, पण त्यांच्या राजकारणनिवृत्तीच्या दिवशीं एकहि भाषण झालें नाही.

मोठीं माणसें आणि छोट्या घटना अशा थाटांतला व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीचा सुखी आणि संपन्न काळ, बातमीदार या नात्याने निरनिराळ्या रणांगणांवर संचार करण्याचा काळ, बोअर लोकांच्या हातीं सापडून त्यांच्या तुरुंगांतून निसटण्याची घटना, किचनेरसारख्या सेनानायकावर टीका करण्याचा आणि सुदानच्या मोहिमेचा काळ, हुजूर पक्षाच्या इतराजीचा आणि मर्जीचा काळ, कैसर बादशहा–हिंडेनबुर्ग, क्लेमेन्को यांचा काळ आणि दार्दानेल्सच्या मोहिमेच्या अपयशाचा काळ, जर्मनीच्या वाढत्या सामर्थ्याविरुद्ध इषारे देण्याचा आणि बाल्डविनसाहेबांशीं केलेल्या झगड्याचा काळ, आठव्या एडवर्डच्या पदच्युतीचा काळ आणि फ्रान्सच्या पतनानंतरचा भीषण काळ, दुसऱ्या महायुद्धांतील हिटलरच्या शत्रुत्वाचा आणि रूझवेल्ट यांच्या मैत्रीचा काळ–या सर्व गोष्टी इतिहासजमा झाल्या होत्या !

राजीनामा देण्यासाठी राजवाड्यांत जातांना चर्चिल यांच्या चेहऱ्यावर झळकणारें स्मित, राजवाड्यांतून परत येतांना नाहीसें झाले होतें. आपल्या मोटारींतून उतरून डाऊनिंग रस्त्यावरील आपल्या कचेरींत चर्चिल जाऊं लागले, त्या वेळीं त्यांचा जयजयकार करणाऱ्या जमावासमोर, डोक्यावरील टोपी काढून ते उभे राहिले–अत्यंत अस्पष्ट असें स्मित त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा झळकलें !

“ भाषण करा–भाषण करा ” असा कोलाहल त्या जमावाने केला !

भाषणाचें आव्हान दिलें असतां काय करावें तें न सुचण्याचा चर्चिल यांच्या आयुष्यांतला तो पहिलाच प्रसंग ! त्यांनी उजवा हात वर उचलला आणि युद्धकाळांत लोकप्रिय झालेली त्यांची ती सुप्रसिद्ध ‘ विजयाची खूण ’ केली–त्याच क्षणीं त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या !

जमावाकडे पाठ फिरवून चर्चिल आपल्या कचेरीच्या पायऱ्या चढूं लागले. आपल्या गर्जनेमुळे युद्धकाळांत आपल्या देशबांधवांना धीर आणि आधार देणारा सिंह त्या दिवशीं भावनावेगामुळे मूक झाला होता !

* * *

**एकदाच करण्यासारखा प्रवास :**

आयुष्यांत आपण ज्या चुका केल्या त्यांची जाणीव कायम राहून आपलें जीवन परत जगण्याची जर संधि मिळाली, तर किती बहार होईल ? पूर्वीच्या सर्व चुका टाळण्याची संधि मिळाल्यामुळे आपण कदाचित् सुखी होऊं, पण ज्या पूर्वी केल्या नाहीत त्या चुका दुसऱ्या खेपेला करून आपण अधिकच दुःखी झालों तर ? यासंबंधी लिहितांना चर्चिल म्हणतात,

" आपण जर आपल्या आयुष्याचें सिंहावलोकन केलें तर असें दिसून येईल की, आपण केलेल्या कांही चुका आपल्या फायद्याच्या ठरल्या असून, आपण जे निर्णय अत्यंत विचारपूर्वक घेतले ते अत्यंत नुकसानीचे ठरले आहेत. धूम्रपानाच्या पायीं मीं किती पैसा खर्च केला आहे त्याचा विचार करा ! तोच पैसा जर मी एखाद्या फायदेशीर धंद्यांत गुंतविला असता, तर त्याची दामदुप्पट झाली असती. परंतु, धूम्रपानाचा माझ्या मनावर जो शांततामय परिणाम होतो, त्याच्या अभावीं एखाद्या कसोटीच्या प्रसंगीं मला सभ्यता आणि शिष्टाचार संभाळून वागतां आलें असतें ही खात्री कोणीं द्यावी ?

" हेंच आयुष्य पुन्हा जगावें असें मला खरोखरच वाटत नाहीं. माझें जीवन सुखी आणि प्रसंगपूर्ण आहे. पण तीच कष्टदायक आणि धोक्याची वाटचाल पुन्हा करावी असें मला वाटत नाही. नव्या चुका करण्यासाठी आणि निराळ्या प्रकारचीं साहसें आणि यश अनुभवण्याच्या मोहामुळेसुद्धा मी तशी संधि पुन्हा स्वीकारणार नाही. कारण, या घटकेपर्यंत दैवाने मला जसा वारंवार हात दिला आहे तसा पुन्हा तेंच जीवन जगत असतांना एखाद्या मोक्याच्या प्रसंगीं दैवाने हात दिला नाही तर ?

" आपल्या वाटेला जें सुख आलें आणि ज्या संकटांपासून आपलें रक्षण झालें त्याबद्दल आपण परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत. आपल्याला

लाभलेल्या सुखाचा आनंद मानावा–दुःखाचा शोक करीत बसूं नये. सुख आणि दुःख–दोहोंचाहि आयुष्यांत समभावानें स्वीकार केला पाहिजे. माझ्या जीवनाचा प्रवास सुखाचा होता आणि करण्यासारखाहि होता !–पण एकदाच, बरं का ! ”

## कांहीं अशुद्धें

| पृ. | | ओळ | | ऐवजी | | वाचावें |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | – | २ | – | चवथ्या | – | तिसऱ्या |
| १८ | – | ११ | – | पांच–चार | – | चार–पांच |
| ४३ | – | २६ | – | ठराव | – | ठराव दोघांनी |
| ४३ | – | २६ | – | कीं, दोघांनी | – | कीं, |
| ५९ | – | २३ | – | बरोबरीचे | – | सकट |
| ६५ | – | ४ | – | चापसले | – | चाचपले |
| ८४ | – | २० | – | तीस | – | एकतीस |
| १२३ | – | ५ | – | मात्र | – | पात्र |
| १७६ | – | २ | – | मतें | – | मनें |

* * *

## सूची


अमेरी, एल्. एस्–११, १५९
अलेक्झांडर ( जनरल ) २१४
ॲटली ( मेजर ) १३६, २१८
आयसनहोअर ( जनरल ) २००, २५७
ऑस्क्विथ १७, ८१, ८५, ९२, ९३, ९७–९९, १०१, १०३, ११५
एव्हरेस्ट ( मिसेस ) ६, ७
एडवर्ड, सातवा ७८, ८७, ९२, १२८
एडवर्ड, आठवा १२२, १२३, १२९, १४०
एडन–ॲन्थनी २५८
एलिझाबेथ ( महाराणी ) २५८
ओस्कर वाईल्ड २३९
ओशिया, किटी २४२, २४३
किचनेर ( लॉर्ड ) ३६, ३७, ३९, ४०, ४३, ७२, ९९, १०१, १०२, १२७, १३३, २५९
कैसर, विल्यम ८९, ९२, ९९, १०६, १४२, २३२–२३४
कोर्डा, अलेक्झांडर २५३
कोननडाईल, ऑर्थर ७७
कॉलिन्स, मायकेल १११, १२९
क्रूगर ( प्रेसिडेंट ) ४७, ५०, ५८, ५९
क्राम्वेल १५९
क्रिप्स, स्टाफोर्ड १७५
क्रेमेन्को ११०
गार्डिनर, ए. जी. १२६, १३०
गांधी ( महात्मा ) १९४
गॉर्डन ( लॉर्ड ) ३५
गोअरिंग १४७
ग्रे, एडवर्ड ८५, ८८
ग्लॅडस्टन, ६, १५, १६ २४२
चर्चिल, जॉन ( मार्लबरो ) २, ५, २२२
चर्चिल, जेमी ३४
चर्चिल, क्लेमंटाईन ८६, २५५–२५७
चर्चिल, रॅन्डॉल्फ ३, ४, ६, १३, १५–१७, २०, २१, २७, ४२, ४९, ७२, ७९, ८०, ८२, ८३, ११७, २२२
चार्ली चॅपलीन १२५, २२९
चांग काय शेक १९७
चेंबरलेन ऑस्टिन १७, ११७
चेंबरलेन, जोसेफ ८२

चेंबरलेन, नेव्हिल ११७, १२७, १४०, १४३, १४५–१४७, १४८, १४९, १५१, १५८–१६०, १६७, १७४
जॅक स्कॉट १०८, १०९
जॉर्ज, पांचवा १२२
जॉर्ज, सहावा १४०
जीराल्ड ( विल्यम ) ४९, ५०
जेम्स ( कॅप्टन ) १३, १४
जेरोम ( लिओनार्ड ) ३
ट्राटेस्की १०९, २३७
ट्रूमन ( प्रेसिडेंट ) २१६, २१७
डफरीन ( लॉर्ड ) ७७
डिसरेली ३, ६
डी गॉल ( जनरल ) १६५
थॉपसन् ११३, १७४
निझाम २८
नेहरू, जवाहरलाल २०६
नेपोलियन २०, ५४, ८८, १२७, १४२, १६३, १८६, २०१
पॅंखर्स्ट, सिलव्हिया ८४
पारनेल २४२, २४३
पेताँ ( मार्शल ) १६५, १६६, १७२
फ्रँको ( जनरल ) १७२
फॉश ( मार्शल ) १३३, १६४
फिशर ( लॉर्ड ) ९४, १०१
फ्रेंच, सर जॉन, १०३
बर्क, एडमंड ११५
बर्कनहेड ( एफ. ई. स्मिथ ) ८३, ९०, ९१, ९५
बार्नेस, रेजिनॉल्ड २४–२६
बालफोर १७, ७६, ११४
बाल्डविन, स्टॅनले ११५, ११७, ११९, १२१–१२३, १३१, १३६–१३८, १४०
ब्रॅबझॉन ( कर्नल ) २१, २२
ब्रॉकी ( लेफ्टनंट ) ५८, ६१
बिंडोन ब्लड २७, ३१–३३
बीव्हरब्रुक ( लॉर्ड ) २१७
बुलर, रेडव्हर्स ४८–५०, ७२
बेनटॉक ( डॉक्टर ) ६९
बोथा, ( जनरल ) ५४, ५५, ७१, ७५, १२९
महादी ३५, ३९, ४०, ४३
मॅकडोनाल्ड, रॅमसे ११५, १२१, १२२, १३१, १३५, १३६
मार्क ट्वेन ४, ७८
मॉटगॉमरी (जनरल) २०१, २४८
मॉलाटोव्ह १९६
मुसलोनी, बेनिटो १३७, १३८, १४१, १४४, १६३, १६४, १६६, १७२, १७४, १७७, १८०, १८२, १८५, १९५, २००, २०१, २३७
मोरॅन ( लॉर्ड ) ११३
मोरिन, चॉर्ल्स १०५, २१९

मोर्ले, जॉन १७, ८१, ८२, ८५, ९७, २२८
रॉबर्टस ( लॉर्ड ) ७२, ७३, ७५
रिबेन्ट्रॉफ १४३
रुझवेल्ट, फ्रँकलीन १५६, १६२, १७५–१७९, १८२, १८९–१९१, १९३, १९५–१९७, १९९, २००, २१२–२१६
रोजबेरी ( लॉर्ड ) १७, २०, ७७, ८१, ८३, २२८
रोमेल ( जनरल ) १८५, १९४, १९५, १९८, २४८
लॅन्सबरी, जॉर्ज १३९
लॅव्हरी, सर जॉन १०४
लॉईड जॉर्ज, ८०, ८१, ८७–८९, ९५, १०५, १०७, १०९, ११०, १५९, २३१
लॉरेन्स ( कर्नल ) ११०, १११
लेनिन १०९
लो ( व्यंगचित्रकार ) २२९
विल्सन, वुड्रो ११०
विल्की, वेंडेल १८९
व्हिक्टोरिया ( महाराणी ) २१–२३, ७८, १२८, २२८, २५८
वेल्स, एच्. जी. ११४
वेव्हल ( जनरल ) १६६, १८०
शॉ, बर्नार्ड २३९–२४१
स्मटस् ( जनरल ) ७५, १२९, १७५, २१३
सॅलिसबरी (लॉर्ड) १५, १६, ३६, ३७, ७६
स्टालीन, जोसेफ १५१, १५७, १६२, १७५, १८७, १८९, १९५–१९७, १९९, २०१, २१२–२१४, २१७, २१८, २३८
सेसिल ( लॉर्ड ) ८२, ८३
स्नोडाऊन, फिलिफ ११९
हॅमिल्टन, इआन ९९
हालडेन ( कॅप्टन ) ५१–५४, ५७, ५८, ६०, ६१
हॉपकिन्स, हॅरी १७८, १७९, १९०, १९६
हॉवर्ड, जॉन ६७–७०
हिटलर, अडॉल्फ २, १३५, १३६, १३८–१४९, १५१, १५५–१६०, १६२–१६८, १७१, १७२, १७४, १७५, १७७, १८०, १८३–१८९, १९१, १९५–१९७, २००, २०१, २०५–२०७, २१२, २१४, २३४–२३६, २४४–२४७.

दा. क. 73913
(स्थळ प्रत)